Estd. 1962
A +++ Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५

शिवाजी विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त अभ्यासक्रमानुसार

# दूरशिक्षण केंद्र

बी. ए. -एक: संस्कृत (DSC)

## संस्कृत महाकाव्यांचा परिचय

Course Number: 01

Sem- 1 (सत्र -१) Course Code: BAU0325DSL205A01

# स्वयं अध्ययन साहित्य

## २०२४

ISBN : 978-93-49570-47-4

# अभ्यास-घटकांचे लेखक
# संस्कृत महाकाव्यांचा परिचय

| घटक क्र. | घटक नाव | लेखक |
|---|---|---|
| १ | महाकाव्याची लक्षणे | डॉ. कावेरी नारायणराव जाधव |
| २ | कालिदासकृत रघुवंशम्<br>प्रथम: सर्ग: (श्लोक- १- २५) | प्रा. (डॉ.) मृणालिनी आबासाहेब शिंदे |
| ३ | माघकृत शिशुपालवधम्<br>द्वितीय: सर्ग: (श्लोक - २६ - ५०) | डॉ. कावेरी नारायणराव जाधव |
| ४ | भारवीकृत किरातार्जुनीयम्<br>प्रथम: सर्ग: (श्लोक - १ - २५) | डॉ. कावेरी नारायणराव जाधव |


संपादक

डॉ. कावेरी नारायणराव जाधव
सहाय्यक प्राध्यापक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

प्रा. (डॉ.) श्रीमती मृणालिनी आबासाहेब शिंदे
अध्यक्ष, सं. अ. मं. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
संस्कृत विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

# प्रस्तावना

सहृदय, विद्यार्थी बंधुभगिनींनो,

आपण शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर दूरशिक्षण केंद्राचे विद्यार्थी आहात. त्याबद्दल आपले मन:पूर्वक हार्दिक स्वागत ! संस्कृत विषयाचे अध्ययन करण्यास आपण प्रवृत्त झालात. त्याबद्दल आपले हार्दिक अभिनंदन !

प्रतिवर्षप्रमाणे याही वर्षी बी. ए. भाग-१ च्या संस्कृत (DSC) सत्र -१, पेपर नं. १, (संस्कृत महाकाव्यांचा परिचय)चे स्वयं अध्ययन साहित्य आपणास बहाल करीत असताना संपादक मंडळाला मनस्वी आनंद होत आहे. प्रतिवर्षप्रमाणे याही वर्षी स्वयं अध्ययन साहित्याचा उपयोग करून आपण संस्कृत विषयाच्या अध्ययनाचा आनंद प्राप्त कराल, असा पूर्ण विश्वास वाटतो. तसेच पुढील वर्षीही Mejor संस्कृत हा विषय निवडाल, अशीही खात्री वाटते. आपली संस्कृत विषयातील जिज्ञासा, आवड वृद्धिंगत होवो आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ध्येय सफलतेप्रत जावो, हीच सदिच्छा!
अध्ययन करताना काही समस्या, अडचणी आल्यास आपण ह्या स्वयं अध्ययन साहित्य निर्मिती संपादक मंडळाशी किंवा घटक लेखकांशी आनंदाने संपर्क साधावा.

**प्रा. (डॉ.) श्रीमती मृणालिनी आबासाहेब शिंदे**
**अध्यक्ष, सं. अ. मं. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**
**संस्कृत विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड**

# अनुक्रमणिका
## संस्कृत महाकाव्यांचा परिचय


| घटक क्र. | घटक नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | महाकाव्याची लक्षणे | |
| २ | कालिदासकृत रघुवंशम्- प्रथम: सर्ग: (श्लोक- १- २५) | |
| ३ | माघकृत शिशुपालवधम्- द्वितीय: सर्ग: (श्लोक - २६ - ५०) | |
| ४ | भारवीकृत किरातार्जुनीयम्- प्रथम: सर्ग: (श्लोक - १ - २५) | |

## घटक क्रमांक - १
## महाकाव्याची लक्षणे

### १.१) उद्दिष्टे -

या घटकाच्या अध्ययनातून विद्यार्थ्यांना -

१) महाकाव्य या संस्कृत काव्यप्रकाराची ओळख होईल.

२) आर्ष महाकाव्य व विदग्ध महाकाव्य यांतील फरक कळून येईल.

३) या नियमांचे महाकवींनी त्यांच्या काव्यात कसे उपयोजन केले आहे, ते कळून येईल.

४) महाकाव्यांच्या विकासक्रमाशी ओळख होईल.

### १.२) प्रस्तावना

घटक क्रमांक १ मध्ये आपण महाकाव्याच्या लक्षण आणि स्वरूप यांचा साहित्यशास्त्रदृष्ट्या अभ्यास करणार आहोत. तसेच पंचमहाकाव्यांचा साधारण परिचय सुद्धा करुन घेणार आहोत. पुढील घटक क्रमांक २, ३ व ४ मध्ये येणाऱ्या रघुवंशम्, शिशुपालवधम् आणि किरातार्जुनीयम् या तीन महाकाव्यांच्या काव्यप्रकाराची कल्पना येण्याकरिता प्रथम घटकातील विषयवस्तुशी परिचय करुन घेणे नितांत आवश्यक आहे.

संस्कृत ही प्राचीन भारतातील ज्ञानभाषा असल्याने जितके काही ज्ञानविषय आपल्या पूर्वजांकडून हाताळले गेले, त्यावर चिंतन केले गेले आणि ग्रंथ रचना केली गेली ते सर्व साहित्य बाहुल्याने संस्कृत भाषेतच लिहीले गेले आहे. त्यामुळे ही भाषा विविध विषयांवरील ग्रंथभांडाराने समृद्ध आहे. यात जेवढे विविध शास्त्रे, दर्शने, आणि धार्मिक आदी विषयांवरील अगणित ग्रंथ उपलब्ध आहेत, तेवढेच विपुल ललित वाङ्मयीन साहित्य सुद्धा आहे. संस्कृत या एकाच भाषेत रचलेले असले तरी सुद्धा या भाषेतील वाङ्मयाचे मुख्यत्वे त्याच्या भाषेच्या व्याकरणाच्या, विषयाच्या आणि प्राचीनतेच्या आधारावर वैदिक साहित्य आणि लौकिक साहित्य असे दोन भागात विभाजन केले आहे. वैदिक साहित्यात प्रत्येक वेदाची संहिता, ब्राह्मण, आरण्यक, उपनिषद्, प्रातिशाख्य, उपवेद, वेदांग इत्यादी साहित्याचा अंतर्भाव होतो. लौकिक साहित्याचे पुन्हा विज्ञान साहित्य आणि वाङ्मयीन साहित्य असे विभाजन केले जाते. यापैकी विज्ञान साहित्यात संगीत, नृत्य, स्थापत्य, ज्योतिष, आयुर्वेद, राज्यशास्त्र, इत्यादी अशा अगणित शास्त्रांचे विवेचन करणारे साहित्य अंतर्भूत होते. तर वाङ्मयीन साहित्यास काव्य ही सामान्य संज्ञा वापरली जाते. मराठी, हिंदी अशा आधुनिक भाषांमध्ये काव्य म्हटल्यावर पद्यमय, छंदोबद्ध रचना आपल्या डोळ्यांमोर उभी राहते. मात्र संस्कृत साहित्यात काव्य ही संज्ञा केवळ पद्य साहित्यापुरती मर्यादीत नाही. तिचा विस्तार अत्यंत व्यापक आहे. काव्याच्या अनेक प्रकारांपैकी पद्यरचना हा त्याचा केवळ एक प्रकार मानला जातो. महाकाव्याच्या परिचयाअगोदर संस्कृत काव्याचे प्रकार जाणून घेणे, येथे आवश्यक ठरते.

### १.३. विषयविवेचन-

### १.३.१ संस्कृत काव्याचे प्रकार व महाकाव्याचे काव्यातील स्थान –

वैदिकेतर साहित्यातील वाङ्मयीन साहित्याला साहित्यशास्त्रात काव्य अशी निव्वळ एकेरी संज्ञा दिलेली दिसते. मात्र संस्कृत भाषेच्या अभ्यासकांनी या काव्याचे इतर वाङ्मयापासून वेगळेपण दाखविण्याकरिता त्यास अभिजात साहित्य किंवा विदग्ध साहित्य अशी संज्ञा वापरली आहे. स्थळ-काळाच्या सीमा पार करुन जे साहित्य चिरस्थायी ठरते त्यास अभिजात (Classical) साहित्य म्हटले जाते. त्यात त्या-त्या संस्कृतींची नैतिक मूल्ये, आदर्श, प्रतिमा, आशा-आकांक्षा या काव्यरूपाने जतन केलेल्या असतात. यासंदर्भात एका पाश्चात्य विद्वानाचे उद्गार येथे उद्धृत करणे यथोचित ठरते. तो म्हणतो, की तुम्हाला जर नाविन्याचा ध्यास असेल तर शास्त्रीयग्रंथ वाचा आणि चिरंतनाची आस असेल तर अभिजात साहित्य वाचा. संस्कृत भाषेतील काव्याचे आपण कोणत्या इंद्रियांनी त्याचे ग्रहण आणि आस्वाद घेऊ शकतो, या निकषावर दृश्य आणि श्रव्य असे दोन भाग कल्पिले आहेत. दृश्य काव्याचे रूपक आणि उपरूपक असे पुन्हा विभाजन करण्यात येते. जे अभिनयाद्वारे सादर केले जाते, त्यास दृश्य काव्य म्हणतात[1]. जे काव्य दृश्य असते ते श्रव्य सुद्धा असते. मराठी भाषेत ज्यास आपण नाट्य म्हणतो त्यास संस्कृत भाषेत रूपक असे पारिभाषिक नामाभिधान केले आहे. या रूपकाचे दहा प्रकार नाट्यशास्त्राने सांगितले आहेत. त्यापैकी नाटक हा अत्यंत प्रसिद्ध रूपक प्रकार आहे. तर प्रकरण, डिम, व्यायोग, ईहामृग, प्रहसन, समवकार, वीथी, भाण, उत्सृष्टांक असे उर्वरित नऊ प्रकार आहे.[2] तसेच उपरूपकांचे नाटिका, त्रोटक, प्रकरणी इत्यादी अठरा प्रकार केले आहेत. कालिदासाचे अभिज्ञानशाकुन्तलम्, मालविकाग्निमित्रम्, भासाचे स्वप्नवासवदत्तम् ही नाटकाची उदाहरणे होत. तर शुद्रकाचे मृच्छकटिकम्, भवभूतीचे मालतीमाधवम् हे प्रकरण रूपक आहे. हर्षाचे रत्नावली हे उपरूपकांपैकी नाटिका आहे तर कालिदासाचे विक्रमोर्वशीयम् हे त्रोटक नावाचे उपरूपक आहे.

श्रव्य काव्य हे केवळ ऐकले जाते म्हणजे त्याचे अभिनयाद्वारे सादरीकरण केले जात नाही. याचे पुढे गद्य, पद्य आणि चंपू असे तीन प्रकार होतात. यापैकी वृत्त-छंदविरहीत काव्यरचनेला गद्य म्हणतात. याचे पुन्हा कथा व आख्यायिका असे दोन उपभेद केले आहेत. विभागविरहीत, संस्कृत किंवा प्राकृत अशा कोणत्याही भाषेत, कल्पित कथानकावर आधारलेल्या गद्यरचनेस कथा असे म्हणतात. यात सुबन्धूची वासवदत्ता, बाणभट्टाची कादंबरी, दण्डीचे दशकुमारचरितम् ही कथेची उहाहरणे आहेत तर उच्छवास आदि विभागात विभाजित केलेल्या, संस्कृत भाषेत रचलेल्या आणि ऐतिहासिक कथानकावर बेतलेल्या गद्य रचनेस आख्यायिका असे म्हणतात. बाणभट्टाचे हर्षचरितम् हे आख्यायिकेचे एकमेव उदाहरण सध्या संस्कृत साहित्यात उपलब्ध आहे. गद्य व पद्य रचनेचे संमिश्रण ज्या काव्यरचनेत आढळते, त्यास चंपू काव्य असे म्हणतात. भोजराजाचे रामायणचंपू, अनंतभट्टाचे भारतचंपू, त्रिविक्रमभट्टाचे नलचंपू, वेंकटाध्वरि यांचे विश्वगुणादर्शचंपू हे प्रसिद्ध चंपू ग्रंथ आहेत.

---

[1] दृश्यं तत्राभिनेयम्। तद्रूपारोत्तु रूपकम्। साहित्यदर्पण, ६.१.

[2] नाटकमथ प्रकरणं भाणव्यायोगसमवकारडिमाः। ईहामृगाङ्कवीथ्यः प्रहसनमिति रूपकाणि दश।। तत्रैव, ६.४.

छंदांमध्ये बद्ध असणाऱ्या काव्यरचनेस पद्य रचना म्हणतात.[3] याचे मुक्तक आणि प्रबंध असे पद्यबांधणीच्या आधारावर दोन भाग होतात. जर पद्य रचनेत अथ पासून इति पर्यंत, साद्यंत सुसंबंधित कथानक मांडले असल्यास त्यास प्रबंध रचना म्हणतात, उदाहरणार्थ, नैषधीयचरितम् मध्ये आदिकाव्यात सुरुवातीपासून शेवटपर्यंत नल या एकाच नायकाविषयीच्या कथाप्रसंगाचे चित्रण केलेले असल्याने ते प्रबंधकाव्य ठरते. मात्र जर एका श्लोकाच्या विषयाचा दुसऱ्या श्लोकातील विषयाशी संबंध नसेल तर त्यास मुक्तक रचना म्हणतात. जसे, सुभाषितसंग्रहांमधील एक -एक श्लोक विचार-मौक्तिक प्रकट करतो मात्र त्याचा पुढील श्लोकांशी किंवा परस्परांशी संबंध असेलच असे नाही.

प्रबंध रचनेचे पुन्हा महाकाव्य आणि खंडकाव्य असे दोन भाग केले आहेत. महाकाव्य हे नावाप्रमाणेच मोठे, प्रदीर्घ काव्य असते. यांचा सविस्तर अभ्यास प्रस्तुत घटकात आपण करणार आहोत तर त्या महाकाव्याच्या एका अंशाचा अनुसर करणाऱ्या लघुकाय काव्यास खंडकाव्य म्हणतात, उदाहरणार्थ, कालिदासाचे मेघदूतम्, जयदेवाचे गीतगोविंदम् इत्यादी. अशाप्रकारे, श्रव्यकाव्याच्या पद्यप्रकारातील प्रंबधकाव्याचा एक प्रकार म्हणजे 'महाकाव्य' होय.

### १.३.२ महाकाव्याचा उद्भव -

आजमितीस आपणास संस्कृत साहित्यात उपलब्ध असलेली काव्ये ही महाकाव्याची उत्कर्ष अवस्था दाखवितात. मात्र त्यांचा उगम काव्यक्षेत्रात कशाप्रकारे झाला, याबाबत अभ्यासकांनी विविध सिद्धांत प्रतिपादित केले आहेत. त्यांचा परामर्श आपण येथे घेणार आहोत.

संस्कृत भाषेत आढळणाऱ्या विविध ज्ञानशाखांचा स्रोत वैदिक साहित्यात शोधण्याचा सार्थ प्रयत्न अभ्यासकांनी नेहमी केले आहेत. कारण वैदिक साहित्य हे भारतीय समाजाचे अत्यंत प्राचीन उपलब्ध साहित्य असल्याने आर्य समाजाच्या सात्यत्यपूर्ण चालणाऱ्या विविध ज्ञानक्षेत्रातील विकासाच्या आणि अनुभवांच्या विकसनाच्या आदिम भागाचे चित्रण प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रीतीने यात आढळते आणि काही वेळेस त्यांचे अनुमाने काढण्यासाठी सुद्धा सहाय्यभूत ठरते. ऋग्वेदात येणारी संवादसूक्ते ही काव्याच्या नाट्य आणि काव्य प्रकारांचे उगम मानले जाते. यात येणारे सरमा-पणि, विश्वामित्र-नदी, यम-यमी इत्यादी संवाद हे यज्ञीय प्रसंगी अनुकरणासहित सादर केले जात असत. त्यातील कथेचा गद्य भाग हा सादरकर्ता स्वतःच्या कुवतीने सादर करायचा. मात्र यातील पद्यसंवाद हा या संवादसूक्ताद्वारे सुरक्षितरित्या जतन केला आहे. त्यामुळे या संवादांना जोडणारा गद्य भाग जो साभिनय सादर केला जात असे, तो दृश्य काव्याचे मूळ मानला जातो तर संवादसूक्तात जतन केला गेलेला पद्य भाग हा महाकाव्यांचा मूळ स्रोत मानला जातो. त्याचबरोबर, वेद साहित्यामध्ये आढळणारी दानस्तुती सूक्ते, नाराशंसी सूक्ते, यज्ञीय आख्याने ही सुद्धा त्यांच्या भाषाशैलीमुळे आणि विषयवस्तूमुळे महाकाव्याचे सक्षम स्रोत ठरतात. केवळ ही निवडक सूक्तेच नाहीत तर पूर्ण ऋग्वेद संहिता ही सुद्धा निसर्गाप्रती असणाऱ्या मानवी भावनांचे उत्कट प्रकटीकरण असल्याने अनेकदा देवतासूक्ते ही काव्याचे उत्कृष्ट नमुने म्हणून प्रतीत होतात.

---

[3] छन्दोबद्धपदं पद्यम्। तत्रैव ६.३१४.

काही अभ्यासकांनी वेदसाहित्याला समांतर असणाऱ्या लौकिक साहित्याची कल्पना करुन त्यास संस्कृत महाकाव्याचे बीज मानले आहे. तर काहींनी संस्कृत महाकाव्याच्या अगोदर अस्तित्वात असणाऱ्या आदिम प्राकृत महाकाव्यावर संस्कृत महाकाव्ये बेतलेली आहेत, असा सिद्धांत मांडला. कारण आजमितीस उपलब्ध शिलांमध्ये संस्कृतपेक्षा प्राकृत भाषेतील शिलालेख हे प्राचीन आहेत आणि तसेच शिलालेखांमध्ये आढळणाऱ्या प्राकृतभाषेपेक्षा हलाराजाची गाथासत्तसई (गाथासप्तशती) ह्या प्राकृत भाषेतील काव्याचे परिपक्व रूप पाहून तसेच आज अनुपलब्ध असणाऱ्या गुणाढ्याच्या पैशाची या प्राकृत भाषेतील बृहत्कथेवरुन संस्कृतपेक्षा प्राचीन अशा प्राकृत वाङ्मयाचे अनुमान केले आहे. या सिद्धांतास सबळ पुरावे उपलब्ध नाहीत तसेच हा सिद्धांत अनुमानावर आधारीत असल्याने त्यास तेवढी मान्यता मिळाली नाही. तसेच संस्कृत आणि प्राकृत साहित्याचे समकालीनत्व सुद्धा नाकारता येत नाही. येथे मॅक्स म्युलर या जर्मन अभ्यासकाने सांगितलेल्या संस्कृत भाषेच्या कृष्ण युगाचे स्पष्टीकरण आवश्यक आहे. मॅक्स म्युलर यांनी भारतामध्ये काही शतकांमधील संस्कृत काव्यांच्या अनुपलब्धतेतमुळे संस्कृत काव्याच्या परंपरेचा ऱ्हास झाला, असे सांगून त्या युगास वाङ्मयाचे कृष्णयुग असे संबोधले आहे. आणि इ. सनाच्या चौथ्या-पाचव्या शतकापासून संस्कृत वाङ्मयाचे पुन्हा पुनरुत्थान झाले असे दर्शवून दिले.

मात्र लॅसन, बुल्हर, किलहॉर्न इत्यादी अभ्यासकांनी इ.सनाच्या दुसऱ्या ते पाचव्या शतकात संस्कृत भाषेमध्ये लिहीलेल्या राजस्तुतीपर प्रशस्तिकाव्यांचा अभ्यास करुन ते गद्य व पद्य काव्याचे उत्तम नमुने असल्याचे आणि त्या प्रशस्तीकारांना काव्यसौंदर्यांच्या काही सिद्धांतांचे ज्ञान असल्याचे दाखवून दिले. जर पाषाणावर  लिहिलेल्या प्रशस्तींमधून उत्तम काव्याचे नमुने झळकू शकतात तर निश्चितपणे इतर काव्याचे प्रकार त्याकाळी निपजले असतील, असे सबळ अनुमान काढता येते. अशा प्रकारे जरी इ .सनाच्या पहिल्या शतकापर्यंतचे महाकाव्य आज उपलब्ध नसले तरी या प्रशस्तींवरुन अव्याहतपणे काव्यपरंपरा भारतात सुरु होती, हे दिसून येते.

तसेच इ.सनाच्या दुसऱ्या शतकातील अश्वघोष कवीने बौद्ध धर्माच्या प्रचारासाठी महाकाव्य या माध्यमाचा वापर करुन बुद्धचरित लिहिले. त्या काव्यप्रकारातून केलेल्या धर्मप्रचारावरुन जनमाणसामध्ये महाकाव्याप्रती असणारी अभिरुची आणि त्या काव्यप्रकाराचा प्रसार द्योतित होतो. तसेच त्या काव्यातून दिसून येणारी काव्याची परिणत अवस्था त्या अगोदरच्या विकासात्मक अवस्थेची जाणीव करुन देते. त्यामुळे आजमितीस इ.सनाच्या दुसऱ्या शतकापूर्वीची काव्ये उपलब्ध नसली तरी उपलब्ध काव्याच्या उत्तुंगतेतून त्या अगोदरच्या विकासात्मक अवस्थेतील काव्यांचे अस्तित्व दाखवून देते.

काही प्रसिद्ध ग्रंथकारांच्या नावे उद्धृत केलेल्या संदर्भावरून प्राचीन महाकाव्यांची माहिती उपलब्ध होते. उदाहरणार्थ, राजशेखराच्या नावे कवी जल्हणाच्या (इ.सनाचे तेरावे शतक) सुक्तिमुक्तावलीमध्ये एक श्लोक उद्धृत केला आहे. त्यावरुन पाणिनीने आधी व्याकरण रचले आणि त्यानंतर जाम्बवतीविजय नावाचे

काव्य रचले अशी माहिती मिळते.[4] रुद्रटाच्या काव्यालंकार या ग्रंथावर टीका लिहिणाऱ्या नमिसाधूने पाणिनीच्या पातालविजय या काव्यातील उद्धरण आपल्या टीकेत दिले आहे. यावरून पाणिनीने पातलविजय आणि जाम्बवतीजय ही दोन काव्ये लिहिल्याचे कळून येते. अभ्यासकांच्या मते पाणिनीने ही दोन स्वतंत्र काव्ये रचली की ही एकाच काव्याची दोन नावे आहेत, हे निश्चित करता येत नाही. क्षेमेंद्राने त्याच्या सुवृत्त-तिलक नावाच्य ग्रंथात असे नमुद केले आहे की, पाणिनि हा उपजाति वृत्तात रचना करण्यात निष्णात होता. संस्कृत साहित्यात या आणि अशा पाणिनीच्या नावे आलेल्या अनेक संदर्भांवरून तसेच संस्कृत साहित्यात पाणिनि या नावाची दुर्लभता दिसून येत असल्यामुळे हा पाणिनी म्हणजे व्याकरणकार पाणिनि असे समजता येते आणि त्याचा काळ हा इ.सन पूर्व सहावे शतक मानण्यात येतो.

तसेच महाभाष्यकार पतंजलीने (इ.सन पूर्व दुसरे शतक) आपल्या ग्रंथात वररुचीच्या (इ.सन पूर्व तिसरे शतक) काव्याचा (वाररुचं काव्यम्) संदर्भ दिला आहे. याशिवाय वररुचीच्या नावे अनेक सुभाषिते ही सुभाषितांच्या संग्रहग्रंथांमध्ये उपलब्ध होतात. त्याच्या काव्याचे नाव एके ठिकाणी स्वर्गारोहण तर दुसरीकडे कण्ठाभरण असे नमुद केले आहे.

पिंगलाचार्यांच्या छंद या वेदांगावर लिहिलेल्या ग्रंथावरुन सुद्धा वैदिक आणि लौकिक छंदांची माहिती मिळते आणि त्यांतील छंदांचे वैपुल्य आणि विविधता ही जोरकस अशा काव्यनिर्मितीच्या प्रक्रियेची साक्ष ठरते.

याच बरोबर रामायण आणि महाभारत या दोन महाकाव्यांचे परिष्कृत रूप महाकाव्य लेखनाच्या प्रदीर्घ परंपरेची साक्ष देतात. यापूर्वीही अशाप्रकारची काव्य रचली गेली असतील. मात्र ती कालकवलित झाल्याने आज आपल्याला ती उपलब्ध नाहीत. मात्र त्यांच्या अस्तित्वाच्या अनुमानावरच उपलब्ध ग्रंथाचे कळस बांधले जाऊ शकतात. यावरून प्राचीन भारतात काव्यलिखाणाची अविरत आणि प्रदीर्घ परंपरा अस्तित्वात होती, हे सिद्ध होते.

### १.३.३ आर्ष काव्ये व विदग्ध काव्ये आणि त्यांचा संबंध –

अनुक्रमांक १ मध्ये पाहिलेली संस्कृत काव्याची विभागणी ही वैदिकोत्तर काळातील काव्याची आहे. वैदिककाळ आणि वैदिकोत्तर काळ यांच्या संधि काळात रामायण आणि महाभारत ही दोन महाकाव्ये निर्माण झाली. या दोन्ही काव्यांचे कर्ते अनुक्रमे वाल्मिकी आणि व्यास हे दोघेही ऋषि होते. ही महाकाव्ये ऋषींनी रचलेली असल्याने या काव्यांना आर्ष महाकाव्ये (ऋषेः इदम्, आर्षम्) असे म्हणतात.[5] यांचे रचयिते ऋषि असल्याने त्यांची दृष्टी ही चर्मचक्षूंनी दिसणाऱ्या जगाला ओलांडून (आक्रान्त) त्या पलिकडे पाहणारी आहे. अशा त्यांच्या क्रांतदर्शी दृष्टीने त्रिकालबाधित सत्याचा, आदर्श चरित्रांचा, जीवनमुल्यांचा, वास्तवाचा वेध आपापल्या काव्यातून घेतलेला आहे. त्यामुळे हजारो वर्षे उलटून सुद्धा आणि एकाहून एक प्रथितयश कवींची काव्ये निर्माण झाली असता भारतीय मनावरील त्यांची पकड तसूभरही कमी झालेली नाही. त्यात येणारा

---

[4] नमः पाणिनये तस्मै यस्मादाविरभूदिह। आदौ व्याकरणं काव्यमनु जाम्बवतीजयम्।। सुक्तिमुक्तावली.

[5] अस्मिन्नार्षे पुनः सर्गा भवन्त्याख्यानसंज्ञकाः। अस्मिन्महाकाव्ये । यथा महाभारतम् । साहित्यदर्पणम्, ६.३२५.

विचारांचा थेटपणा, भावनांची निर्भेळता, दृष्टीची व्यापकता, विषयांची वैविध्यता, निसर्गाशी सानिध्यता, लेखणीची स्वयंस्फूर्तता आणि सादरीकरणातील सहजता आपल्या मनाचा ठाव घेतल्याशिवाय राहत नाही. याहीपेक्षा त्यात वर्णिलेला इतिहास हा आपल्या पूर्वजांचा आहे, या विचारानेच भारतीय समाजाला त्या ग्रंथांविषयी अधिक ममत्व वाटते.

मुख्यत्वे यातील रामायणाची काव्य आणि महाभारताची इतिहास अशी ओळख आहे. या दोहोंपैकी रामायण हे आधी रचलेले असल्याने त्यास आदिकाव्य आणि त्याच्या कर्त्यास, वाल्मिकींस, आदिकवि असे म्हटले जाते. महाभारत ही प्रामुख्याने सूतवर्गाची निर्मिती असल्याने यात कौरव-पांडवांचा इतिहास सांगत असतानाच भारतवर्षातील इतर अनेक राजांची चरित्रे ही आख्यान आणि उपाख्यानाच्या रूपात संग्रहित केली गेली आहेत.

साहित्याच्या दृष्टीने या दोन्ही ग्रंथांनी आणि त्यामध्ये विशेषकरुन वाल्मिकींनी स्वतःच्या काव्यकृतीने, रामायणाने महाकाव्यलेखनाचा जणू मापदंडच घालून दिलेला दिसतो आणि याचाच कित्ता गिरवीत वैदिकोत्तर काळातील कालिदासादि कवी यशाच्या शिखराप्रत पोहोचलेले दिसतात.

वैदिकोत्तर काळातील महाकाव्ये विदग्ध काव्ये किंवा अभिजात काव्ये अशी संज्ञा प्रामुख्याने वापरली जाते. वि+ दह् (दहति १.प.प.) या धातूचे कर्मणि भूतकाळवाचक धातूसाधित विशेषण म्हणजे विदग्ध. आर्ष महाकाव्यात आलेली कथा-आख्याने जी मनुष्याच्या सहजावस्थेतील अनुभवांचे कथन करतात त्या कथावस्तू त्यांच्या मुबलकतेमुळे, जनमाणसातील परिचयामुळे आणि लोकांच्या पसंतीची असल्यामुळे या वैदिकोत्तर महाकाव्यांनी आपल्या काव्याच्या कथानकाच्या सामग्रीसाठी वापरल्या आणि स्वतःच्या प्रतिभेने त्यांचे कलात्मकतेने काव्यरूप सादरीकरण केले. अग्नीतून तावून-सुलाखून निघाल्यानंतर सोन्याचे जसे निर्मळ व विशुद्ध रूप दिसून येते त्याप्रमाणे आर्षमहाकाव्यातील कथावस्तुला वैदिकोत्तर कवींनी स्वप्रतिभेने नवीन झळाळी दिली, म्हणून त्यास विदग्ध महाकाव्य म्हटले जाते. आपली चिरंतन मूल्यपरंपरा, विचारधारा, वर्तनव्यवस्था, इतिहास हा वैदिकोत्तर महाकाव्यात नविन रूपात ढाळला गेला आणि त्यास चिर अधिष्ठान प्राप्त करुन दिले.

अशाप्रकारे विदग्ध महाकाव्यांसाठी आर्ष महाकाव्ये ही नेहमी कथास्रोत ठरलेली दिसतात. किरातार्जुनीयम्, शिशुपालवधम् व नैषधीयचरितम् यांचे कथानक हे महाभारत या आर्ष महाकाव्यातून घेतले आहे. तर रघुवंशम् या महाकाव्यातील रामाच्या चरित्रचित्रणासाठी कालिदासास रामायण हे आधारभूत ठरले आहे. विषयवस्तूच्यासहित, सादरीकरण, काव्यसौंदर्यीकरण यासाठी सुद्धा आर्षकाव्ये विदग्ध कवींना नेहमी आदर्शवत् ठरली आहेत. तसचे केवळ विदग्घ महाकाव्येच नाही तर दृश्य काव्यांनी सुद्धा आपल्या नाट्याच्या कथावस्तूसाठी आर्ष महाकाव्यांचा आधार घेतला आहे.

**१.३.४ महाकाव्यांचे स्वरूप –**

वर उद्धृत केलेल्या लक्षणांवरुन हे स्पष्ट होते की, ही लक्षणे लक्ष्य ग्रंथाच्या अवलोकावरुन निर्माण केली गेली आहेत. म्हणजे काही महाकाव्ये आधी निर्माण झाली आणि त्यांचे अवलोकन करुन त्यांची लक्षणे

तयार करण्यात आली. त्यांचे उपयोजन विदग्ध महाकाव्यात कशाप्रकारे दिसून येते त्याचा येथे विचार येथे केला आहे.

**१.३.४.१) विषयवस्तु तसेच कथोद्गम -** वर उद्धृत केल्याप्रमाणे काव्याची कथावस्तु ही इतिहासातून घेतलेली किंवा सज्जनाचा आश्रय घेणारी (सज्जनाचे चित्रण करणारी) असावी. या नियमांचा पुरेपुर अवलंब महाकाव्यांमध्ये केलेला दिसून येतो. आर्ष महाकाव्यांच्या सहित पुराणवाङ्मय, इतिहास, नाराशंसी हे सुद्धा महाकाव्यांसाठी विषयवस्तूचा स्रोत ठरले आहे. क्षेमेंद्राने तर त्याच्या रामायणमञ्जरी आणि भारतमञ्जरी या महाकाव्यात आर्षमहाकाव्यांचे संक्षिप्त रूपच आपल्या प्रासादिक शैलीत प्रस्तुत केले आहे. अशाप्रकारे आर्ष महाकाव्यांतील पूर्ण कथा किंवा त्यातील काही भाग, लघु कथानक घेऊन काव्यरचना केलेली दिसते. रघुवंशामधील रामाचे चरित्र वगळता इतर रघुवंशीय राजांचे वर्णन करताना पुराणांचेच सहाय्य कालिदासाला लाभले आहे. कुमारसंभवाच्या कथानकास सुद्धा पुराणेच कथास्रोत ठरली आहेत. माघाने सुद्धा आपल्या काव्याचे कथानक महाभारतातून तसेच्या तसे न घेता श्रीमद्भागवत पुराणातील काही प्रसंगांचा त्यात मेळ घातला आहे. मंख कवीने (इ.सनाचे १२ वे शतक) श्रीकण्ठचरितम् या महाकाव्यात भगवान शंकर आणि त्रिपुरासुर यांचे युद्ध पंचवीस सर्गात विशद केले आहे आणि त्यासाठी निश्चितच शैव पुराणे उपयोगी पडली आहेत. पूर्ण कथेच्या व्यतिरिक्त काव्यातील लघु प्रसंगासाठी उत्तरोत्तर कवी अगोदरच्या कवींकडून प्रभावित झाल्याचे दिसून येते, जसे माघाने भारवीच्या द्वितीय सर्गाचे अनुकरण करीत आपल्या काव्याच्या द्वितीय सर्गात राजकीय मंत्रणेचा प्रसंग घातला आहे. नैषधीयचरितम् मधील दमयंतीच्या स्वयंवरासाठी कालिदासाच्या इंदुमती स्वयंवराची कल्पना श्रीहर्षाला उपयोगी पडली. परंतु, जेथे कालिदासाने हे स्वयंवर एका सर्गात वर्णिले आहे तेथे श्रीहर्षाने चार सर्ग स्वयंवराच्या वर्णनासाठी खर्ची घातले आहेत.

**१.३.४.२) महाकाव्याची सुरुवात –** महाकाव्याची सुरुवात ही देवतांना नमन करुन, वाचकांना आशीर्वचन उद्गारुन किंवा महाकाव्याच्या कथानकाचा निर्देश करुन आरंभ करावा, असे सुचित केले आहे. त्याप्रमाणे कालिदासाने त्याच्या रघुवंश या महाकाव्याची सुरुवात त्याच्या इष्ट देवतेस, शंकरास पार्वती सह नमस्कार करुन केली आहे.[6] त्याचवेळी कालिदासाने कुमारसंभवाची सुरुवात वस्तु-निर्देशाने केलेली दिसते. देवतांना नमस्कार न करता सरळ-सरळ कथेचा भाग असणाऱ्या पार्वतीच्या वडिलांचे, हिमालयाचे वर्णन करुन सुरुवात केली आहे.[7] भारवीने आणि माघाने सुद्धा काव्याची सुरुवात वस्तुनिर्देशाने केलली दिसते. तरीसुद्धा दोघांनीही पहिल्या श्लोकातील पहिल्या शब्दात 'श्री' शब्दाचा उल्लेख करुन आपल्या काव्याचे मंगलविधान साधले आहे.[8]

---

[6] वागर्थाविव सम्पृक्तौ वागर्थप्रतिपत्तये। जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ। रघुवंशम्, १.१.

[7] अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराजः. ।पूर्वापरौ तोयनिधी वगाह्य स्थितः पृथिव्या इव मानदण्डः । कुमारसंभवम्, १.१.

[8] अ) श्रियः कुरूणामाधिपस्य पालनीं प्रजासु वृत्तिं यमयुङ्क्त वेदितुम्।
स वर्णलिङ्गी विदितः समाययौ युधिष्ठिरं द्वैतवने वनेचरः। किरातार्जुनीयम्, १.१
ब) श्रियःपति श्रीमतीं शासितुं..शिशुपालवधम्, १.१.

**१.३.४.३) काव्याचे नामकरण -** कवीच्या नावावरुन किंवा कथानकावरुन किंवा नायकावरुन किंवा इतर कोणत्या तरी (संबद्ध गोष्टीवरुन) महाकाव्याचे नामकरण करावे. यातील सर्गांची नावे ही त्यात येणाऱ्या कथेवरुन ठेवावीत, असे सांगितले आहे. त्यानुसार पूर्ण कथानकाचा आशय व्यक्त करणारे शिशुपालवधम् हे शीर्षक माघाने दिले आहे. भारवीने कथानकातील किरात आणि अर्जुन या दोन प्रमुख पात्रांचा उल्लेख आपल्या शीर्षकात केला आहे. अश्वघोषाने व श्रीहर्षाने आपल्या काव्यात अनुक्रमे, गौतम बुद्धांचे आणि नलराजाचे चरित्र काव्यरूपाने सांगितल्याने त्यांचे बुद्धचरितम् व नैषधीयचरितम् अशी नामाभिधाने केली आहेत. काव्याचे नाव ऐकताच त्यातील कथानकाचा किंवा नायकाचा बोध होईल, इतक्या काळजीपूर्वक काव्याचे नाव कवीने ठेवलेले दिसते. काही वेळेस मात्र काव्यापेक्षा कवीमहात्म्यामुळे काव्य त्याच्या खऱ्या नावापेक्षा कवीच्या नावानेच जास्त परिचित होते. जसे माघकाव्य किंवा भट्टीकाव्य होय.

**१.३.४.४) वर्णनांचे बाहुल्य -** लक्षणग्रंथाच्या निर्मितीनंतर साहित्यशास्त्राच्या नियम बरहुकूम निर्मिती करण्याचा कल कवींमध्ये वाढला. त्यामुळे कथानकास गरज नसली तरी नियमांनुसार ज्याचे ज्याचे वर्णन करावयास सांगितले आहेत, त्याचे वर्णन कथेला वळवून, काही वेळेस गुंडाळून केलेले दिसते. त्यामुळेच भारवीच्या काव्यातील एकूण अठरा सर्गांपैकी सर्ग क्रमांक तीन पासून सर्ग क्रमांक अकरा पर्यंतचा भाग हा विविध वर्णनांनी भरलेला आहे. काव्याच्या अठरा सर्गांपैकी सात सर्गांमध्ये इंद्रकील पर्वत, शरद ऋतु, हिमालय, अप्सरा व गंधर्व यांचे विलास, विनविहार, उद्यान क्रीडा, जलक्रीडा, सायंकाळ, चंद्रोदय, रात्रक्रीडा, प्रभातसमय इत्यादी वर्णने समाविष्ट केली आहेत. तसेच माघाने सुद्धा त्याच्या महाकाव्याच्या वीस सर्गांपैकी क्रमांक चार ते तेरा पर्यंत असे एकूण दहा सर्ग केवळ वर्णनांमध्ये खर्ची घातले आहेत. वर्णनांमुळे कवींना आपली कल्पकता, अलंकरण सामर्थ्य, विविध शास्त्रांचे ज्ञान दाखविण्यासाठी वाव मिळतो. तसेच कथा ही रुक्ष न वाटता त्यांतील वर्णनांमुळे काव्यास लालित्य प्राप्त होते. काव्यात मात्र त्याच्या अतिविस्तारामुळे कथाबंध विस्कळीत होतो. कालिदासादी प्रथम कवींनी ठेवलेले वर्णनसामग्रीचे काव्यातील औचित्य नंतरच्या कवींनी सांभाळलेले दिसून येत नाही.

**१.३.४.५) रस -** नाट्याचा आणि काव्याचा आत्मा हा रस मानला आहे. कथानकाला अनुसरुन रसाचा परिपोष केला जातो. शृंगार, वीर , करुण, हास्य, रौद्र, भयानक, बिभत्स, अद्भूत व शांत या नऊ रसांपैकी शृंगार किंवा वीर किंवा शांत हा रस अङ्गीरस म्हणजे प्रमुख रस म्हणून योजावा, असे सांगितले आहे. इतर उर्वरित सर्व रस हे प्रमुख रसास अंगभूत, सहाय्यक असू शकतात. शांत हा कधीही नाट्याचा अङ्गी रस असू शकत नाही मात्र तो काव्याचा अङ्गी रस असू शकतो. रामायणाचा अङ्गी रस शोक तर महाभारताचा शांतरस सांगितला जातो. अनेक जैन आर्चायांच्या चरित्रावर महाकाव्ये प्राकृत भाषेत लिहीली गेली आहेत. तेथे शांत रसाचा आविष्कार दिसून येतो. माघकाव्यात शिशुपालाच्या वधाच्या कथानकाद्वारे वीर रसाचा परिपोष झाला आहे तर कृष्णाच्या सैन्याच्या प्रवासातील क्रीडांच्या अनुषंगाने शृंगार रसाची निर्मिती केली आहे. कुमारसंभवामध्ये तसेच नैषधकाव्यात शृंगार रसाच्या विप्रलम्भ व संभोग दोन्ही प्रकारांचे वर्णन अंगी रसाच्या रूपात केले आहे.

**१.३.४.६) संधि -** काव्याच्या कथेचे विकसन एका लयीत होणे अभिप्रेत आहे. कथा जशी उपलब्ध सामग्रीमध्ये मिळते ती तशीच्या तशी घेऊ चालत नाही. कथेला कथानकात वळविताना तिचे योग्य विभाग करणे आवश्यक आहे. यासंबंधी सखोल विचार हा नाट्यशास्त्रामध्ये कथानकाच्या सादरीकरणाच्या अनुषंगाने केला आहे. विषयवस्तूचे पाच घटक (अर्थप्रकृती) (बीज, बिंदू, पताका, प्रकरी, कार्य) आणि विषयवस्तूच्या पाच अवस्था (आरंभ, यत्न, प्राप्त्याशा, नियताप्ति, फलागम) यांच्या संयोगाने पाच संधी (मुख, प्रतिमुख, गर्भ, विमर्श किंवा अवमर्श आणि निर्वहण) होतात, असे दशरूपककार धनंजयाचे मत आहे तर त्या दोहोंचा संबंध भरतमुनींनी सांगितलेला नाही. नाट्यसंधी या निर्दिष्ट क्रमानेच दाखवायच्या असतात. नाट्याच्या कथेला लागू पडणाऱ्या या संधी महाकाव्याच्या कथेला सुद्धा लागू पडतात. त्यामुळे कथेची मांडणी करताना कवीने त्या सर्व संधी येथे साधल्या गेल्या पाहीजेत, असा साहित्यशास्त्राचा नियम आहे. मुखसंधीमध्ये कथानकाचे बीज पेरले जाते. प्रतिमुखसंधीत त्याचे अंकुरण होते. गर्भसंधीत बीज फलित होईल की नाही, अशी संशयात्मक, द्वंन्द्वात्मक परिस्थिती निर्माण होते. फलाच्या प्राप्तीतील विघ्ने ही अवमर्श किंवा विमर्शसंधीमध्ये दूर केली जातात तर बीजाच्या फलिताची प्राप्ती ही निर्वहण संधीमध्ये होते.
**१.३.४.७) प्रयोजन –** धर्मशास्त्राने निहीत केलेले मनुष्याच्या आयुष्याचे धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे जे चार पुरुषार्थ आहेत, त्यापैकी एका पुरुषार्थाची प्राप्ति हे काव्याचे ध्येय, प्रयोजन म्हणून दाखविले जावे, असा नियम आहे. मात्र ते प्रयोजन स्वतंत्रपणे नमुद केलेले नसते तर ते फलप्राप्तीतून द्योतित होते. जेथे जेथे प्रणयकथांचे उद्धाटन केले आहे तेथे काम हा पुरुषार्थ प्रमुख प्रयोजन रूपात दिसतो. कुमारसंभव, नैषधीयचरितम् मधील नायकांना स्त्रीप्राप्तीच्या रूपाने कामप्राप्ति दिसून येते. माघकाव्यात शिशुपालाच्या वधाने धर्म पुरुषार्थ साधला आहे. वैयक्तिक /व्यष्टि पातळीवरील घटनांना एका वैश्विक /समष्टि परिप्रेक्षातून पाहिले असता त्यातून एका उदात्त प्रयोजनाचे फलित दाखविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. ऐतिहासिक महाकाव्यांच्या बाबतीत अर्थ प्रयोजनाची प्राप्ती ही फलित रूपाने दिसते.
**१.३.४.८) नायक –** भरतनाट्यशास्त्रात नायकाचे धीरोदात्त, धीरप्रशांत, धीरललित आणि धीरोद्धत असे चार प्रकार वर्णिले आहेत. महाकाव्याचा नायक हा यापैकी धीरोदात्त गुणांनी युक्त असावा, असे सांगितले आहे. दशरूपककार धनंजयानुसार धीरोदात्त नायक हा महासत्त्व असणारा, अत्यंत गंभीर, क्षमावान, असत्य भाषण न करणारा, स्थिरचित्त असलेला, स्वाभिमानी आणि दृढवान असतो.[9] आर्ष महाकाव्यापासून विदग्ध महाकाव्यापर्यंत सर्वत्र अशा धीरोदात्त गुणांनी युक्त नायकाचे चित्रण आपल्याला केलेले दिसते. रामायणातील राम किंवा नैषधातील नल हे सर्व स्वतःच्या चरित्रातून एका उदात्त गुणांचा परिपाठ घालून देतात.

**१.३.५ महाकाव्यांचा विकासक्रम –**

वर उद्धृत केल्याप्रमाणे लक्ष्य ग्रंथाच्या अवलोकनावरुन महाकाव्याची लक्षणे निर्माण केली गेली. या नियमांच्या आधी आणि नतंर निर्माण झालेल्या काव्यांमध्ये त्यामुळे काही अतंर, फरक दिसतो. ही लक्षणे

---

[9] महासत्त्वोऽतिगम्भीरः क्षमावानविकत्थनः। स्थिरो निगूढाहङ्कारो धीरोदात्तो दृढवतः।। दशरूपकम्, २.४.

तयार होण्याच्या अगोदरच्या कालखंडात (इ. सनाचे सातव्या शतकाअगोदर) निर्माण झालेली महाकाव्ये हे त्यांच्या सहज, सरल आणि उत्स्फूर्त अवस्थेचे दर्शन घडवितात. त्यांच्या निर्मितीला नियमांचे बंधन नव्हते. त्यांची प्रतिभा स्वयंभू होती. जेथे जेथे आवश्यक तेथे कथेला माफक साज चढवून काव्यकथा विकसित होत होती. ती अलंकरणामध्येच गुंतली नाही. मात्र नंतरच्या काळात कवींची उत्स्फूर्त काव्यनिर्मितीची क्षमता या नियमांपुढे शरण गेल्याचे दिसते. राजदरबारातील पंडीतांच्या पसंतीला उतरण्याची अनामिक भिती अथवा लालसा त्यांना हे करण्यास भाग पाडत असेल.

प्रसिद्ध पंचमहाकाव्यांपैकी कालिदासाच्या कुमारसंभव आणि रघुवंश या दोन महाकाव्यांना आणि त्यानेच रचलेल्या मेघदूतम् या खंडकाव्याला त्यांच्या लहान ग्रंथ-विस्तारामुळे लघुत्रयी काव्य असे म्हटले जाते. ही अधिक हृदयस्पर्शी असल्याने वाचकाच्या मनाला जास्त साद घालतात. तर भारवीचे किरातार्जुनीयम्, माघाचे शिशुपालवधम् आणि श्रीहर्षाचे नैषधीयचरितम् यांना त्यांच्या मोठ्या ग्रंथ-विस्तारामुळे बृहत्त्रयी म्हटले जाते. यात शास्त्रीय प्रौढता सुद्धा दिसून येते. त्यामुळे त्यांचा शास्त्रकाव्य असा देखील उल्लेख आढळतो. ही महाकाव्ये वाचकाच्या बुद्धीला साद घालतात.

संस्कृत महाकाव्याच्या विकासक्रमातील पहिली दोन महाकाव्ये ही कविकुलगुरु कालिदासप्रणित असून त्यामध्ये विषयवस्तूच्या मांडणीपेक्षा (manner) विषयवस्तूंवर (matter) जास्त लक्ष केंद्रित केलेले दिसते तर शेवटच्या दोन महाकाव्यांमध्ये विषयवस्तूपेक्षा विषयमांडणीवर जास्त लक्ष कवींनी दिलेले आहे.

आधीच्या काळातील कथावस्तूंमध्ये ऐक्य आणि समन्वय दिसतो तर नंतरच्या काळातील काव्यांमध्ये त्याचा अभाव दिसतो. विषयवस्तू हा पांडित्याच्या आविष्कारासाठी आणि प्रदर्शनासाठी वापरलेला दिसतो. तसेच काव्याची सहजता, साधेपणा, नैसर्गिक सौंदर्य यांची जागा भपकेदारपणा, अलंकारांची रेलचेल, अतिसौंदर्यीकरण आणि त्यामुळे निर्माण झालेली कृत्रिमता यांनी घेतली. कवींनी स्वतःच्या अभिव्यक्तीपेक्षा पंडितांच्या प्रशंसेकडे जास्त लक्ष केंद्रित केले आणि काव्यांनी वाचकांच्या मनापेक्षा बुद्धीला जास्त साद घातली. यांमधील संधिदुवा म्हणजे भारवीचे काव्य होय. यात या दोहोंचा समतोल त्याने साधलेला दिसतो. मात्र भारवीनंतरच्या कवींनी विषयाच्या मांडणीला आकर्षित करण्याकरिता अवघड, रोजच्या वापरात नसलेले शब्दप्रयोग, शब्दच्छल, अलंकार, अतिशयोक्तिपूर्ण कविकल्पना, काव्यबंध तसेच पाल्हाळिक वर्णन अशा वेगवेगळ्या क्लृप्त्या योजल्याने काव्यातील सहज सौंदर्य झाकोळून गेलेले आहे. नैषधीयचरितम् या महाकाव्याचा कर्ता श्रीहर्ष तर मोठ्या अभिमानाने सांगतो की माझे काव्य हे केवळ नुसते वाचण्याजोगे नसून ते टीकेसहित वाचण्यासाठी आहे. येथे स्वतः कवीच आपल्या काव्याच्या बोजडपणाचा, दुर्बोधतेचा अभिमान बाळगताना दिसतो. एका श्लोकाचे श्लिष्टार्थाच्या जोरावर एकाच वेळी चार-चार अर्थ देण्यास त्याचे काव्य समर्थ आहे. श्रीहर्ष हा वेदान्ती दार्शनिक सुद्धा आहे. त्यामुळे त्याच्या काव्यातून तो श्लिष्टार्थाने एकेवेळी वेदान्त्यांच्या विरोधकांचा समाचार घेताना दिसतो आणि त्याचवेळी काव्यबंध सुद्धा गुंफत जातो. राजदरबारी पंडितांच्या पसंतीस उतरण्याकरिता केलेल्या या प्रयत्नांबरोबरच विषयवस्तूला ताणून राजोपयोगी विषयांची चर्चा सुद्धा यांत अंतर्भूत केलेली दिसते. त्यामुळे वाल्मीकींसारख्या निसर्गकवींसमोर किंवा कालिदासासारख्या सहज कवींसमोर नंतरच्या कवींचे काव्य हे

दरबारी काव्य किंवा पंडिती काव्य वाटल्यावाचून राहत नाही. अशाप्रकारे काव्याच्या सकलप्रयोजनमौलिभूत सद्यःपरनिर्वृतीला तिलांजली दिलेली दिसते.

मध्ययुगाच्या अगोदरच्या कालखंडात महाकाव्य या माध्यमाद्वारे कवींनी नव्हे तर पंडीतांनी आपल्या पांडित्याचे प्रदर्शनच मांडलेले दिसते. त्यामुळे काव्य हे रसिकांसाठी नाही तर पंडीतांसाठी रचले जात होते की काय, असे चित्र आपल्या डोळ्यासमोर उभा राहिल्यावाचून राहत नाही. याचाच अर्थ सामान्य समाजाची साहित्याशी असणारी नाळ तुटत चालली होती आणि ती एका विशिष्ट वर्गाची मक्तेदारी बनत होती. एकाच श्लोकातून दोन-तीन अर्थ हे श्लिष्ट शब्दांच्यायोगे काढले जातात. यांच्या आधारे एखाद-दुसरे श्लोकच नाही तर पूर्ण काव्य लिहिण्याची किमया सुद्धा काही प्राचीन कवींनी साधली आहे. यामध्ये राघवपांडवीयम् हे जैन कवि धनंजयाचे, हरदत्तसूरींचे राघवनैषधीयम्, वेंकटाध्वरींचे यादवराघवीय या काव्यांचा समावेश होतो. यात एकाच वेळी अनुक्रमे, रामाची आणि पांडवांची, रामाची आणि नलराजाची, कृष्णाची आणि रामाची कथा एकत्रितपणे गुंफली आहे. त्यास द्विसंधान किंवा त्रिसंधान काव्य असे म्हटले जाते. कवी भट्टीने तर त्याचे रावणवधम् हे महाकाव्य जे भट्टीकाव्य म्हणून जास्त परिचित आहे त्यात त्याने केवळ आधारासाठी रामायणाची कथा ही बावीस सर्गांमध्ये वर्णिली आहे. मात्र प्रामुख्याने अलंकार, कोश आणि व्याकरण या विषयांचे ज्ञान करुन देण्यासाठी महाकाव्य रचलेले दिसते. काही सर्गांच्या समुहातून त्याने व्याकरणाच्या आणि अलंकारांच्या एक-एक विषयाचे, प्रकाराचे निरुपण केले आहे. अशाप्रकारे शास्त्राच्या सुप्रचारासाठी काव्याचा वापर झालेला दिसून येतो.

मध्ययुगात महाकाव्य या काव्यप्रकाराच्या आधाराने अनेक ऐतिहासिक काव्ये लिहीली गेली. यामध्ये प्रामुख्याने आश्रयदात्या राजाच्या चरित्राचे गायन काव्यमय पद्धतीने केलेले दिसते. यामध्ये नवसाहसांकचरितम् हे माळव्याचा परमारवंशीय प्रसिद्ध राजा भोज याच्या वडीलांचे, म्हणजे सिंधूराज यांचे चरित्र कवी परिमल हे टोपणनाव घेतलेल्या पद्मगुप्त कवीने (इ. सनाचे ११ शतक) ११ सर्गात वर्णिले आहे. चालुक्यवंशीय राजा विक्रमादित्य षष्ठ याच्या दरबारात असणाऱ्या काश्मिरी कवी बिल्हणाने (इ. सनाचे ११वे शतक) आपल्या आश्रयदात्या राजाचे जीवनचरित्र अठरा सर्गात बद्ध विक्रमांकदेवचरितम् या महाकाव्यातून केले आहे. राजतंरगिणी या आठ तरंगामध्ये विभागलेल्या महाकाव्यातून कवी कल्हणाने काश्मिर प्रदेशाचा ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक इतिहास उलगडला आहे. हम्मीरमहाकाव्यातून कवी नयचंद्र सुरि (इ.सनाचे १५वे शतक) याने रणथंबोर येथील चौहानवंशीय राजा हम्मीर याचे चरित्रचित्रण केले आहे. पृथ्वीराज चौहान यांचे चरित्र कवी जयानकाने (इ. सनाचे १२वे शतक) पृथ्वीराजविजयम् या महाकाव्यातून मांडले आहे. त्याचे केवळ १२ सर्ग उपलब्ध झाले आहेत. जैनमुनि हेमचंद्र यांनी वीस सर्गांमध्ये संस्कृत भाषेमधून आणि उर्वरित आठ सर्गांमध्ये प्राकृत भाषेचा वापर करुन अनहिलवाड प्रदेशाचे (गुजरात राज्यातील पाटण)चालुक्यवंशीय राजा कुमारपाल याचे चरित्र कुमारपालचिरतम् या अठ्ठावीस सर्गाच्या महाकाव्यातून मांडले आहे. या काव्यात दोन भाषांचा आश्रय काव्यलेखनासाठी घेतला असल्याने यास द्वयाश्रय महाकाव्य असे म्हणतात. अशाप्रकारे ऐतिहासिक महाकाव्ये मध्ययुगीन भारतातील राजकीय, व सामाजिक जीवन उलगडून दाखवितात आणि त्यामुळे भारतीय इतिहासाच्या अभ्यासकांना त्यांचा अभ्यास

महत्त्वपूर्ण ठरतो. यावेळी बाहुल्याने हे सर्व कवी राजाश्रय मिळालेले दिसतात. राजाश्रयाशिवाय काव्यप्रतिभेची होणारी कुचंबणा येथे अध्याहृत मानली पाहिजे. त्याचबरोबर आश्रित दरबारी कवीने लिहिलेले हे काव्यमय चरित्र असल्याने त्याच्या सत्यतेसाठी इतर पुराव्यांचा आधार घेणे सुद्धा आवश्यक ठरते.

संस्कृत भाषेतून महाकाव्य रचनेची परंपरा आजच्या युगात सुद्धा स्वल्प प्रमाणात अव्याहतपणे सुरु आहे. त्यामुळेच ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व असणाऱ्या शिवाजी महाराजांच्या सच्चरित्रावर आधारित शिवराज्योदयम् हे महाकाव्य श्रीधर भास्कर वर्णेकर यांनी ६८ सर्गांमध्ये रचले. भारतरत्न डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या आयुष्यावर श्रीयुत प्रभाकर जोशी यांनी १५७७ श्लोकात व वीस सर्गात भीमायनम् नावाचे महाकाव्य रचले आहे. सत्चरित्र आणि सज्जनाश्रयी महाकाव्याचे निकष आजही अनुसरलेले दिसून येतात.

**१.३.६ उपसंहार –**

अशाप्रकारे महाकाव्य या संस्कृतभाषेतील काव्यप्रकाराने बदलत्या काळाबरोबर कालसुसंगत अनेक तडजोडी करत आपले अस्तित्व टिकवून ठेवलेले दिसते. महाकाव्यांची त्यांच्या उपरोक्त वैशिष्ट्यांवरुन कालिदासपूर्व व कालिदासीय आणि कालिदासोत्तर अशी दोन विभागात विभागणी करणे भाग पडते. उपलब्ध महाकाव्यांमध्ये अग्रगण्य असणाऱ्या अश्वघोषाने प्रथम त्याचे काव्य बौद्धधर्माच्या प्रचारासाठी वापरलेले दिसते. यात त्याने जगाच्या कल्याणासाठी गृहस्थाश्रमातून संन्यास घेणाऱ्या गौतम बुद्धांचे चरित्र रेखाटले तर त्याला जणु प्रत्यत्तर म्हणून कालिदासाने कुमारसंभवातून जगाच्या परिहारासाठी संन्यासाश्रमातून गृहस्थाश्रमी होणाऱ्या भगवान शंकरांचे वर्णन केले. त्याचवेळी आपल्या आश्रयदात्या राजाच्या, द्वितीय चंद्रगुप्ताच्या मुलाच्या म्हणजे कुमारगुप्ताच्या जन्माचे सुद्धा द्योतन या काव्यातून साधले असल्याचे अभ्यासकांचे म्हणणे आहे. कालिदासाने रघुवंशात सुद्धा आपल्या काव्यातून एकाचवेळी प्रथितयश रघुकुळाच्या संकीर्तनाच्या मिषाने आपल्या आश्रयदात्या राजाच्या पराक्रमाचे, दिग्विजयाचे आणि गुणांचे वर्णन केलेले दिसते. भारवी, माघ, श्रीहर्ष या कवींनी आपले काव्य राजोपयोगी कसे होईल, याचा विचार केलेला दिसतो. तसेच येथून पुढे काव्याचा उपयोग हा प्रतिभेच्या नितळ आणि उत्कट अभिव्यक्तीपेक्षा कवीच्या अहमिकेला, प्रगल्भतेला, पांडित्याला वाव देण्यासाठी झालेला आहे, हे वाचकांना कळल्यावाचून राहत नाही. मध्ययुगाच्या सुरुवातीचा कालखंड अशाच धाटणीतील काव्याने व्यापला आहे. त्यानतंर पुन्हा दरबारी कवींनी केलेल्या राजप्रशंसेतून जन्मास आलेल्या महाकाव्यांचा काळ सुरु झालेला दिसून येतो. आता पौराणिक सुर नायकांचा काळ संपून ऐतिहासिक क्षत्रियोद्भव नायकांचा काळ सुरु झाला. याची प्रदीर्घ परंपरा संस्कृत आणि प्राकृत या दोन्ही भाषांमध्ये दिसून येते. वर्तमानाकाळातील काव्ये ही वर उद्धृत केल्याप्रमाणे आजच्या काळाचे बौद्धीक आणि सामाजिक नैतृत्व करणाऱ्या सज्जनाश्रयी धीरोदात्त नायकांची चरित्रे आहेत.

महाकाव्याच्या विकासक्रमाच्या या स्थित्यंतरामध्ये काव्याची प्रयोजने सुद्धा एकमेकांना वरचढ ठरलेली दिलेली दिसतात. काव्याचे शीर्षस्थ प्रयोजन आहे, काव्य वाचल्याक्षणी वाचकाला अवर्णनीय आनंदाची प्रचिती करुन देणे. या प्रयोजनाने प्रेरित झालेली महाकाव्ये फार विरळा दिसतात किंवा प्रत्येक

काव्यात हे दुय्यम स्थानी असेलेले प्रयोजन दिसते. *काव्यं यशसे* लिहील्याची उदाहरणे जास्त लक्षित होतात. तर राजाश्रित कवींनी लिहीलेल्या काव्यात हे राजाकरिता उपदेशयुजे सुद्धा करण्याचा प्रयत्न केला आहे.

जशी काव्यप्रयोजनांमध्ये स्थित्यंतरे आढळतात तसा काव्यकारणांमध्ये सुद्धा काळाबरोबर बदल झालेला दिसतो. अश्वघोष, कालिदास, भारवी, आदि पहिल्या टप्प्यांतील कवींमध्ये त्यांची कारयित्री प्रतिभा ही त्यांच्या काव्याला अधिक प्रेरक ठरलेली दिसते. त्यामुळे ते सिद्ध कवी (Born Poet) वाटतात. नंतरच्या कवींमध्ये त्यांची प्रतिभा लोकशास्त्रकाव्यादि अवेक्षणाने आणि निपुणतेने अधिक व्यामिश्र झालेली दिसते. एकूणच महाकाव्याचा हा प्रदीर्घ प्रवास हा चढ-उताराने व्यापलेला असून उतारकाळातील अंधःकारामध्ये सुद्धा काही काव्यमौक्तिक काव्यक्षितीज उजळून टाकतात. या सर्व स्थित्यंतरांमध्ये नियत, अढळ राहिलेला एकच मुद्दा म्हणजे रामादिवत् वर्तितव्यम्, न रावणादिवत् याचा परिपाठ नित्यनेमाने सर्व कवींनी समाजापुढे मांडला आहे. यासाठी महाकाव्ये ही त्यांच्या काव्यात्मक ऱ्हासकाळात सुद्धा प्रेरणास्तंभ ठरतात, हे त्यांचे अद्वितीय योगदान नाकारता येत नाही.

संस्कृत साहित्यात एकीकडे महाकाव्यांच्या आणि इतर वेगवेगळ्या साहित्यकृतींच्या निर्मितीची प्रदीर्घ परंपरा सुरु असताना निर्माण होत असताना त्यालाच काही काळानंतर समांतर असे त्यांच्या समीक्षेचे साहित्याशास्त्राचे ग्रंथ निर्माण झाले. यामध्ये आजतागायत उपलब्ध ग्रंथांमध्ये सर्वप्रथम भामहाचा (इ.स. ७ वे शतक) काव्यालंकार, त्यानंतर दंडीचा (इ.स. ८ वे शतक) काव्यादर्श, रुद्रटाचा (इ.स. ९ व्या शतकाचा मध्य) काव्यालंकार, विश्वनाथाचा (इ.स. १५वे शतक) साहित्यदर्पण आणि इतर अनेक ह्या ग्रंथामध्ये महाकाव्याच्या लक्षणांचा, वैशिष्ट्यांचा सविस्तर अभ्यास केलेला दिसून येतो. या ग्रंथकारांनी त्यांच्या काळापर्यंत लिहिल्या गेलेल्या महाकाव्यांचे अवलोकन करुन त्यांतील समान बिंदु ताडून महाकाव्यांची लक्षणे तयार केली. नंतरच्या साहित्यशास्त्रकारांनी अगोदरच्या साहित्यशास्त्रकारांचे नियम घेऊन त्यांना पूर्णत्व देण्याचा प्रयत्न केला. यामध्ये विश्वनाथाचा (इ.सनाचे पंधरावे शतक) साहित्यदर्पण हा ग्रंथ उत्तरवर्ती असल्याने या ग्रंथात दिलेले नियम हे विस्तृत व सर्वसमावेश आहेत. त्यामुळे त्यांचा अभ्यास येथे महाकाव्यांच्या लक्षणाकरिता आधारभूत मानला आहे.

विश्वनाथाने त्याच्या ग्रंथाच्या सहाव्या परिच्छेदात वैदिकोत्तर काव्याच्या सर्वप्रकारांची लक्षणे सांगितली आहेत. यामध्ये त्याने पुढील श्लोकांमध्ये महाकाव्याचे विवेचन केले आहेमहाकाव्य हे सर्गामध्ये विभक्त असते. तेथे एखादा देव किंवा, चांगल्या कुळातील, धीरोदात्त गुणांनी युक्त क्षत्रिय हा नायक असतो. एकावंशात जन्मला आलेले अनेक कुलीन राजे सुद्धा नायक होऊ शकतात.श्रृंगार, वीर आणि शांत यांपैकी एक रस प्रमुख रसाच्या रूपात अभिप्रेत आहे. इतर उर्वरित सर्व रस हे प्रमुख रसास अंगभूत, सहाय्यक असू शकतात. तसेच नाटकातील सर्व संधी येथे साधल्या गेल्या पाहीजेत. यातील कथावस्तु ही इतिहासातून निर्माण झालेली (घेतलेली) किंवा सज्जनाचे आश्रय घेणारे (सज्जनाचे चित्रण करणारे) असावे. चार पुरुषार्थांचे त्यांचे चित्रण असावे, त्यापैकी एक पुरुषार्थ हे कथावस्तूचे फळ असावे. ही देवतांना नमन करुन, वाचकांना आशीर्वचन उद्गारुन किंवा महाकाव्याच्या कथानकाचा निर्देश करुन महाकाव्याचा आरंभ करावा. क्वचितप्रसंगी दुष्ट लोकांची निंदा किंवा सज्जनांचे गुणसंकीर्तन करावे.महाकाव्याचे सर्ग हे अतिलघु किंवा

अतिदीर्घ नसावेत तसेच ते आठ सर्गाहून अधिक असावेत. एका सर्गाची रचना ही एका वृत्तात करावी. तसेच सर्गाच्या अंती (वृत्तबदल करुन) अन्य वृत्तांमधील पदे रचावीत.अनेक वृत्तांमध्ये रचलेला एक सर्ग सुद्‌धा (काही महाकाव्यांमध्ये) दिसून येतो. तसचे सर्गाच्या शेवटी भावी सर्गाच्या कथानकाचे सूतोवाच करावे. येथे (महाकाव्यात) जसे शक्य तसे (जसा काव्यात वाव मिळेल तेथे) संध्या, सूर्य, चंद्र, रजनी, प्रदोष (रात्रीची सुरुवात), अंधकार, दिवस, प्रातःकाळ, मध्याह्न, शिकार, पर्वत, ऋतु, वन, सागर, संभोग व विप्रलंभ शृंगार, मुनि, स्वर्ग, नगर, यज्ञ, रणांगणाप्रति गमन, विवाह, सल्ला-मसलत, पुत्रोदय इत्यादींचे सांगोपांग वर्णन करावे.कवीच्या नावावरुन किंवा कथानकावरुन किंवा नायकावरुन किंवा इतर कोणत्या तरी (संबद्‌ध गोष्टीवरुन) महाकाव्याचे नामकरण करावे. यातील सर्गांची नावे ही त्यात येणाऱ्या कथेवरुन ठेवावीत. आर्ष महाकाव्यांच्या सर्गांना आख्यान असे नाव दिले जाते.

विश्वनाथाने महाकाव्याच्या विस्तारामध्ये केवळ पर सीमा म्हणजे आठ सर्गांपेक्षा जास्त सर्ग असावेत, असे उद्‌धृत केले आहे. मात्र जास्तीत जास्त किती सर्ग असावेत, हे सांगितलेले नाही. ईशानसंहितेमध्ये महाकाव्याची अपरसीमा तीस सर्गांपेक्षा जास्त नसावी, असे नमुद केले आहे. दंडीने स्पष्टपणे नमुद केले आहे की, जर ज्यांचे वर्णन केले गेले आहे, त्यातील काव्यसौंदर्याने पंडीतांचे समाधान होत असेल तर वर्णनांमधील काही भाग वर्णित केला नाही तरी काव्याहानी होणार नाही.[10] भोजाने सुद्‌धा हेच मत प्रतिपादिले आहे. रुद्रटाने मूळ कथावस्तुचा विच्छेद होणार नाही, तितकेच वर्णन काव्यात अंतर्भूत करावयास सांगितले आहे. काव्याच्या विषयाच्या उपस्थापनाचे दोन प्रकार अवलंबिले जात असत, हे भामहाच्या व दंडीच्या श्लोकांवरुन कळून येते. आधी प्रतिनायकाचा वंश, गुण, पराक्रम यांचे वर्णन करुन नंतर नायकाच्या गुणांचे संकीर्तन केले जात असे. तसेच आधी नायकाच्या गुणांचे वर्णन करुन त्याच्याद्‌वारे शत्रूचा नाश दाखविला जात असे. भामहाने नायकाचे आधी वंश, पराक्रम, गुण यांचे वर्णन करुन दुसऱ्या पात्राच्या उत्कर्षाकरिता त्याचा वध दाखविणे योग्य नाही, असे मत मांडले आहे.[11] याचाच अर्थ शत्रूचे अथवा प्रतिनायकाचे गुणसंकीर्तन आधी करु नये असे, भामहाचे मत आहे. मात्र दंडीने हे दोन्ही मार्ग त्यास अभीष्ट असल्याचे सांगितले आहे.[12] यावरुन विषयाच्या उपस्थापनाबाबत दोन्ही पद्‌धती रुढ होत्या आणि त्याबाबत समीक्षकांमध्ये मतभिन्नता होती, असे दिसून येते.

**१.४) स्वंय अध्ययनाचे प्रश्न**

१) विदग्ध महाकाव्यांच्या विभागांना कोणते नामाभिधान दिले आहे ?

१) सर्ग २) उच्छवास ३) आख्यान ४) अंक

२) महाकाव्यामध्ये खालीलपैकी कोणता रस हा अंगी रस म्हणून असत नाही?

---

[10] न्यूनमप्यत्र यैः कैश्चिदङ्गैः काव्य न दुष्यति।यद्‌युपात्तेषु संपत्तिराराधयति तद्‌विदः।।, काव्यादर्श, १.२०

[11] नायकं प्रागुपन्यस्य वंशवीर्यश्रुतादिभिः। न तस्यैव वधं ब्रूयादन्योत्कर्षाभिधित्सया।।, काव्यलंकार, १.२२

[12] अ) गुणतः प्रागुपन्यस्य नायकं तेन विद्‌विषाम्। निराकरणमित्येष मार्गः प्रकृतिसुन्दरः।।, तत्रैव. १.२१.

ब) वंशवीर्यश्रुतादीनि वर्णयित्वा रिपोरपि। तज्जयान्नायकोत्कर्षवर्णनं च धिनोति नः।।, तत्रैव. १.२२.

१) शृंगार २) वीर ३) शांत ४) बीभत्स

३) विदग्ध महाकाव्याचे सर्ग किती सर्गांपेक्षा जास्त पाहीजेत?

१) सातपेक्षा जास्त २) आठपेक्षा जास्त ३) दहापेक्षा जास्त ४) पंधरापेक्षा जास्त

४) सर्गाच्या कोणत्या भागात वृत्तबदल करण्यास सांगितले आहे?

१) कोठेही नाही २) सुरुवातीस ३) मध्यभागात ४) शेवटी

५) काव्याची सुरुवात कशी करण्यासाठी सुचविले आहे?

१) आशीः २) नमस्क्रिया ३) वस्तुनिर्देश ४) वरील सर्व

६) खालीलपैकी कोणते काव्य हे लघत्रयींपैकी आहे?

१) नैषधीयचरितम् २) शिशुपालवधम् ३) रघुवंशम् ४) किरातार्जुनीयम्

७) खालीलपैकी महाकाव्याचे कोणते स्रोत आहेत ?

१) रामायण २) महाभारत ३) पुराण ४) वरील सर्व

८) खालीलपैकी कोणते काव्य हे बृहत्त्रयी पैकी आहे?

१) मेघदूतम् २) नैषधीयचरितम् ३) कुमारसंभवम् ४) रघुवंशम्

९) खालीपैकी कोणास आदिकवि म्हटले जाते?

१) व्यासऋषि २) कालिदास ३) वाल्मिकी ४) अश्वघोष

१०) बौद्धधर्माच्या प्रचाराकरिता खालीलपैकी कोणत्या कवीने महाकाव्य या माध्यमाचा वापर केला ?

१) हर्ष २) अश्वघोष ३) कालिदास ४) माघ

**१.५) पारिभाषिक शब्द, शब्दार्थ**

या घटकामध्ये महाकाव्यांची लक्षणे सांगत असताना काही पारिभाषिक संज्ञांचा नामोल्लेख आपल्याला आढळतो. त्यांचे विवेचन मुख्य पुस्तकात दिलेले आहे. येथे त्यांचे थोडक्यात स्पष्टीकरण दिले आहे.

**१) सर्ग** - महाकाव्यांच्या विभागांना सर्ग म्हणतात.

**२) आख्यान** - आर्ष महाकाव्यांच्या सर्गांना आख्यान असे नाव दिले जाते.

**३) आर्ष महाकाव्य** - ऋषींनी रचलेल्या काव्यांना आर्ष महाकाव्य म्हणतात. ऋषेः इदम्, आर्षम्।

**४) विदग्घ महाकाव्य –** पुराण, इतिहास किंवा आर्ष महाकाव्ये यांमधून घेतलेल्या कथावस्तुला वैदिकोत्तर कवींनी स्वप्रतिभेने नवीन झळाली दिली, संस्कारित केले, म्हणून त्यास विदग्ध महाकाव्य म्हटले जाते.

**५) बृहत्त्रयी महाकाव्य –** प्रसिद्ध पाच महाकाव्यांपैकी आकारविस्ताराने दीर्घ असणाऱ्या भारवीच्या किरातार्जुनीयम्, (१८ सर्ग) माघाच्या शिशुपालवधम् (२० सर्ग) आणि श्रीहर्षाच्या नैषधीयचरितम् (२२ सर्ग) या महाकाव्यांना बृहत्त्रयी म्हटले जाते. यात शास्त्रीय प्रौढता सुद्धा दिसून येते. त्यामुळे ही महाकाव्ये वाचकाच्या बुद्धीला साद घालतात.

**६) लघुत्रयी काव्य** – प्रसिद्ध पाच महाकाव्यांपैकी आकारविस्ताराने लहान असणाऱ्या कालिदासाच्या दोन महाकाव्यांना, कुमारसंभवम् (८ सर्ग) आणि रघुवंशम् यांना तसेच त्यानेच रचलेल्या मेघदूतम् या खंडकाव्याला लघुत्रयी काव्य असे म्हटले जाते. ही हृदयस्पर्शी अधिक असल्याने वाचकाच्या मनाला जास्त साद घालतात.

**७) द्विसंधान किंवा त्रिसंधान काव्य** – एका श्लोकातून श्लेष या अलंकाराच्या सहाय्याने दोन किंवा तीन अर्थ काढून दोन किंवा तीन नायकांचे चरित्र एकाच काव्यात गुंफले जाते, त्यास द्विसंधान किंवा त्रिसंधान काव्य असे म्हणतात.

**८) संधी -** ही नाट्यशास्त्रीय संकल्पना आहे. महाकाव्याच्या किंवा नाट्याच्या सादरीकरणात विषयवस्तूचे पाच घटक (अर्थप्रकृती) (बीज, बिंदू, पताका, प्रकरी, कार्य) आणि विषयवस्तूच्या पाच अवस्था (आरंभ, यत्न, प्राप्त्याशा, नियताप्ति, फलागम) यांच्या संयोगाने पाच संधी (मुख, प्रतिमुख, गर्भ, विमर्श किंवा अवमर्श आणि निर्वहण) होतात, असे दशरूपककार धनंजयाचे मत आहे तर त्या दोहोंचा संबंध नाट्यशास्त्राने सांगितलेला नाही. संधींचे उपस्थापन निर्दिष्ट क्रमानेच करणे अपेक्षित आहे. या नाट्यसंधी महाकाव्यात सुद्धा कथानकाची मांडणी करताना दाखवाव्यात, असे साहित्यशास्त्राकारांचे मत आहे. मुखसंधीमध्ये कथानकाचे बीज पेरले जाते. प्रतिमुखसंधीत त्याचे अंकुरण होते. गर्भसंधीत बीज फलित होईल की नाही, अशी संशयात्मक, द्वंन्द्वात्मक परिस्थिती निर्माण होते. फलाच्या प्राप्तीतील विघ्न हे विमर्शसंधीमध्ये दूर केले जातात तर बीजाच्या फलिताची प्राप्ती निर्वहणसंधीमध्ये होते.

**९. द्वयाश्रयमहाकाव्य -** संस्कृत व प्राकृत अशा दोन भाषांमध्ये बद्ध असणाऱ्या महाकाव्यास द्वयाश्रयमहाकाव्य म्हणतात.

**१.६) स्वयं अध्ययनाच्या प्रश्नाची उत्तरे**

घटक ३.४ मधील प्रश्नांची उत्तरे येथे दिली आहेत.

(१) १ - सर्ग (२) ४ - बीभत्स (३) २ - आठपेक्षा जास्त

(४) ४ - शेवटी (५) ४ - वरील सर्व (६) ३ - रघुवंशम्

(७) ४ - वरील सर्व (८) २ - नैषधीयचरितम् (९) ३ - वाल्मिकी
(१०) २ - अश्वघोष

**१.७) सारांश -** प्रस्तुत घटकातून आपण विदग्ध महाकाव्याचा सामान्य परिचय करुन घेतला. या महाकाव्याचे संपूर्ण संस्कृत वाङ्मयातील स्थान आणि त्यांचा उद्भव सुद्धा जाणून घेतला. साहित्यशास्त्राच्या ग्रंथामध्ये निहीत केलेली महाकाव्यांची लक्षणे अभ्यासली. ती लक्षणे लक्ष्यग्रंथांध्ये, महाकाव्यांमध्ये कशी दिसून येतात, ते सुद्धा पाहिले. तसेच महाकाव्यांच्या निर्मितीच्या प्रदीर्घ प्रवासात त्यात झालेली स्थित्यंतरे सुद्धा अभ्यासली आहेत.

**१.८) स्वाध्याय – सरावासाठी प्रश्न**

**अ) विवेचक टीपा लिहा.**

१) बृहत्त्रयी
२) आर्ष व विदग्ध महाकाव्ये
३) आर्ष काव्यांचे विदग्ध महाकाव्यांच्या निर्मितीमध्ये योगदान

**ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) महाकाव्यांच्या उद्भवाबद्दलची विविध मते सविस्तर स्पष्ट करा.
२) महाकाव्यांची लक्षणे सोदाहरण सविस्तर विशद करा.
३) विदग्ध महाकाव्यांचा विकासक्रम विशद करा.

**१.९) क्षेत्रीय कार्य**

१) कोणतेही एक विदग्ध महाकाव्य घेऊन त्यास महाकाव्याची लक्षणे कशी लागू होतात, ते दाखवून द्या.

**१.१०) अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ**

१) उपाध्याय, बलदेव, *संस्कृत साहित्य का इतिहास,* शारदा निकेतन, वाराणसी, दहावी आवृत्ती, २००१.
२) करंबळेकर, विनायक वामन, *संस्कृत साहित्याचा सोपपतिक इतिहास*, श्री शारदा प्रकाशन, नागपूर, द्वितीय आवृत्ती, १९६३.
३) वाटवे, केशव नारायण, *संस्कृत काव्याचे पंचप्राण*, मनोहर ग्रंथमाला, पुणे, १९७०.
४) शर्मा, उमाशंकर, *संस्कृत साहित्य का इतिहास,* चौखम्बा विश्वभारती, वाराणसी, २००८.

घटक क्रमांक -२

## कालिदासकृत रघुवंशम्
## प्रथम सर्ग (श्लोक- १- २५)

२.१ उद्दिष्ट्ये

रघुवंशम् महाकाव्याच्या प्रथम सर्गातील ०१ ते २५ श्लोकांच्या अध्ययनातून विद्यार्थ्यांना -

1) महाकाव्य या संस्कृत काव्यप्रकाराचा परिचय करून देणे.
2) रघुवंशम् महाकाव्याचे स्वरूप ज्ञात करून देणे.
3) आदर्श राजाच्या गुणवैशिष्टयांचे महत्त्व स्पष्ट करून देणे.
4) रघुवंशम् महाकाव्यातील विचारांची उपयुक्तता कथन करणे.

### २.२ प्रस्तावना

घटक क्रमांक १ मध्ये आपण महाकाव्याची लक्षणे आणि त्याचे स्वरूप यांचे साहित्यशास्त्रदृष्ट्या अध्ययन केले आहे. तसेच पंचमहाकाव्यांची ओळखदेखील करुन घेतली आहे. त्याच अनुषंगाने इ. स. ४ थ्या शतकात होऊन गेलेल्या कालिदासांनी रचलेल्या, प्रसिद्ध पंचमहाकाव्यांपैकी महत्त्वपूर्ण असलेल्या रघुवंशम् या महाकाव्याचा द्वितीय घटकात सामान्य परिचय आपण करुन घेणार आहोत.

संस्कृत वाङ्मयात काव्य ही अत्यंत व्यापक संकल्पना असून यात दृश्य आणि श्रव्यकाव्य या दोहोंचा समावेश होतो. यापैकी श्रव्यकाव्यात पुन्हा गद्य, पद्य आणि गद्य-पद्यात्मक चम्पू या तीन साहित्यप्रकारांचा समावेश होतो. पद्याचे पुन्हा प्रबंधकाव्य आणि मुक्तककाव्य असे दोन भाग पडतात. यातील प्रबंध काव्याचे पुन्हा महाकाव्य आणि खंडकाव्य असे दोन प्रकार केले जातात. अशाप्रकारे श्रव्यकाव्याच्या पद्यप्रकारातील प्रबंधकाव्याचा एक प्रकार म्हणजे ‘महाकाव्य’ होय.

रघुवंशम् महाकाव्य १९ सर्गांमध्ये विभागलेले आहे. यात १५६९ श्लोक आहेत. हे महाकाव्य सूर्यवंशातील ३१ राजांच्या शौर्याचे आणि जीवनाचे वर्णन करते. अत्यंत भव्य आणि दयाळू राजा मनूपासून अत्यंत विलासी राजा अग्निवर्णापर्यंतची कथा रघुवंशम् महाकाव्यामध्ये संकलित केली आहे. रघुवंश महाकाव्याचा मूळ स्त्रोत रामायण आहे.परंतु रघुवंशम् महाकाव्याची कथा पद्मपुराणाच्या जवळ आहे. रघुवंशम् हे वीर महाकाव्य आहे. कवीने या महाकाव्यात रघुवंशाच्या उदय आणि अस्ताचे सुंदर वर्णन केले आहे. रघुवंशम् महाकाव्यात एकूण २८+०३=३१ राजांचे वर्णन आहे.

(१) राजा दिलीप (२) रघु (३) अज (४) दशरथ (५) राम (६) कुश (७) अतिथी (८) निषध (९) नल (१०) नभ (११) पुंडरिक (१२) क्षेमधन्वा (१३) देवानीक (१४) अहीनग (१५) पारियात्र (१६) शील (१७) उन्नाभ (१८) वज्रनाभ (१९) शंखण (२०) व्युषिताश्व (२१) विश्वसह (२२) हिरण्यनाभ (२३) कौशल्य (१४) ब्रह्मनिष्ठ

(२५) पुत्रपुष्य (२६) ध्रुवसंधी (२७) सुदर्शन (२८) अग्निवर्ण. येथे रामासह लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न यांच्यासह एकूण ३१ राजांचे वर्णन केले आहे. रघुवंश महाकाव्य एकोणीस सर्गांमध्ये  मध्ये विभागलेले आहे. त्यात महाकाव्याची सर्व वैशिष्ट्ये आहेत.

ह्या भरतभूमीस भूषणभूत अशा कविरत्नमालेतील कालिदास हे जगद्विख्यात कवी  आहे. त्याने अनेक उत्कृष्ट काव्ये रचिलेली आहेत. त्यात मोठे विस्तीर्ण आणि शृंगार, वीर इ. नानारसांनी परिपूर्ण असे हे रघुवंशनामक काव्य लोकप्रसिद्ध आहे. संस्कृतात जी पंच महाकाव्ये प्रसिद्ध आहेत. त्यात हे काव्य अग्रगण्य असून संस्कृत व्युत्पत्ती शिकणारे विद्यार्थी प्रथम ह्याच काव्याचा अभ्यास करितात, असे आपणास पहावयास मिळते. ह्या काव्यास रघुवंश असे नाव देण्याचे कारण असे आहे की, सूर्यवंशातील दिलीपराजास नंदिनीनामक वसिष्ठधेनूच्या प्रसादाने रघु ह्या नावाचा महापराक्रमी उदार, धर्मनिष्ठ, आणि नीतिमान् असा एक पुत्र झाला. त्याने मोठ्या शौर्याने सकल भूमंडल जिंकून सार्वभौम पदवी संपादिली, असे वर्णन आहे. ह्या रघूच्या वंशाचे म्हणजे तद्वंशीय राजांचे चरित्र ह्यात वर्णिले आहे. म्हणून ह्यास रघुवंश असे नाव दिले आहे. ह्या काव्याचे सर्ग म्हणजे विभाग एकंदर १९ आहेत. ते सर्व मिळून दिलीप राजापासून ते शेवटच्या अग्निवर्णराजापर्यंत सुमारे अठ्ठावीस राजांचे वर्णन ह्या काव्यात आले आहे. काव्याच्या प्रारंभी सामान्यतः सर्व रघुवंशीय राजांचे एकंदरीने गुणवर्णन करून पुढे अनुक्रमाने एकेक राजाच्या चरित्रवर्णनास आरंभ केला आहे. प्रथम दिलीप, मग रघु, पुढे अज आणि त्यापुढे दशरथ मिळून चार राजांचे चरित्र पहिल्या नऊ सर्गांत वर्णिले आहे. तेथून पुढे प्रभु रामचंद्र ह्याचे अवतारचरित्र सहा सर्गांत वर्णिले आहे. त्यापुढे रामचंद्राचा पुत्र कुश आणि कुशाचा पुत्र अतिथि ह्या दोघांचे चरित्र अनुक्रमे दोन सर्गांत वर्णन पुढे अतिथिराजापासून तो अग्निवर्ण राजापर्यंत एकंदर वीस एकवीस राजांचे चरित्र एकाच म्हणजेच १८ व्या सर्गात संक्षेपाने वर्णिले आहे व शेवटी म्हणजे १९ व्या सर्गात अग्निवर्ण राजाचा शृंगारवर्णन, त्याचा अंतकाळ व त्याच्या गर्भिणी राणीस राज्याभिषेक करून त्याच्या मंत्रिमंडळाने राज्य चालविले, हे सांगून कवीने ह्या काव्याची समाप्ती केली आहे. ह्या काव्यात रघुवंशीय राजांच्या प्रतापाच्या व त्यास संसारात प्राप्त झालेल्या सुखदुःखानुभवाचे वर्णन केले आहे. शृंगार, वीर, करुण इ. सर्व रस प्रसंगाप्रसंगाने कवीने ह्यात आणिले आहेत. सहाव्या सर्गातील इंदुमतीचे स्वयंवर, नवव्या सर्गातील वसंतोत्सव, १९ व्या सर्गातील अग्निवर्ण राजाची क्रीडा इत्यादिक श्रृंगाररसाची मुख्यस्थाने आहेत. द्वितीय सर्गातील दिलीपाने सिंहास केलेले स्वदेहार्पण, चौथ्या सर्गातील रघूचा दिग्विजय, बाराव्या सर्गातील रावणाचा वध इ. वीररसाची मुख्यस्थाने आहेत. तसेच आठव्या सर्वातील इंदुमतीचे मरण, नवव्या सर्गातील मृगयेच्या अंती दशरथाच्या हातून घडलेला तापसपुत्राचा वध, चौदाव्या सर्गातील रामचंद्राने केलेला सीतेचा परित्याग, इ. करुणरसाची मुख्यस्थाने आहेत. याखेरीज युद्ध इ. प्रसंगाने अद्भुत, रौद्र,

भयानक, बीभत्स इ. रस त्या त्या स्थळी उत्कृष्टरीतीने वर्णन केले आहेत. असे कालिदास कवीचे अप्रतिम कविता कौशल, ते ह्या काव्यात सर्वत्र दिसून येते.

प्रौढ व मधुर वर्णरचना, वर्णन करण्याची शैली, निरनिराळ्या रसांचा आविर्भाव, वगैरेमुळे 'रघुवंश' हे काव्य कालिदासाच्या सर्व काव्यांत श्रेष्ठ होय.

२.३ विषयविवेचन-

२.३.१ भाषांतर

शब्द व त्याचा अर्थ ह्यांचे सम्यक् ज्ञान होण्यासाठी (मी) शब्द व त्यांचा अर्थ ह्यांच्याप्रमाणे नित्य संबंध असलेले, जगाचे आईवडील असलेले पार्वती व भगवान शंकर यांना नमस्कार करतो.|| १ ||

कोठे सूर्यापासून उत्पन्न झालेला वंश आणि लहानसान विषयात चालणारी (माझी), बुद्धी. अज्ञानामुळे (मी) लहानशा नावेने तरून जाण्यास कठीण अशा समुद्राला तरून जाण्याची इच्छा करणारा आहे. ||२||

(शिवाय मी) मूर्ख/अज्ञानी, कवीच्या यशाची इच्छा करणारा, उंच मनुष्याच्या हाताला येणाऱ्या फलाकरिता हात वर करणाऱ्या, ठेंगू माणसाप्रमाणे उपहासाला पात्र होईन ॥३॥

किंवा (तथापि) प्राचीन कवींनी आपल्या वाणीरूपी दरवाजा बनविलेल्या ह्या (रघु-) वंशात वज्राने छिद्र पाडलेल्या मण्यात (रत्नात) धाग्याप्रमाणे माझा संचार आहे. ||४||

तो मी (कालिदास) जन्मापासून शुद्ध असलेल्या, फळप्राप्तीपर्यंत उद्योग करीत राहणाऱ्या, समुद्रापर्यंत पृथ्वीवर शासन (राज्यकारभार) असणाऱ्या, स्वर्गापर्यंत रथाचा मार्ग असलेल्या (रघूच्या वंशाचे मी वर्णन करतो). ||५||

विधिपूर्वक अग्नीत आहुती देणाऱ्या, याचकांच्या इच्छेनुसार दान देणाऱ्या, अपराधानुसार शासन (शिक्षा) करणाऱ्या, योग्यकाळी जागे होणाऱ्या (रघुच्या वंशाचे मी वर्णन करतो). ||६||

दान देण्यासाठी धनसंचय करणाऱ्या, सत्यासाठी अल्प भाषण करणाऱ्या, कीर्तीकरिता विजयाची इच्छा करणाऱ्या, संततिप्राप्तीसाठी गृहस्थाश्रम स्वीकारणाऱ्या, (रघूच्या वंशाचे मी वर्णन करतो.) || ७ ||

बालपणी विद्याभ्यास करणाऱ्या, तारुण्यात विषयोपभोगाची इच्छा बाळगणाऱ्या, म्हातारपणी मुनींची वृत्ती धारण करणाऱ्या (व) अन्तकाली योगाच्याद्वारे (परमात्म्याचे ध्यान करीत) देहत्याग करणाऱ्या, (रघूच्या वंशाचे मी वर्णन करतो.) ॥८॥

वाणीचे वैभव कमी असूनही त्यांच्या (रघुवंशीय राजांच्या) गुणांच्याद्वारे कानावर येऊन (काव्य लिहिण्याचे) धाडस करण्यास प्रवृत्त झालेला, (मी कवी कालिदास), रघूच्या वंशाचे वर्णन करतो. ||९||

गुणदोषांची चांगल्याप्रकारे पारख करणारे सज्जन, विद्वान लोक त्या (रघुवंश काव्या) ला ऐकण्यास पात्र आहेत, कारण सोन्याची शुद्धता किंवा काळसरपणा, हिणकसपणादेखील अग्नीत दिसून येतो. ||१०||

विद्वानांमध्ये पूज्य वैवस्वत नावाचा मनू वेदांतील ॐकाराप्रमाणे राजांमध्ये पहिला (राजा) होऊन गेला. ॥११॥

ज्याप्रमाणे क्षीरसागरातून चंद्र (उत्पन्न झाला) (त्याप्रमाणे) पवित्र अशा त्याच्या कुळामध्ये अतिशय पवित्र, राजांमध्ये श्रेष्ठ (असा) दिलीप नावाचा राजा जन्मास आला. ॥१२॥

रुंद छातीचा, बैलासारखे (मांसल व पुष्ट) खांदे असलेला, शालवृक्षाप्रमाणे उंच (व) विशाल बाहू असलेला (असा तो) आपल्या कर्माला अनुकूल शरीर धारण केलेला जणूकाय (मूर्तिमंत) क्षत्रिय धर्मच. ||१३||

(राजा दिलीप) सर्वांहून अधिक अशा बलाने, सर्वांना दिपवून टाकणाऱ्या तेजाने, सर्वांहून उंच अशा शरीराने मेरू पर्वताप्रमाणे पृथ्वीला आक्रमून, स्थित राहिला होता. ||१४||

(तो दिलीप राजा) शरीराला साजेशी बुद्धी असलेला, बुद्धीला अनुरूप विद्याभ्यास असलेला, विद्याभ्यासास अनुरूप कार्य करणारा, (आणि) आरंभलेल्या कार्यानुरूप फलनिष्पत्ती असलेला (असा होता). ||१५||

भयंकर आणि मनोहर अशा राजाला साजेशा गुणांनी तो (राजा दिलीप) नोकर-चाकर इत्यादी लोकांना आणि मगर इ. जलचर प्राणी व रत्ने यांच्यामुळे समुद्राप्रमाणे भीतिप्रद व आश्रय करण्यास योग्य असा आदरणीय झाला. ||१६||

नियमन करणाऱ्या चाकाच्या धावेप्रमाणे व्यवहार असणारी त्याची प्रजा मनूच्या काळापासून चालत आलेल्या न्याय्य मार्गापासून थोडीशीही, काडीभरसुध्दा ढळली नाही (बाजूला गेली नाही). ||१७||

ज्याप्रमाणे सूर्य हजारो पटींनी (पाऊसस्वरूपात) वर्षाव करण्यासाठी/ देण्यासाठी (पृथ्वीकडून) जल/ पाणी घेतो. (त्याप्रमाणे) तो (दिलीप राजा) प्रजेच्या समृद्धीसाठीच त्यांच्यापासून (विविधप्रकारचा) कर घेत असे. ||१८||

त्या (दिलीप राजाची) (चतुरंग-हत्ती-घोडे-रथ-पायदल) सैनिक असा (एक मोठा) लवाजमा (होता), (तसेच) प्रयोजनसिद्धीचे साधन म्हणून केवळ दोनच (गोष्टी होत्या) (१) शास्त्रांमध्ये नित्य (प्रवेश करणारी) बुद्धी आणि (२) धनुष्यावर चढविलेली प्रत्यंचा (धनुष्यबाण). ॥१९॥

सल्लामसलती, खलबते गुप्त ठेवणाऱ्या, भाव व संकेत गुप्त असलेल्या त्या (दिलीप राजाचे) राजकीय धोरण (साम-दाम-भेद-दण्ड उपायविषयक कार्य) पूर्वजन्मीच्या संस्काराप्रमाणे कार्याच्या परिणामानुसार (फलानुसार) अनुमानावे लागे. ||२०||

तो (दिलीप) निर्भय होऊन (न घाबरता) स्वतःचे संरक्षण करीत असे, निरोगी अवस्थेत धर्माचरण करीत असे, निर्लोभीपणे संपत्ती मिळवित असे, आसक्तिरहित होऊन सुखाचा उपभोग घेत असे. ||२१||

तो (दिलीप) ज्ञान असूनही मौन बाळगत असे, सामर्थ्य असूनही क्षमा करीत असे, दान देत असूनही (त्याच्याठिकाणी) आत्मप्रशंसेचा अभाव असे, (ह्याप्रमाणे) त्याचे (परस्परविरोधी) गुण गुणांशी असणाऱ्या साहचर्यामुळे जुळ्या भावंडाप्रमाणे (होते.) ||२२||
विषयांच्या आहारी न गेलेल्या, (विविध) विद्यांमध्ये पारंगत असलेल्या, कर्तव्यदक्ष असलेल्या, त्या राजाला म्हातारपणाशिवाय वृद्धत्व आले होते. ॥२३॥
तो (राजा) प्रजालोकांची शिक्षणाची व्यवस्था करीत असल्यामुळे, (त्यांचे) संरक्षण करीत असल्यामुळे, पालनपोषण करीत असल्यामुळे (प्रजेचा) पिता होता, (त्यांचे) मातापिता फक्त जन्मदाते होते. ||२४||
समाजधारणेकरिता अपराध्यांना शिक्षा करणाऱ्या, (आणि) संतानप्राप्तीसाठी विवाह करणाऱ्या, त्या विद्वान राजाचे (अर्थ व काम देखील) धर्मच होते .||२५||

**२.३.२ कालिदास जीवनचरित्र, काळ आणि ग्रंथसंपदा**

कालिदास संस्कृतभाषेचा एक महाकवी व नाटककार आहे. कालिदासाने स्वतःविषयी आपल्या ग्रंथांत कुठेच माहिती दिलेली नाही. त्याचे विश्वसनीय चरित्रही उपलब्ध नाही. त्यामुळे त्याच्या स्थलकालाविषयी विद्वानांत मतभेद निर्माण झाले आहेत. काही विद्वानांनी प्राचीन परंपरेला अनुसरून कालिदास ख्रिस्त-पूर्व पहिल्या शतकात होऊन गेला, असे मानले आहे. ते मानतात, की शकारी विक्रमादित्याच्या पदरी असलेल्या नवरत्नांपैकी तो एक होता. या विक्रमादित्याने सनपूर्व ५७ मध्ये आपल्या नावाचा विक्रमसंवत सुरू केला. उज्जयिनी ही त्याची राजधानी असून कालिदासाचे वास्तव्यही याच नगरीत होते. पण काही पंडितांच्या मते कालिदास हा गुप्त घराण्यातील द्वितीय चंद्रगुप्त विक्रमादित्य याच्या आश्रयाला होता. या विक्रमादित्याने इ. स. ३८० ते ४१३ या कालखंडात राज्य केले. म्हणून कालिदास ४ थ्या शतकाच्या शेवटी व पाचव्या शतकाच्या आरंभी झाला असला पाहिजे, असे ते म्हणतात.

कालिदासाच्या कालाप्रमाणेच त्याच्या स्थलाबाबतही विद्वानांत एकमत नाही. बंगाल, ओडिसा, मध्यप्रदेश व काश्मीर या चारी प्रदेशांतले लोक आपापल्या भागात त्याचे वास्तव्य सांगतात. पण मध्यप्रदेश किवा काश्मीर या दोनच प्रदेशात त्याचे वसतिस्थान असण्याचा संभव आहे. ऋतुसंहारम् खंडकाव्यातील वर्णन मध्यप्रदेशातील ऋतूंशीच जुळणारे आहे. मेघदूतम् खंडकाव्यात मेघाला मार्ग सांगण्याच्या निमित्ताने त्याने मध्यप्रदेशातील अनेक स्थळांचे व उज्जयिनीचे आत्मीयतेने वर्णन केले आहे. त्यावरून विद्वानांनी उज्जयिनी हेच कालिदासाचे निवासस्थान मानले आहे.

कालिदासाला हिमालयाचेही बरेच आकर्षण दिसते. कुमारसंभवम् महाकाव्याचे सर्व कथानक व मेघदूताम् खंडकाव्याचा उत्तरार्ध हिमालयाशी संबंधित आहे. रघुवंशम्, अभिज्ञानशाकुंतलम् व विक्रमोर्वशीयम् यांतही अनेक ठिकाणी हिमालयाचा संबंध आलेला आहे. म्हणून काही पंडित त्याला

काश्मीरचा निवासी मानतात. कालिदासाचा जन्म कदाचित पहाडी प्रदेशात झाला असावा व पुढे तो मध्यप्रदेशात येऊन स्थायिक झाला असावा.

कालिदासाच्या वैयक्तिक जीवनाबद्दलची माहिती अनुमानांच्या आधारेच मिळवावी लागते. त्याचा जीवनवृत्तांत, त्याचे कवित्व, चातुर्य व औदार्य यांबद्दल अनेक दंतकथा प्रचलित असून, त्यांपैकी एक दंतकथा पुढीलप्रमाणे-

कालिदास हा ब्राह्मणाचा मुलगा. तो सुरूप, सुदृढ आणि बुद्धिमान होता. लहानपणीच आईवडिलांचे निधन झाल्यामुळे एका गवळ्याने त्याचा सांभाळ केला. त्यामुळे त्याच्यावर विद्येचे संस्कार झाले नाहीत. जवळच्या नगरीतील एका राजकन्येचे लग्न तेथील प्रधानाने कपट करून त्या देखण्या पण विद्याविहीन मुलाशी लाऊन दिले. पुढे त्या राजकन्येने आपल्या मूर्ख पतीची निर्भर्त्सना करून त्याला कालीदेवीची उपासना करण्यास पाठविले. कालीच्या उपासनेमुळे त्याला कवित्व, विद्वत्व व कालिदास हे नाव मिळाले. तो परत आल्यावर पत्नीने त्याला विचारले. 'अस्ति कश्चिद् वाग्विशेषः? ‘तुझ्या वाणीत काही विशेष आहे का?’ तात्काळ त्याने 'अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा' या आरंभाचे ‘कुमारसंभवम्,' महाकाव्य कश्चित्कान्ताविरहगुरुणा' या आरंभाचे ‘मेघदूतम्’ खंडकाव्य आणि 'वागर्थाविव संपृक्तौ' या आरंभाचे ‘रघुवंशम्’ महाकाव्य अशी तीन काव्ये उत्तरादाखल अचूक म्हणून दाखविली. पुढे तो आपल्या बुद्धिवैभवाचे निमित्त झालेल्या आपल्या पत्नीशी मातृभावनेनेच वागू लागला. त्यामुळे चिडून जाऊन तिने त्याला शाप दिला, की 'एका स्त्रीच्या हातूनच तुझा मृत्यू होईल.

यानंतर कालिदास स्वैरपणे वागू लागला. एकदा कुमारदास नावाच्या आपल्या मित्राला भेटण्यासाठी तो सिंहलद्वीपात गेला असता तिथल्या एका गणिकेकडून त्याला समजले, की 'कमले कमलोत्पत्तिः श्रूयते न तु दृश्यते' एका कमलावरच दुसऱ्या कमलाची उत्पत्ति होते, असे ऐकले आहे. पण कधी पाहिले नाही, या श्लोकार्धाची पूर्ती करणाऱ्याला राजाने मोठे बक्षीस जाहीर केले आहे. कालिदासाने लगेच पुढील श्लोकार्ध रचून ती समस्यापूर्ती केली-' बाले तव मुखाम्भोजात् कथमिन्दीवरद्वयम्’ ‘तुझ्या मुखकमलावर दोन (नेत्ररूपी) निळी कमळे दिसतात हे कसे?’ त्यावर ती गणिका आश्चर्यचकित झाली. समस्यापूर्तीचे बक्षीस आपल्यालाच मिळावे म्हणून तिने कालिदासाचा खून करविला. पण तो गुन्हा उघडकीस आला. कुमारदासाला हे समजताच मित्रप्रेमामुळे त्याने कालिदासाच्या चितेवर स्वतःला जाळून घेतले.

ऐतिहासिकदृष्ट्या वरील आख्यायिकेत काही तथ्य नाही. त्यामुळे विश्वसनीय आख्यायिकांच्या अभावी, कालिदासाच्या ग्रंथांवरून त्याच्यांसंबंधी माहिती गोळा करावी लागते. कारण प्रत्येक ग्रंथकाराच्या विद्वत्तेचे, मतांचे व स्वभावाचे प्रतिबिंब त्याच्या ग्रंथात पडत असते, हे तत्त्व आता सर्वमान्य झालेले आहे. त्यानुसार त्याच्या वाङ्मयातील उल्लेखांवरून त्याच्या चरित्राविषयी पुढील अनुमाने निघू शकतात.

कालिदासाचा जन्म ब्राह्मण कुळात झाला होता. तो माळव्यातील उज्जयिनी नगरीत राहत असे. तो राजकवी असून शिवभक्त होता. त्याचे शिक्षण त्याकाळच्या एखाद्या गुरुकुलात झाले असावे. श्रुती, स्मृती, इतिहास, पुराणे, सांख्य, योग, वेदान्त, ज्योतिःशास्त्र, कामशास्त्र, वैद्यकशास्त्र, व्याकरण,

अर्थशास्त्र, संगीत, चित्रकला, इ. शास्त्रांचा आणि कलांचा त्याला उत्तम परिचय होता. राजदरबार व श्रीमंत लोक यांची त्याला सूक्ष्म माहिती होती. विद्या व विद्यागुरू यांच्याबद्दल त्याला नितांत आदर होता.

भावकवी, महाकवी व नाटककार या तीनही भूमिका कालिदासाने सारख्याच बजवल्या आहेत. 'ऋतुसंहारम्' निसर्गवर्णनपर खंडकाव्य, मेघदूतम् हे खंडकाव्य, कुमारसंभवम् व रघुवंशम् ही दोन महाकाव्ये आणि अभिज्ञानशाकुंतलम्, मालविकाग्निमित्रम्, विक्रमोर्वशीयम् ही नाटके या त्याच्या प्रसिद्ध साहित्यकृती आहेत.

### २.३.३ रघुवंशम् महाकाव्याचे कथानक

**प्रस्तावना:** कालिदासाने रघुवंशम् हे संस्कृत महाकाव्य रचलेले आहे. या महाकाव्यात रघूच्या वंशात जन्मलेल्या २८ राजांचे वर्णन एकोणीस सर्गांमध्ये केलेले आहे. यामध्ये दिलीप, रघु, दशरथ, राम, कुश आणि अतिथी यांचे सविस्तर वर्णन केलेले आहे. या सर्वांनी समाजात आदर्श निर्माण करण्यात यश मिळवले आहे. त्यात रामाचे विस्ताराने वर्णन केलेले आहे.

मूळ कवी वाल्मिकी यांनी रामाला नायक बनवून रामायण या आर्ष महाकाव्याची रचना केली. ज्याचे अनुसरण जगातील अनेक कवी आणि लेखकांनी त्यांच्या स्वत:च्या भाषेत केले आणि रामाची कथा त्यांच्या पद्धतीने मांडली. कालिदासांनी रामाची कथा लिहिली असली तरी, या कथेत त्यांनी एकही पात्र नायक म्हणून अधोरेखित केलेले नाही. त्यांनी आपल्या 'रघुवंशम्' या काव्यग्रंथात संपूर्ण राजवंशाची कथा रचलेली आहे, जी दिलीप राजापासून सुरू होते आणि अग्निवर्णावर संपन्न होते. अग्निवर्णाच्या मृत्यूनंतर आणि त्याच्या गर्भवती पत्नीच्या राज्याभिषेकानंतर हे महाकाव्य संपन्न होते.

**रघुवंशम् महाकाव्याचे कथानक**

'रघुवंशम्' महाकाव्याचे कथानक दिलीप आणि त्याची पत्नी सुदक्षिणा यांच्या वसिष्ठ ऋषींच्या आश्रमातील प्रवेशाने सुरू होते. राजा दिलीप श्रीमंत, सद्गुणी, हुशार आणि बलवान तसेच कर्तव्यनिष्ठ आहे. तो सर्वगुणसंपन्न आहे. पण तो अपत्यरहित आहे. अपत्यप्राप्तीचा आशीर्वाद मिळावा म्हणून वसिष्ठ ऋषी दिलीप राजाला कामधेनु गायीची कन्या नंदिनीची सेवा करण्यास सांगतात. रोजच्या प्रमाणे नंदिनी जंगलात भटकत असते आणि दिलीप राजादेखील तिच्यासोबत तिच्या संरक्षणासाठी जातो. दरम्यान, सिंहाला नंदिनीला आपले खाद्य बनवायचे आहे, हे दिलीप राजाच्या लक्षात येते. तेव्हा दिलीप स्वत:ला सिंहापुढे अर्पण करतो आणि सिंहाला त्याचे अन्न बनवण्याची प्रार्थना करतो. सिंह प्रार्थना स्वीकारतो आणि त्यांना मारण्यासाठी त्याच्यावर झेप घेतो. त्याच्यावर झेप घेऊन सिंह गायब होतो. तेव्हा नंदिनी सांगते की, तिने दिलीप राजाची परीक्षा घेण्यासाठी हा भ्रम निर्माण केला होता. दिलीप राजाच्या सेवेवर नंदिनी प्रसन्न होऊन त्याला पुत्रप्राप्तीसाठी आशीर्वाद देते. राजा

दिलीप आणि सुदक्षिणा नंदिनीचे दूध सेवन करतात आणि त्यांना पुत्रप्राप्ती होते. या प्रतिभावान पुत्राचे नाव रघु आहे. या रघू राजाच्या शौर्य आणि पराक्रमामुळे हा वंश रघुवंश म्हणून ओळखला जातो.

कालिदासांनी त्यांच्या 'रघुवंशम्' महाकाव्यात रघुच्या शौर्याचे सविस्तर वर्णन केलेले आहे. अश्वमेध यज्ञाच्या घोड्यासाठी त्याने इंद्राशी युद्ध केले आणि त्याची सुटका केली. विश्वजित यज्ञ पूर्ण करून त्यांनी आपली सर्व संपत्ती दान केली होती. जेव्हा त्याच्याकडे पैसे शिल्लक नव्हते, तेव्हा एके दिवशी ऋषिपुत्र कौत्स आला आणि त्याने त्याच्या गुरूंना दक्षिणा देण्यासाठी १४ कोटी सोन्याची नाणी मागितली. या ब्राह्मणाचे समाधान करण्यासाठी रघूने कुबेरावर हल्ला करण्याचे ठरवले. ही माहिती मिळताच कुबेर घाबरले आणि त्यांनी स्वत: रघू राजाची तिजोरी भरली. रघूने संपूर्ण निधी ब्राह्मणाला (कौत्साला) प्रदान केला. पण त्या ब्राह्मणपुत्राने फक्त १४ कोटी सोन्याची नाणीच स्वीकारली.

रघू राजाचा पुत्र अजदेखील खूप शूर होता. तो विदर्भातील राजकन्या इंदुमतीच्या स्वयंवरास गेला आणि तिला पत्नी बनवले. कालिदासांनी या स्वयंवराचे सुंदर वर्णन आपल्या महाकाव्यामध्ये केलेले आहे. अजाचे राजकौशल्य पाहून रघुने आपले सिंहासन त्याच्या हाती दिले आणि वानप्रस्थाश्रम स्वीकारला. रघूप्रमाणेच अज राजाही कुशल राजा झाला. त्यांची पत्नी इंदुमती हिच्यावर त्यांचे अतूट प्रेम होते. एकदा नारदजी आनंदी मन:स्थितीत आपल्या वीणेसह आकाशमार्गाने फिरत होते. योगायोगाने त्यांच्या वीणेतील एक फूल तुटून बागेत फिरत असलेल्या राणी इंदुमतीच्या डोक्यावर पडले. त्यामुळे तिचा मृत्यू झाला. इंदुमतीपासून वियोग झाल्यावर राजा अजदेखील व्याकूळ झाला आणि शेवटी त्याने जलसमाधी घेतली.

कालिदास यांनी 'रघुवंशम्' महाकाव्याच्या आठ सर्गांमध्ये दिलीप, रघु आणि अज यांच्या चरित्रावर प्रकाश टाकलेला आहे. नंतर त्यांनी दशरथ, राम, लव आणि कुश यांची कथा वर्णन केलेली आहे. राम लंकेहून परत येत असताना सीतेला पुष्पकविमानातून दंडकारण्य आणि पंचवटी ही स्थळे दाखवत होते, जिथे त्यांनी सीतेचा शोध घेतला होता.

अयोध्येची भूतकाळातील कीर्ती आणि सद्यस्थितीचे वर्णन कवीने कुशाच्या स्वप्नातून केलेले आहे.

रघुवंशम् महाकाव्याच्या अंतिम सर्गात म्हणजेच १९ व्या सर्गात रघुवंशाचा शेवटचा राजा अग्निवर्णाच्या सुख-विलासांचे चित्रण करण्यात आले आहे. अग्निवर्णाच्या उद्दामपणाची उंची एवढी आहे की, जेव्हा लोक राजाला भेटायला येतात तेव्हा अग्निवर्णाने खिडकीबाहेर पाय पसरवले होते. सार्वजनिक अनादराचा परिणाम राज्याच्या अधोगतीला कारणीभूत होतो. अग्निवर्णाचा ऱ्हास झाला. त्याला क्षयरोग झाला व त्यामुळे त्याचा मृत्यू झाला. यासाठी कालिदासाचे स्पष्टीकरण असे आहे

की, अग्निवर्णाचे वडील सुदर्शन यांनी आपल्या राज्याची अशी सुंदर मांडणी केली होती की, अग्निवर्णाला काही उरले नाही, तेव्हा त्याच्या इच्छा-वासना प्रबळ होऊ लागल्या आणि तो अधोगतीकडे वाटचाल करीत राहिला.

अग्निवर्णाच्या मृत्यूनंतर आणि त्याच्या गर्भवती पत्नीच्या राज्याभिषेकानंतर हे महाकाव्य संपते.

**आशय: इतिहास इतिहास घडवित असतो, हे सत्य आहे. हे या महाकाव्याच्या कथानकातून अनुभवास येते.**

### २.३.४ कालिदासविरचित रघुवंशम् महाकाव्य सारांश

संस्कृत कवी कालिदास सर्वांना परिचित आहे. पण कालिदासाबद्दल विश्वसनीय व अचूक माहिती कोठेच सापडत नाही. काही विद्वान त्याला इ.स. च्या पहिल्या शतकातला मानतात, तर काही विद्वान इ.स. ३८० ते ४२३ या काळातील मानतात. मध्यप्रदेश अथवा काश्मीर यांपैकी एका प्रदेशात त्याचे वास्तव्य असावे, असे म्हटले जाते. कारण या दोन ठिकाणांचे भौगोलिक वर्णन त्याच्या काव्यांमधे सापडते. नाटककार व कवी या दोन्ही भूमिका कालिदासाने समर्थपणे पेललेल्या दिसतात. कालिदासाची शैली, काव्यसौंदर्य, त्यातील भावुकता, निसर्ग व मानव यांच्यातील अतूट संबंध याबद्दल अनेकांनी लिहिलेले वाचावयास मिळते. रघुवंशम्, कुमारसंभवम् ही दोन महाकाव्ये, मेघदूतम्, ऋतुसंहारम् ही दोन खंडकाव्ये आणि अभिज्ञानशाकुंतलम्, विक्रमोर्वशीयम् आणि मालविकाग्निमित्रम् ही तीन नाटके अशी विविधतेने नटलेली साहित्यसंपदा कालिदासाने रचलेली आहे.

### रघुवंशम् महाकाव्याचा सारांश

कालिदासाने रघुवंशम् हे संस्कृत महाकाव्य रचलेले आहे. या महाकाव्यात रघूच्या वंशात जन्मलेल्या २८ राजांचे वर्णन एकोणीस सर्गांमध्ये केलेले आहे. यामध्ये दिलीप, रघु, दशरथ, राम, कुश आणि अतिथी यांचे सविस्तर वर्णन केलेले आहे. या सर्वांनी समाजात आदर्श निर्माण करण्यात यश मिळवले आहे. त्यात रामाचे विस्ताराने वर्णन केलेले आहे.

**सर्ग १-२:** - आत्मविश्वासाला साजेल अशा लीनतेने आरंभ करून, निपुत्रिक दिलीपराजास कामधेनूकन्या नंदिनीच्या निरलस, जीवनसमर्पणाच्या सेवेमुळे झालेली पुत्रपाप्ती

**सर्ग ३-५:** - रघूचे बालपण, राज्याभिषेक, दिग्विजय आणि अश्वमेध यज्ञ

**सर्ग ५-८:** - अज-इंदुमतीचा स्वयंवरपूर्वक विवाह, स्वर्गीय माला हृदयावर पडून इंदुमतीचा मृत्यू, अजाचा करुण विलाप आणि आत्महत्या

**सर्ग ९:** - श्रावणबाळ-हत्येमुळे शापित दशरथाचे जीवन

**सर्ग १०-१५:** - रामायणाची करुणोदात्त कथा

**सर्ग १६:** - कुशाला राज्यलक्ष्मीचे स्वप्नात दर्शन, अयोध्येची पुनःस्थापना आणि कुशाचा

राज्यकारभार

**सर्ग १७-१८:** - कुशाचे वंशज आणि पुढील एकवीस राजे यांची राजवट

**सर्ग १९:** - सुदर्शनाचा पुत्र अग्निवर्ण या विलासी पण कलावंत राजाच्या मृत्यूने अखेर

**सर्ग पहिला**

या सर्गाचा प्रारंभ मंगलाचरणाने होतो. त्यानंतर कवीचे आत्मनिवेदन व रघुवंशाच्या मोठेपणाचे तसेच कीर्तीचे वर्णन येते. राजा दिलीपाचे कीर्तीवर्णन - पुत्रप्राप्तीच्या इच्छेने राजा दिलीप-पत्नी सुदक्षिणा हिच्यासह कुलगुरू वसिष्ठांच्या आश्रमात जाणे व वसिष्ठ आश्रमवर्णन येते. वसिष्ठांसमोर दिलीप आपली इच्छा प्रदर्शित करतो. तेव्हा महर्षी वसिष्ठ दिलीपाला पुत्रप्राप्तीसाठी कामधेनूकन्या नंदिनीची मनोभावे सेवा करण्यास सांगतात.

**सर्ग दुसरा**

या सर्गात वसिष्ठांच्या आश्रमात जाऊन महाराजा दिलीप-राणी सुदक्षिणादेखील कामधेनूकन्या नंदिनी गायीची सेवा करू लागते - नंदिनीवर सिंहाचा हल्ला, सिंह-दिलीप संवाद, दिलीपाची प्राणार्पण करण्याची तयारी व नंदिनी-दिलीप संवाद, नंदिनीकडून दिलीपाला वरदान- महर्षी वसिष्ठांच्या आदेशावरून दिलीपाने नंदिनीच्या दुधाचे प्राशन करणे- व्रतसमाप्तीनंतर होमहवन - महर्षी वसिष्ठ व गुरुपत्नी अरुंधती यांना तसेच कामधेनू व तिची कन्या नंदिनीला प्रदक्षिणा घालून सर्वांचा शुभाशीर्वाद मिळवून राजा दिलीपचा सुदक्षिणेसह अयोध्या नगरीत प्रवेश - यानंतर काहीकाळाने सुदक्षिणेची गर्भधारणा इ. वर्णन आले आहे.

**सर्ग तिसरा**

या सर्गात राजा दिलीप व राणी सुदक्षिणा यांच्या पुत्राचा (रघूचा) जन्म व त्याचे शिक्षण -अश्वमेध यज्ञाच्या अश्वाचे इंद्राकडून अपहरण - रघू व इंद्र यांच्यातील युद्धाचे वर्णन आलेले आहे.

**सर्ग चौथा**

या सर्गात महाराजा रघूच्या कीर्तीचे वर्णन - रघूच्या दिग्विजयाचे वर्णन-'विश्वजित' यज्ञाचे वर्णन आले आहे.

**सर्ग पाचवा**

या सर्गात रघूने वरतंतुशिष्य कौत्साला केलेल्या धनदानाचे वर्णन -हत्तीच्या रूपात असलेल्या प्रियंवद नावाच्या गंधर्वाला अजाकडून मिळालेल्या मोक्षाचे वर्णन - रघुपुत्र अजाचे विदर्भाकडे जाण्याचे वर्णन आलेले आहे.

**सर्ग सहावा**

या सर्गात इंदुमती स्वयंवरवर्णन- स्वयंवरासाठी जमलेल्या विविध देशातील राजांची वैशिष्ट्ये वर्णलेली आहेत.

**सर्ग सातवा**

या सर्गात अज - इंदुमती यांचा विवाह - त्यामुळे नाराज झालेल्या इतर राजांशी अजाचे झालेल्या युद्धाचे वर्णन आलेले आहे.

**सर्ग आठवा**

या सर्गात अजाकडे राज्याची जबाबदारी सोपवून रघूचे मोक्षप्राप्तीसाठी योगीजनांबरोबर आश्रमाकडे निघून जाणे- महर्षी नारदांच्या वीणेवरील फुलाची माळ पडल्यामुळे इंदुमतीचा मृत्यू - अजविलाप-यानंतर इंदुमती मूळात एक अप्सरा असल्याची व स्वर्गीय माळेमुळे तिला पुन्हा मुक्ती मिळाल्याची कथा अजाला गुरूकडून कळणे हे वर्णन आले आहे.

**सर्ग नववा**

या सर्गात दशरथाच्या दक्ष व न्यायी राज्यकारभाराचे वर्णन- मगध, कौशल, केकय या देशांच्या राजकन्यांशी राजाचा विवाह -शिकारीसाठी गेलेल्या दशरथ राजाकडून चुकून श्रावणाबाळाचा वध व त्यामुळे त्याच्या दुःखी मातापित्याकडून दशरथ राजाला मिळालेला शाप (शाप- दशरथाला म्हातारपणी पुत्रशोक सहन करावा लागेल) असा कथाभाग येतो.

**सर्ग दहावा**

या सर्गात अपत्यरहित अशा दशरथाच्या राज्यकारभाराचे वर्णन- दशरथाकडून पुत्रकामेष्टी यज्ञप्रारंभ- याचवेळी रावणाकडून त्रस्त झालेल्या देवांचे भगवान विष्णूकडे क्षीरसागरात जाणे - देवतांकडून विष्णूची स्तुती व रावणाच्या अत्याचाराचे वर्णन, त्यामुळे दशरथाच्या पुत्राकडून रावणाचा वध होईल भगवान विष्णूकडून आश्वासन- दशरथ राजाच्या यज्ञसमाप्तीनंतर यज्ञपुरुषाचे सोन्याची थाळी घेऊन प्रकट होणे- महाराजा दशरथाने यज्ञपुरुषाकडून दिलेला प्रसाद कौसल्या, कैकेयी व सुमित्रा राण्यांना देणे- दशरथाच्या पुत्रांचा जन्म, नामकरण, इ. संस्कार, बाललीला - राजकुमार रामातील सद्‌गुण व महाराज दशरथाच्या वैभवाचे वर्णन आले आहे.

**सर्ग अकरावा**

या सर्गात महर्षी विश्वामित्र यांच्या यज्ञाचे राक्षसांपासून संरक्षण करण्यासाठी पित्याची आज्ञा घेऊन राम-लक्ष्मण यांचे आश्रमाकडे जाणे- वाटेत 'ताडका' राक्षसीचा वध-विश्वामित्रांकडून रामाला विविध

अस्त्रांची प्राप्ती- महर्षी विश्वामित्राच्या आश्रमात मारीच व सुबाहूचा वध - यज्ञसमाप्ती -राजा जनकाकडून निमंत्रण, जनकाच्या नगरीकडे जाताना गौतम ऋषींची पत्नी अहल्या हिचा उद्धार -जनकाच्या नगरीत राम लक्ष्मण - यज्ञस्थळी जाणे, रामाकडून शिवधनुष्याचा भेद, सीतेचा रामाशी, लक्ष्मणाचा ऊर्मिलेशी, भरताचा मांडवीशी, शत्रुघ्नाचा श्रुतकीर्तीशी विवाह, परशुराम-राम यांच्यातील संवाद, नववधूसह राजधानीत प्रवेश एवढ्या घटना घडतात.

**सर्ग बारावा**

या सर्गात रामाचे वनवासागमन, दशरथाचा स्वर्गवास-चित्रकूटावर राम-भरत भेट, भरत रामाच्या पादुका सिंहासनावर ठेवणे प्रसंग- इंद्रपुत्र जयंत कावळ्याच्या रूपात सीतेला त्रास देतो तेव्हा चिडलेला राम बाण मारून त्याला एकाक्ष करतो तो प्रसंग, विराधाचा वध, पंचवटीतील निवास – शूर्पणखा प्रसंग - रामाकडून खर, दूषण, त्रिशिरा इत्यादी राक्षसांचा वध, सीताहरण, कबंध राक्षसाचा वध, राम व सुग्रीव यांची मैत्री, वालीचा वध, हनुमानाचा लंकाप्रवेश, रामाला मिळालेला सीतेचा संदेश – राम-बिभीषण यांची भेट, सेतूबांधणी, लंकेवर आक्रमण – रावणपुत्र मेघनाद, कुंभकर्ण, रावण यांचा वध, रामाचा विजय यांचे वर्णन येते.

**सर्ग तेरावा**

या सर्गात लंका विजयानंतर पुष्पक विमानातून रामाचे अयोध्येकडे प्रस्थान (येणे) - सैन्यासहित भरताकडून रामाचे स्वागत याचे वर्णन येते.

**सर्ग चौदावा**

या सर्गात रामाची त्याच्या परिवारातील इतरांशी भेट व राज्याभिषेकाचे वर्णन – राक्षसाच्या घरी राहिलेल्या सीतेचा स्वीकार केला एवढी गोष्ट वगळता प्रजाजन रामाच्या गुणांची प्रशंसा करतात, अशी माहिती भद्र नावाच्या दूताकडून रामाला मिळणे- त्यामुळे कर्तव्यदक्ष रामाकडून अनिच्छेने लक्ष्मणाकरवी सीतात्याग - सीता-लक्ष्मण संवाद - लक्ष्मण गेल्यावर सीतेचा विलाप ऐकून वाल्मीकीकडून सांत्वन - स्वआश्रमात घेऊन जाणे –सीतेचे स्वतःला तपाचरणात गुंतविणे - राम आपले विरहाचे दुःख बाजूला ठेऊन राज्यकारभारामध्ये व्यस्त असल्याचे वर्णन येते.

**सर्ग पंधरावा**

या सर्गात रामाच्या न्यायपूर्ण राज्याचे वर्णन, शत्रुघ्नाकडून लवणासुराचा वध, लव- कुश यांचा जन्म - रामाकडून शंबुकाचा वध, अश्वमेध यज्ञास प्रारंभ, यज्ञप्रसंगी महर्षी वाल्मीकीकडून रामाला लवकुशांचा परिचय- सीतेचे यज्ञस्थळी येऊन आपल्या निर्मल चारित्र्याची परीक्षा देण्याच्या वेळी पाताळात

अंतर्धान पावणे- यज्ञसमाप्ती – रामाचे आपल्या वारसदारांना राज्य विभाजित करून देणे आणि स्वतः प्राणत्याग करणे, याचे वर्णन आले आहे.

**सर्ग सोळावा**

या सर्गात रामाच्या वंशजांचा परस्परांतील व्यवहार -अयोध्यास्थित देवतेच्या आवाहनावरून कुशाचा अयोध्येचे पुनर्वसन करण्याचा व तेथे निवास करण्याचा निर्णय - त्यानुसार महाराज कुशाचे कुशावती नगरी ब्राह्मणांकडे सोपवून सैन्य व परिवारासह अयोध्येत येणे- कुशाकडून अयोध्येचा जीर्णोद्धार, पूजन, प्रवेश आणि निवास - ग्रीष्मवर्णन, कुशाचा जलविहार- कुशाचा एक दागिना पाण्यात पडणे-सापांचा राजा कुमुद याची बहीण कुमुद्वती हिने पाण्यात पडलेला कुशाचा दागिना कुतूहल म्हणून उचलून आणणे - कुमुद्वती -रामपुत्र कुश विवाह इ. वर्णन यात आलेले आहे.

**सर्ग सतरावा**

या सर्गात कुशाचा पुत्र 'अतिथी' याचा जन्म- त्याच्या संस्कारांचे वर्णन- कुशाचे इंद्राला युद्धात साहाय्य करण्यासाठी जाणे- दुर्जय राक्षसाचा वध व त्यावेळी स्वतः च कुशाचे स्वर्गात जाणे- कुमुद्वतीचेदेखील कुशापाठोपाठ स्वर्गागमन - त्यामुळे अतिथीला राज्याभिषेक - महाराजा अतिथीचे व्यक्तिमत्त्व, राज्यवैभव, अश्वमेध यज्ञ याचे वर्णन आहे.

**सर्ग अठरावा**

या सर्गात अतिथीचे पुत्र व कुशाचे नातू यांची वंशावली - निषध-नल-नभ-पुण्डरीक-क्षेमधन्वा-देवानीक-अहीनग-पारियात्र-शील-उन्नाभ-वज्रणाभ-शंखण-व्युषिताश्व-विश्वसह-हिरण्यनाभ-कोसल्य-ब्रह्मिष्ठ-पुत्र- पुष्य-ध्रुवसंधी-सुदर्शन. ध्रुवसंधी मृत्यु – सुदर्शनाचा लहान वयातच राज्याभिषेक -सुदर्शन-पाणिग्रहण संस्कार इ. वर्णन आले आहे.

**सर्ग एकोणिसावा**

या सर्गात महाराज सुदर्शनपुत्र अग्निवर्ण राज्याभिषेक आणि महाराज सुदर्शन संन्यासाश्रम स्वीकार- पित्याकडून संपन्न राज्यप्राप्ती -त्यामुळे अग्निवर्ण विलासी-व्यसनाधीन-व्यसनांमुळे त्याला क्षयरोगप्राप्ती व त्यातच त्याचा मृत्यु व त्याच्या गर्भवती राणीला सिंहासनावर बसवून सर्व मंत्रीगण व प्रजाजन नव्या राजाची प्रतीक्षा करतात, असे वर्णन आले आहे.

## २.४ स्वयं अध्ययनाचे प्रश्न

1. रघुवंशम् या महाकाव्यात ------ सर्ग आहेत.
   1) १९ ब) २० क) १७ ड) १८
2. रघुवंशम् या महाकाव्यात प्रथम रघुवंशीय राजा म्हणून ----- चे वर्णन आले आहे.
   अ) मनू वैवस्वत ब) लक्ष्मण क) दिलीप ड) रघु
3. ------- यांनी दिलीप राजास नंदिनी गायीची सेवा करण्यास सांगितले होते.
   अ) वसिष्ठ ब) कपिल क) पिंगलाचार्य ड) कामदेव
4. कालिदास यांनी --------- या महाकाव्याची रचना केलेली आहे.
   अ) शिशुपालवधम् ब) रघुवंशम् क) किरातार्जुनीयम् ड) सीताचरितम्
5. रघुवंशम् या महाकाव्यात --------- रस हा प्रमुख आहे.
   अ) शांत ब) वीर क) हास्य ड) रौद्र
6. अरुंधतींच्या पतीचे नाव काय होते?
   अ) जमदग्नी ब) गौतम क) वसिष्ठ ड) सांदिपनी
7. रघुवंशम् महाकाव्यातील पहिल्या सर्गात कोणत्या राजाचे वर्णन आलेले आहे ?
   अ) अग्नीवर्ण ब) दिलीप क) दशरथ ड) लक्ष्मण
8. क्व सूर्यप्रभवो वंश: क्व च अल्पविषया -----।
   अ) गति: ब) रीति: क) प्रगति: ड) मति:
9. रघुवंशम् महाकाव्यात दिलीप राजास वसिष्ठ यांनी कोणत्या गाईच्या कन्येची सेवा करण्यास सांगितले होते?
   अ) कामधेनु ब) कपिला क) पिंगला ड) नंदिनी

१०. रघुवंशम् हे महाकाव्याची कथा --------- मधून घेतलेली आहे.
   अ) पुराणातून ब) महाभारतातून क) रामायणातून ड) वेदातून

## २.५ परिशिष्ट-

छंद- अनुष्टुप

देवता– शिव पार्वती

लेखक- कालिदास

प्रथम सर्ग- ९५ श्लोक

प्रकार– महाकाव्य

उपजीव्यकाव्य- रामायण

नायक- दिलीप

नायिका- सुदक्षिणा
अंगिरस- शृंगार
रीती- वैदर्भी
गुण- प्रसाद
रघुवंशम् प्रथम सर्ग - प्रमुख पात्र
दिलीप- राजा
रघू- दिलीपचा पुत्र
अज- रघुचा पुत्र
दशरथ- अजाचा पुत्र
वसिष्ठ- रघुकुळाचे कुलगुरू
सुदक्षिणा- मगधदेशाची राजकुमारी
नंदिनी - कामधेनूची कन्या
रघुवंशम्- प्रथम सर्ग मुख्य संदर्भ
रघुवंशम् हे पंच महाकाव्यांतील महत्त्वपूर्ण महाकाव्य आहे.
रघुवंशम् महाकाव्यातील प्रथम सर्गातील अंतिम श्लोकात प्रहर्षिणी छंद आहे.
रघुने विश्वजित नामक यज्ञ केला होता.
नंदिनीने २१ दिवस दिलीप राजाची परीक्षा घेतली.
सिंहाचे नाव कुंभोदर होते. तो शिवभक्त होता.
रघुवंशातील प्रथम राजा वैवस्वत मनू हा होता.

**२.६ स्वयं अध्ययनाच्या प्रश्नांची उत्तरे**

१. अ)१९ २) अ) मनू वैवस्वत ३) अ) वसिष्ठ ४) ब) रघुवंशम्
५) ब) वीर ६) क) वसिष्ठ ७) ब) दिलीप ८) ड) मति:
९) अ) कामधेनु १०) क) रामायणातून

**२.७ सारांश-** या घटकातून आपण रघुवंशम् हे महाकाव्याची ओळख करून घेतली. या महाकाव्याचे संस्कृत महाकाव्यप्रकारातील स्थान व महत्त्व ज्ञात करून घेतले. रामायण आणि पद्मपुराणातून घेतलेल्या कथानकात कवी कुलगुरू कालिदासांनी आपल्या बुद्धिमत्तेप्रमाणे महाकाव्य निकष व तत्कालीन परिस्थितीनुसार योग्य असे बदल करून १९ सर्गांमध्ये रघुवंशीय २८ राजांचे केलेले वर्णन आहे. व प्रथम सर्गामध्ये उद्धृत केलेली रघुवंशीय राजांची आणि दिलीप राजाची गुणवैशिष्ट्ये सविस्तर अध्ययन केलीत.

**२.८ स्वाध्याय**

**भाषांतर श्लोक:-**

१)अनाकृष्टस्य विषयैर्विद्यानां पारदृश्वनः |

तस्य धर्मरतेरासीद् वृद्धत्वं जरसा बिना ||

प्रजानां विनयाधानाद् रक्षणाद् भरणादपि ।

स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः ||

स्थित्यै दण्डयतो दण्ड्यान्परिणेतुः प्रसूतये |

अप्यर्थकामौ तस्यास्तां धर्म एव मनीषिणः ||

२) रेखामात्रमपि क्षुण्णादा मनोर्वर्त्मनः परम् |

न व्यतीयुः प्रजास्तस्य नियन्तुर्नेमिवृत्तयः ||

प्रजानामेव भूत्यर्थं स ताभ्यो बलिमग्रहीत् ।

सहस्रगुणमुत्स्रष्टुमादते हि रसं रविः ||

सेना परिच्छदस्तस्य द्वयमेवार्थसाधनम् ।

शास्त्रेष्वकुण्ठिता बुद्धिर्मौर्वी धनुषि चातता ||

३) त्यागाय संभृतार्थानां सत्याय मितभाषिणाम् ।

यशसे विजिगीषूणां प्रजायै गृहमेधिनाम् ||

शैशवेऽभ्यस्तविद्यानां यौवने विषयैषिणाम् ।

वार्धके मुनिवृत्तीनां योगेनान्ते तनुत्यजाम् ||

रघूणामन्वयं वक्ष्ये तनुवाग्विभवोऽपि सन् ।

तद्गुणैः कर्णमागत्य चापलाय प्रचोदितः ||

**मोठे प्रश्न**

1) कालिदासविरचित रघुवंशम् महाकाव्याचे कथानक लिहा.
2) रघुवंशीय राजाची गुणवैशिष्ट्ये स्पष्ट करा.
3) दिलीप राजाचे गुणविशेष कथन करा.
4) कालिदासांचे जीवनचरित्र, काळ आणि साहित्यसंपदा यावर सविस्तर निबंध लिहा.

**२.९ क्षेत्रीय कार्य**

१) रघुवंशम् महाकाव्याच्या मूलाधार ग्रंथांचा अभ्यास करणे.

२) रामायण आर्ष महाकाव्यावर लिहलेल्या मराठी टीकांचे संकलन करण्यासाठी नजीकच्या ग्रंथलयास भेटी देणे.

३) कालिदास-ग्रंथसंपत्तीबद्दलची माहिती विविध माहितीस्रोताच्या आधारे संकलित करणे.

**२.१० अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ**

**(अ) प्राथमिक संदर्भग्रंथ-**

1. कालिदासविरचित, रघुवंशमहाकाव्यम्, चौखम्बा कृष्णदास अकादमी, वाराणसी
2. कालिदासविरचित, बोरवणकर आणि किंजवडेकर (संपा.), रघुवंश (सर्ग-१), चित्रशाळा प्रकाशन, पुणे

**(ब) दुय्यम संदर्भग्रंथ-**

1 द्विवेदी कपिलदेव, संस्कृत साहित्य का समीक्षात्मक इतिहास, रामनारायणलाल विजयकुमार २, कटरा रोड, इलाहाबाद- २११००२
2 त्रिपाठी रमाशंकर, संस्कृत साहित्य का प्रामाणिक इतिहास, चौखम्बा कृष्णदास अकादमी, वाराणसी
3 सहाय राजहंस, संस्कृत साहित्य कोश, चौखम्बा विद्याभवन, वाराणसी

**घटक क्रमांक - ३**
**माघकृत शिशुपालवधम्**
**द्वितीय: सर्ग: (श्लोक - २६ - ५०)**

**३.१) उद्दिष्टे -**

शिशुपालवधाच्या द्वितीय सर्गाच्या निवडक श्लोकांच्या अध्ययनातून विद्यार्थ्यांना -

१) महाकाव्य या संस्कृत काव्यप्रकाराची ओळख होईल.

2) संस्कृत कवी माघाची लेखनशैली व त्याच्या काळातील महाकाव्याचे स्वरूप यांची ओळख होईल.

3) प्राचीन राजनैतिक विचार बलरामाच्या संवादातून कळून येतील.

4) प्राचीन पौराणिक कथांची ओळख होईल.

**३.२) प्रस्तावना**

घटक क्रमांक १ मध्ये आपण महाकाव्याच्या लक्षण आणि स्वरूप यांचा साहित्यशास्त्रदृष्ट्या अभ्यास केला आहे. आणि पंचमहाकाव्यांचा साधारण परिचय सुद्धा करुन घेतला आहे. त्याच अनुषंगाने इ.सनाच्या आठव्या शतकात महाकाव्याचे बदलते स्वरूप माघाच्या काव्यातून द्योतित होते. या घटकात प्रसिद्ध पंचमहाकाव्यांपैकी शिशुपालवधम् या महाकाव्याचा विशेषत्वाने परिचय आणि ग्रांथिक वाचन आपण करुन घेणार आहोत.

संस्कृत वाङ्मयात काव्य ही अत्यंत व्यापक संकल्पना असून यात दृश्य म्हणजे रूपक (नाटक, प्रकरण, प्रहसन, इत्यादी) आणि श्रव्यकाव्य या दोहोंचा समावेश होतो. यापैकी श्रव्य काव्यात पुन्हा गद्य, पद्य आणि गद्य-पद्यात्मक चम्पू या तीन वाङ्मयप्रकारांचा समावेश होतो. पद्याचे पुन्हा प्रबंधकाव्य आणि मुक्तककाव्य असे दोन भाग पडतात. यातील प्रबंध काव्याचे पुन्हा महाकाव्य आणि खंडकाव्य असे दोन प्रकार केले जातात. अशाप्रकारे, श्रव्यकाव्याच्या पद्यप्रकारातील प्रबंधकाव्याचा एक प्रकार म्हणजे 'महाकाव्य' होय.

**३.३) विषयविवेचन-**

**३.३.१ भाषांतर** –

मंद बुद्धीचे लोक सुद्धा ग्रंथाचे अध्ययन करुन सहा गुण, तीन शक्ति आणि सिद्धी आणि तीन प्रकारचे उदय यांचे स्पष्टीकरण देण्यास समर्थ ठरतात. (एखाद्या) कार्याचा साधक-बाधक विचार न करणाऱ्या (करता) (परंतु, तरीसुद्धा त्या कार्याबद्दल) प्रभावशाली बोलणाऱ्या मनुष्याच्या वाणीचा संभार हा ध्येयापासून च्यूत ज्याचा बाण झाला आहे, अशा धनुर्धारी मनुष्याच्या (पोकळ) वल्गनेप्राणे व्यर्थ असतो. ज्याप्रमाणे बौद्धांचा आत्मा (नामक संकल्पना) कार्यररूपीशरारांमध्ये / सर्व निर्मिलेल्या शरीरांमध्ये पाच अंग भाग सोडून अन्य नसतो त्याप्रमाणे राजाचा मंत्र (नामक संकल्पना) हा समस्त कार्यररूपीशरारांमध्ये पाच अंगभाग सोडून नसते. सर्वांगे झाकलेली असताना सुद्धा ज्याप्रमाणे भित्रा योद्धा शत्रूकडून भेद केला जाईल (मारले जाऊ), या शंकेने प्रदीर्घकाळ (युद्धभूमीवर) तग धरु शकत नाही त्याप्रमाणे सर्व बाजूंनी गुपित

ठेवले असता सुद्धा मसलत ही इतरांकडून भेजली जाईल या शंकेने प्रदीर्घकाळ तग धरु शकत नाही. स्वतःचा उदय आणि शत्रूची हानि एवढीच राजनीति आहे. त्या (नीतीचा) स्वीकार करुन वाणीचा विस्तार केला जातो. मोठ्या लोकांचे अतिशय उत्कर्षाने सुद्धा समाधान होत नाही. येथे चंद्राच्या उदयाची आकांक्षा असणारा संपूर्ण समुद्र हा उदाहरण आहे. थोड्याशा सुद्धा संपत्तीने जो (स्वतःस आपण) सुस्थितीत आहोत, असे मानणारा होतो त्याच्या तिला (संपत्तीला) (आपण आपली) इतिकर्तव्यता पार पाडली आहे,असा (मानणारे) (त्याचे) दैव वृद्धींगत करत नाही, असे मी मानतो. शत्रूंचा समूळ संहार न करणाऱ्या मानी लोकांची उन्नती होत नाही. काळ्याकभिन्न अंधाराचा नाश करणारा सूर्य तेथे उदाहरण आहे. विरुद्ध पक्षाला नेस्तनाबूत न करता प्रतिष्ठा खरोखर दुर्लभ आहे. पाणी धूळीस चिखलाप्रत न नेता थाबंत नाही. जोपर्यंत एक सुद्धा शत्रू जीवंत आहे तोपर्यंत कोठून सुख मिळणार? कारण राहू देवांच्या समोर  चंद्राला त्रास देतो. कृत्रिम मित्र आणि शत्रू हे (सहज आणि प्राकृत मित्र आणि शत्रू यांपेक्षा) महत्त्वाचे असतात कारण ते (काही) कारणांमुळे/कामांमुळे (मित्र आणि शत्रू ) झालेले असतात. तसेच सहज आणि प्राकृत मित्र आणि शूत्रू सुद्धा होतात. उपकार करणाऱ्या शत्रू बरोबर तह करावा, अपकार करणाऱ्या मित्राबरोबर करु नये; उपकार आणि अपकार हे खरोखर या दोघांचे (म्हणजे शत्रूचे आणि मित्राचे) लक्षण जाणावे. हे हरि, रुक्मिणीला हरण करणाऱ्या तुझ्याकडून चैद्य राजा शत्रू बनविला गेला आहे. खोलवर रुजणाऱ्या शत्रूत्वरूपी वृक्षाची स्त्रिया ही खरोखर मोठी मूळे असतात. सूर्य निघून गेला आहे अशा मेरु पर्वताच्या तटभागांना ज्याप्रमाणे अंधकार घेरतो त्याप्रमाणे भौमाला जिंकण्यासाठी तू  (द्वारकेतून) गेला असता त्याने ह्या नगरीला (द्वारकेला) घेरले. त्याने (शिशुपालाने) बभ्रूच्या पत्नीचे अपहरण केले, ते हे बोलायला सुद्धा नको. कारण पापी लोकांच्या कथा सुद्धा अमंगल करण्यास खरोखर समर्थ असतात. अशाप्रकारे आपल्याकडून तो दुखविला गेला आहे आणि वारंवार आपल्याला (सुद्धा) दुखविले आहे. (अशाप्रकारे) तो श्रुतश्रवसाच्या मुलगा (त्याच्या) क्रियेने शूत्र झाला आहे. जी माणसे क्रोधित शत्रूशी वैर करुन उदासीन राहतात, ते वाळलेल्या गवतावर अग्नीला टाकून, वाऱ्याला सम्मुख होऊन झोपतात. जो क्षमाशील मनुष्य (आहे) (तो) कमी प्रमाणात किंवा एकदा केल्या गेलेल्या अपराधाला खूशाल क्षमा करो, (परंतु) वारंवार  केल्या जाणाऱ्या अपराधाला कोण क्षमा करेल ? (कोणीही करणार नाही.) इतर वेळी स्त्रीचे ज्याप्रमाणे लज्जायुक्त असणे हे भूषण आहे त्याप्रमाणे पुरुषाचा इतर वेळी क्षमाशीलता हा गुण आहे. मात्र, रतिक्रीडेमध्ये स्त्रीचा ज्याप्रमाणे निलाजरेपणा हा गुण आहे त्याप्रमाणे पुरुषाचा अपमानामध्ये पराक्रम हा गुण आहे. जो शत्रूने केलेल्या अपमानामुळे झालेल्या दुःखामुळे जळणारा, ज्याने जगू नये असा असताना सुद्धा जो जगतो, त्या आईला दुःख देणाऱ्या मनुष्याचा अजन्म असू दे (तो जन्मालाचा न येवो.) पायाने तुडविली गेलेली धूळ जी उठून (उडून) (तिला तुडविणाऱ्या माणसाच्या) डोक्यावर जाऊन बसते, ती धूळ अपमान झाला असताना सुद्धा स्वस्थ, शांत राहणाऱ्या मनुष्यापेक्षा श्रेष्ठ होय. ज्याप्रमाणे जाति, क्रिया आणि गुण यांच्याद्वारे कोणतेही व्यवहाररूप प्रयोजन न साधणारा, केवळ नावासाठी असणारा, मनाला वाटले म्हणून नाव ठेवलेला/मनमानी शब्द असतो त्याप्रमाणे (स्वतःच्या) जाति, क्रिया आणि गुण यांच्याद्वारे कोणतेही प्रयोजन न साधणारा मनुष्याचा जन्म केवळ नामधारी/नावासाठी असतो. पर्वतामध्ये उंची आहे. (मात्र) इतर (गुण) नाही. समुद्रामध्ये खोली आहे (मात्र) हे (उंची)

नाही. महान पुरुषांमध्ये (मात्र) (त्यांना) न उल्लंघण्याचे ते दोन्ही (मोठेपणा आणि गांभीर्य) कारण आहेत. समान अपराध असून सुद्धा राहू सूर्याला उशीराने ग्रासतो (तर) चंद्राला लगेचच ग्रासतो. हे जे आहे ते (चंद्राच्या) सौम्यपणाचे स्पष्ट फलित आहे. सारहीन गोष्टीचे उदाहरण म्हणजे गवताप्रमाणे असणारा दीन मनुष्य होय. अगदी थोडा सुद्धा वायुरूपी शत्रू जवळ आला असता स्वतःहून वाकतो, नत होतो.

३.३.२ **कवी सामान्य परिचय-**

कवि माघाचे शिशुपालवधम् हे महाकाव्य संस्कृत भाषेतील नावाजलेल्या पंचमहाकाव्यांपैकी एक म्हणून गणले जाते. प्रसिद्ध पंचमहाकाव्यांपैकी कुमारसंभव आणि रघुवंश यांना मेघदूतम् या खंडकाव्यासहित त्यांच्या लहान ग्रंथ-विस्तारामुळे लघुद्वयी तर किरातार्जुनीयम्, शिशुपालवधम् आणि नैषधीयचरितम् यांना त्यांच्या मोठ्या ग्रंथ-विस्तारामुळे बृहत्त्रयी म्हटले जाते. संस्कृत महाकाव्याच्या विकासक्रमात पहिली दोन महाकाव्ये ही कविकुलगुरु कालिदासप्रणित असून त्यामध्ये विषयवस्तूच्या मांडणीपेक्षा (manner) विषयवस्तूंवर (matter) जास्त लक्ष केंद्रित केलेले दिसते तर शेवटच्या दोन महाकाव्यांमध्ये विषयवस्तूपेक्षा विषयमांडणीवर जास्त लक्ष कवींनी दिलेले आहे. विषयवस्तू हा पांडित्याच्या आविष्कारासाठी आणि प्रदर्शनासाठी वापरलेला दिसतो. तसेच काव्याची सहजता, साधेपणा, नैसर्गिक सौंदर्य यांची जागा भपकेदारपणा, अलंकारांची रेलचेल, अतिसौंदर्यीकरण आणि त्यामुळे निर्माण झालेली कृत्रिमता यांनी घेतली. कवींनी स्वतःच्या अभिव्यक्तीपेक्षा पंडितांच्या प्रशंसेकडे जास्त लक्ष केंद्रित केले आणि काव्यांनी वाचकांच्या मनापेक्षा बुद्धीला जास्त साद घातली. यांमधील संधिदुवा म्हणजे भारवीचे काव्य होय. यात या दोहोंचा समतोल त्याने साधलेला दिसतो. मात्र भारवीनंतरच्या कवींनी विषयाच्या मांडणीला आकर्षित करण्याकरिता अवघड, रोजच्या वापरात नसलेले शब्दप्रयोग, शब्दच्छल, अलंकार, अतिशयोक्तिपूर्ण कविकल्पना, काव्यबंध तसेच पाल्हाळिक वर्णन अशा वेगवेगळ्या क्लृप्त्या योजल्याने काव्यातील सहज सौंदर्य झाकोळून गेलेले आहे. राजदरबारी पंडितांच्या पसंतीस उतरण्याकरिता केलेल्या या प्रयत्नांबरोबरच विषयवस्तूला ताणून राजोपयोगी विषयांची चर्चा सुद्धा यांत अंतर्भूत केलेली दिसते. त्यामुळे वाल्मीकींसारख्या निसर्गकवींसमोर किंवा कालिदासासारख्या सहज कवींसमोर नंतरच्या कवींचे काव्य हे दरबारी काव्य किंवा पंडिती काव्य वाटल्यावाचून राहत नाही. अशा कवींमध्ये माघाचा अंतर्भाव होतो.

पंडितांच्या पसंतीस उतरल्यामुळेच पंडितांनी निव्वळ एकाच कलाकृतीने अजरामरत्व मिळालेल्या माघावर मुक्तकंठे अनेक स्तुतीसुमने उधळली आहेत. जसे, संस्कृत भाषेतील नावाजलेल्या पहिल्या दहा श्रेष्ठ कवींमध्ये त्याची गणना केली जाते.[13] तसेच कवींमध्ये श्रेष्ठ म्हणून जरी कालिदासाचे नाव प्रख्यात असले तरी श्रेष्ठ काव्य म्हणून माघाच्याच काव्याचे नाव घेतले जाते.[14] त्याच्या काव्याच्या प्रथम नऊ सर्गांचे वाचन संपले असता एकही शब्द नूतन असा राहत नाही. म्हणजेच त्याने पहिल्या नऊ सर्गांमध्ये संस्कृत

---

[13] आदौ कालिदासः स्यादश्वघोषस्ततःपरम् । भारविश्च तथा भट्टिः कुमारश्चापि पञ्चमः।।
माघरत्नाकरौ पश्चाद्हरिश्चन्द्रस्तथैव च । कविराजश्च श्रीहर्षः प्रख्याताः कवयो दशाः।।

[14] पुष्पेषु चम्पा, नगरीषु लङ्का, नदीषु गङ्गा, नृवरेषु रामः । रामासु रम्भा, पुरुषेषु विष्णुः काव्येषु माघः, कवीषु कालिदासः।

भाषेचा संपूर्ण शब्दसंग्रह रिता केला आहे.[15] काव्यांमध्ये उपमा अलंकाराच्या उपयोगाकरिता कालिदास प्रसिद्ध आहे, भारवि अर्थगौरवासाठी सर्वश्रुत आहे, कवि दंडी पदलालित्यासाठी नावाजला जातो, तर हे तीनही गुण एकत्रितरित्या केवळ माघाच्या काव्यात आढळतात.[16] माघ या शब्दावर हेमंत ऋतूतील माघ महिन्याचा श्लेष साधून राजशेखराने मोठ्या खूबीने म्हटलें आहे की, माघाचे काव्य वाचून कोण बरे कंपित होत नाही ?[17] भारतीय सौर महिन्यांपैकी माघ महिन्यात हेमंत ऋतु असतो. उबदार कपडे न घातल्यास एखादा माणूस थंडीने जसा कुडकुडतो त्याप्रमाणे माघाचे काव्य वाचून भल्या भल्या कवींना कंप सुटतो. माघ महिन्याप्रमाणे संपूर्ण जगास कंपित करण्यास माघ सक्षम आहे.[18] साक्षात ज्याचे अनुकरण करीत किंवा स्पर्धा करीत माघ महाकाव्य लिहिण्यास उद्युक्त झाला, त्या भारवीला सुद्धा त्याने मागे टाकले आहे, असे भारवि आणि माघ या शब्दांच्या श्लेषात्मक अर्थातून द्योतित केले जाते. भारवि हे जसे एका कवीचे विशेषनाम आहे तसाच त्या शब्दाचा व्युत्पत्तीने अर्थ रवीचे म्हणजे सूर्याचे (रवेः) तेज (भा) असा सुद्धा होतो. आणि माघ या शब्दाचे सुद्धा दोन अर्थ होतात, एक म्हणजे कवीचे विशेषनाम आणि दुसरा म्हणजे भारतीय सौर महिना. जोपर्यंत माघ महिना उजाडत नाही तोपर्यंत सूर्याचे तेज प्रखर असते. परंतु एकदा का माघ महिना आला की सूर्याचे तेज निस्तेज होते. या प्राकृतिक नियमावरुन कवींनी माघाची प्रशंसा केली आहे की, जोपर्यंत माघाचा उदय होत नाही तोपर्यंत भारवीचे तेज झळाळते आणि एकदा का माघाचा उदय झाला की भारवीचे तेज हे माघ महिन्यातील सूर्याच्या तेजाप्रमाणे निस्तेज होते.[19] मुरारीच्या (कृष्णाच्या) पायांची इच्छा असल्यास पाप (अघ) करु नये (मा) आणि मुरारीच्या (मुरारी नामक कवीच्या) पदांची (पद जाणण्याची) इच्छा असल्यास माघाच्या काव्यात रत व्हावे.[20]

अशाप्रकारे उत्तुंग काव्यकल्पना, समृद्ध शब्दसंचय, प्रखर बुद्धिमत्ता, शब्दालंकार आणि अर्थालंकारांचा चपखल आणि सढळ वापर, वृत्तांचे वैविध्य, शब्द आणि ध्वनि यांचा सुयोग्य समेळ, माधुर्य आणि ओजस् गुणांनी साधलेले भाषेचे सौष्ठव अशा विविध गुणांमुळे कवि माघ हा नेहमीच संस्कृत पंडितांचा आवडता कवि ठरला आहे.

**१) माघाची वैयक्तिक माहिती –** बोटावर मोजण्याजोगे काही कवी सोडल्यास संस्कृत कवी सामान्यतः स्वतःबद्दल विस्ताराने काहीही सांगत नाही. स्वतःचे कुलनाम, आई-वडील किंवा गुरुचे नाव, फार-फार तर राजाश्रय देणाऱ्या राजाचे नाव, गावाचे नाव इत्यादी त्रोटक माहिती ही त्यांच्या स्वतःच्या लेखणीतून आपल्याला कळते. त्या माहितीतून कवीच्या आयुष्याबद्दल व्यवस्थित किंवा पूर्ण चित्र तयार करण्याकरिता आपल्याला अंतःपुरावे, बाह्य पुरावे, किं वदतीं इत्यादींवर अवलंबून रहावे लागते.

परंतु माघाने आपल्या काव्याच्या शेवटी येणाऱ्या पुष्पिकांमधून स्वतःच्या वंशाबद्दल थोडी माहिती दिलेली आहे. त्यानुसार राजा श्रीधर्मलाभाच्या पदरी पुण्यकर्मे करणारा, सदैव अनासक्त दृष्टी असणारा,

---

[15] नवसर्गगते माघे नवो शब्दो न विद्यते।।

[16] उपमा कालिदासस्य, भारवेरर्थगौरवम् । दण्डिनः पदलालित्यं माघे सन्ति त्रयोगुणः।।

[17] माघेनैव च माघेन कम्पः कस्य न जायते।।

[18] माघो माघः इवाशेषं क्षमः कम्पयितुं जगत् । श्लेषामोदभरं चापि सम्भावयितुमीश्वरः।।

[19] तावद् भाः भारवेः भाति यावन् माघस्य नोदयः। उदिते च पुनर्माघे भारवेर्भा रवेरिव।।

[20] मुरारिपदचिन्ता चेति माघे रतिं कुरु । मुरारिपदचिन्ता चेत् माऽघे रतिं कुरु।।

मनात कोणतेही किल्मिष नसणारा जणू दुसरा राजा/देव असा सुप्रभदेव नावाचा सर्वाधिकारी (प्रमुख मंत्री) होता.[21] ज्याप्रमाणे तथागत बुद्धाची सम्यक, संक्षिप्त व योग्य वचने सामान्य लोकांनी अनुरोध न करिता व स्वतःच्या हिताच्या इच्छेने स्वीकारली त्याप्रमाणे राजा श्रीमालाने मंत्री सुप्रभदेवाची योग्य वेळी (सल्लामसलतीच्या वेळी) योग्य, मोजकी, पथ्य अशी वचने (सल्ला/मंत्रणा) अनुरोध न करता, स्वतःच्या हिताच्या इच्छेने स्वीकारली.[22] त्या सुप्रभदेवाचा दत्तक नावाचा उदात्त, क्षमाशील, मृदु स्वभावाचा, धर्मपरायण मुलगा होता, ज्याला पाहून लोक व्यासांच्या अजातशत्रूबद्दलच्या (युधिष्ठिराबाबतच्या) गुणग्राही वचनांचा स्वीकार करीत.[23] सर्वांना आधार देण्याच्या त्यांच्या गुणामुळे त्यांना सर्वाश्रय हे दुसरे गुणाधारीत नाव प्राप्त झाले होते. ते खरोखर सज्जनांमध्ये श्रेष्ठ आणि अद्वितीय असे होते. त्यांच्या (दत्तकाच्या) मुलाने म्हणजे माघाने श्री शब्द हा ज्याचा सर्गसमाप्तीसूचक लक्षण आहे, असे लक्ष्मीपतीच्या (विष्णूच्या) चरित्राचे संकीर्तन करणारे, शिशुपालवधम् नावाचे सुंदर काव्य सुकवींच्या दुर्लभ किर्तीच्या इच्छेने रचले आहे.[24]

या कविवंशवर्णनावरुन आपणास असे कळून येते की, माघाचा एका लब्धप्रतिष्ठित राजमंत्र्याच्या घराण्यात जन्म झाला होता. त्याचे आजोबा हे श्रीधर्मलाभ नामक राजाचे समकालीन होते. त्याच्या आजोबांचे नाव सुप्रभदेव आणि वडीलांचे नाव दत्तक होत. त्याचे पूर्वज हे सत्शील आणि परोपकारी वृत्तीचे होते. सुकवी म्हणून यश किर्ती मिळविण्याच्या हेतूने त्याने हे काव्य लिहिले होते. आता श्रीधर्मलाभ राजाचा वंश, स्थळ आणि काळ कळल्यास माघाचा सुद्धा स्थळ-काळ कळून येईल. मात्र शिशुपालवधाच्या उपलब्ध हस्तलिखित प्रतींमध्ये श्रीधर्मलाभ राजाच्या उल्लेखास श्रीमाल, धर्मलाभ, धर्मतात, धर्मनाभ, धर्मनाथ, श्रीवर्मलात असे अनेक पाठभेद उपलब्ध होतात. त्यामुळे राजाच्या काळावरुन माघाचा काळ ठरविताना अनेक अडचणी येतात. त्यामुळे इतर बाह्य पुराव्यांचा आधार घ्यावा लागतो. यामध्ये प्रभावकचरितम् हे श्रीप्रभाचंद्राच्या (तेराव्या शतकाचा उत्तरार्ध) ग्रंथात माघाच्या आजोबांबद्दल, सुप्रभदेवाबद्दल उल्लेख आढळतो. यात ते ज्यांच्या पदरी मंत्री होते त्या राजाचे नाव श्रीवर्मलात असे सांगितले आहे.[25] त्यांचा माघ हा नातू असून तो राजा भोजाचा समकालीन होता, त्याचे गाव श्रीमाल किंवा भिल्लमालव (आजच्या गुजरात राज्यात) असे होते, असे उल्लेख आढळतात. तसेच शिशुपालवधाच्या काही हस्तलिखितांच्या प्रतींच्या सर्गांत पुष्पिकेमध्ये त्याच्या गावाचा उल्लेख श्रीभिल्लमालव असा केलेला असून माघास महावैय्याकरणी असे संबोधले आहे.[26] माघ महावैय्याकरणी असल्याची प्रतीति त्याचे काव्य वाचताना जागोजागी येते. याचबरोबर बल्लालसेनाचा भोजप्रबंध व मेरुतुंगाचार्यांचा प्रबंधचिंतामणि या ग्रंथात सुद्धा माघाचे उल्लेख आणि

---

[21] सर्वाधिकारी सुकृताधिकारः श्रीधर्मलाभस्य बभूव राज्ञः। असक्तदृष्टिर्विरजाः सदैव देवोऽपरः सुप्रभदेवनामा।।शि.व., सर्ग २०, कविवंश वर्णनम्,१, पृ. ३०५.

[22] काले मितं तथ्यमुदर्कपथ्यं तथागतस्येव जनः सचेताः। विनानुरोधात् स्वहितेच्छयैव महीपतिर्यस्य वचः चकार।।तत्रैव, २.

[23] तस्याभवद् दत्तक इत्युदात्तः क्षमी मृदुर्धर्मपरस्तनूजः। यं वीक्ष्य वैयासमजातशत्रोर्वचो गुणग्राहि जनैः प्रतीये।। तत्रैव, ३.

[24] श्रीशब्दरम्यकृतसर्गसमाप्तिलक्ष्म लक्ष्मीपतेश्चरितकीर्तनमात्रचारु। तस्यात्मजः सुकविकीर्तिदुराशयादः काव्यं व्यधत्त शिशुपालवधाभिधानम्।।तत्रैव, ५, पृ.३०६,

[25] अस्ति गुर्जरदेशो....। तत्र श्रीमालमित्यस्ति पुरं मुखमिव क्षितेः। तत्रास्ति.... नृपः श्रीवर्मलाताख्यः ...। तस्य सुप्रभदेवोऽस्ति मन्त्री मिततपाः
किल। प्रभावकचरित, १४.५-१०.

[26] इति श्रीभिल्लमालववास्तव्यदत्तकसुनोर्महावैय्याकरणस्य माघस्य कृतौ शिशुपालवधे महाकाव्ये...

त्याच्याविषयी आख्यायिका आढळतात. या कथांमधून तो अत्यंत दानशूर व आतिथ्यशील होता आणि तसेच त्याच्या दानशूरतेमुळे त्याला आयुष्याच्या शेवटी दारिद्र्यात दिवस काढावे लागले, असे दिसून येते. मात्र हे ग्रंथ दंतकथासदृश असल्यामुळे त्यांच्या ऐतिहासिकतेविषयी साशंकता वाटते. काव्यातील द्वारका नगरी, रैवतक पर्वत, समुद्र, यांच्या स्पष्ट वर्णनांवरुन त्याला या स्थळांशी सुपरिचय होता असे लक्षात येते आणि म्हणून तो सध्याच्या गुजरातचा निवासी होता, असा निष्कर्ष काढता येतो. तसेच तो बौद्ध धर्माबाबतही सहिष्णु होता व त्यास बौद्ध धर्माची आणि दर्शनाची माहिती होती, हे सुद्धा त्याच्या बौद्ध संदर्भांवरून दिसून येते. तसेच तो विष्णु भक्त असल्याने त्याने आपल्या काव्यातून कृष्णाचे चरित्र गायले आहे आणि इतर काव्यांपेक्षा याच्या काव्यात सूर्याचे प्रदीर्घ वर्णन आल्याने तो सूर्य-पूजक असल्याचे सुद्धा मानले जाते. काही अभ्यासकांचे असे मत आहे की, माघ हे कवीचे खरे नाव नसून त्याने मुद्दाम भारवीवर कडी करण्यासाठी धारण केलेले टोपणनाव आहे. मात्र सदर काव्याच्या सर्व हस्तलिखितांतील प्रतिसर्गाच्या पुष्पिकेमध्ये त्याचे नाव माघ असेच लिहिलेले दिसते. त्यामुळे त्याचे हे नाव खरे न मानण्याला प्रत्यवाय येत नाही.

**२) माघाचा काळ -** माघाने वर उद्धृत केलेल्या स्वतःच्या वंशवर्णनावरुन त्याच्या काळाबद्दल कोणतीही ठोस माहिती आपणास उपलब्ध होत नाही. मात्र पुन्हा पन्हा येणाऱ्या गौतम बुद्धांच्या आणि बौद्ध धर्माच्या उल्लेखावरुन असे अनुमान करण्यास वाव आहे की, बौद्ध धर्माच्या भरभराटीच्या काळात माघ होऊन गेला. पाश्चात्य आणि पौर्वात्य विद्वानांनी माघाच्या काळाबद्दल वेगवेगळी मते व्यक्त केली आहेत. त्यानुसार, वेबर यांनी त्याचा काळ दहावे शतक सांगितला आहे. याकोबी त्यास सहाव्या शतकातील तर मॅकडोनेल हे त्यास नवव्या शतकातील मानतात. रमेशचंद्र दत्त यांनी तर त्याला बाराव्या शतकातील मानले आहे. भोजप्रबंधामधील आख्यायिकांवरुन तो राजा भोजाचा समकालीन ठरतो आणि भोजाचा जो काळ म्हणजे अकरावे शतक तो त्याचाही काळ मानावा लागतो. मात्र या ग्रंथात कालिदास, भवभूति पासून अनेक कवी भोजाचे समकालीन दाखविले आहेत, जे अशक्य आहे. त्यामुळे या ग्रंथाची विश्वासार्हता ऐतिहासिकेतच्या दृष्टिकोनातून कमी पडते.

राजा श्रीवर्मलात यांचा एक शिलालेख राजपुताना येथील वसंतगढ येथे सापडला असून त्या राजाचा कालावधी हा इ.स. ६२५ असा निश्चित केला आहे. जर माघाच्या आजोबांचा आश्रयदाता असणारा राजा हाच शिलालेखातील श्रीवर्मलात असेल तर माघाच्या आजोबांचा काळ हा समकालीनतेमुळे तोच निश्चित होतो. आणि तेथून माघाची तिसरी पिढी म्हणून गणना केली असता माघाचा कालावधी इ.स. च्या सातव्या शतकाचा उत्तरार्ध निश्चित होतो.

तसेच ग्रांथिक आंतर-बाह्य पुराव्यांवरुन सुद्धा माघाची पर-अपर सीमा निश्चित करता येते. माघाच्या ग्रंथातील उद्धरणे नवव्या शतकातील आनंदवर्धनाने आपल्या ध्वन्यालोक या ग्रंथात दिली आहेत. तसेच त्याच्या अगोदर राष्ट्रकुट राजा नृपतुंग किंवा अमोघवर्ष याने रचलेल्या कविराजमार्ग या कन्नड भाषेतील ग्रंथात अमोघवर्षाने माघास कालिदासाच्या तोडीचा कवी समजले आहे. अमोघवर्षाचे इ.सन ८१४ साली राज्यारोहण झाले आणि त्याने इ.सन ८७८ पर्यंत राज्य केले. या दरम्यान त्याने या ग्रंथाची रचना केली असणार. म्हणजे कन्नड प्रांतात गुर्जर प्रांतीय कवीची कीर्ति श्रुतोपश्रुत होऊन पोहोचण्यासाठी माघाच्या काळापासून किमान प्रदीर्घ वर्षांचे अंतर मध्यंतरात मानावे लागणार. असे केले असता माघाचा काळ हा सातव्या शतकाचा उत्तरार्ध मानावा लागतो. ही माघाच्या काळाची पर सीमा ठरते

आता माघाच्या काळाची अपर सीमा निश्चित करण्याकरिता त्याच्या काव्यात तत्कालीन किंवा त्याच्या अगोदरच्या कोणत्या कवीचा किंवा ग्रंथाचा उल्लेख येतो, ते पाहावे लागते. माघाने त्याच्या काव्याच्या द्वितीय सर्गात वृत्ति आणि न्यास या दोन व्याकरणविषयक ग्रंथाचा उल्लेख केला आहे.[27] शिशुपालवधावरील टीकाकार वल्लभदेव आणि मल्लिनाथ या दोहोंनी यास पुष्टी दिली आहे, की याद्वारे माघाने जयादित्य व वामन यांची काशिकावृत्ति आणि त्यावरील जिनेंद्रबुद्धि यांची न्यास नावाची टीका यांचा निर्देश केला. या दोन ग्रंथाचे कर्ते, त्यांचे प्रतिवादक, त्यांचे टीकाकार या सर्वांचा साकल्यात्मक अभ्यास करुन माघाच्या काळाचे अनुमान करता येते. तसेच माघाने स्वतःचे काव्य हे भारवीशी जणु स्पर्धा करण्याच्या हेतूने लिहीलेले दिसते. तसेच माघाने त्याचे अनेक ठिकाणी अनुकरण सुद्धा केलेले दिसते. याचा अर्थ भारवी नंतर माघाचा काळ येतो. भारवीचा काळ इ.सना चे सहावे शतक असा निर्धारीत केला आहे. भारवीची किर्ती सुदूर पसरून त्यास वरचढ ठरण्याचा विचार करणाऱ्या माघाचा काळ, त्यामुळे, तदोपरांत म्हणजे सहाव्या शतकानंतर सातव्या शतकाचा उत्तरार्ध असा निर्धारीत करता येतो.

**३) माघाच्या काव्यकृती –** वर उद्धृत केल्याप्रमाणे आजपावेतो माघाची केवळ शिशुपालवधम् ही एकमेव महाकाव्यरुपातील काव्यकृती उपलब्ध आहे. परंतु यापेक्षा अजून काही काव्यकृती त्याच्या असू शकतील ज्या कालकवलीत झाल्याने आपल्यापर्यंत पोहोचू शकल्या नाहीत, कारण वल्लभदेवाच्या सुभाषितावलि आणि क्षेमेंद्राच्या औचित्यविचारचर्चा या ग्रंथांमध्ये माघाच्या नावाने काही पद्ये उद्धृत केली आहेत. मात्र ती शिशुपालवधम् या महाकाव्यातील नाहीत. त्यामुळे शिशुपालवधम् या महाकाव्याव्यतिरिक्त माघाची अन्य काही काव्यकृती नक्कीच असू शकतील, ज्यातून त्यांनी ही उद्धरणे दिली आहेत.

**३.३.४) महाकाव्याच्या कथेचा स्रोत –** साहित्यशास्त्राच्या नियमानुसार महाकाव्याचा विषयवस्तु हा प्रसिद्ध इतिहासातून घेतलेला असावा किंवा सज्जनाश्रयावर बेतलेला असावा. श्रीकृष्णाने केलेला शिशुपालाचा वध ही कथा महाभारत या इतिहास ग्रंथात, श्रीमद्भागवत पुराण आणि इतर पुराणे यांमध्ये थोड्या फार फरकाने येते. यापैकी महाभारतामधील कथानक प्रथम पाहू.

महाभारताच्या सभापर्वामध्ये शिशुपालाच्या वधाचे कथानक येते. एके दिवशी नारद मुनि हे युधिष्ठिराकडे येऊन संपूर्ण पृथ्वीस जिंकण्यास सक्षम असणाऱ्या त्यास, हरिश्चंद्राप्रमाणे राजसूय यज्ञ करावयास सांगतात. नारद मुनि निघून गेल्यानंतर युधिष्ठिर आपल्या भावांबरोबर याबाबत विचार विनिमय करतो. त्यांची सहमत मिळाल्यानंतर युधिष्ठिर श्रीकृष्णाचे मत जाणण्यासाठी द्वारकेला दूत पाठवितो. त्यानुसार श्रीकृष्ण इंद्रप्रस्थाला युधिष्ठिराकडे येऊन त्याच्या विचारास सहमती दर्शवितात. मात्र जोपर्यंत इतर राजांना बंदी बनविणारा जरासंध राज्य करीत आहे तोपर्यंत हा यज्ञ कोणत्याही प्रकारे पूर्णत्वास जाणार नाही, असे सुचवितात. त्यावर अर्जुन, भीम आणि श्रीकृष्ण यांनी जरासंधावर जाऊन त्यास जिंकून घेण्याचे ठरते. त्यानुसार हे तिघे जरासंधाच्या राज्यात, मगधास जातात आणि कृष्णाच्या सल्ल्यानुसार भीम जरासंधाचा वध करतो. त्यानंतर इतर दिशांमधील सर्व राजांना जिंकून ते परततात आणि श्रीकृष्ण युधिष्ठिरास आता तो यज्ञाचा अधिकारी असल्याचे सागंतात. त्यानुसार यज्ञाची तयारी करून ब्राह्मणांच्या पाद्यपूजेची जबाबदारी श्रीकृष्णावर सोपविली जाते. यज्ञ यथासांग पार पडतो आणि यज्ञानंतर अर्घ्य देतेवेळी

---

[27] अनुत्सूत्रपदन्यासा सद्वृत्तिः सन्निबन्धना। शब्दविद्येव नो भाति राजनीतिपस्पशा। शिशुपालवधम्, २.११२.

भीष्म युधिष्ठिरास उपस्थितांतील जो श्रेष्ठ आहे त्यास प्रथम अर्घ्य द्यावयास सांगतात. युधिष्ठिर पुन्हा भीष्मालाच विचारतात की अर्घ्य प्रथम कोणाला द्यावे, यावर भीष्म कृष्णाचे नाव घेतात आणि त्यानुसार सहदेव विधीपूर्वक श्रीकृष्णास अर्घ्य समर्पित करतो. यज्ञास तेथे उपस्थित असलेला शिशुपाल मात्र यास सहमति देत नाही आणि तो प्रथम भीष्म आणि युधिष्ठिर यांना कठोर बोल सुनावून कृष्णाची निर्भत्सना करु लागतो आणि रागाने सभेतून निघून जाऊ लागतो. यावर युधिष्ठिर त्यास शांत करण्याचा प्रयत्न करतो, मात्र तो रागाच्या भरात कृष्णाची निर्भत्सना सुरुच ठेवतो. यावेळी सहदेव म्हणतो की, जो कोणी श्रीकृष्णाच्या पूजेस विरोध करेल त्याच्या मस्तकावर माझा पाय असेल. याने क्रोधित झालेला शिशुपाल यज्ञसभेतील वृष्णि आणि पांडवांना घेरुन युद्ध करण्याची घोषणा करतो. यावेळी भीष्म शिशुपालाच्या जन्माची कथा सांगतात की त्यास जन्मावेळी तीन डोळे आणि चार हात होते आणि जन्मल्यानंतर लगेचच तो गाढवाप्रमाणे ओरडू लागला. त्याचे हे विकृत रूप पाहून सर्व भयभीत झाले आणि त्याचवेळी आकाशवाणी झाली की तो अत्यंत बलशाली होईल. यावर शिशुपालाच्या आईने, श्रुतश्रवसाने तिच्या पुत्राच्या मृत्यूचे कोण कारण होईल, अशी विचारणा केली. त्यावर आकाशवाणीने सांगितले की ज्याच्या मांडीवर शिशुपालास ठेवले असता याचे दोन हात आणि एक डोळा गळून पडतील तोच याचा काळ ठरेल. तेव्हा शिशुपालास अनेक राजांच्या मांडीवर ठेवले. कृष्णाच्या मांडीवर ठेवले असता त्याचे अवयव गळून पडले आणि शिशुपालाच्या आईने श्रीकृष्णाकडे आपल्या मुलासाठी वरदान मागितले असता त्याने शिशुपालाचे शंभर अपराध माफ करण्याचे वचन दिले. त्यामुळेच हा शिशुपाल आज एवढा गर्वाने वागत आहे. यावर शिशुपाल अजूनच चवताळला आणि कृष्णास अद्वातद्वा बोलू लागला. तेव्हा, श्रीकृष्णाने  याचे शंभर अपराध संपल्याचे सांगून आपल्या सुदर्शन चक्राने त्याचे शीर उडविले आणि शिशुपालाच्या शरीरातून एक प्रकाश निघून तो श्रीकृष्णाच्या शरीरात प्रविष्ट झाला. त्याच्या मृत्युने काही राजे आनंदित झाले तर काही क्रुद्ध झाले.

श्रीमद्भागवतपुराणाच्या दहाव्या स्कंधामध्ये ही कथा अत्यंत वेगळ्या स्वरूपात येते. एके दिवशी श्रीकृष्ण द्वारकेमध्ये आपल्या नित्यचर्येमध्ये व्यस्त असताना मगधाचा राजा जरासंध याच्या कैदेत असलेल्या राजांचा एक दूत निरोप घेऊन येतो की जरासंध आपली (कृष्ण) प्रजा असलेल्या आम्हाला खूप त्रास देत आहे तर आपण स्वतः येऊन आमची सुटका करावी. त्याचवेळी तेथे नारदमुनि प्रकट होतात आणि श्रीकृष्ण त्यांचे यथोचित आदरातिथ्य करतो. त्यानंतर कृष्ण यावेळी पांडवांच्या मनात सध्या काय चालले आहे, याची नारद मुनींकडे विचारणा करतो. त्यावेळी नारद मुनि यधिष्ठिर हे राजसूय यज्ञ करण्याच्या मानसिकतेत आहेत, तर तू त्यास दुजोरा दे, असे सांगतात. मात्र कृष्णाची ही विनंती यादव समुह ऐकण्यास उत्सुक नव्हता. दूताच्या निरोपानुसार जरासंधाच्या कैदेतील राजांना सोडवायचे की युधिष्ठिराच्या यज्ञाला उपस्थित रहावयाचे, असा पेचप्रसंग कृष्णासमोर उभा राहिला असताना श्रीकृष्णाने आपला भक्त उद्धव यास तो मर्मज्ञ असल्याने आता काय करावे याबाबत विचारणा केली. त्यावर उद्धवाने सल्ला दिला की, नारद मुनींच्या म्हणण्यानुसार तुम्ही राजसूय यज्ञ करणाऱ्या आपल्या आत्येभावास मदत केली पाहिजे. तसेच जरासंधाच्या कैदेतील राजांना सोडविणे, हे आपले कर्तव्यच आहे. मात्र राजसूय यज्ञ हा सर्व दिशांतील राजांना जिंकून घेतल्यानंतरच करता येतो. त्यामुळे युधिष्ठिरास जरासंधास जिंकून आवश्यक आहे. त्यामुळे आपले कर्तव्य सुद्धा पूर्ण होईल आणि एकाच कामात आपली दोन कामे साध्य होतील. उद्धवाचे हे म्हणणे सर्वांनी मान्य केले. त्यानंतर नारद मुनि आकाशमार्गाने निघून गेले आणि कृष्णाने सुद्धा दूताला जरासंधाच्या लवकरच होणाऱ्या वधाची ग्वाही देऊन पाठवून दिले आणि इंद्रप्रस्थाकडे प्रस्थान ठेवण्यासाठी तयारी सुरु

केली. यानंतर त्यांच्या प्रवासाचे वर्णन येते. श्रीकृष्णाच्या आगमनाचे वृत्त मिळताच युधिष्ठिर आपल्या बंधूंसह त्याचे वेशीवर स्वागत करतो आणि त्यांच्या राहण्याची उत्तम सोय करतो. युधिष्ठिर कृष्णाकडे आपली राजसूय यज्ञाची मनोकामना व्यक्त करतो आणि कृष्ण त्यास अनुमोदन देतो तसेच द्विग्विजयासाठी उद्युक्त करतो. युधिष्ठिर आपल्या भावंडांना दिग्विजयासाठी पाठवितो मात्र जरासंध अजेय असल्याने युधिष्ठर कृष्णाशी पुन्हा सल्लामसलत करतो. तेव्हा भीम, अर्जुन आणि कृष्ण जरासंधाच्या राज्यात, मगधात जातात आणि कृष्ण भीमाकरवी जरासंधाचा वध करवून घेतो. कैदेतील राजांची सुटका करुन परत राजसूय यज्ञासाठी इंद्रप्रस्थास येतो. यज्ञाच्या वेळी सर्वात पहिले कोणास अर्घ्य द्यावे, असा प्रश्न पडला असता सहदेवाने श्रीकृष्णाची प्रशंसा करुन त्याची पूजा केल्यास सर्व जीवांची पूजा केल्यासमान होईल, असे सांगितल्याने युधिष्ठिराने श्रीकृष्णाची सर्वप्रथम अर्घ्यपूजा केली. इतर राजांनी त्यास अनुमोदन दिले मात्र शिशुपालाच्या मनात श्रीकृष्णाबाबत ईर्षा असल्याने त्याने कृष्णाची निर्भत्सना करण्यास सुरुवात केली. त्यावेळी काही राजे शिशुपालास मारावयास धजावले आणि शिशुपाल सुद्धा त्यांस प्रत्युत्तर देण्यासाठी सज्ज झाला. शिशुपालाची ताकद अत्यधिक असल्याने इतर राजे मारले जातील, या विचाराने श्रीकृष्णाने स्वतः सुदर्शनचक्राने शिशुपालाचे शीर कापले. त्यावेळी शिशुपालाच्या शरीरातून निघालेली एक प्रकाशज्योति ही श्रीकृष्णाच्या शरीरात प्रविष्ट झाली. जय आणि विजय यांना सनकादिकांचा शाप असल्याने त्यांना पुन्हा पुन्हा जन्म घ्यावा लागला. त्यामुळे ते पहिले हरण्याक्ष आणि हिरण्यकश्यपु म्हणून जन्माला आले. पुढील जन्मात रावण आणि कुंभकर्ण म्हणून त्यांनी जन्म घेतला आणि नंतर शिशुपाल आणि दंतवक्र म्हणून जन्मास आले. अशाप्रकारे शिशुपाल हा पूर्वजन्मी विष्णूचा शत्रू असल्याचे दर्शविले आहे.

वरील दोन्ही कथास्रोत पाहता कवीने हुबेहुब कथानक न घेता आवश्यकतेनुसार त्यात बदल केले आहेत. जरासंधाच्या वधाची कथा यातून वगळली आहे.

**३.३.५) किरातार्जुनीयम् आणि शिशुपालवधम्** - काव्याचा विषय-वस्तु पाहता श्रीमद्भागवतातील कथा ही जरी कवीला स्रोत ठरली असली तरी कथेच्या सादरीकरणाकरिता माघाने भारवीच्या किरातार्जुनीयम् या काव्याचा अनुसर केल्याचा आणि काही वेळेस त्यास मागे टाकण्याचा सुद्धा प्रयत्न केलेला दिसतो. त्यामुळे येथे किरातार्जुनीयम् आणि शिशुपालवधम् यांचा तौलनिक अभ्यास आवश्यक ठरतो.

भारवीने त्याच्या काव्याचा विषय-वस्तु हा महाभारतातील वनपर्वातून घेतला आहे तर तोच इतिहासग्रंथ माघाने आपल्या काव्याच्या कथेसाठी निवडला आहे. भारवीने काव्याची सुरुवात 'श्री' शब्दाने करुन मंगल साधले आहे. तसेच माघाने सुद्धा "श्रियः पति श्रीमतिं शासितुं.." असे म्हणत काव्याची सुरुवात 'श्री' शब्दानेच केलेली आहे. भारवीने प्रत्येक सर्गाच्या शेवटी 'श्री' शब्द तर माघाने 'लक्ष्मी' शब्द वापराला आहे, म्हणून भारवीच्या काव्यास 'श्रयन्त' म्हणतात तर माघाच्या काव्यास 'लक्ष्म्यन्त' म्हणतात. भारवीच्या काव्यात वनेचर हा वृत्तांत घेऊन येतो आणि त्याच्या वृत्तांत कथनाने विषय-वस्तूला सुरुवात होते तशीच माघाच्या काव्याची सुरुवातही आपल्याला नारदमुनींच्या आगमनाने झालेली दिसते. नारद मुनि कृष्णाला तर माघाच्या काव्यात व्यासमुनि युधिष्ठिराला उपदेश करतात. दोन्ही काव्यात काव्याच्या नायकांनी आदरपूर्वक मुनींचे आदारातिथ्य केलेले दाखविले आहे. दोन्ही काव्यांच्या द्वितीय सर्गात राजनैतिक विचारांची चर्चा प्रस्तुत केली आहे. भारवीच्या काव्यात ही चर्चा द्रौपदी, भीम आणि युधिष्ठिर यांच्यात पार पडते तर माघकाव्यात ती श्रीकृष्ण, बलराम आणि उद्धव यांच्यात झालेली दिसते. यातील एक

बाजू ही आक्रमक विचारांचे आणि दुसरी बाजू ही संयत विचारांचे प्रतिनिधीत्व करते. बलरामाचे संभाषण शिशुपालावर तात्काळ आक्रमणाची बाजू मांडते. भारवीच्या काव्यात अर्जुनाच्या हिमालयात तपश्चर्येसाठी जाण्याच्या निमित्ताने प्रवासवर्णन येते आणि माघकाव्यात युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञाला हजेरी लावण्याच्या निमित्ताने कृष्णाचे प्रवासवर्णन येते. दोन्ही काव्यांत प्रवासवर्णनाच्या निमित्ताने सूर्योदय, चंद्रोदय, ऋतु वर्णन येते. अर्जुनाला त्याच्या ध्येयापासून विचलित करण्यासाठी अप्सरांच्या निमित्ताने तर कृष्णाच्या सैन्याचे त्यांच्या-त्यांच्या स्त्रियांच्या सहवासाद्वारे श्रृंगार रसाचे वर्णन केले आहे. भारवीच्या काव्यात इंद्रकील आणि हिमालय या पर्वतांचे यमक अलंकराच्या योगे तर माघाने रैवतक पर्वताचे वर्णन यमक अलंकाराच्या सहाय्याने केले आहे. भारवीने पंधराव्या सर्गात गोमुत्रिकाबन्ध रचना तर माघाने एकोणिसाव्या सर्गात चित्रबंध रचना सादर केली आहे आणि दोन्ही सर्ग चित्रकाव्याचे उदाहरण ठरतात. दोन्ही काव्यात प्रतिस्पर्ध्यांचे युद्ध दाखविले आहे. त्यामुळे वीररसाचा परिपोष दोन्ही काव्यात झालेला दिसतो. दोन्ही कवींनी छोटे कथानक घेऊन आपल्या प्रतिभेने ते फुलविण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. असे अनेक समानतादर्शक मुद्दे आपल्याला दोन्ही काव्यांमध्ये दिसून येतात. तरी सुद्धा माघाचे काव्य हे केवळ भारवीच्या काव्याचे अनुकरण मात्र ठरत नसून त्यात त्याची प्रतिभा ओतप्रोत भरलेली दिसते. त्याचबरोबर दंडीचे पदलालित्य, कालिदासाची उपमा, भारवीचा अर्थगौरव अशा अनेक गुणांचा सम्यक समन्वय त्याच्या काव्यात दिसून येतो.

**३.३.६) महाकाव्याच्या सर्गांचे विषय-वर्णन –** कृष्णाकडून झालेल्या शिशुपालाच्या वधाचा कलात्मक आविष्कार माघाने वीस सर्गांमध्ये आपल्या महाकाव्यातून प्रस्तुत केला आहे. प्रथम सर्गात नारद मुनींचे इंद्रदेवाच्या निरोपासहित श्रीकृष्णाकडे द्वारकेस आगमन, त्यांचा कृष्णाकडून झालेला सत्कार, शिशुपालाच्या पूर्वजन्मांचे वर्णन, आणि कृष्णाला त्याच्या अवतारकार्याची आठवण करुन दिली आहे. द्वितीय सर्गात कृष्णासमोर पडलेल्या पेचाचे वर्णन आणि त्यासंदर्भात त्याची बलराम आणि उद्धवाबरोबर मसलत यांचे विवेचन सादर केले आहे. तृतीय सर्गात कृष्णाचे इंद्रप्रस्थानाकडे प्रस्थान आणि द्वारका नगरी, समुद्र आणि कृष्णाची सेना यांचे वर्णन दिले आहे. चतुर्थ सर्गात रैवतक पर्वताचे वर्णन केले आहे. पंचम सर्गात रैवतक पर्वताच्या तळाशी सैन्याच्या शिबीरांचे वर्णन येते. सहाव्या सर्गात सहा ऋतूंतील शोभेने रैवतकाचे दर्शन कृष्णाला करुन दिले. सातव्या सर्गात वन-विहार वर्णन येते. अष्टम सर्गात जलक्रीडचे वर्णन आणि नवव्या सर्गात चंद्रोदयाचे वर्णन येते. दहाव्या सर्गात सुरापान व सुरतक्रीडेचे वर्णन केले आहे. अकराव्या सर्गात प्रभातवर्णन, बाराव्यात पुन्हा कृष्णाच्या आणि सैन्याच्या मार्गक्रमणाचे आणि यमुना नदीचे वर्णन येते. तेराव्या सर्गात कृष्णाच्या सैन्याचे इंद्रप्रस्थात आगमन आणि पांडवांकडून त्यांचे केलेल्या स्वागताचे, स्वागतासाठी सजलेल्या नगरीचे, सभामंडपाचे वर्णन आले आहे. चौदाव्या सर्गात कृष्ण आणि युधिष्ठिर यांच्यातील राजसूय यज्ञासंबंधी चर्चा, त्यानंतर यज्ञाचे सविस्तर वर्णन आणि यज्ञसमाप्तीनंतर युधिष्ठिर आणि भीष्म यांत धर्मशास्त्रानुसार अर्ध्यदानाबावत संवाद, कृष्णाचे महिमा वर्णन आणि त्याला केलेले अर्घ्यदान यांचे वर्णन आले आहे. पंधराव्या सर्गात कृष्णाच्या पूजेने कृष्णाबाबत आधीच मनात द्वेष असणाऱ्या शिशुपालाद्वारे कृष्णाची केलेली निर्भत्सना सविस्तर दिली आहे. त्यावर भीष्माने कृष्णाच्या अर्घ्यपूजेशी सहमत नसणाऱ्या राजांना पायदळी तुडविण्याचे आव्हान दिले. त्यावर शिशुपालाच्या बाजूच्या राजांचे रौद्ररूप, शिशुपालाने त्याच्या बाजूच्या राजांसहित रागाने केलेला सभात्याग आणि आपआपल्या शिबिरात जाऊन सुरु केलेली युद्धाची तयारी यांचे वर्णन दिले आहे. सोळाव्या सर्गात शिशुपालाकडून

आलेल्या दूताचा द्व्यर्थी संदेश, त्यास सात्यकीने दिलेले उत्तर यांचे वर्ण आहे. सतराव्या सर्गात राजांचा उद्वेग आणि युद्धाची तयारी तर अठराव्या व एकोणिसाव्या सर्गात युद्धाचे भीषण वर्णन आणि कृष्णाचे युद्धभूमीवर आगमन आणि युद्धकौशल्य दाखविले आहे. विसाव्या सर्गात श्रीकृष्णाचे आणि शिशुपालाचे समोरासमोर युद्ध आणि त्यात परस्परांविरुद्ध वापरलेल्या प्रस्वापास्त्र, आग्नेयास्त्र, करुणास्त्र, भुजंगास्त्र, गरुडास्त्र आदी अस्रांचा वापर आणि शेवटी आपली सर्व अस्त्रे निरस्त झाल्यानंतर शिशुपालाने पुन्हा मौखिकरित्या कृष्णाची निर्भत्सना सुरु केली. तेव्हा कृष्णाने सुदर्शनचक्राने शिशुपालाचे शिर उडविले आणि शिशुपालाच्या शरीरातून महाकाय तेजाचा गोळा कृष्णामध्ये विलीन झाल्याचे वर्णन केले आहे. काव्याच्या शेवटी माघाने पाच श्लोकात स्वकुळाचा वृत्तांत थोडक्यात सांगितला आहे.

अशाप्रकारे प्रदीर्घ अशा वीस सर्गात कवीने शिशुपालाच्या वधाचा वृत्तांत कथन केला आहे. यात मुख्य कथानक पहिल्या अडीच ते तीन सर्गात येते. कथानकाच्या सुरुवातीला आलेल्या पेचासाठी श्रीमद्भागवताचे कथानक आणि किरातार्जुनीय काव्याचा आशय वापरलेला दिसून येतो. भागवतात जरासंधाच्या वधासाठी विनंती बंदीराजांनी केलेली दाखविली आहे तर येथे इंद्रदेवाने नारदाकरवी शिशुपालाच्या वधासाठी केलेली विनंती दाखविली आहे. महाभारतात कृष्ण स्वतः युधिष्ठिरास सल्ला देतो तर भागवतात तो उद्धवाकडून सल्ला घेतो. माघकाव्यात सुद्धा कृष्ण मसलत घेताना दाखविला आहे. भागवतात शिशुपाल हा पूर्वजन्मीचा हिरण्यकश्यपु आणि रावण दाखविला आहे. त्यानंतर मूळ कथानक विसावा घेते आणि सर्ग क्रमांक चार ते बारा पर्यंत विस्तृत प्रवासवर्णन आले आहे. या प्रवासवर्णनाचा स्रोत भागवतपुराण आहे तर सादरीकरणाची मांडणी भारवीच्या काव्यानुसार केली आहे. यानतंर पुन्हा बाराव्या सर्गानंतर मूळ कथानकास हात घातला आहे. महाभारतात आणि श्रीमद्भागवतात युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञावेळी आलेल्या जरासंधाच्या वधाची कथा कवीने वगळली आहे. तसेच अर्घ्यदानाच्या वेळी महाभारतात आलेला वृत्तांत त्याने पुन्हा स्वीकारला आहे. कवीने कृष्णपूजेशी सहमत नसणाऱ्या राजांना आव्हान देताना सहदेवाच्या ऐवजी भीष्माला दाखविले आहे. मूळ भागवतातील कथानकात आणि महाभारतात सुद्धा तुंबळ युद्ध आणि नरसंहार पूर्णपणे टाळलेला आहे. वाग्युद्धातच कृष्णाकडून शिशुपालाचा वध दाखविला आहे. युद्धाअगोदर शिशुपालाने केलेल्या दूत संप्रेषणाचे भारवीच्या युद्धाआधी केलेल्या दूतसंप्रेषणाशी साम्य दिसते. मात्र कवीने येथे तीन सर्ग युद्धाच्या वर्णानासाठी खर्ची घातले आहेत. येथेही भारवीचे काव्य हेच माघाला प्रेरक ठरले आहे. अशाप्रकारे केवळ एकाच स्रोतकाव्यावर अवलंबून न राहता विविध स्रोतांतून मिळणाऱ्या कथानकांचा आणि प्रेरणांचा कवीने सम्यक समेळ आणि समन्वय आपल्या काव्यात साधलेला दिसतो.

**३.३.७) शिशुपालवधम् : एक महाकाव्य –** संस्कृत साहित्यात एकीकडे वेगवेगळ्या साहित्यकृती निर्माण होत असताना त्यालाच काही काळानंतर समांतर असे त्यांच्या समीक्षेचे साहित्याशास्त्राचे ग्रंथ निर्माण झाले. यामध्ये आजतागायत उपलब्ध ग्रंथांमध्ये सर्वप्रथम भामहाचा (इ.स. ७ वे शतक) काव्यालंकार, त्यानंतर दंडीचा (इ.स. ८ वे शतक) काव्यादर्श, रुद्रटाचा (इ.स. ९ व्या शतकाचा मध्य) काव्यालंकार, विश्वनाथाचा (इ.स. १५वे शतक) साहित्यदर्पण ह्या ग्रंथामध्ये महाकाव्याच्या लक्षणांचा, वैशिष्ट्यांचा सविस्तर अभ्यास केलेला दिसून येतो. या ग्रंथामध्ये सांगितलेल्या महाकाव्याच्या लक्षणांचे माघाने आपल्या काव्यात तंतोतत पालन केलेले दिसून येते.

संपूर्ण महाकाव्य हे वीस सर्गांमध्ये विभागलेले असून श्रीकृष्णाच्या हस्ते झालेल्या शिशुपालाच्या वधाचे कथानक माघाने महाकाव्याच्या विषय-वस्तूसाठी निवडले आहे. महाकाव्याचे नाव हे त्या काव्यातील

मुख्य कथानकावर बेतलेले असते. त्यानुसार शिशुपालस्य वधः शिशुपालवधः तम् अधिकृत्य काव्यं शिशुपालवधम् ।असे काव्याचे नामाभिधान केले आहे.  कथानकास अनुलक्षून वीर हा काव्याचा प्रमुख रस आहे तर शृंगार हा गौण रस कवीने योजला आहे. श्रीकृष्ण अवतारातील विष्णु हा काव्याचा नायक आहे आणि तो धीरोदात्त नायकाच्या गुणांनी युक्त आहे. शिशुपालरूपातील दुष्ट शक्तीचे निर्दालन करुन समाजाचे संरक्षण करण्यासाठी श्रीकृष्णाने शिशुपालाचा वध केला आहे, यातून चार पुरुषार्थांपैकी धर्म या पुरुषार्थाची प्राप्ती या काव्यातून दाखविली आहे. प्रत्येक सर्गात पन्नासपेक्षा जास्त आणि एकशे पन्नास पेक्षा कमी श्लोकसंख्या दिसून येते. महाकाव्याचा विस्तार हा बाहुल्याने द्वारकानगरी, समुद्र, ऋतु, सूर्योदय, चंद्रोदय, रैवतर पर्वत, यमुना नदी, स्त्रियांच्या जलक्रीडा, प्रवास, सभामंडप, यज्ञ, युद्ध इत्यादींच्या वर्णनाने झाला आहे. या वर्णनांवरुन हे कळून येते की कथानक कितीही लहान असले तरी कवी स्वतःच्या प्रतिभेने ते किती खुलवून आणि संथ गतीने पुढे नेऊ शकतो. अशाप्रकारे कथेचा अंश हा प्रसंगवश असून काव्य हे मुख्यत्वे वर्णनप्रधान आहे. प्रत्येक सर्ग हा एकाच वृत्तात लिहिला असून सर्गाच्या शेवची वृत्तबदल केला आहे. जसे मंत्रवर्णन नामक द्वितीय सर्ग हा अनुष्टुप् छंदात रचला असून त्याच्या शेवटी औपच्छंदसिक, द्रुतविलंबित आणि मालिनी ह्या वृत्तांत श्लोक रचना करु सर्गान्त द्योतित केला आहे. महाकाव्याच्या नियमांना अनुसरुन सर्ग क्रमांक तीनमध्ये विविध वृत्तांत रचना केली आहे. अशाप्रकारे केवळ या परिभाषित नियमांच्या अनुसरणाने माघाच्या काव्याला महाकाव्यत्व प्राप्त झाले आहे, असे नाही तर त्यातील विचारांची, कल्पनांची आणि भाषेची उत्तुंगता, भाषेचे सौष्ठव आणि सौंदर्य, कवीची प्रतिभा आणि पांडित्य, उदार चरित्राचे गायन या सर्वांनी काव्याला एक विदग्धता प्राप्त करुन दिली आहे. त्यामुळेच माघाचे काव्य हे एकाच वेळी पंडीत आणि सामान्य रसिक या दोहोंच्या मनात प्रदीर्घ काळ रुंजी घालताना दिसते. यातच या महाकाव्याची सार्थकता आहे.

**३.३.८) द्वितीय सर्गाची पार्श्वभूमी आणि कृष्णासमोरील पेचप्रसंग –** शिशुपालवधम् या महाकाव्याच्या प्रथम सर्गातच सुरुवातीला नारद मुनींचे आकाशमार्गाने द्वारकेला आगमन दाखविले आहे. नारदमुनि इंद्रदेवाचा कृष्णासाठी संदेश घेऊन येतात आणि त्या संदेशातून शिशुपालाच्या वधाचे कारण कवीने कथन केले आहे. ते प्रथम श्रीकृष्णाला त्याच्या अवतार कार्याच्या प्रयोजनाची आठवण करुन देतात. जन्मजन्मांतरातून शिशुपाल समस्त जगाला त्रस्त करीत आला आहे. त्याने पूर्व जन्मात हिरण्याक्ष असूराचे रूप धारण केले होते तेव्हा कृष्णाने वराह अवतार धारण करुन पृथ्वीचे रक्षण करुन त्यास ठार मारले. त्याने पुन्हा हिरण्यकश्यपु होऊन जन्म घेतला असता कृष्णाने नरसिंहरूपात त्याचा संहार केला. त्याने पुन्हा रावण रूपात जन्म घेतला आणि कृष्णाने रामावतारात त्याला ठार मारले. आता त्याने परत शिशुपाल रूपात जन्म घेतला आहे. बालपणी विरूप असणारा शिशुपाल मांडलिक राजांना त्रस्त करीत आहे. त्याची जन्मजन्मांतरातील दुष्ट प्रवृत्ती तशीच असल्याने तो लोकांना सुद्धा सतत त्रास देत आहे. तेव्हा त्यास ठार मारणे अगत्याचे आहे. जेव्हा दुष्टांच्या पापांचा भार वाढतो तेव्हा त्यांना दंडित करणे, हे सज्जनांचे कर्तव्य आहे. शिशुपालाचा वध करुन कृष्णाने इंद्राला चिंतामुक्त करावे आणि संपूर्ण विश्वाचे कल्याण करावे अशी, विनंती नारदमुनि कृष्णास करतात. श्रीकृष्ण या प्रार्थनेचा स्वीकार करतात. त्यामुळे त्याच्या वधाची जबाबदारी कृष्णावर येऊन पडली आहे.

त्याचवेळी युधिष्ठिराकडून आयोजित केल्या जाणाऱ्या राजसूय यज्ञाला उपस्थित राहण्याचे आमंत्रण श्रीकृष्णाला प्राप्त होते. यावेळी कृष्णासमोर पेच निर्माण होतो की कोणत्या कार्याला प्राथम्य द्यावे, इंद्राने सांगितलेल्या शिशुपालाच्या वधाला कि युधिष्ठिराच्या आमंत्रणाला ? या द्वंद्वातून मार्ग काढण्यासाठी श्रीकृष्ण आपला मोठा भाऊ बलराम आणि मित्र उद्धवासहित सल्लामसलत करतो. त्याचे वर्णन द्वितीय सर्गात केले आहे. श्रीकृष्ण त्यांच्यासमोर प्रश्न ठेवतो आणि त्याचे स्वतःचे मत यावर प्रस्तुत करतो. त्याच्या मतानुसार युधिष्ठिर कृष्णाशिवाय यज्ञ करण्यास समर्थ आहे.[28] शिशुपाल कृष्णाचा द्वेष करतो यापेक्षा तो लोकांना अकारण त्रास देतो याने कृष्णाला जास्त दुःख होते.[29]म्हणजेच श्रीकृष्ण शिशुपालावर आक्रमण करण्यास प्राथम्य देतो. असा स्वतः निर्णय केलेला असताना सुद्धा तो दोघांचे मत विचारतो, कारण सार जाणणारा एकटा मनुष्य सुद्धा कार्य करताना संदिग्ध अवस्थेत पडतो.[30] श्रीकृष्णाचे हे वचन ऐकताच शत्रूच्या कूकर्मांची आठवण झाल्याने बलराम क्रोधित झाला आणि त्याने कृष्णाच्या वचनाला दुजोरा दिला. तो म्हणाला की श्रीकृष्णाच्या ओजस्वी वाणीला कार्यरुपात परिणत करणे हेच त्याच्या वचनाचे उत्तर आहे.[31] माझे (बलरामाचे) भाषण हे कृष्णाच्या अर्थगर्भ आणि संक्षिप्त वचनांवरील सविस्तर भाष्यच आहे.[32] म्हणजेच बलराम सुद्धा शिशुपालावर तात्काळ आक्रमण करण्याचा विचार प्रस्तुत करतो आणि श्रीकृष्णाने एका वाक्यात जो निर्णय सांगितला त्याचे सविस्तर स्पष्टीकरण बलरामाच्या संभाषणातून व्यक्त होत आहे. एकूण शिशुपालावर प्रथम आक्रमण करुन त्याचा वध का करावा, याचे विवेचन करणारे बलरामाचे वचन आहे. मंत्रवर्णन नामक द्वितीय सर्गाच्या श्लोक क्रमांक २२ ते ६६ पर्यंत म्हणजे एकूण ४४ श्लोकांमध्ये बलरामाचा वाग्विस्तार कवीने प्रस्तुत केला आहे. येथे त्याने राजनैतिक सिद्धांताचा आधार घेऊन, सामान्य उदाहरणांचे दाखले देऊन, शिशुपालाची कुकर्मे सांगून, त्याची दखल न घेतल्यास होणाऱ्या परिणामांची जाणीव करुन देऊन श्रीकृष्णाचा शिशुपालावर प्रथम चढाई करण्याचा निर्णय कसा योग्य आहे, ते ठसविण्याचा प्रयत्न केला आहे.

**३.३.९) चरित्र चित्रण** – द्वितीय सर्गातील श्रीकृष्ण, बलराम आणि उद्धव यांच्या संवादातील केवळ बलरामाचा संवाद अभ्यासक्रमात आहे. तसेच ते तिघेही ज्याच्याविषयी बोलत आहे तो शिशुपाल हा या संभाषणाचा विषय आहे. त्या अनुषंगाने बोलणारा वक्ता, श्रीकृष्णाचा भाऊ, बलराम आणि ज्याच्याविषयी बोलले जात आहे तो शिशुपाल यांचा विचार येथे केला आहे.

**३.३.९.अ) बलराम** - बलराम हा श्रीकृष्णाचा मोठा भाऊ आहे. कंस देवकीच्या गर्भाचा घात करेल या भीतीने तिचा गर्भ वसुदेवाची दुसरी पत्नी, रोहिणी हिच्या गर्भात परिवर्तित करण्यात आला. तिच्यापासून  झालेला

---

[28]विनाऽप्यस्मदलं भुष्णुरिज्यायै तपसः सुतः।। शिशुपालवधम्, २.९.

[29] न दूये सात्वतीसूनुः यन्मह्यमपराध्यति। यत्तु दन्दह्यते लोकमदो दुःखाकरोति माम्। तत्रैव, २.११.

[30] ज्ञातसारोऽपि खल्वेकः सन्दिग्धे कार्यवस्तुनि। तत्रैव, २.१२.

[31] वचसस्तस्यसपदि क्रिया केवलमुत्तरम्। तत्रैव, २.२२.

[32] संक्षिप्तस्यास्याप्यतोऽस्यैव वाक्यस्यार्थगरीयसः। सुविस्तरतरा वाचो भाष्यभूता भवन्तु मे। तत्रैव, २.२३.

वसुदेवाचा मुलगा म्हणजे बलराम होय. बलराम हा मल्लविद्येत आणि गदाविद्येत अत्यंत पारंगत होता. तसेच त्याचे आयुध हे मुसळ आणि नांगर आहेत, असे पुराणांमध्ये वर्णिलेले आहे. यावरुन त्याला हलायुध आणि मुसलायुध ह्या नावांनी सुद्धा संबोधले जाते. त्याच्या ह्या आयुधांवरुन तो कृषिप्रधान संस्कृतीचे प्रतिनिधीत्व करतो, हे दिसून येते. तो अत्यंत गौरवर्णीय, लाल ओठ असणारा, काळे वस्त्र नेसणारा, आरक्त डोळे असणारा, तसेच त्याची पत्नी रेवती हिच्या बरोबर सुरापानामध्ये रत असणारा असे त्याचे वर्णन पुराणांमध्ये आणि काव्यांमध्ये आढळते. त्याच्या वक्तव्यावरुन त्याचे राजनीतीचे सखोल ज्ञान दिसून येते. त्याचा आपल्या भावाच्या मताला पाठिंबा हा केवळ होकारासाठी दिलेला नसून साधक-बाधक विचारांवर आधारलेला आहे. अन्यायाबद्दलची चीड, अपमानाबद्दलचा राग हा त्याच्या वक्तव्यावरुन दिसून येतो. त्याचे म्हणणे तो विविध लौकिक आणि पौराणिक उदाहरणांनी सिद्ध करुन मांडतो. आपण दोघांनीही परपरस्परांचे नुकसान केलेले असल्याने अशा दुखावलेल्या शत्रूकडे डोळेझाक करुन चालणार नाही, याची त्याला पूर्ण जाणीव आहे. अपमानीत जीवन जगणे हे त्याला लांछनास्पद वाटते, हे त्याच्या क्षात्रधर्माला आणि युयुत्सु वृतीला अगदी साजेसेच आहे. तो केवळ एक राजनीतिज्ञ नाही तर तो स्वतः एक योद्धा सुद्धा आहे त्यामुळे नीति आणि त्याचे उपयोजन या दोहोंचे ज्ञान त्याला आहे. त्याच्यातील उत्साह शक्ति ही विजिगीषुला साजेशी अशी आहे. शिशुपाल हा आपला नातेसंबंधी सुद्धा आहे आणि त्याने त्याच्या कर्माने वितुष्ट सुद्धा वाढविले आहे. अशाप्रकारे नात्यातील शत्रूत्व असून सुद्धा ते न्याय्य पद्धतीने सोडविण्याचा त्याचा विचार, हा त्याच्या निःपक्षपातीवृत्तीचा सुद्धा निदर्शक आहे.

**३.३.९.ब ) शिशुपाल** - शिशुपाल हा चेदीनरेश दमघोष आणि श्रुतश्रवस यांचा मुलगा आहे. श्रुतश्रवस ही वसुदेवाची बहीण आहे. तसेच पाच पांडवाची आई, कुंती ही सुद्धा वसुदेवाची बहीण आहे अशाप्रकारे त्यांची मुले ही सुद्धा परस्परांशी नातेसंबंधाने जोडलेली आहेत. त्यामुळे पाच पांडव आणि शिशुपाल हे परस्परांचे मावस भाऊ आहेत तर कृष्ण हा त्या दोहोंचा मामेभाऊ आहे. त्यास जन्मावेळी तीन डोळे आणि चार हात होते आणि जन्मल्यानंतर लगेचच तो गाढवाप्रमाणे ओरडू लागला. त्याचे हे विकृत रूप पाहून सर्व भयभीत झाले आणि त्याचवेळी आकाशवाणी झाली की अत्यंत बलशाली होईल. यावर शिशुपालाच्या आईने, श्रुतश्रवसाने तिच्या पुत्राच्या मृत्यूचे कोण कारण होईल, अशी विचारणा केली. त्यावर आकाशवाणीने सांगितले की ज्याच्या मांडीवर शिशुपालास ठेवले असता याचे दोन हात आणि एक डोळा गळून पडतील तोच याचा काळ ठरेल. तेव्हा शिशुपालास अनेक राजांच्या मांडीवर ठेवले. श्रीकृष्णाच्या मांडीवर ठेवले असता त्याचे अवयव गळून पडले आणि शिशुपालाच्या आईने श्रीकृष्णाकडे आपल्या मुलासाठी वरदान मागितले असता त्याने शिशुपालाचे शंभर अपराध माफ करण्याचे वचन दिले. शिशुपाल हा यादवांशी पुरातन वैर असणाऱ्या जरासंधाच्या गटातील असून जरासंधाचा मित्र आहे. शिशुपालाची वाग्दत्त वधू, रुक्मिणीचे श्रीकृष्णाने तिच्या लग्नातून अपहरण केल्याने यादवांचे आणि शिशुपालाचे वैर निर्माण झाले आहे. त्याचा बदला शिशुपालाने यादवांपैकी एक अशा बभ्रुच्या पत्नीच्या अपहरणाने घेतला तसेच श्रीकृष्णाच्या द्वारकेतील अनुपस्थितीत द्वारकेला वेढा घातला. मात्र महाभारतात येणारी श्रीकृष्ण आणि शिशुपाल यांच्या वैराची कथा ही पारस्पारिक वैरापुरती मर्यादीत राहत नाही तर त्याला सामाजिक आणि नैतिक अधिष्ठान हे हरिवंश, भागवत् पुराण,

विष्णु पुराण या ग्रंथामध्ये प्राप्त करुन दिले आहे. या पुराणातील उल्लेखानुसार शिशुपाल ही व्यक्ती नसून खलप्रवृत्ती आहे, जी जन्मानुजन्मे विविध रूपांमध्ये सज्जनांना त्रस्त करीत आहे. या अगोदर शिशुपालाने हिरण्याक्ष, हिरण्यकश्यपु, रावण अशी रूपे घेऊन सज्जनांना त्रासविले आहे. त्या-त्या वेळी श्रीकृष्णाने वराह, नृसिंह, राम असे अवतार घेऊन या दुष्ट शक्तींचे निर्दालन केले होते. आता तीच शक्ति शिशुपालरूपात अवतरली आहे. आणि त्याच्या मृत्यूला कारणीभूत ठरला तो युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञातील प्रथम अर्घ्यपूजेचा नैमित्तिक प्रसंग. यज्ञातील प्रथम अर्घ्यपूजेचा मान श्रीकृष्णाला दिल्याने आधीच कृष्णाबद्दल द्वेषबुद्धी असणारा शिशुपाल क्रुद्ध झाला आणि त्याच्या अनाठायी संतापाचा आणि अहंकाराचा शेवट हा त्याच्या मृत्यूमध्ये झाला. श्रीकृष्णाने आपल्या सुदर्शन चक्राने त्याचे शीर उडविले आणि पुराणांनुसार त्याचे तेज श्रीकृष्णामध्ये विलीन झाले..

**३.३.१०) द्वितीय सर्गातील निवडक भागाचे रसग्रहण -** शिशुपालवधाचा द्वितीय सर्ग हा राजनैतिक विचारांचा उहापोह करणारा असून त्याची प्रेरणा ही माघाला भारवीच्या किरातार्जुनीयम् या महाकाव्याच्या द्वितीय सर्गातून मिळाली आहे. श्रीमद्भागवतपुराणामध्ये आलेल्या कथेनुसार श्रीकृष्णाने युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञास हजेरी लावावी की जरासंधाच्या तावडीतून राजांची प्रथम सुटका करावी, याकरिता केवळ उद्धवाशी चर्चा केली होती. काव्यातून कवीने जरासंधाच्या वधाचा भाग पूर्णपणे वगळून शिशुपालाच्या वधाचा भाग यात अंतर्भूत केला आहे. मूळ कथेत शिशुपालाचा वध हा राजसूय यज्ञात प्रसंगपरत्वे अचानक उद्भवला आहे. तर येथे तो आधीच गृहीत धरला आहे. शिशुपालाचा वध ही साक्षात इंद्रदेवाची विनंती असल्याने त्याचे अनुष्ठान कृष्णाने प्राथम्याने आणि प्राधान्याने करणे योग्य आहे, असे मत मांडल्यावर बलराम त्यास आपली सहमती दर्शवितो. प्रस्तुत निवडक वेच्यामध्ये आलेले श्लोक हे बलरामाच्या मुखातील असून ते कृष्णाच्या मताला दुजोरा देणारे, अर्थातच शिशुपालाचा वध प्रथम का करावा, याचे सर्मथन करणारे आहेत. मूळकथानकात अशाप्रकारे काहीही कथाभाग आलेला नसताना कवीने तो त्याच्या काव्यात घालण्यामागे निश्चितच काही हेतु असावा. तो म्हणजे माघाचा काळ हा महाकाव्याच्या इतिहासात पंडिती काव्याचा मानावा लागतो. दरबारी कवींकडून लिहिली गेलेली काव्ये ही केवळ काव्यसेवा न करता आपली काव्ये येण-केन प्रकारे आश्रयदात्या राजाला उपयोगी पडू शकतील काय, याचाही वेध घेत होती. म्हणजे आपली काव्ये राजाला “उपदेशयुजे...” करण्याच्या उद्देशाने असे प्रसंग कथानकात कवींकडून गुंफण्यात आले. तसेच मूळ कथेत केवळ एका व्यक्तीशीच जेथे विचारविनिमय करण्यात आला होता तेथे काव्यात दोन व्यक्तींशी विचारविनिमय करण्यात आलेला आहे. याचे कारण म्हणजे, प्रत्येक वस्तूला दोन बाजू असतात आणि त्या दोन्ही बाजू किंवा भूमिका मांडण्यांसाठी दोन व्यक्तिंशी सल्ला-मसलत करुन दोन व्यक्तींकरवी दोन विभिन्न मतांचे समर्थन केलेले आहे. त्यातही त्या मतांची मांडणी सुद्धा वैशिष्ट्यपूर्ण ठरते. प्राचीन भारतीय दार्शनिक परंपरेला अनुसरुन जे मत पहिले मांडले जाते, तो पूर्वपक्ष असतो आणि त्याचा निरास करुन जे मत प्रस्थापित केले जाते, त्यास उत्तरपक्ष म्हटले जाते. श्रीकृष्णाने शेवटी शिशुपालावर चढाई न करता युधिष्ठिराच्या यज्ञास उपस्थित राहण्यास प्राथम्य दिलेले आहे आणि हा विचार उद्धवाने

बलरामानंतर सांगितलेला आहे. याचाच अर्थ बलरामाचे म्हणणे हे संपूर्ण संवादामध्ये पूर्वपक्षाचे रूप धारण करते. यातून कवीची कथाप्रसंगाच्या मांडणीमधील मार्मिकता, सूक्ष्मता दिसून येते.

बलरामाच्या मुखी घातलेली वचने ही कवीची राजनैतिक विषयांचे ज्ञान दर्शविणारी आहेत. यात येणाऱ्या गुण, शक्ति, सिद्धी, मंत्राची अंगे, मित्र-शत्रू यांचे प्रकार हे केवळ पुस्तकी ज्ञानाचे प्रदर्शन नाहीत तर त्यांचे केलेले उपयोजन आणि सूक्ष्म निरीक्षण यातून उद्भवलेले आहेत. माघाचे आजोबा आणि वडील हे श्रीवर्मलात राजाचे सर्वाधिकारी, मंत्री असल्याने व राजव्यवहार जवळून पाहिलेला असल्याने माघ राजनैतिक संकल्पनाशी आणि त्यांच्या उपयोजनाशी पूर्ण अनभिज्ञ असू शकत नाही. कृष्णाचे शिशुपालाशी असलेले वैर हे केवळ वैयक्तिक पातळीवर मापलेले नाही तर राजनैतिक सिद्धांतांवर जोखलेले आहे आणि त्यामुळे त्यानसार त्या वैराला त्याच्या योग्य व न्याय्य अशा शेवटास नेऊन ठेवणे, हे अगत्याचे ठरते म्हणून शिशुपालाचा वध करणे योग्य आहे, अशी सैद्धांतिक बैठक बलरामाच्या विचारातून कवीने मांडली आहे.

शिशपालाच्या वधाचे औचित्य समजावून सांगताना कवीने ही राजनैतिक चर्चा निरस ठरु नये, यासाठी अनेक अर्थालांकराचे साज त्यामध्ये गुंफले आहेत. उपमा, व्यतिरेक, दृष्टांत, अर्थांतरन्यास अशा अनेक समर्पक अलंकारांचा यथोचित वापर करुन विचाराधीन विषय हा लौकिक आणि पौराणिक संदर्भांनी स्पष्ट आणि सुरम्य करण्याचे प्रयोजन कवीने एकाचवेळी साधले आहेत. अनुष्टुप् छंदात रचलेल्या द्वितीय सर्गातील काव्याची भाषा प्रसादयुक्त, ओजस्वी आहे, वीर रसाचा परिपोष करणारी आहे. भारवीच्या काव्याचे वैशिष्ट्य असणारी कमी शब्दात जास्त आशय अभिव्यक्त करण्याची क्षमता म्हणजे अर्थगौरवता येथे दिसून येते. तसेच कालिदासाच्या काव्याचे वेगळपणं हे त्यातील उपमांच्या सहजतेमुळे आणि वैविध्यामुळे आहे आणि त्याचा प्रत्यंतर बलरामाच्या उक्तींमधूनही येतो. समुद्राची अजून अभिवृद्धीची इच्छा, गवताच्या गंजीवर विस्तव टाकून झोपणारी व्यक्ती, पायदळी तुडवल्या जाणाऱ्या धुळीचे तिला तुडविणाऱ्या माणसाच्या डोक्यावर जाऊन बसणे, पाण्याचे धुळीला त्याच्या तळाशी बसविणे, गवताच्या पात्याचे थोड्याशा वाऱ्याच्या झुळकेने सुद्धा वाकणे, सूर्याचे अंधकार दूर करुनच उगविणे, राहूचे सूर्याला सततचे ग्रासणे, सूर्याच्या भ्रमणाने मेरुच्या तटांवर पडलेला अंधकार ही दररोजच्या वापरातील सर्वांच्या निदर्शनास येणारी उदाहरणे माघ जितक्या सहजतेने देतो तितक्याच प्रगल्भतेने तो शास्त्रीय संदर्भ आणि उदाहरणे सुद्धा देतो. अर्थशास्त्रातील पंचांग मंत्रणा, षाड्गुण्य संबंध, बौद्धांची अंगपंचस्कंध ही आत्म्यासंबंधीची संकल्पना, व्याकरणशास्त्रातील शब्दाच्या अर्थासंबंधीची धारणा इत्यादी विषय तो सहजतेने उद्धृत करतो. त्याच्या वाक्यांमध्ये काव्याच्या संदर्भाशिवाय सुद्धा स्वतंत्ररित्या अर्थ अभिव्यक्तीची क्षमता असल्याने अनेक वाक्ये ही सुभाषित अथवा म्हणीवजा वापरली जाऊ शकतात. जसे, बद्धमूलस्य मूलं हि महद्वैरतरोः स्त्रियः ।, क्रियासमभिहारेण विराध्यन्तं क्षमेत कः । जननिरेवास्तु जननीक्लेशकारिणः।, इत्यादी. तसेच हिमांशुमाशु, जननिरेवास्तु जननीक्लेशकारिणः, स्वर्भानुर्भानुमन्तम्, समूलघातमघ्नन्तः, महिम्ना न महात्मनाम् अशा पदरचनेने त्याने यमकालंकाराद्वारे पदलालित्य सुद्धा साधले आहे. म्हणजे एकाच वेळी काव्याचे शरीर असणाऱ्या शब्द आणि अर्थ या दोघांचे समान सौंदर्य साधत विषय-वस्तूला पुढे नेण्याची कसब

माघाच्या लेखणीने साधली आहे. त्यामुळे उत्तरोत्तर संस्कृत भाषेच्या समीक्षकांनी आणि कवींनी माघाची मुक्तहस्ते केलेली प्रशंसा ही समर्पक असल्याची साक्ष या द्‌वितीय सर्गाच्या वेच्यातून मिळते.

**३.३.११) द्‌वितीय सर्गातील वृत्त –** महाकाव्याचे जे नियम साहित्यशास्त्राच्या ग्रंथामध्ये दिले आहेत त्यानुसार प्रत्येक सर्ग हा एका वृत्तामध्ये रचला जातो आणि सर्गाच्या शेवटी वृत्तबदल केला जातो.[33] या नियमांना अनुसरुन शिशुपालाचा द्‌वितीय सर्ग हा अनुष्टुप् वृत्तात रचलेला आहे. अनुष्टुप् हे एक जातीवृत्त असून याचे एकूण २५६ प्रकार होतात. या सर्व प्रकारांमधील समान धर्म म्हणजे यात प्रत्येक पादांमध्ये आठ वर्ण येतात. अशाप्रकारे, पद्याच्या चार पादांमध्ये प्रति पाद आठ अक्षरांनुसार एकूण बत्तीस वर्ण येतात. हे अत्यंत लघुकाय वृत्त असून याच्या प्रकारांमध्ये श्लोक हा सर्वात प्रसिद्ध प्रकार आहे. इतर वृत्तांनुसार यातील सर्व वर्णांचे लघु-गुरुनुसार नियमन केलेले नसते. केवळ तीन वर्णांबद्दल नियम केले असून इतर वर्ण लघु किंवा गुरु यापैकी काहीही असू शकतात. अनुष्टुप वृत्तांची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

*पञ्चमं लघु सर्वत्र । सप्तमं द्‌विचतुर्थयोः।*
*गुरु षष्ठं च पादानां । चतुर्णां स्यादनुष्टुभि।।*

या व्याख्येनुसार पुढील केवळ तीन अक्षरांचे नियमन सांगितले आहे.
१) सर्वत्र म्हणजे सर्व पादांमधील पाचवे अक्षर हे लघु असते.
२) दुसऱ्या आणि चौथ्या पादांमधील सातवे अक्षर लघु असते.
३) सर्व पादांमध्ये सहावे अक्षर हे गुरु असते.

कमी शब्दात विषयाची आशयघनता व्यक्त करणे ही कसब या वृत्तात कवीला साधावी लागते. आणि त्यानुसार माघकाव्याच्या द्‌वितीय सर्गात (निवडक श्लोकांमध्ये) मोजक्या शब्दात बलरामाच्या रागाची व त्वेषाची धार व्यक्त करण्यासाठी लघुकाय अनुष्टुप वृत्ताचा वापर केला आहे. द्‌वितीय सर्गाच्या शेवटी औपच्छंदसिक, द्रुतविलंबित आणि मालिनी या वृत्तात काव्यरचना करुन सर्गान्त सूचित केला आहे.

### ३.४) स्वंय अध्ययनाचे प्रश्न

१) श्रीकृष्णाला कोणी राजसूय यज्ञाचे आमंत्रण दिले होते ?
१) भीमकाने २) शिशुपालाने ३) युधिष्ठिराने ४) जरासंधाने

२) श्रीकृष्णाला शिशुपालाच्या वधाच्या कार्याची कोणी आठवण करवून दिली ?
१) इंद्राने २) नारदाने ३) बलरामाने ४) उद्‌धवाने

३) माघाने कोणाच्या काव्याचे अनुकरण आपल्या महाकाव्यात केले आहे ?
१) कालिदासाच्या २) भारवीच्या ३) अश्वघोषाच्या ४) श्रीहर्षाच्या

---

[33] एकवृत्तमयैः पद्यैरवसानेऽन्यवृत्तकैः । साहित्यदर्पणम्, ६.३२०.

४) खालीलपैकी कोणते काव्य हे बृहत्त्रयींपैकी नाही ?

१) रघुवंशम् २) शिशुपालवधम् ३) किरातार्जुनीयम् ४) नैषधीयचरितम्

५) माघाने राजाच्या अङ्गपंचकम् मंत्रणेची कोणाबरोबर तुलना केली आहे ?

१) पंचप्राणांशी २) पंचप्रमाणांशी ३) बौद्धांच्या अङ्गस्कन्धपञ्चकाशी ४) पंच महाभूतांशी

६) शिशुपाल हा श्रीकृष्णाचा कोणत्या प्रकारचा मित्र आहे?

१) सहजमित्र २) कृत्रिममित्र ३) प्राकृतमित्र ४) कोणताही नाही

७) शिशुपाल हा श्रीकृष्णाचा आता कोणत्या प्रकारचा अरि झाला आहे?

१) सहजारि २) कृत्रिमारि ३) प्राकृतारि ४) कोणताही नाही

८) कृष्णाने कोणाचे हरण केल्याने शिशुपालाशी त्याचे वैर निर्माण झाले?

१) अंबा २) सत्यभामा ३) द्रौपदी ४) रुक्मिणी

९) उपकार करणाऱ्या शत्रूबरोबर कोणत्या प्रकारचे संबंध ठेवावेत?

१) यान २) विग्रह ३) संधि ४) आसन

१०) सूर्याला आणि चंद्राला खालीलपैकी कोण सतत त्रास देतो ?

१) केतु २) राहु ३) मंगळ ४) शनि

**३.५) पारिभाषिक शब्द, शब्दार्थ**

शिशुपालाच्या द्वितीय सर्गामध्ये राजनैतिक विषयाची चर्चा असल्याने त्यामध्ये काही प्राचीन राजनैतिक संकल्पनांचा नामोल्लेख आपल्याला आढळतो. त्यांचे विवेचन मुख्य पुस्तकात दिलेले आहे. येथे त्यांचे थोडक्यात स्पष्टीकरण दिले आहे.

**१) गुण** - राज्यांचे परस्परांशी असणारे सहा प्रकारचे आंतर-राज्य संबंधांचे प्रकार असतात. ते म्हणजे, संधि, विग्रह, यान, आसन, द्वैधीभाव, संश्रय होय. (१) संधी म्हणजे तह करणे, (२) विग्रह म्हणजे युद्ध पुकारणे, (३) आसन म्हणजे जैसे थे परिस्थिती ठेवणे, (ना युद्ध करणे ना तह करणे), (४) यान म्हणजे दुसऱ्या राज्यावर चढाई करणे, (५) संश्रय म्हणजे बलशाली राज्याचा आश्रय घेणे आणि (६) द्वैधीभाव म्हणजे एका राज्याबरोबर युद्ध करणे आणि दुसऱ्या राज्याबरोबर तह करणे होय. याचा अर्थ काहींनी एकाच राज्याशी वरकरणी मैत्रीचे संबंध आणि अंतःस्थ शत्रूत्व असा सांगितला आहे.

**२) शक्ति -** शक्ति म्हणजे बल होय. त्या तीन प्रकारच्या आहेत. (१) कोश आणि सैन्य यांनी प्राप्त होणारी प्रभुशक्ति (२) राजाच्या अंगी असणारे पराक्रमरुपी बल म्हणजे उत्साहशक्ति होय आणि (३) ज्ञानाचे बल असणारी मंत्रशक्ति होय.

**३) सिद्धी -** त्या-त्या शक्तीने प्राप्त होणाऱ्या सिद्धी सुद्धा तीन प्रकारच्या आहेत. (१) प्रभुशक्तीने प्राप्त होणारी प्रभुसिद्धी, (२) मंत्रशक्तीने मिळणारी मंत्रसिद्धी आणि (३) उत्साहशक्तीने मिळणारी उत्साहसिद्धी होय.

**४) उदय -** उदय हे तीन प्रकारचे सांगितले आहेत, ते म्हणजे, वृद्धि, क्षय आणि स्थिती.

**५) अङ्गस्कन्धपञ्चकम्** - मंत्रणेचे पाच अंगे. कोणतेही कार्य हाती घ्यावयाचे ठरविल्यानंतर त्याच्याविषयी मसलत करताना पुढील गोष्टींचा विचार केला जातो. (१) कार्याच्या अनुष्ठानासाठी उपाययोजना करणे (२) कार्यासाठी आवश्यक त्या मनुष्यबळ आणि द्रव्यबळाचा विचार करणे (३) कार्याच्या अनुष्ठानासाठी योग्य अशा देश आणि काळाचा विचार करणे (४) कार्यामध्ये येणाऱ्या संभाव्य अडचणींचा/संकटांचा विचार करुन त्यांचा परिहार करणे (५) कार्याची सिद्धी. (कर्मणामारम्भोपायः पुरुषद्रव्यसंपद् देशकालविभागो विनिपातप्रतीकारः कार्यसिद्धिरिति पञ्चाङ्गो मन्त्रः। कौटिलीय अर्थशास्त्र, १.१५)

**६) बौद्धधदर्शनातील अङ्गस्कन्धपञ्चकम् संकल्पना -** बौद्ध दर्शनानुसार आत्मा हा पाच अंगानी युक्त आहे. या अंगांस स्कंध म्हणजे भाग, प्रकार अशी पारिभाषिक संज्ञा दिलेली आहे. ते म्हणजे (१) रूपस्कंध - यामध्ये पंचेंद्रिय आणि त्यांचे विषय म्हणजे बाह्यार्थ जग अंतर्भूत होते. (२) विज्ञानस्कंध – पंचेद्रियांनी होणारे विषयांचे ज्ञान आणि स्वतःचे ज्ञान यामध्ये येते. (३) वेदनास्कंध – ज्ञानोत्तर मनुष्याला होणारा सुखधुःखात्मक अनुभव म्हणजे वेदनासंक्ध होय. (४) संज्ञास्कंध – वेदनास्कंधानंतर वस्तूचे संपूर्ण ह्रहण आपणास होतो आणि त्या वस्तूंच्या गुणांवर आधारीत त्या वस्तूनचे नामकरण केले जाते. यास संज्ञास्कंध म्हणतात. (५) संस्कारस्कंध - एखाद्या वस्तूची संज्ञा ऐकल्यानंतर आपल्या सुखदुःखरूपी अनुभवावर आधारीत आपली त्या वस्तूप्रत रागद्वेषादि मानसिक प्रवृत्ती निर्माण होते. यास संस्कारस्कंध म्हणतात. अशाप्रकारे होणाऱ्या संवेदनात्मक प्रतिक्रियांचा समुह म्हणजेच आत्मा होय, असे बौद्ध दार्शनिकांचे म्हणणे आहे.

**७) मित्रांचे प्रकार -** अ) मित्राचे प्रकार –अ.१) सहजमित्र – समान कूळात जन्मास आलेला मित्र. आई-वडीलांकडील नातेसंबधाने असलेला मित्र, जशी मामाची मुले किंवा आत्याची मुले.अ.२) प्राकृतमित्र – कौटिलीय अर्थशास्त्रातील राज्यमंडळाच्या सिद्धांतानुसार आपल्या राज्याला लागून नजीक असणारे राज्य हे आपले शत्रू राज्य असते. आणि तसेच शूत्रच्या राज्याला लागून नजीक असणारे राज्य ते त्या शत्रूचे शत्रूराज्य असते. आपल्या शत्रूचा शत्रू तो आपला मित्र असतो. त्यानुसार मधले एक शत्रू राज्य सोडून

पलिकडील राज्य हे आपले स्वाभाविक मित्र राज्य असते . आणि त्याचा राजा हा आपला मित्र असतो.अ.३) कृत्रिम मित्र – वरील दोन्ही प्रकारात न मोडणारा परंतु तत्कालीन परस्परांच्या हितसंबंधाने किंवा स्वतःच्या स्वार्थान मित्र झालेला राजा व राज्य हे कृत्रिम मित्र असते.

**८) शत्रूंचे प्रकार -** अ.१) सहजशत्रू/अमित्र – समान कूळात जन्मास आलेला शत्रू. आई-वडीलांकडील नातेसंबधाने असलेला शत्रू. सामान्यतः संपत्तीमध्ये वाटेकरी असणारे येथे अभिप्रेत आहेत, जशी काकाची मुले.अ.२) प्राकृतमित्र – कौटिलीय अर्थशास्त्रातील राज्यमंडळाच्या सिद्धांतानुसार आपल्या राज्याला लागून नजीक सणारे राज्या हे आपले शत्रू राज्य असते. हे शत्रू राज्य आपले स्वाभाविक अमित्र किंवा शत्रू राज्य असते. आणि त्याचा राजा हा आपला स्वाभाविक शत्रू असतो.अ.३) कृत्रिम मित्र – वरील दोन्ही प्रकारात न मोडणारा, परंतु तत्कालीन परस्परांच्या हितसंबंधांच्या संघर्षाने शत्रू झालेला राजा हा कृत्रिम शत्रू होय.

**९) शब्दाच्या अर्थाचे प्रकार -** वैयाकरणांच्या मते जाति, गुण, क्रिया आणि यदृच्छा असे चार प्रकारचे अर्थ आहेत. (१) जाति म्हणजे आकृति अथवा सामान्य तत्त्व होय. उदाहरणार्थ गाय हा शब्द उच्चारल्यानंतर गोत्व जातीने युक्त प्राणी आपल्या मनःचक्षुसमोर उभा राहतो. गाय या शब्दाने त्याने संकेतित केलेल्या त्या जातीचे ज्ञान झाल्यामुळे केवळ आपल्या घरची गाय बघून सुद्धा आपल्याला जगातील सर्व गायींचे ज्ञान होते. कारण गायींमध्ये असणारे सामान्य तत्त्व जे त्यांना इतरांपासून वेगळे करते, जसे सास्ना इत्यादी यांचे ज्ञान आपल्याला होते. (२) गुण हा तत्त्व त्या जातीतील व्यक्तींना परस्परांपासून वेगळ करते, जसे काळी गाय, पांढरी गाय इत्यादी. (३) क्रिया पूर्ण जालेल्या क्रियांचा सुद्धा संज्ञात्मक रुपाने आपल्याला शब्दातून बोध होतो. जसे, चालणे, बसणे इत्यादी. (४) यदृच्छा शब्द म्हणजे स्वतःच्या इच्छेनुसार ठेवलेले व्यक्तीचे, वस्तूचे नाव. जसे कपिला, डित्थ इत्यादी. यास संज्ञा असे सुद्धा म्हणतात.

**३.६) स्वयं अध्ययनाच्या प्रश्नाची उत्तरे**

घटक ३.४ मधील प्रश्नांची उत्तरे येथे दिली आहेत.

| | | |
|---|---|---|
| (१) ३ - युधिष्ठिराने | (२) २ - नारदाने | (३) ३ - भारवीच्या |
| (४) १ - रघुवंशम् | (५) ३ - बौद्धांच्या आत्म्याच्या संकल्पनेशी | (६) १ - सहजमित्र |
| (७) २ - कृत्रिमारि | (८) ४ – रुक्मिणी | (९) ३ - संधि |
| (१०) २ - राहु | | |

**३.७) सारांश -** प्रस्तुत घटकातून आपण शिशुपालवधम् या महाकाव्याचा सामान्य परिचय करुन घेतला. या महाकाव्याचे संस्कृत वाङ्मयातील स्थान आणि महत्त्व जाणून घेतले. महाभारत आणि श्रीमद्भागवतपुराणामधून घेतलेल्या कथा-वस्तुमध्ये कवीने आपल्या प्रतिभेच्या जोरावर आवश्यक ते बदल करुन स्वल्पशा कथानकाचा वीस सर्गांमध्ये विविध विषयांच्या वर्णानांच्या सहाय्याने केलेला रम्य विस्तार पाहिला. बलरामाच्या वक्तव्याची पार्श्वभूमी आणि शिशुपालावर श्रीकृष्णाने प्रथम चढाई का करावी,

याकरिता अनेक उदाहरणे, दृष्टांत आणि राजनैतिक सिद्धांतासहित मांडलेले बलरामाचे विचार पाहिले. तसेच निवडक वेच्याचे रसग्रहण सुद्धा पाहिले आहे.

**३.८) स्वाध्याय – सरावासाठी प्रश्न**

**अ) खालील श्लोकांचा अनुवाद करा.**

१) सर्वकार्यशरीरेषु मुक्त्वाङ्गस्कन्धपञ्चकम् । सौगतानामिवात्मान्यो नास्ति मन्त्रो महीभृताम् ।।

२) तृप्तियोगः परेणापि महिम्ना न महात्मनाम् । पूर्णचन्द्रोदयाकाङ्क्षी दृष्टान्ताऽत्र महार्णवः ।।

३) विपक्षमखिलीकृत्य प्रतिष्ठा खलु दुर्लभा । अनीत्वा पङ्कतां धूलिमुदकं नावतिष्ठते ॥

४) विराद्ध एवं भवता विराद्धा बहुधा च नः ।निर्वर्त्यतेऽरिः क्रियया स श्रुतश्रवसः सुतः ।।

५) तुङ्गत्वमितरा नाद्रौ नेदं सिन्धावगाधता । अलङ्घनीयताहेतुरुभयं तन्मनस्विनि ॥

६) अनिर्लोडितकार्यस्य वाग्जालं वाग्मिनो वृथा ।निमित्तादपराद्धेषोर्धानुष्कस्येव वल्गितम् ॥

७) सर्वकार्यशरीरेषु मुक्त्वाङ्गस्कन्धपञ्चकम् । सौगतानामिवात्मान्यो नास्ति मन्त्रो महीभृताम् ।।

**ब) विवेचक टीपा लिहा.**

१) शिशुपालवधम् मध्ये येणाऱ्या राजनैतिक संकल्पनांचे स्पष्टीकरण करा.

२) बौद्ध दर्शनातील आणि राजनैतिकशास्त्रातील अङ्गस्कन्धपञ्चकम् पंचअंगस्कंध संकल्पना.

३) माघाने बलरामोक्तीमध्ये वापरलेल्या उपमा

**क) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) श्रीकृष्णासमोर कोणता पेच निर्माण झाला होता, ते स्पष्ट करुन त्यावर बलरामाने दिलेला सल्ला विशद करा.

२) माघाच्या शैलीची वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा.

३) महाकाव्याची लक्षणे शिशुपालवधम् या महाकाव्यास कशी लागू होतात, ते सोदहारण स्पष्ट करा.

**३.९) क्षेत्रीय कार्य**

**१)** शिशुपालवधम् या महाकाव्याचे मूळ स्रोतसाहित्य महाभारत आणि श्रीमद्भागवतपुराण यांतील संबंधित कथानक वाचून त्यांचा तौलनिक अभ्यास करा.

२) माघाच्या शिशुपालवधाचा भारवीच्या किरातार्जुनयम् या महाकाव्याशी तौलनिक अभ्यास करा.

**३.१०) अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ**

**(अ) प्राथमिक संदर्भग्रंथ -**

१) *शिशुपालवधम्,* (इंग्रजी), भंडारे एम. एस., मे. गोपाल नारायण आ�ड कंपनी, मुंबई, १९३२.

२) *शिशुपालवधम् महाकाव्यम्,* (हिंदी) शास्त्री कृष्णमोहन आचार्य, चौखम्बा अमकभारती प्रकाशन, वाराणसी, आठवी आवृत्ती, १९७९.

३) *शिशुपालवधम्,* द्वितीय सर्ग (हिंदी) पाण्डेय जनार्दनशास्त्री, मोतीलाल बनरसीदास, दिल्ली, दुसरी आवृत्ती, १९९४.

४) *शिशुपालवधम्,* द्वितीय सर्ग (हिंदी) शर्मा रामजीलाल, चौखम्बा सुरभारती प्रकाशन, वाराणसी, २०१३.

५) *शिशुपालवधम्,* (मराठी) नूलकर, प्रसाद प्रकाशन, पुणे, २०१२.

**(ब) दुय्यम संदर्भग्रथ -**

१) उपाध्याय बलदेव, *संस्कृत सुकवि समीक्षा,* चौखम्बा विद्याभवन, वाराणसी, तृतीय आवृत्ती, १९८७.

२) वाटवे, केशव नारायण, *संस्कृत काव्याचे पंचप्राण,* मनोहर ग्रंथमाला, पुणे, १९७०.

३) शर्मा, मोहनलाल जगन्नाथ, *महाकवि माघ,* नवयुग प्रकाशन, दिल्ली, १९६३.

**घटक क्रमांक - ४**

**भारवीकृत किरातार्जुनीयम्**

**प्रथम: सर्ग: (श्लोक - १ - २५)**

**४.१) उद्दिष्टे -**

या महाकाव्याच्या प्रथम सर्गाच्या निवडक श्लोकांच्या अध्ययनातून विद्यार्थ्यांना -

१) महाकाव्य या संस्कृत काव्यप्रकाराची ओळख होईल.

२) संस्कृत कवी भारवीची लेखनशैली व त्याच्या काळातील महाकाव्याचे स्वरूप यांची ओळख होईल.

३) प्राचीन राजनैतिक विचार कळून येतील.

४) दूताच्या कर्तव्याशी ओळख होईल.

**४.२) प्रस्तावना**

घटक क्रमांक १ मध्ये आपण महाकाव्याच्या लक्षण आणि स्वरूप यांचा साहित्यशास्त्रदृष्ट्या अभ्यास केला आहे. आणि पंचमहाकाव्यांचा साधारण परिचय सुद्धा करुन घेतला आहे. त्याच अनुषंगाने इ.सनाच्या सहाव्या शतकात महाकाव्याचे बदलते स्वरूप भारवीच्या काव्यातून द्योतित होते. या घटकात प्रसिद्ध पंचमहाकाव्यांपैकी किरातार्जुनीयम् या महाकाव्याचा विशेषत्वाने परिचय आणि ग्रांथिक वाचन आपण करुन घेणार आहोत.

संस्कृत वाङ्मयात काव्य ही अत्यंत व्यापक संकल्पना असून यात दृश्यकाव्य म्हणजे रूपके (नाटक, प्रकरण, प्रहसन, इत्यादी) आणि श्रव्यकाव्य या दोहोंचा समावेश होतो. यापैकी श्रव्य काव्यात पुन्हा गद्य, पद्य आणि गद्य-पद्यात्मक चम्पू या तीन वाङ्मयप्रकारांचा समावेश होतो. पद्याचे पुन्हा प्रबंधकाव्य आणि मुक्तककाव्य असे दोन भाग पडतात. आणि यातील प्रबंध काव्याचे पुन्हा महाकाव्य आणि खंडकाव्य असे दोन प्रकार केले जातात. अशाप्रकारे, श्रव्यकाव्याच्या पद्यप्रकारातील प्रंबधकाव्याचा एक प्रकार म्हणजे 'महाकाव्य' होय.

**४.३) विषयविवेचन-**

**४.३.१ भाषांतर –**

किरातार्जुनीयम् या महाकाव्याच्या प्रथम सर्गातच सुरुवातीला हेराचे द्वैतवनात युधिष्ठिराकडे आगमन दाखविले आहे. युधिष्ठिराने एका वनेचरास म्हणजे वनात राहणाऱ्या पुरुषास ब्रह्मचाऱ्याचा वेष धारण करुन (*वर्णलिङ्गी*) हेर रूपाने दुर्योधनाचे राजलक्ष्मीचे पालन करणारे, प्रजेबाबतचे वर्तन जाणून घेण्यासाठी हस्तिनापूरास माहिती काढण्यासाठी पाठविले होते. (श्लोक क्रमांक १)

वनेचराने युधिष्ठिरास आल्यानंतर यथोचित प्रणाम केला व शत्रूने जिंकून घेतलेल्या प्रजेबाबत राजाला सांगताना त्याच्या मनाला थोडी सुद्धा व्यथा जाणवली नाही. कारण हितैषी व्यक्ति खोटे बोलू इच्छित नाही. (श्लोक २) शत्रूच्या विघाताची इच्छा करणाऱ्या युधिष्ठिर राजाची एकांतात अनुज्ञा घेऊन तो

शब्दसामर्थ्य (सौष्ठव) आणि अर्थगर्भता (औदार्य) ही वैशिष्ट्ये असणारी व निःसंदिग्ध अशी वाणी बोलला. (श्लोक ३) तो म्हणाला, " हे राजा, कामगिरीवर नियुक्त केलेल्या सेवकांनी, हेर हेच ज्यांचे नेत्र आहेत अशा राजाला फसवू नये. म्हणून मी जे काही प्रिय किंवा अप्रिय सांगेन त्याकरिता आपण मला माफ करावे कारण हितकारक आणि प्रिय असे दोन्ही गुण असणारी वाणी दुर्लभ आहे. (*हितं मनोहारि च दुर्लभं वचः*।) (श्लोक ४) तो कसला राजा जो हितकारक उपदेश ऐकत नाही आणि तो कसला मित्र जो हितकारक सांगत नाही. म्हणजे हितकारक न सांगणारा मित्र आणि न ऐकणारा राजा हे दोघेही निंदनीय आहेत. परस्परांना अनुकूल असणाऱ्या राजावर व अमात्यांवर सर्व प्रकारची संपदा नेहमी प्रसन्न असते.'' (श्लोक ५) वनेचर जे काही जाणू शकला त्यात तो स्वतःचे मोठेपणा न मिरविता हे आपल्यावरील राजाच्या कृपेचे फळ आहे, असे सांगतो. तो म्हणतो जात्याच अगम्य असे राजाचे वर्तन कोठे आणि आमच्या सारखे क्षुद्र जीव कोठे? या दोहोंची बरोबरीच होऊ शकत नाही. तरी सुद्धा मी शत्रूंची गूढ राजनीति जी काही जाणू शकलो ते केवळ आपल्या कृपेने शक्य झाले. (श्लोक ६) वनेचराच्या राजाप्रत असणाऱ्या एकनिष्ठतेने तो राजाच्या हिताच्या दृष्टीने सर्व वृत्तांताचे सार एका श्लोकात कथन करतो, की सुयोधन आज राजसिंहासनावर आरुढ झालेला असला तरी वनात राहणाऱ्या आपल्याकडून (युधिष्ठिराकडून) होणाऱ्या त्याच्या पराभवाची त्याला साशंकता आहे. म्हणून द्यूताने आपल्याकडून जिंकलेल्या पृथ्वीस तो नीतीच्या सहाय्याने जिंकू इच्छितो. (श्लोक ७) त्याच्या मनात आपल्याकडून जिंकल्या जाण्याची साशंकता मनात असून सुद्धा तो कपटी सुयोधन तुम्हाला जिंकून घेण्याच्या मनीषेने स्वतःच्या गुणसंपदेने त्याचे शुभ्र यश प्रसारित करीत आहे. स्वतःचा उत्कर्ष साधणारे सज्जनाशी वैर हे दुर्जनाच्या मैत्रीपेक्षा श्रेष्ठ होय. (श्लोक ८) त्याच्या गुणसंपदेचे वर्णन करताना वनेचर सांगतो की, सुयोधनाने काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड् रिपूंना जिंकून घेतले आहे, आळस झटकून टाकला आहे, मनूची प्रजापालनाची अगम्य रीति प्राप्त करुन घेण्याची त्याची इच्छा आहे, तो दिवस-रात्र यांचे योग्यरित्या विभाजन करुन वेळ सदुपयोगी लावित आहे. अशाप्रकारे तो त्याचा पराक्रम नीतिपूर्वक मार्गाने प्रसारित करीत आहे. (श्लोक ९) त्याने अहंकार त्यागला आहे. तो आता सेवकांशी प्रिय मित्रांप्रमाणे, मित्रांशी बांधवांप्रमाणे आणि बांधवांशी जणू आधिपत्य मिळालेल्या राजाप्रमाणे वागत आहे. (श्लोक १०) तो धर्म, अर्थ व काम या तीन पुरुषार्थांचे कालानुसार निष्पक्षपातीपणे विभाजन करुन अनासक्तपणे त्यांचा उपभोग घेत आहे. त्याच्याठायी या तीन वर्गांचा विरोध न दिसता उलट त्यांच्यात मैत्रीच दिसत आहे. (श्लोक ११) तो कुणाचीही केवळ स्तुती करीत नाही तर त्याचे मौखिक कौतुक हे दानाने युक्त असते. तो दानाशिवाय सत्कार करीत नाही. तसेच गुणांना पाहूनच तो सत्कार करतो. (श्लोक १२) जितेंद्रिय असा तो केवळ धनाच्या लोभाने नाही किंवा अहंकाराने सुद्धा नाही तर ज्यात इतर कोणतेही कारण नाही अशा केवळ स्वकर्तव्यभावनेने तो गुरुंच्या उपदेशानुसार स्वतःच्या मुलामधील आणि शत्रूमधील धर्माच्या उल्लंघनाला दंडाने संपुष्टात आणत आहे. (श्लोक १३) सुयोधन साशंक सुद्धा आहे. परंतु तो स्वकीय जनांना आपल्या आजूबाजूस नेमून जणू निःशंक अथवा निर्भय असल्याप्रमाणे दाखवितो. तसेच हाती घेतलेले कार्य पूर्णत्वास नेल्यानंतर तो त्याच्या सेवकांप्रती असलेली त्याची कृतज्ञता ही तो धन प्रदान करुन व्यक्त करतो. (श्लोक १४) कोणत्या कार्यात साम, दान, भेद आणि दंड या चार उपायांपैकी कोणत्या उपायाचा वापर करावा याचे योग्य पद्धतीने विभाजन

करुन त्यांचा सम्यक वापर केल्याने ते उपाय जणू परस्परांमध्ये स्पर्धा असल्याप्रमाणे त्यास आत्यंतिक संपत्तीचा लाभ करुन देत आहे. (श्लोक १५) त्याच्या राजवाड्याचे अंगण अनेक राजांच्या रथ आणि अश्वांनी भरुन गेले आहे. तसेच सामंत राजांनी भेट म्हणून दिलेल्या उत्तम प्रतीच्या गंधहत्तींच्या मदस्रवाने ते पंकील सुद्धा झाले आहे. (श्लोक १६) त्याने केलेल्या लोकाभिमुख कामांमुळे त्याच्या राज्याला केवळ पर्जन्याच्या पाण्यावर अवलंबून रहावे लागत नाही. त्यामुळे ते जणू न नांगरता सहज मिळणाऱ्या धान्यांच्या समृद्धीला सुद्धा अनुभवत आहे. (श्लोक १७) प्रतिथयश, करुणाशील, सर्व बाजूने रक्षण केल्यामुळे उपद्रवरहित उदयाने आणि कुबेरासमान असणाऱ्या सुयोधनाच्या सद्गुणाने पान्हावलेली पृथ्वी स्वतःहून त्यास आपल्या संपदा प्रदान करीत आहे. (श्लोक १८) त्याचे योद्धे बलशाली, स्वाभिमानी, युद्धभूमीवर प्रतिष्ठा मिळविलेले, धनाने संतृप्त व त्याच्या मताहून भिन्न मते नसणारे आहे, त्याच्याविरुद्ध न एकवटलेले आणि त्यामुळे त्याच्याकरिता युद्धामध्ये स्वतःच्या जीवावर उदार होऊन त्याचे प्रिय करु इच्छितात. (श्लोक १९) तो सर्व कार्ये वेळेत पूर्णत्वास नेतो. चांगले चरित्र असणाऱ्या हेरांद्वारे इतर राजांचे सर्व क्रियाकलाप तो जाणून घेतो. मात्र त्याच्या क्रिया फलद्रूप झाल्या असताच कळून येतात. त्याच्या क्रियांची फले ही त्याच्या हिताशी निगडीत आणि मोठा उत्कर्ष करणारी असतात. (श्लोक २०) त्याने दोरी लावलेले धनुष्य कधी उचलले नाही की रागाने चेहरा वाकडा केला नाही. त्याच्या गुणांवर अनुरक्त झालेल्या राजांनी त्याची आज्ञा जणु फुलांच्या माळेप्रमाणे शिरसा वंद्य मानली आहे. (श्लोक २१) त्याने तारुण्याने उद्धत अशा आपल्या धाकट्या भावाला, दुःशासनाला युवराजपदी बसविले आहे. तसेच त्याची आज्ञा ही अप्रतिहत आहे आणि तो पुरोहितांनी अनुमोदित केल्यानुसार सतत अग्निदेवतेला आहुतींनी प्रसन्न करीत आहे. (श्लोक २२) त्याचे सर्व शत्रू हे नामशेष झालेले असले आणि तो जरी स्थायी भविष्य असणाऱ्या आसिंधू पृथ्वीवर राज्य करीत असला तरी तो तुमच्यापासून भविष्यकालात होणाऱ्या भयाची जणू चिंता करीत आहे. अहो, मोठ्या लोकांशी वैर हे अनर्थकारी असते. (श्लोक २३) ज्याप्रमाणे सहन करण्यास अशक्य असे तार्क्ष्य आणि वासुकी यांचे नाव ऐकले असता सर्पाचा फणा खाली उतरतो त्याप्रमाणे कथाप्रसंगाने लोकांकडून असह्य असे तुमचे नाव उच्चारले गेले असता अर्जुनाच्या पराक्रमाची आठवण झालेला तो शीर खाली घालतो. (श्लोक २४) तरी, तुमच्या बाबतीत कपट करण्यासाठी उद्युक्त झालेल्या त्या सुयोधनाच्या बाबतीत तुम्ही तात्काळ प्रत्युत्तर द्यावे. दुसऱ्यांच्या वचनांचा संग्रह करणाऱ्या माझ्यासारख्या लोकांची वाणी ही केवळ वृत्तांतरूप आहे. (श्लोक २५)

**४.३.२ भारवी सामान्य परिचय**

कवि भारवीचे किरातार्जुनीयम् हे महाकाव्य संस्कृत भाषेतील नावाजलेल्या पंचमहाकाव्यांपैकी एक म्हणून गणले जाते. प्रसिद्ध पंचमहाकाव्यांपैकी कुमारसंभव आणि रघुवंश यांना मेघदूतम् या खंडकाव्यासहित त्यांच्या लहान ग्रंथ-विस्तारामुळे लघुत्रयी म्हटले जाते तर किरातार्जुनीयम्, शिशुपालवधम् आणि नैषधीयचरितम् यांना त्यांच्या मोठ्या ग्रंथ-विस्तारामुळे बृहत्त्रयी म्हटले जाते. संस्कृत महाकाव्याच्या विकासक्रमात पहिली दोन महाकाव्ये ही कविकुलगुरु कालिदासप्रणित असून त्यामध्ये विषयवस्तूच्या मांडणीपेक्षा (manner) विषयवस्तूंवर (matter) जास्त लक्ष केंद्रित केलेले दिसते तर

शेवटच्या दोन महाकाव्यांमध्ये विषयवस्तूपेक्षा विषयमांडणीवर जास्त लक्ष कवींनी दिलेले आहे. विषयवस्तू हा पांडित्याच्या आविष्कारासाठी आणि प्रदर्शनासाठी वापरलेला दिसतो. तसेच काव्याची सहजता, साधेपणा, नैसर्गिक सौंदर्य यांची जागा भपकेदारपणा, अलंकारांची रेलचेल, अतिसौंदर्यीकरण आणि त्यामुळे निर्माण झालेली कृत्रिमता यांनी घेतली. कवींनी स्वतःच्या अभिव्यक्तीपेक्षा पंडितांच्या प्रशंसेकडे जास्त लक्ष केंद्रित केले आणि काव्यांनी वाचकांच्या मनापेक्षा त्यांच्या बुद्धीला जास्त साद घातली. या महाकाव्यांच्या विकासक्रमामधील संधिदुवा म्हणजे भारवीचे काव्य होय. यात या दोहोंचा समतोल त्याने साधलेला दिसतो. मात्र भारवीनंतरच्या कवींनी विषयाच्या मांडणीला आकर्षित करण्याकरिता अवघड, रोजच्या वापरात नसलेले शब्दप्रयोग, शब्दच्छल, अलंकार, अतिशयोक्तिपूर्ण कविकल्पना, काव्यबंध तसेच पाल्हाळिक वर्णन अशा वेगवेगळ्या क्लृप्त्या योजल्याने काव्यातील सहज सौंदर्य झाकोळून गेलेले आहे. राजदरबारातील पंडितांच्या पसंतीस उतरण्याकरिता केलेल्या या प्रयत्नांबरोबरच विषयवस्तूला ताणून राजोपयोगी विषयांची चर्चा सुद्धा यांत अंतर्भूत केलेली दिसते. अशाप्रकारच्या दरबारी काव्य किंवा पंडिती काव्यांना या नवीन वळणात ढाळण्याचे श्रेय सुद्धा भारवीच्या काव्याला जाते.

पंडितांच्या पसंतीस उतरल्यामुळेच पंडितांनी निव्वळ एकाच कलाकृतीने अजरामरत्व मिळालेल्या भारवीची साहित्य-समीक्षकांनी मुक्तकंठे प्रशंसा केलेली दिसते. जसे, संस्कृत भाषेतील नावाजलेल्या पहिल्या दहा श्रेष्ठ कवींमध्ये त्याची गणना केली जाते.[34] काव्यांमध्ये उपमा अलंकाराच्या उपयोगाकरिता जसा कालिदास प्रसिद्ध आहे, तसा भारवि अर्थगौरवासाठी म्हणजे आशयघन अर्थ कमी शब्दात व्यक्त करण्याच्या गुणामुळे सर्वश्रुत आहे.[35] भारवि हे जसे कवीचे विशेषनाम आहे तसेच त्या शब्दाचा व्युत्पत्तीने अर्थ रवीचे म्हणजे सूर्याचे (रवेः) तेज (भा) असा सुद्धा होतो. यावरुन त्याचे तेज हे सूर्याच्या तेजाप्रमाणे आहे, अशी कीर्ती त्यास प्राप्त झाली होती.[36] कालिदासाची वाणी ही चंद्राप्रमाणे आल्हाददायक आहे, तर भारवीची वाणी ही सूर्याच्या प्रबोधाप्रमाणे मानली आहे.[37] तसेच जशी कालिदासाच्या काव्याला द्राक्षापाकाची उपमा दिली जाते त्याप्रमाणे भारवीच्या काव्याला नारळाच्या फळाची उपमा दिली आहे. द्राक्ष ज्याप्रमाणे लगेचच त्याच्या मधुर रसाचा आस्वाद खाणाऱ्यास देतो त्याप्रमाणे कालिदासाची काव्यकल्पना वाचकाला तात्काळ आनंद देऊन जाते. मात्र नारळ ज्याप्रमाणे बाहेरुन कठीण आणि आतून गोड पाणी व गर असणारे असते त्याप्रमाणे भारवीची काव्यशैली ही बाहेरुन त्याच्या जड व क्लिष्ट शब्दांमुळे कठीण वाटते. परंतु एकदा अर्थ कळल्यानंतर त्यातील रस वाचकाला आनंद देऊन जातो.[38] त्याची भाषा ही जात्याच मधुर मानली आहे.[39] तसेच त्यात रस व भाव यांचे तादात्म्य स्पष्टपणे दिसून येते.[40] भारवीची कलाकृती ही त्याच्यानंतरच्या काळातील कवींसाठी महाकाव्याचे एक आदर्शरूप म्हणून समजली गेली. त्यामुळे काव्यरसाने युक्त, कमी

---

[34] आदौ कालिदासः स्यादश्वघोषस्ततः परम् । भारविश्च तथा भट्टिः कुमारश्चापि पञ्चमः।।
माघरत्नाकरौ पश्चाद्हरिश्चन्द्रस्तथैव च । कविराजश्च श्रीहर्षः प्रख्याताः कवयो दशाः।।

[35] उपमा कालिदासस्य, भारवेरर्थगौरवम् । दण्डिनः पदलालित्यं माघे सन्ति त्रयोगुणः।।

[36] भारवेर्भा रवेरिव।।

[37] शशिप्रभेव प्रह्लादं कालिदाससरस्वती। तनोति भारवेर्वाणी प्रबोधं भारवेरिव।।

[38] नारिकेलसम्मितं वचो भारवेः सपदि यद् विभज्यते। स्वादयन्तु रसगर्भनिर्भरं सारमस्य रसिका यथेप्सितम्।।

[39] प्रकृतिमधुरा भारविगिरः। सदुक्तिकर्णामृत

[40] तादात्म्यं रसभावयोर्भारविः स्पष्टमूचिवान्।

शब्दात जास्त आशय व्यक्त करणारी, मार्गावरील दीपस्तंभप्रमाणे असणारी भारवीची रम्य कृती कोणाला बरे उपजीव्य ठरणार नाही?[41] अशा आशयाच्या श्लोकाने भरतचरितम् चे लेखक, कवीकृष्णाने भारवीचे कौतुक केले आहे. यावरुन नंतरच्या काळातील महाकाव्यकारांना त्याचे काव्य लिहिण्याकरिता कसे मार्गदर्शक ठरले, हे दिसून येते. त्याच्या काव्याने महाकाव्याचे एक नवे पर्व सुरु झाले. महाकाव्य रचनेचा नवीन पायंडा पडला. तो केवळ महाकवींनाच उपयोगी पडला असे नाही तर साहित्यशास्त्राच्या लेखकांनी सुद्धा महाकाव्याची वैशिष्ट्ये ही त्याच्या व इतर ग्रंथांच्या अवलोकनाने तयार केलेली दिसतात.

ज्याप्रमाणे कालिदास हा त्याच्या दीपशिखेच्या उपमेसाठी प्रसिद्ध आहे, माघ जसा हत्तीच्या गळ्यातील घण्टांच्या उपमेमुळे घण्टामाघ माघ म्हणून नावाजला जातो त्याप्रमाणे भारवी हा आतपत्राच्या (छत्रीच्या) उपमेसाठी नावाजला जातो. म्हणून त्यास आतपत्रभारवि असे सुद्धा म्हटले आहे.

अशाप्रकारे भारवीच्या काव्यात आपल्याला रम्य काव्यकल्पना, भावगभीरता, अर्थगौरव, समृद्ध शब्दसंचय, वृत्तांचे वैविध्य, वर्णनांचे वैपुल्य, अलंकारांची चमत्कृती, भाव-रसाची सांद्रता आणि गुणांनी साधलेले भाषेचे सौष्ठव प्रकर्षाने दिसून येते. या काव्यगुणांमुळे भारवी हा त्याच्या उत्तरवर्ती काळात नेहमीच अनुकरणीय ठरला.

**४.३.३) भारवीचा काळ -**

काही विरळा कवी सोडल्यास संस्कृत कवी सामान्यतः स्वतःबद्दल विस्ताराने काहीही सांगत नाही. जास्तीत जास्त स्वतःचे कुलनाम, आई-वडील किंवा गुरुचे नाव, फार-फार तर राजाश्रय देणाऱ्या राजाचे नाव, गावाचे नाव इत्यादी त्रोटक माहिती ही त्यांच्या स्वतःच्या लेखणीतून आपल्याला कळते. मात्र भारवीच्या बाबतीत तो स्वतःबद्दल काहीही माहिती सांगत नाही. त्यामुळे कवीच्या आयुष्याबद्दल व्यवस्थित किंवा पूर्ण चित्र तयार करण्याकरिता आपल्याला अंतःपुरावे, बाह्य पुरावे, किं वदतीं, इत्यादींवर अवलंबून रहावे लागते.

माघाने स्वतःचे शिशुपालवधम् हे महाकाव्य हे भारवीशी जणु स्पर्धा करण्याच्या हेतूने लिहिलेले दिसते. तसेच माघाने त्याचे अनेक ठिकाणी अनुकरण सुद्धा केलेले दिसते. याचा अर्थ भारवीच्या नंतर माघाचा काळ येतो. माघाचा काळ इ.सनाचे सातवे शतक असा निर्धारीत केला आहे. त्यामुळे माघाच्या अगोदर म्हणजे इ.सनाच्या सातव्या शतका अगोदर भारवीचा काळ मानावा लागतो. ही भारवीच्या काळाची अपर सीमा ठरते.

त्याची पूर्व सीमा ठरविण्याकरिता दोन शिलालेख उपयोगी पडतात. त्यापैकी पहिला शिलालेख हा सध्याच्या महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातील भूमीवर राज्य करणाऱ्या चालुक्यवंशीय राजा द्वितीय पुलुकेशीच्या आश्रयी असणाऱ्या कवि रविकीर्तीचा ऐहोळ (सध्याचे कर्नाटकातील विजापूर) येथील जैन मंदिराच्या भिंतीवरील लेख होय. यात त्याने स्वतःची तुलना ही कालिदास आणि भारवीसह केली आहे.[42] यात शिलालेखाचा काळ सुद्धा नमुद केला आहे.[43] तो शक गणनेनुसार ५५६ असा नमुद केला असून त्यात ७८

---

[41] प्रदेशवृत्त्यापि महान्तमर्थं प्रदर्शयन्ती रसमादधाना। सा भारवेः सत्पथदीपिकेव रम्या कृतिः कैरिव नोपजीव्या।।

[42] येनायोजि नवेऽश्मस्थिरमर्थविधौ विवेकिना जिनवेश्म। स विजयतां रविकीर्तिः कविताश्रितकाळिदासभारविकीर्तिः।
ऐहोळप्रशस्ति, ३७.

[43] पञ्चाशत्सु कलौ काले षट्सु पञ्चशतासु च। समासु समतीतासु शकानामपि भूभुजाम् ।। तत्रैव, ३४.

वर्षांची बेरीज केली असता इ. सनाचा काळ प्राप्त होतो. अशाप्रकारे तो काळ इ. सन ६३४ वर्ष असा मिळतो. याचा अर्थ भारवी हा या वर्षापर्यंत कालिदासाच्या समतुल्य आणि प्रतिथयश कवी गणला जाऊ लागला होता. तत्कालीन काळातील साहित्याच्या प्रसार व प्रचाराच्या साधनसामग्रीची दुरुहता व कमतरता पाहता एखाद्या कवीचे नाव व त्याचे साहित्य सुदूर सर्वश्रुत होण्यासाठी त्याच्या निर्मितीपासून किमान वीस-पंचवीस वर्षांचा कालावधी गृहीत धरणे अभिप्रेत आहे. अशाप्रकारे भारवीचा काळ हा इ.सनाच्या ६३४ च्या अगोदर पन्नास वर्षे म्हणजे सहाव्या शतकाचा उत्तरार्ध असा निश्चित करता येईल.

सुदैवाने आपल्याला अजून एका शिलालेखावर भारवीचा उल्लेख आढळतो. तो म्हणजे आजच्या कर्नाटक राज्याच्या दक्षिण भागात राज्य करणाऱ्या गंगवंशीय नरेश पृथ्वीकोंगण याचा असून त्यात त्याने त्याच्या कुळातील पूर्व राजांचे चरित्र सांगताना राजा दुर्विनीताचा उल्लेख केला आहे. त्याने भारवीच्या किरातार्जुनीयम् काव्यावरील पंधराव्या सर्गावर टीका लिहिली होती, असा उल्लेख त्याने केला आहे.[44] भारवीच्या काव्यातील पंधरावा सर्ग हा चित्रकाव्याचे उदाहरण असल्याने तो समजण्यास कठीण आहे. राजा दुर्विनीताचा काळ इ. सनाचे सहावे शतक असा नियत करण्यात आला आहे. त्यावरुन भारवीचे काव्य प्रसिद्ध होऊन स्वतः राजाने त्यावर टीका लिहिण्यासाठी काही काळ गृहीत धरला असता सहाव्या शतकाचा उत्तरार्ध हा भारवीचा काळ मानावा लागतो.

तसेच संस्कृत साहित्यातील अजून एक नामांकित कवी दंडी याच्या तीन कलाकृतींपैकी अवन्तीसुन्दरीकथा या ग्रंथाचा काही त्रुटीत भाग उपलब्ध झाला आहे. तसेच अवन्तीसुन्दरीकथासार या नावाचा अन्य एक ग्रंथ सुद्धा उपलब्ध आहे. या ग्रंथातील उल्लेखांवरुन भारवी हा कवी दंडीचा आजोबा लागतो. दंडीचा काळ हा इ. सनाचे ६५० वर्ष असा मानला आहे. त्यामुळे तिथून मागे प्रत्येक पिढीकरिता २५ वर्षे मानली असता भारवीचा काळ हा सहाव्या शतकाचा उत्तरार्ध ठरतो.

**४.३.४) भारवीची वैयक्तिक माहिती –**

वर उद्धृत केल्याप्रमाणे भारवीने स्वलिखित माहिती दिलेली नसली तरी अवन्तिसुदंरीकथासारातील वृत्तांतावरुन आपणास असे कळून येते की, भारवी हा कौशिकवंशीय ब्राहमण होता. त्याच्या पूर्वजांचे मूळ गाव आर्यदेशाचे शिखारत्न असणारे आनंदपूर ग्राम होते. नंतर त्यांनी नासिक्य देशातील अचलपूर येथे स्थलांतर केले. तेथे नारायण नामक एका पूर्वजाच्या उदरी दामोदर जन्मास आला. तो अत्यंत हुशार असा कवि भारवी होता. त्याने विष्णुवर्धन नावाच्या राजाशी मैत्री केली. हा राजा विष्णुवर्धन म्हणजे ऐहोळप्रशस्ती/ लिहिणाऱ्या रविकिर्तीचा आश्रयदाता असणाऱ्या चालुक्य वंशीय द्वितीय पुलकेशीन् राजाचा लहान भाऊ होय. एकदा तो मृगयेला गेला असता तेथे त्याने अभक्ष्य भक्षण केले. म्हणून तो सलज्जित होऊन तीर्थस्थळी गेला. तेथे त्याची भेट राजा दुर्विनीताशी झाली व त्याच्याकडे भारवी राहिला. याच दुर्विनीत राजाने भारवीच्या महाकाव्याच्या पंधराव्या सर्गावर टीका लिहील्याचा शिलालेखावरील उल्लेख आपण वरील परिच्छेदात पाहिला. राजा दुर्विनीताकडून भारवीची कीर्ति ऐकून आजच्या तेलंगाणा व आंध्रप्रदेशमधील भूमिभागावर राज्य करणाऱ्या पल्लव राजा विष्णुसिंहाने त्यास आपल्या दरबारात आश्रय दिला. भारवीस एकूण तीन मुले होती. त्यापैकी मधल्या मुलाचे नाव नाव मनोरथ होते. अशाप्रकारची भारवीच्या वैयक्तिक आयुष्याबद्दलची माहिती आपणास अवन्तिसुंदरीकथासार या ग्रंथातून मिळते.

---

[44] अविनीतनाम्नः पुत्रेण.... किरातार्जुनीयपंचदशसर्गटीकाकारेण दुर्विनीतनामधेयेन ।

भारवीस चालुक्य राजा विष्णुवर्धन, गंग राजा दुर्विनीत व पल्लव राजा सिंहविष्णु यांचा राजाश्रय मिळाला. हे तिघेही राजे समकालीन आहेत. याचाच अर्थ तो दक्षिण भारतीय होता, हे सुद्धा सिद्ध होते. तसेच त्याच्या काव्यात अर्जुनाने शंकराच्या उरस्थळावर केलेल्या मुष्टिप्रहाराची तुलना ही त्याने सह्यपर्वताच्या पायथ्याशी आपटणाऱ्या समुद्राच्या लाटांशी केलेली आहे.[45] हे वर्णन त्याचे या भूभागाशी असणारा परिचय दर्शविते. तसेच वर उद्धृत केलेले दोन्ही शिलालेख हे आजच्या कर्नाटक राज्यातील असल्याने भारवीचे तेथील प्रदेशात वास्तव्य आणि त्याची तेथे पसरलेली ख्याती दर्शिवते, ज्यामुळे त्याचा उल्लेख प्रकर्षाने शिलालेखांवर झालेला दिसतो.

भारवीच्या काव्यावरुन तो शैव उपासक होता, हे कळून येते. म्हणूनच त्याने आपल्या काव्यातून अर्जुनाकडून केली गेलेली भगवान शंकराची आराधना आणि किरातवेषधारी शंकराचे रूप दर्शविले आहे. काव्याच्या नामाभिधानात सुद्धा त्याने किराताच्या नावाचा उल्लेख आद्यपदाच्या स्थानी आवर्जुन केला आहे. त्याच्या काव्यातील अनेक उल्लेखांवरुन त्याला व्याकरणशास्त्र, साहित्य, नीतिशास्त्र, युद्धशास्त्र, राजनीतिशास्त्र, दर्शनशास्त्र, छंदशास्त्र, व्याकरणशास्त्र आदी शास्त्रांचा व्यासंग, ज्ञान होते, असे दिसून येते. त्याच्या काव्यावरुन तो धीर गंभीर प्रकृतीचा, मानी व उदार स्वभावाचा होता, असे समजते. तो मनुष्याच्या यशात स्वकर्तृत्व व दैव या दोघांना समान महत्त्व देतो. त्याच्या प्रतिभेच्या आणि एकमेव काव्याच्या जोरावर त्याने अजरामर प्रसिद्धी प्राप्त केली म्हणून उत्तरोतर काळात त्याच्या आयष्याबद्दल ठोस माहिती उपलब्ध नसल्याने त्याच्या नावाभोवती अनेक दंतकथांचे गारुड उभे राहिले. यातून त्याचे पूर्वायुष्य अत्यंत दारिद्र्यात गेले. मात्र उतार वयात त्याच्या काव्याच्या जोरावर त्याला धनप्राप्ति झाली, अशी किंवदंती सर्वश्रुत आहे. *सहसाविदधीत न क्रियामविवेकः परमापदां पदम्। वृणते हि विमृश्यकारिणं गुणलुब्धा स्वयमेव सम्पदः।।*[46] या त्याच्या श्लोकावरुन त्याच्याबाबत अनेक दंतकथा निर्माण झाल्या आहेत.

**४.३.५) भारवीच्या काव्यकृती –**

वर उद्धृत केल्याप्रमाणे आजपावेतो भारवीची केवळ किरातार्जुनीयम् ही एकमेव महाकाव्यरूपातील काव्यकृती उपलब्ध आहे. परंतु यापेक्षा अजून काही काव्यकृती त्याच्या असू शकतील ज्या कालकवलीत झाल्याने आपल्यापर्यंत पोहोचू शकल्या नाहीत, कारण वल्लभदेवाच्या सुभाषितावलि आणि श्रीधरदासाच्या सदुक्तिकर्णामृतम् या ग्रंथामंध्ये भारवीच्या नावाने काही पद्ये उद्धृत केली आहेत. मात्र ती किरातार्जुनीयम् या महाकाव्यातील नाहीत. त्यामुळे किरातार्जुनीयम् या महाकाव्याव्यतिरिक्त भारवीची अन्य काही काव्यकृती नक्कीच असू शकतील, ज्यातून त्यांनी ही उद्धरणे दिली आहेत.

**४.३.६) महाकाव्याच्या कथेचा स्रोत –**

साहित्यशास्त्राच्या नियमानुसार महाकाव्याचा विषयवस्तु हा प्रसिद्ध इतिहासातून घेतलेला असावा किंवा सज्जनाश्रयावर बेतलेला असावा. त्यास अनुसरुन भारवीने व्यासरचित महाभारत या इतिहास

[45] उरसि शूलभृतः प्रहिता मुहुः प्रतिहतिं ययुरर्जुनमुष्टयः। भूशरया इव सह्यमहीभृतः पृथुनि रोधसि सिन्धुमहोर्मयः।।
किरातार्जुनीयम्, १८.५

[46] किरातार्जुनीयम्, २.३०.

ग्रंथातून आपल्या काव्याकरिता कथा-वस्तु घेतला आहे. महाभारतातील वनपर्वात अध्याय क्रमांक सत्तावीस ते एक्केचाळीस मध्ये ही कथा आढळते. ती कथा प्रथम पाहू.

दयुतक्रीडेत कौरवांकडून हरल्यानंतर पांडव द्वैतवनात राहत असताना एके दिवशी द्रौपदी युधिष्ठिरास शत्रूविरुद्ध युद्ध पुकारण्यासाठी उद्युक्त करते. त्यांचा हा संवाद अध्याय क्रमांक २७ ते ३३ मध्ये वर्णिलेला आहे. यानंतर अध्याय क्रमांक ३४ मध्ये भीम सुद्धा या संवादात सामील झाला आणि तो सुद्धा द्रौपदीच्या म्हणण्याचे समर्थन करत कौरवांविरुद्ध युद्ध पुकारण्याकरिता युधिष्ठिरास उत्तेजित करतो मात्र युधिष्ठिर संयमाने मार्गक्रमण करण्याचा विचार मांडतो. भीम, द्रौपदी व युधिष्ठिर यांचा हा युद्धाविषयी संवाद सुरु असतानाच व्यासमुनींचे तेथे आगमन होते व ते पांडवांना द्वैतवन सोडून काम्यक वनात जावयास सांगतात. तसेच अर्जुनास शिवाची आराधना करण्यास सांगून पाशुपतास्त्राची प्राप्ति करून घेण्यासाठी उपदेश करतात. अध्याय क्रमांक ३७ मध्ये व्यासांच्या सांगण्यानुसार पांडव काम्यक वनात स्थलांतरित होतात. एके दिवशी युधिष्ठिर अर्जुनास बोलावून भीष्म व द्रोण यांची अजेयता आणि त्यामुळे आपल्या यशाची दुर्लभता समजावून सांगतात. युधिष्ठिर अर्जुनास व्यासांकडून मिळालेली योगविद्या देतो आणि घोर तपश्चर्या करुन दिव्यास्त्र प्राप्त करुन घेण्यासाठी सांगतो. युधिष्ठिराची संमति घेऊन अर्जुन हिमालय पर्वताचा भाग असणाऱ्या इंद्रकील पर्वतावर तपश्चर्या करण्यासाठी प्रस्थान ठेवतो. मंत्रांच्या सहाय्याने तात्काळ तो इंद्रकील पर्वतावर पोहचतो. तेथे त्याची वृद्ध ब्राह्मणाशी भेट होते व तो त्यास तपश्चर्येपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो. अर्जुनास त्याच्या ध्येयावर अढळ पाहून इंद्रदेव प्रसन्न होऊन त्यास त्याचे स्वरूपात दर्शन देतो व तो अर्जुनास शकंराची आराधना करावयास सांगतो. अध्याय क्रमांक ३८ मध्ये इंद्राच्या सांगण्याप्रमाणे अर्जुनाची घोर तपश्चर्या दाखविली आहे. अर्जुनाच्या तपश्चर्येने तेथील ऋषिमुनि भयभीत होऊन शंकरास अर्जुनाच्या तपश्चर्येबाबत सांगतात. भगवान शंकर त्यांस निश्चिंत होण्यास सांगतात कारण शंकरास अर्जुनाच्या तपाचरणाचे कारण माहित असते. अर्जुनाची परीक्षा घेण्यासाठी शंकर किराताचे रूप घेऊन उमा व काही गणांबरोबर तेथे येतात. त्याचवेळी मुक नावाचा एक दानव हा वराहरूपात अर्जुनाकडे धाव घेतो व अर्जुन लगेचच त्यास आपल्या बाणाचे लक्ष बनवितो. त्याच क्षणी किरातसुद्धा त्या वराहाचा बाणाने वेध घेतात. दोन बाणांनी घात झालेला तो वराह लगेचच मूळ रूप धारण करुन प्राणत्याग करतो. नंतर अर्जुन व किरात या दोघांमध्ये त्या वराहावर अधिकार सागंण्यासाठी वाद होतो. ते परस्परांवर प्रथम प्राण्याचा वेध कोणी घेतला आणि एकाच्या लक्षावर दुसऱ्याने सुद्धा वेध घेण्याच्या नियमांच्या उल्लंघनाने निर्भत्सना करतात. दोघांचे भीषण युद्ध अध्याय क्रमांक ३९ मध्ये वर्णिले आहे. अर्जुनाची सर्व अस्त्रशक्ति परास्त झाल्यानंतर तो मुष्टियुद्धावर उतरतो. त्यातही तो हतबल होतो व मुर्छित होऊन पडतो. शुद्ध आल्यावर तो उठून पाहतो तर जी माळ त्याने शंकराच्या मूर्तीला अर्पण केली होती तीच माळ किराताच्या गळ्यात दिसते. अर्जुन लगेचच किराताचे खरे रूप जाणतो व त्याच्या पाया पडतो आणि त्याच्या औद्धत्याबद्दल माफी मागतो. अर्जुनाच्या शौर्यावर प्रसन्न होऊन शकंर अर्जुनास आलिंगन देतात त्यास व पाशुपतास्त्राची विद्या देतात, त्यानंतर इंद्र, कुबेर, वरुण आदी देवता अर्जुनास दिव्यास्त्र देतात. इंद्राच्या वाहनाने अर्जुनास स्वर्गात नेले जाते. तेथे त्याचे उत्तम आतिथ्य केल्यानंतर इंद्र अर्जुनास अजुन दिव्यास्त्रे देऊन त्यांच्या बांधवांकडे पाठवितात. पांडव तोपर्यंत गंधमादन वनात पोहोचलेले असतात. याचे वर्णन चाळिसाव्या अध्यायात आले आहे. त्यानंतर पुढील अध्यायात इतर देवताही अर्जुनास इतर

दिव्यास्त्रे देतात, याचे वर्णन आले आहे. ही कथा शिव पुराणात सुद्धा आढळते. मात्र महाकाव्याच्या कथेचे भ्रष्टरूप प्रक्षिप्त स्वरूपात पुराणात घातलेले दिसते.

**४.३.७) महाकाव्याच्या सर्गांचे विषय-वर्णन –**

महाभारताच्या या चौदा अध्यायांमध्ये येणाऱ्या कथेला भारवीने आपल्या प्रतिभेने तिचा परिष्कार करुन अठरा सर्गांमध्ये फुलविले आहे. त्यामधील प्रथम सर्गात युधिष्ठिराने दुर्योधनाची माहिती जाणण्याकरिता पाठविलेला वनेचर माहितीसहित परत येऊन तो वृत्तांत युधिष्ठिरास कथन करतो. येथे दुर्योधनास सुयोधन असे संबोधून तो योग्य प्रशासक म्हणून कसा राज्य करीत आहे, त्याचे विस्तृत वर्णन दिलेले आहे. त्यानंतर युधिष्ठिर हा द्रौपदीच्या कक्षात जाऊन आपल्या लहान भावांच्या समक्ष वनेचराचा सर्व वृत्तांत त्यांना सांगतो. तो ऐकल्यावर द्रौपदी त्यास आपल्या ओजस्वी भाषणाने सुयोधनाविरुद्ध युद्ध पुकारण्यासाठी उद्युक्त करते. द्वितीय सर्गात भीम द्रौपदीच्या म्हणण्यास समर्थन देताना पराक्रमाचे महत्त्व युधिष्ठिरास प्रतिपादित करतो. त्यास युधिष्ठिर संयमाने शत्रूचा प्रतिवाद केला पाहिजे, अशी भूमिका घेतो. त्याचवेळी तेथे व्यासमुनींचे आगमन होते. तृतीय सर्गात व्यास शिवाची उपासना करुन दिव्यास्त्र प्राप्तीसाठी उपदेश देतात. योगविधीचे निरुपण करून अंतर्धान पावतात. अर्जुन सर्वांचा निरोप घेऊन प्रवासासाठी निघतो. चतुर्थ सर्गात व्यासांनी पाठविलेल्या यक्षासहित अर्जुन प्रस्थान करतो व इंद्रनील पर्वतावर पोहोचतो. येथे शरद ऋतूचे वर्णन येते. पाचव्या सर्गात हिमालय पर्वताचे सुंदर वर्णन व यक्षाद्वारे अर्जुनास इंद्रिय संयमाचा उपदेश कवीने घातला आहे. सहाव्या सर्गात इंद्रकील पर्वताचे आरोहण, अर्जुनाची तपश्चर्या आणि याचे वनरक्षकांकडून इंद्राला संकीर्तन हा वृत्तांत येतो. सातव्या सर्गात इंद्राद्वारे अर्जुनाच्या तपश्चर्येत भंग करण्याकरिता अप्सरांचे आगमन व त्यांचे गंधर्वासह विहार, इत्यादींचे वर्णन दिले आहे. आठव्या सर्गात पुन्हा अप्सरा व गंधर्व यांची जलक्रीडा इत्यादींचे यांचे वर्णन केले आहे. नवव्या सर्गात सायंकाळ, चंद्रोदय, दूतांद्वारे त्यांची निरोप पाठवणी, प्रभात वर्णन, दहाव्या सर्गात अप्सरांचा अर्जुनाला विचलीत करणारा क्रिया-कलाप व त्यात त्यांना आलेले अपयश यांचे वर्णन येते. अकराव्या सर्गात मुनिरूपात इंद्र अर्जुनास भेटावयास येऊन त्याच्याशी संवाद साधतो. नंतर स्वतःचे खरे रूप प्रकट करुन त्यास शिवाची आराधना करावयास सांगतो. बाराव्या सर्गात अर्जुनाची तपश्चर्या, त्याचे मुनिद्वारे शंकरास वृत्तांत कथन, शंकराचे स्वतः त्याची परीक्षा घेण्याकरिता किरात रूपात त्याच्या सैन्यासह आगमन व एक मूक नावाच्या दानवाचे अर्जुनाचा वध करण्यासाठी त्याच्या दिशेने वराहाच्या रूपात आगमन हा वृत्तांत घातला आहे. तेराव्या सर्गात अर्जुन व किरात या दोघांकडून वराहाचा वेध व त्याच्या मालकीवरुन अर्जुन व किराताच्या सैन्यातील विवाद याचे वर्णन येते. चौदाव्या सर्गात आपल्या सेनेसहित किराताचे आगमन व अर्जुनाशी त्यांचे युद्धवर्णन येते. पंधराव्या सर्गात चित्रकाव्याच्या रूपात पुन्हा सविस्तर युद्धाचे वर्णन, सोळाव्या सर्गात शंकराचे अर्जुनासह शस्त्र युद्ध व नंतर मल्लयुद्ध, सतराव्या सर्गात पुन्हा दोघांचे युद्ध, अठराव्यात सर्गात शंकराचे अर्जुनाच्या पराक्रमावर संतुष्ट होऊन त्यास मूलरूप दर्शन देणे, इंद्रादी देवतांचे आगमन, अर्जुनाने केलेली शंकराची स्तुती, शंकराचा अर्जुनाला उपदेश व अस्त्रदान, इतर देवातांकडून सुद्धा अर्जुनाला दिव्यास्त्र प्राप्ति व अर्जुनाच्या पुन्हा परत द्वैतवनास आगमनाने काव्य समाप्त होते.

**४.३.८) मूळ कथेत कवीने केलेले बदल -**

कवीने मूळ कथानकास जास्त धक्का न लावता बारकाव्यांमध्ये व वर्णनांमध्ये आपले प्रभुत्व दाखविले आहे आणि यातूनच त्याने साध्या कथेचे महाकाव्यात रूपांतर केले आहे. यात नवीन घातलेला सर्व वृत्तांत ही भारवीची स्वतःची निर्मिती आहे.

द्यूतामध्ये राज्य हरलेल्या राजांना त्यांचे राज्य परत मिळवून देण्यासाठी पहिल्या सर्गात आलेला वनेचराचा वृत्तांत हा सर्वथैव भारवीची स्वतःची निर्मिती आहे, ज्यामुळे मागच्या कथेचा अनुबंध वाचकांकडून जाणला जातो व पुढील कथानकास चालना मिळते. अशाप्रकारे वनेचर वृत्तांत हा महाभारताच्या एकूण कथानकास महाकाव्यातील परिच्छिन्न कथानकाशी जोडण्याकरिता संधि-दुव्याचे कार्य करतो. कवीने मूळ कथेत असणारे अतिमानुषी प्रभाव कमी करुन पात्रांना पूर्ण वास्तविक वातावरणात ठेवले आहे. रागाने उसळणारा भीम येथे एका सूज्ञ राजनीतिज्ञाप्रमाणे बोलताना दिसतो. मूळ कथानकात इंद्राला प्रसन्न करुन घेण्याचे मंत्र व्यासमुनि हे युधिष्ठिराला शिकवितात व युधिष्ठिर ते अर्जुनास सांगतो. मात्र येथे कवीने ही ज्ञानपरंपरा न दर्शिवता व्यासमुनि थेट अर्जुनाला मंत्रविद्या देतात. तसेच व्यासांनी वनातून स्थलांतर करावयाचा दिलेला उपदेश येथे संबंधित नसल्याने गाळलेला आहे. तसेच मूळ कथेत अर्जुन हा व्यासांच्या मंत्रप्रभावाने आकाशमार्गाने लगेचच इंद्रकील पर्वतावर पोहचलेला दाखविला आहे. येथे मात्र कवीने अतिमानुषी प्रभाव त्यजून त्यास व्यासांनी पाठविलेल्या यक्षाद्वारे इंद्रकील पर्वतावर पोहचण्यासाठी दिग्दर्शन केल्याचे दाखविले आहे. हा वृत्तांत महाकाव्याच्या प्रथम तीन सर्गांपर्यत येऊन जातो. त्यानंतर मूळ कथानक खंड घेते आणि सर्ग क्रमांक चार ते बारा पर्यंत अर्जुनाचे विस्तृत असे प्रवासवर्णन आले आहे. अर्जुनाला मंत्रशक्तीने इच्छित स्थळी न पोहचविण्याचे कारण म्हणजे कवीला त्यामुळे प्रवासवर्णनाला संधी प्राप्त झाली आहे. यानंतर पुन्हा बाराव्या सर्गानंतर मूळ कथानकास सुरुवात होते. उर्वरीत कथानकात सुद्धा कवीने बदल केलेले दिसतात, जसे मूळ कथेत अर्जुन पर्वतावर पोहोचताच वृद्ध ब्राह्मणाच्या रूपात इंद्र त्याला तपश्चर्येपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो. मात्र काव्यात इंद्र स्वतः न येता प्रथम अप्सरांना प्रथम त्याला तपाचरणापासून विचलीत करण्यासाठी पाठवितो. येथे पुन्हा कवीला अप्सरांच्या निमित्ताने त्याचे कामशास्त्राचे ज्ञान दर्शविण्याची संधी मिळते. अप्सरा जेव्हा त्यांच्या प्रयत्नांत अयशस्वी होतात तेव्हा इंद्राचे आगमन वृद्ध ब्राह्मणाच्या रूपात काव्यात दाखविले आहे. तसेच मूळ कथेत भगवान शंकर, त्याची पत्नी उमा व काही गण हे सर्व किरातवेषात अर्जुनाकडे येतात तर काव्यात किरातवेषातील भगवान शंकर हा त्याच्या किरात सैन्यासह अर्जुनासमोर उभा ठाकतो. किरातसैन्य हे अर्जुनाच्या पराक्रमाची व शौर्याची पराकाष्ठा दाखविण्याकरिता कवीने येथे आणले आहे. येथे तीन सर्ग कवीने युद्धाच्या वर्णानासाठी खर्ची घातले आहेत. मूळ कथेत अर्जुन शुद्धीत आल्यानंतर शंकराला अर्पण केलेली माळ किराताच्या गळ्यात पाहून किराताचे खरे रूप ओळखतो तर येथे काव्यात युद्धाच्या प्रसंगी किरात आकाशात उंच उडी घेतो, तेव्हा त्यास पकडण्यासाठी जेव्हा अर्जुन सुद्धा उडी मारतो तेव्हा शंकराचे पाय अर्जुनाकडून पकडले जातात आणि भक्ताचे हात पायावर पडल्याने भगवान शंकर आपले खरे रूप दाखवितात. वरील कथा पाहता कवीने हुबेहुब तसेच कथानक न घेता आवश्यकतेनुसार त्यात थोडे कलात्मक बदल व काव्यास आवश्यक अशी वाढ केली आहे.

**४.३.९) किरातार्जुनीयम् : एक महाकाव्य –**

संस्कृत साहित्यात एकीकडे वेगवेगळ्या साहित्यकृती निर्माण होत असताना त्यालाच काही काळानंतर समांतर असे त्यांच्या समीक्षेचे साहित्याशास्त्राचे ग्रंथ निर्माण झाले. यामध्ये आजतागायत उपलब्ध ग्रंथांमध्ये सर्वप्रथम भामहाचा (इ.स. ७ वे शतक) काव्यालंकार, त्यानंतर दंडीचा (इ.स. ८ वे शतक) काव्यादर्श, रुद्रटाचा (इ.स. ९ व्या शतकाचा मध्य) काव्यालंकार, विश्वनाथाचा (इ.स. १५वे शतक) साहित्यदर्पण ह्या ग्रंथामध्ये महाकाव्याच्या लक्षणांचा, वैशिष्ट्यांचा सविस्तर अभ्यास केलेला दिसून येतो. या ग्रंथामध्ये सांगितलेल्या महाकाव्याची लक्षणे या काव्यास तंतोतंत लागू पडतात कारण या काव्याचे आणि या अगोदरच्या काही काव्याचे निरीक्षण करुनच ही लक्षणे तयार करण्यात आली आहे. म्हणजे लक्ष्यावरुन लक्षणे तयार केली गेली आहेत.

संपूर्ण महाकाव्य हे अठरा सर्गांमध्ये विभागलेले असून अर्जुनाला शंकराला प्रसन्न करुन झालेली दिव्यास्त्र प्राप्तीचे हे कथानक भारवीने महाकाव्याच्या विषय-वस्तूसाठी निवडले आहे. महाकाव्याचे नाव हे त्या काव्यातील मुख्य कथानकावर बेतलेले असते. त्यानुसार किरातश्च अर्जुनश्च किरातार्जुनौ, तावाधिकृत्य कृतं काव्यं किरातार्जुनीयम्।असे काव्याचे नामाभिधान केले आहे. कथानकास अनुलक्षून वीर हा काव्याचा प्रमुख रस आहे तर शृंगार हा गौण रस कवीने योजला आहे. या काव्याच्या नायकाबाबत या महाकाव्यावंरील टीकाकारांमध्ये मतभिन्नता दिसते. काहींच्या मते काव्याचा नायक हा अर्जुन आहे कारण त्याचे वर्णन संपूर्ण काव्यात व्यापलेले दिसते. तसेच दिव्यास्त्राची प्राप्ति ही सुद्धा अर्जुनालाच होते. त्यामुळे ज्याला फळाची प्राप्ती होते तो नायक, या सामान्य नियमानुसार महाकाव्याचा नायक हा कुरुकुलोत्पन्न महान् योद्धा, अर्जुन ठरतो. काही टीकाकारांच्या मते काव्याचा नायक हा धर्मराज युधिष्ठिर आहे. कारण दिव्यास्त्र प्राप्तीसाठी युधिष्ठिर अर्जुनाला पाठवितो तसेच दिव्यास्त्रांच्या प्राप्तीने मिळणारे युद्धातील यश हे युधिष्ठिरास राजेपद बहाल करणारे आहे. मात्र महाकाव्याच्या शीर्षकातील अर्जुनाच्या नावाचा ठळक उल्लेख कवीची अर्जुनाला नायकत्व देण्याची मनिषा सुचवितो.

तसेच आपल्या अभीष्ट देवतेप्रती, भगवान शंकराप्रती असणारा कवीचा भक्तिभाव व अनुराग हा शीर्षकातील किराताच्या उल्लेखाने अधोरेखित केला आहे. तसेच भगवान शंकर हे समाधीस्थ किंवा पत्नी पार्वतीसह गृहस्थी न दाखविता त्यांच्या किरातरूपातून त्यांचे शस्त्रधारी आत्तसज्ज योद्धा रूप दाखवून वीररसाचे सूचन केले आहे.

अर्जुन हा धीरोदात्त नायकाच्या गुणांनी युक्त आहे. त्याला त्याच्या ध्येयापासून परावृत्त करण्याचे प्रयत्न अप्सरांकडून व वृद्ध ब्राह्मण वेशातील इंद्राकडून केले गेले असताना सुद्धा तो त्याच्या ध्येयापासून ढळला नाही. युधिष्ठिरास त्याचे न्याय्य राज्याधिकार प्राप्त करुन देण्यासाठी दिव्यास्त्रप्राप्ती हे एक साधन आहे. त्यामुळे पांडवांना राज्यप्राप्ती हे अर्थ प्रयोजन व पुरुषार्थ सुचित करत असल्याने या महाकाव्याने परंपरा संबंधाने चार पुरुषार्थांपैकी अर्थ या पुरुषार्थाची प्राप्ती साधली आहे. मात्र इंद्र आणि अर्जुन यांच्या संवादातून अर्जुन कर्तव्य भावनेतून हे व्रत आचरत असल्याचे सांगत आहे. म्हणजे अर्थापेक्षा त्याने स्वतःच्या कर्तव्याला, जबाबदारीला जास्त महत्त्व दिले आहे. त्यामुळे धर्म या पुरुषार्थाची प्राप्ती हे सुद्धा महाकाव्याचे प्रयोजन दिसून येते.

काव्याचा मुख्य रस वीर असून अप्सरांच्या क्रीडांमधून दिसून येणारा शृंगार रस, अर्जुन व किराताच्या युद्धातून उद्भूत होणारा अद्भूत रस, इत्यादी हे अङ्ग रस आहेत. या महाकाव्यातील सर्वात लहान सर्ग हा ३८ श्लोकांचा असून सर्वात मोठा सर्ग हा ८१ श्लोकांचा आहे. महाकाव्याचा विस्तार हा बाहुल्याने अर्जुनाचा प्रवास, त्यानिमित्ताने शरद ऋतु वर्णन, हिमालय व इंद्रकील या दोन पर्वतांचे वर्णन, नंतर व्रतभंगाकरिता आलेल्या अप्सरांच्या निमित्ताने चंद्रोदय, रात्र, प्रभात यांचे वर्णन, जलक्रीडा, वनविहार, त्यानंतर मृगया, किरातसैन्य, अस्त्रयुद्ध, मल्लयुद्ध इत्यादींच्या वर्णनाने झाला आहे. या वर्णनांवरुन हे कळून येते की कथानक कितीही लहान असले तरी कवी स्वतःच्या प्रतिभेने ते कसे खुलवू शकतो. अशाप्रकारे कथेचा अंश हा प्रसंगवश असून काव्य हे मुख्यत्वे वर्णनप्रधान आहे.

प्रत्येक सर्गाचे त्यातील मुख्य कथानकावरुन नामाभिधान केले आहे, जसे प्रथम सर्गाचे नाव व्यवसायदीपन, द्वितीय सर्गाचे व्यासागमनम्, तृतीय सर्गाचे धनंजयप्रस्थानम् अशी नावे दिसून येतात. प्रत्येक सर्ग हा एकाच वृत्तात लिहिला असून सर्गाच्या शेवटी वृत्तबदल केला आहे. जसे व्यवसायदीपन नामक ४६ श्लोकात्मक प्रथम सर्ग हा वंशस्थ वृत्तात रचला असून त्याच्या शेवटी पुष्पिताग्रा आणि मालिनी ह्या वृत्तांत श्लोकरचना करुन सर्गान्त द्योतित केला आहे. त्याचा वंशस्थ या वृत्ताच्या अत्यधिक वापरामुळे तो त्याचा आवडता छंद दिसून येतो. तसेच वीररसाला पोषक असा हा असल्यामुळे सुद्धा कवीने त्याचा जास्त वापर केला असेल. महाकाव्याच्या नियमांना अनुसरुन सर्ग भारवीने पंधराव्या सर्गात गोमुत्रिकाबन्ध रचना क्रमांक तीनमध्ये विविध वृत्तांत रचना केली आहे. तसेच भारवीने काव्याची सुरुवात काव्याच्या वस्तु-निर्देशाने केली असली तरी प्रथम पद्यात देवीवाचक 'श्री' हे प्रथम पद योजून कवीने आपल्या काव्याचे मंगल सुद्धा साधले आहे. अशाप्रकारे साहित्याचे सर्व साज माफक प्रमाणात योजून भारवीने महाकाव्याचे दंडकच निश्चित केलेले दिसतात.

केवळ या परिभाषित नियमांच्या अनुसरणाने भारवीच्या काव्याला महाकाव्यत्व प्राप्त झाले आहे, असे नाही तर त्यातील विचारांची, कल्पनांची आणि भाषेची उत्तुंगता, भाषेचे सौष्ठव आणि सौंदर्य, कवीची प्रतिभा आणि पांडित्य, उदार चरित्राचे गायन या सर्वांनी काव्याला एक विदग्धता प्राप्त करुन दिली आहे. त्यामुळेच भारवीचे काव्य हे एकाच वेळी पंडीत आणि सामान्य रसिक या दोहोंच्या मनात प्रदीर्घ काळ रुंजी घालताना दिसते. यातच या महाकाव्याची सार्थकता आहे.

**४.३.१०) प्रथम सर्गाची पार्श्वभूमी** –

भारवीने संपूर्ण महाभारत कथेतील निवडक भाग हा त्याच्या महाकाव्याच्या कथानकासाठी वापरला असल्याने मूळ कथेतील कोणत्या बिंदूपासून महाकाव्याच्या कथानकाला सुरुवात झाली आहे, हे कळण्यासाठी त्याची पार्श्वभूमी समजणे अगत्याचे ठरते. महाभारतामध्ये कुरु कुळातील राज्याच्या वाटणीवरुन कुंतीपुत्र पांडव आणि गांधारीपुत्र दुर्योधन आणि त्याचे इतर बांधव यांतील वादाची कथा आहे, हे तर सुपरिचित आहे. या गांधारीपुत्रांना युद्धानंतर कौरव असे संबोधले जाऊ लागले. महाकाव्याचे कथानक वर उद्धृत केल्याप्रमाणे महाभारताच्या तिसऱ्या पर्वातून म्हणजे वनपर्वातून घेतले आहे. महाभारताच्या द्वितीय पर्वात म्हणजे सभापर्वात सांगितलेली कथा ही वनपर्वातील कथेस पार्श्वभूमी ठरते. त्यानुसार सभापर्वात कौरव व पांडव यांच्यात द्युतक्रीडा व त्यात पांडवांचा झालेला पराभव सांगितला आहे. द्यूताच्या

अटीनुसार पराभूत झालेल्यांस बारा वर्षांचा वनवास व एक वर्षाचा अज्ञातवास भोगावा लागणार होता. त्यानुसार असे एकूण मिळून तेरा वर्षे पांडवांना पराभूत झाल्यामुळे सत्तेपासून दूर रहावे लागणार आहे. ते आपले जीवन द्वैतवनात यापित करीत आहेत. मात्र आपले राज्य पुन्हा जिंकून घेण्याची त्यांची दुर्दुम्य इच्छा व युयुत्सु वृत्ती त्यांना शांत बसून देत नाही. त्यामुळे वनात असून सुद्धा युधिष्ठिराने आपण राज्यातून बाहेर गेल्यानंतर दुर्योधन राज्याचे शासन कसे करीत आहे, हे जाणून घेण्याकरिता हेर पाठविला. व तो तेथील दुर्योधनाच्या सुशासनाचे वर्णन युधिष्ठिरास करुन देत आहे.

**४.३.११) चरित्र चित्रण –**

प्रथम सर्गात येणारा वनेचर आणि युधिष्ठिर यांचा संवाद हा या महाकाव्यातील प्रथम संवाद आहे व तो आपल्या अभ्यासक्रमासाठी आहे. वनेचर ज्याच्याविषयी बोलत आहे तो सुयोधन हा या संभाषणाचा विषय आहे. त्या अनुषंगाने बोलणारा वक्ता, वनेचर आणि ज्याच्याविषयी बोलले जात आहे तो सुयोधन यांचा विचार येथे केला आहे.

**११ अ) वनेचर** - प्रजेबाबतची सुयोधन राजाची वृत्ती जाणण्याकरिता युधिष्ठिराने वनेचरास हस्तिनापुरास पाठविले होते. वनेचरास त्याने बह्मचारी वेषात (*स वर्णलिङ्गी वनेचरः*) पाठविल्याचा उल्लेख आला आहे. कौटिल्याने गुप्तहेरांचे अनेक प्रकार आपल्या कौटिलीय अर्थशास्त्रम् या ग्रंथात दिल्याचे आढळते. ज्या वेषाबाबत सामान्य जनांस शंका निर्माण होणार नाही, उलट त्याचा संचार सुकर होईल, असा ब्रह्मचाऱ्याचा वेष त्याने घेतला आहे. यातून समाजात असणारे ब्रह्मचाऱ्याचे स्थान, त्याची निःस्पृह वृत्ति, त्यामुळे त्यास मिळणारा आदर व त्याला विविध नियंत्रित व सुरक्षित ठिकाणी मिळणारा प्रवेश व पोहोच यांचा अभ्यास करुन त्याने तो वेष घेतला आहे. त्यामुळे त्याच्या माहिती गोळा करणाच्या कामात त्याला जास्त प्रत्यवायांस सामोरे जावे लागणार नाही, इतका विचार वनेचराने आपला छद्मीवेष स्वीकारताना घेतला आहे.

हेराच्या वृत्तांताला अपेक्षित असणारे सर्व गुण म्हणजे, असंदिग्धता, नेमकेपणा, सौष्ठव, विनीतव्यवहार इ. हे वनेचराच्या वृत्तांतात होते. राजाच्या भावी क्रियांची बांधणी आणि सिद्धी ही हेरांकडून मिळणाऱ्या माहितीवर अवलंबून असते. त्यामुळे हेरांना राजाचे चक्षु असे म्हटले आहे. त्यामुळे हेरामध्ये व हेराच्या वृत्तांतात सत्यता, निसंदिग्धता, निष्पक्षता, स्वामीनिष्ठा, हितैषीवृत्ती आणि विनयशीलता इत्यादी गुण असणे आवश्यक असते. ते वनचेराच्या आचरणातून आणि वृत्तांत कथनातून प्रतिबिंबित होताना जाणवतात. एकाच वाणीमध्ये हितकारकता आणि माधुर्य असे दोन्ही गुण फार विरळा आढळतात. त्यामुळे माझे बोलणे कटु असले तरी ते आपल्याला हितकारक असल्याने आपण त्याचा मोठ्या मनाने स्वीकार करावा, अशी विनंती वनेचर युधिष्ठिरास करतो. त्याला त्याच्या कर्तव्याची आणि जबाबदारीची पूर्ण जाणीव आहे. आपण राजाचे साक्षात चक्षु आहोत. त्यामुळे आपण जे जे सत्य ऐकले किंवा पाहिले असेल ते अप्रिय असले तरी राजाला न फसविता आणि कटु वाटले तरी सांगितले पाहिजे, याची त्याला जाणीव आहे. तसेच आपण जे काही जाणू शकलो त्यात तो स्वतःचे मोठेपणा न मिरविता हे आपल्यावरील राजाच्या कृपेचे फळ आहे, असे सांगतो. स्वतःचा उत्कर्ष साधणारे सज्जनाशी वैर हे दुर्जनाच्या मैत्रीपेक्षा श्रेष्ठ होय, या वाक्यातून

युधिष्ठिराबरोबर त्याचे शत्रूत्व नसते तर त्यास सुधारण्याची व यश प्राप्त करण्याची संधीच मिळाली नसती असे सुचवून वनेचर आपल्या स्वामींची, युधिष्ठिराची स्तुती सुद्धा करतो.

कवीच्या वाणीप्रमाणे वनेचराची नजर सुद्धा मर्मग्राही आहे. त्यामुळे त्याने त्याच्यावर सोपविलेली कामगिरी चोख पार पाडली आहे. राजाच्या वर्तनाचा राज्याच्या स्वामी, अमात्य, जनपद, दुर्ग, सैन्य, कोश आणि मित्र ह्या सात अंगावर दिसून येणारा परिणाम त्याने न्याहाळला आहे आणि त्याच्या वर्तनातील आमुलाग्र झालेल्या बदलामागील हेतू सुद्धा त्याने ताडला आहे. युधिष्ठिराच्या साध्या नामोच्चाराने सुयोधनाचा पडणारा चेहरा, त्याची भविष्यकालीन भीती सुद्धा त्याच्या नजरेतून चुकलेली नाही. यातून त्याची केवल सूक्ष्म निरीक्षण शक्तीच नव्हे तर लोकव्यवहारातून झालेला मानसशास्त्राचा अभ्यास सुद्धा दिसून येतो. त्याच्या मर्यादा सुद्धा त्याला ज्ञात आहेत. कारण त्याचा वृत्तांत म्हणजे केवळ इतरांच्या वचनांचा केवळ संग्रह मात्र आहे आणि म्हणून सरते शेवटी तो राजास सुयोधनाविरुद्ध योग्य ती प्रत्युत्तरादाखल कार्यवाही करण्यास सांगतो आणि राजाची रजा घेतो. राज्याच्या कारभारात गुप्तचर संस्थेचे महत्त्व अधोरेखित करणारा हा वनेचर-वृत्तांत वनेचराच्या आदबशीर, संयत आणि निष्ठावान वर्तणुकीने तो काव्यातील दुय्यम पात्र असून सुद्धा वाचकांच्या मनात घर करतो, हे निःसंशय.

**११ ब ) सुयोधन** - गांधारी व धृतराष्ट्र यांच्या ज्येष्ठ पुत्रास, दुर्योधनास वनेचराने 'सुयोधन' असे संबोधले आहे. व्यासलिखित महाभारतात सुद्धा दुर्योधनास 'सुयोधन' असे संबोधले आहे. पांडवांना द्युतक्रीडेमध्ये हरविल्यानंतर त्यांना पूर्वनियोजित अटीनुसार बारा वर्षांच्या वनवासात व एक वर्षाच्या अज्ञातवासात पाठविल्याने तो काही काळ शत्रूवरिहीत राज्याचा उपभोग घेता झाला. इकडे वनवास भोगणाऱ्या पांडवांना मात्र त्यांचे क्षात्रतेज शांत बसू देत नव्हते, म्हणून दुर्योधनाच्या राज्यकारभाराबद्दल जाणून घेण्याकरिता युधिष्ठिराने एका वनेचरास हेराच्या स्वरूपात हस्तिनापूरास पाठविले आहे. दुर्योधनाच्या राज्यकाराभाराचा वृत्तांत जाणून तो युधिष्ठिरास कथन करण्यास वनेचर वनात परत आला आहे. अशाप्रकारे वनेचराच्या वृत्तांताचा विषय असणाऱ्या दुर्योधनास आपण त्याच्या शत्रूच्या, युधिष्ठिराच्या हेराच्या नजरेतून पाहत आहोत.

येथे वनेचराने युधिष्ठिरास त्याचा वृत्तांत कथन करताना त्यास जाणीवपूर्वक सुयोधन असे संबोधले आहे. राजाच्या समोर त्याच्याबद्दल सर्वच प्रिय असे बोलतात. परंतु ज्याच्या परोक्ष सुद्धा प्रिय बोलले जाते, तो खरोखर उत्तम आचरणाचा व्यक्ति होय. येथे सुयोधनाच्या परोक्ष त्याच्या शत्रूचा हेर सुद्धा त्याच्या शासनाबद्दल प्रशंसोद्गार काढीत आहे. याचा अर्थ तो व्यक्ति म्हणून तसेच त्याचे प्रशासन हे खरोखर उत्तम दर्जाचे व शास्त्रसंमत स्वरूपाचे आहे, असे म्हटले पाहिजे. महाभारतात पांडवांचा प्रतिनायक रूपाने प्रकटणारा दुर्योधन वनेचराच्या वृत्तांतून एक उत्तम प्रशासक, सक्षम मुत्सुद्दी म्हणून दिसून येतो. मात्र वनेचराच्या चाणाक्ष नजरेतून त्याच्या या उत्तम आचरणामागचा कुटिल हेतू काही लपून राहिला नाही.

युधिष्ठिराचे कपटाने जिंकलेले राज्य तो नीतीने जिंकण्याचा प्रयत्न या सद्वर्तनाने करीत आहे. त्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्वात त्याने सुधारणा व बदल केला आहे. त्याने काम, क्रोधादी षड्रिपूंवरती विजय

मिळविला आहे. दिवस-रात्रीचे योग्य विभाजन करुन वेळेचे सुयोग्य नियोजन केले आहे. अहंकार व दर्प त्यागला आहे. तो सेवकांपासून ते नातेवाईकांपर्यंत सर्वांशी प्रेमाने व ममत्वाने व्यवहार करीत आहे. तो गुणग्राही झाला आहे आणि धर्म, अर्थ व काम या प्रथम तीन पुरुषार्थांचा तो समान बुद्धीने, अनासक्त होऊन योग्य पद्धतीने त्यांचे विभाजन करुन त्यांचा उपभोग घेत आहे. त्याची कृत्ये ही लोभ, क्रोध यांनी नव्हे तर स्वधर्मबुद्धीने प्रेरित झालेली आहेत.

तसेच तो गुणवान व्यक्तीचा यथोचित दानासहित सन्मान, सत्कार करतो. एकूण, लोकांना आत्मसात करण्यासाठी लोकांवर तो विविध पद्धतीने अनुग्रह करीत आहे. दंडनीय व्यक्तीस, मग तो शत्रू असो व स्वतःचा पुत्र यांना दंडीत करतो. तसेच त्याचा न्याय-निवाडा हा अहंकाराने किंवा कोणत्याही लोभाने प्रेरित नाही तर स्वधर्मबुद्धीने व्यवसित झालेला आहे म्हणजेच तो निष्पक्षपातीपणे शासन करीत आहे.

सुयोधन हा दूरदर्शी सुद्धा आहे. त्यामुळेच राज्याची सर्व अंगे त्याच्या कवेत आणि अनुकूल असूनही तो युधिष्ठिराकडून भविष्यकाळात येणाऱ्या संकटाने चिंतित आहे. त्याचे बलाढ्य पांडवांशी शत्रूत्व असल्यामुळे तो साशंकित सुद्धा असतो. परंतु तो त्याचे विश्वासू लोक त्याच्या आजूबाजूस नेमून निःशंक असल्याप्रमाणे दाखवतो. तसेच काम तडीस नेणाऱ्या व्यक्तीचे लगेच धन देऊन कौतुक करतो आणि आपली त्या व्यक्तिप्रति कृतज्ञता सुद्धा व्यक्त करतो. त्याला कोणत्या कार्यात कोणत्या उपायाचे विनियोजन करायचे, याचे पूर्ण ज्ञान आहे. त्या उपायांच्या योग्य वापरामुळे त्याच्या संपत्तीत उत्तरोत्तर वृद्धीच होत आहे. त्याचा वाढता प्रभाव त्याच्या शेजारच्या राष्ट्रांवर पडलेला सुद्धा दिसून येतो. त्याच्या राजवाड्याचे अंगण त्याच्या भेटीस आलेल्या राजांच्या रथ आणि अश्वांनी भरुन गेले आहे. तसेच सामंत राजांनी भेट म्हणून दिलेल्या उत्तम प्रतीच्या गंधहत्तींच्या मदस्रवाने ते पंकील सुद्धा झाले आहे. तो त्याच्या शेजारील राष्ट्रांची गुप्तहेरांद्वारे माहिती घेतो. मात्र त्याची कार्ये ही फलित झाल्यानंतरच कळून येतात. त्याचे राज्य, जे केवळ पर्जन्याच्या पाण्यावर अवलंबून होते, ते त्याने केलेल्या लोकाभिमुख कामांमुळे धान्यांची समृद्धी सुद्धा अनुभवत आहे. त्याची कीर्ती सर्वत्र पसरली आहे. त्याने पृथ्वीला उपद्रवरहित केले आहे. त्यामुळे त्याच्या गुणांवर संतुष्ट झाल्याने पृथ्वी त्यास स्वतःहून आपल्या उदरातील खनिजसंपत्ती देऊ करीत आहे. तसेच त्याचे सैन्य स्वाभिमानी, युद्धभूमीवर प्रतिष्ठा मिळविलेले, धनाने संतृप्त आहे आणि त्यामुळे त्याच्याकरिता युद्धामध्ये स्वतःच्या जीवावर उदार होऊ शकतात. इतर राजे त्याच्या भीतीपोटी नाही तर प्रेमाखातर त्याच्या आज्ञा शिरसा वंद्य मानतात. त्याने राज्यकाराभाराची जबाबदारी आपल्या तरुण भावावर सोपवून तो स्वतः यजन करुन देवतांना प्रसन्न करुन घेत आहे.

अशाप्रकारे प्रजेला आपल्याप्रति अनुकूल करुन घेण्याकरिता सुयोधनाने स्वतःमध्ये योग्य ते बदल करुन राज्यांतर्गत उत्तम प्रशासनाद्वारे प्रजेवर आणि राजकीय नीतींचा सुयोग्य वापर करुन राज्याबाहेर आपल्या सामंत व मित्र राष्ट्रांवर सौहार्दाने योग्य पकड निर्माण केली आहे.

**४.३.१२) वनेचर वृत्तांतातून दिसून येणारे राजकीय विचार -**

महाभारतातील कुरुंचा राज्यप्राप्तीकरिता झालेला कौटुंबिक कलह हा महाकाव्याच्या कथास्रोतासाठी वापरल्याने कवीला आपले राजकीय ज्ञान दाखविण्यासाठी आयतीच संधी प्राप्त झाली आहे. किरातार्जुनीयम् या महाकाव्याचे प्रथम तीन सर्ग हे राजनैतिक विचारांचा उहापोह करणारे आहेत. यात कवीने राजनीतीचे दोन पद्धतीने दर्शन घडविले आहे, त्यापैकी पहिले म्हणजे राज्य मिळालेल्या राजाने आणि दुसरे राज्य गमावलेल्या राजाने वापरलेली नीती येथे दिसून येते. त्याचे दर्शन अनुक्रमे सुयोधनाचे प्रशासन आणि युधिष्ठिराची नीती या दोहोंनी करुन दिले आहे.

**४.३.१२.१) प्रजाकेंद्री शासन -** राजनीतीची चुणूक अगदी पहिल्या श्लोकापासून दिसून येते. राजनैतिक विचार स्पष्टपणे न मांडता त्यांचे सूचक शब्दयोजनेद्वारे ध्वनन केले आहे. राजलक्ष्मीचे पालन करणारी प्रजेबाबतची वृत्ती (*श्रियः पालनीं प्रजासु वृत्तिम्... /*) जाणून घेण्यासाठी असे शब्द प्रथम श्लोकात येतात. त्यामुळे सुयोधन कसा आहे किंवा काय करीत आहे त्यापेक्षा तो राज्य कसा करीत आहे, त्याचे प्रजेबाबतचे धोरण जाणून घेण्यात युधिष्ठिराला जास्त स्वारस्य आहे, हे त्यातून द्योतित होते. तसेच राजाचे राज्यांतर्गत धोरण हे दुसरे -तिसरे काहीही नसून केवळ प्रजाकेंद्रित असणे, हे सुद्धा यातून सूचित केले आहे.

**४.३.१२.२) गुप्तहेरसंस्था -** राजाला संपूर्ण राज्यावर लक्ष ठेवण्याकरिता कौटिल्याने हेरांची (चार) योजना करावयास सांगितली आहे. राजास तर त्याने चारचक्षु म्हणजे हेरच ज्याचे चक्षु आहेत असा राजा असेच म्हटले आहे. (*क्रियासु युक्तैर्नृप, चारचक्षुषो न वञ्चनीयाः प्रभवोऽनुजीविभिः* / १.४) हेर हा वेषांतर करुन अनेक ठिकाणी फिरुन, लोकांशी संवाद साधून प्रजेचे राजाबद्दलचे मत आणि राजाच्या गूढ नीतींचा दृश्य परिणाम पाहतो व तो वृत्तांत आपल्या राजास कथन करतो. येथे सुद्धा युधिष्ठाराने वनात राहणाऱ्या वनेचरास एका ब्रह्मचाऱ्याचा वेष धारण करून पाठविले आहे. (*स वर्णिलिङ्गी विदितः समाययौ युधिष्ठिरं द्वैतवने वनेचरः*/१.१) त्याच्या या धार्मिक रूपामुळे त्यास मिळालेली सर्वत्र सहज पोहोच, आदराची वागणूक व निःसंशयता असे अनेक हेतु एकत्रच साधले आहेत. त्याने सुद्धा इतरांच्या मतांचा संग्रह करून युधिष्ठिरास तो कथन केला आहे.(*परप्रणितानि वचांसि चिन्वतां प्रवृत्तिसाराः खलु मादृशां गिरः* / १.२५) तसेच सुयोधन सुद्धा इतर राजांचे सर्व क्रियाकलाप सद्वर्तनी हेरांकडून जाणून घेतो. (*महीभृतां सच्चरितैश्चरैः क्रियाः स वेद* ... /१.२०) येथे हेराच्या अंगी आवश्यक असणाऱ्या गुणांचे संकीतर्न सुद्धा कवीने केले आहे. जर राजाची सर्व मदार या हेराच्या वृत्तांतांवर बेतणारी असेल तर राजाला मिळणारा वृत्तांत जो ग्रहण करून कथन करतो, तो प्रगल्भ स्वभावाचा व चारित्र्यसंपन्न असणे सुद्धा तितकेच गरजेचे आहे. तसेच तो सत्यवचनी व राजनिष्ठ असणे आवश्यक असल्याचे कवीने वनेचराच्या वचनांतून दाखविले आहे. तसेच महाकाव्याच्या सुरुवातीलाच वनेचराच्या मुखातून सुयोधन वृत्तांत ऐकवून राज्यव्यवस्थेत असणारे हेरसंस्थेचे महत्त्व कवीने अधोरखित केले आहे.

**४.३.१२.३) कल्याणकारी राज्यशासन -** प्राचीन राजनीतिशास्त्रानुसार राज्याची स्वामी, अमात्य, जनपद, दुर्ग, सैन्य, कोश, मित्र ही सात अंगे सांगितली आहेत. त्यापैकी अनेक अंगे ही सुयोधनाला कशी अनुकुल आहेत, हे वनेचराचने आपल्या वृत्तांतातून सांगितले आहे. ती अनुकुल असतील तर ते राज्य प्रभावशाली व

बळकट बनते. जनपद म्हणजे प्रजा हे एक त्यापैकी महत्त्वाचे अंग आहे. राजाच्या राज्यकारभाराचा थेट परिणाम हा प्रजेवर होत असल्यामुळे राजाच्या कारभाराच्या प्रतिक्रिया तात्काळ दृश्य, अदृष्य स्वरूपात प्रजेवर उमटतात. जर प्रजा असंतुष्ट अथवा दुःखी असेल तर काही काळाने राजाविरुद्ध बंड करते. अशी अनेक उदाहरणे आपल्याला इतिहासात दिसतात. त्यामुळे राज्यलक्ष्मीला राज्यांतर्गत सुरक्षित ठेवण्यासाठी प्रजेचे पालन आवश्यक ठरते. त्याकरिता सुयोधनाने कल्याणकारी राज्याची (welfare state) पद्धत अनुसरली आहे. तेथील प्रजेला आता केवळ पर्जन्यावर शेतीकरिता अवलंबून रहावे लागत नाही (*अदेवमातृका कुरवः*) कारण त्याने अनेक कालवे बांधल्यामुळे जणू काही न नांगरताच (*अकृष्टपच्या इव*) धान्याच्या राशी धारण करणारा कुरुप्रदेश शोभून दिसत आहे. त्याने सर्व बाजूने रक्षण करुन राज्याला उपद्रवरहित केले आहे. (*अभिरक्षया प्रशान्तबाधम्*)

**४.३.१२.४) राजा आणि सेवक संबंध -** राजा आणि अमात्य ही राज्याची प्रमुख अंगे आहेत. जर ती परस्परांना अनुकूल असतील, त्यांमध्ये एकोपा असेल तर राज्यलक्ष्मी राजाच्या हातात स्थिर व सुरक्षित राहते, सर्व प्रकारच्या संपदा राजाला प्राप्त होतात. अन्यथा राजाचे आणि राज्याचे नुकसान होते. म्हणून अप्रिय, कटु सत्य असले तरी अमात्यांनी, सेवकांनी ते राजाला सांगणे आणि राजाने मर्मग्राहीपणे ते ऐकणे आवश्यक आहे, हा महत्त्वाचा कांतासम्मित उपदेश भारवी आपल्या काव्याच्या माध्यमाद्वारे वनेचराच्या वृत्तांतातून राजाला करीत आहेत. कौटिल्याने सुद्धा *सहाय्यसाध्यं राजत्वं चक्रमेकं न वर्तते। कुर्वीत सचिवांतस्मातेषां च शृणुयात्मतम्।।* (कौटिलीय अर्थशास्त्र, १.७.९) अर्थात राजेपण मदतनिसांच्या सहाय्यानेच सिद्ध होऊ शकते. गाडीचे एकच चाक कधी फिरु शकत नाही. म्हणून राजाने सचिवांची नेमणूक करावी आणि त्यांचे मत विचारात घ्यावे, असे सांगितले आहे. सुयोधनाच्या वर्तनातून राजा व सेवक यांच्यातील संबंधाचा आदर्श दाखविला आहे. राजाचे संबंध हे सौहार्दाचे असावेत तसेच सेवकांच्या सफल कार्याची शाबासकी त्यांना सत्कार रूपात व दान देऊन करावी, हेही त्याने दाखविले आहे. तो सेवकांशी मित्रांप्रमाणे व्यवहार करीत आहे. त्याची सेवकां प्रति सत्क्रिया ही त्यांच्या गुणांवर आधारीत होती. (*विशेषशालिनी गुणानुरोधेन विना न सत्क्रिया।*). त्याने त्याच्या पराक्रमी सैन्याला धनाने तृप्त केले आहे. (*धनार्चिता धनुर्भृतः*) अशाप्रकारे राजाने त्याच्या सेवकांना दान, सत्कार, धन देऊन मित्रत्वाच्या स्वरूपात वागवावे, आपली त्यांप्रति असणारी कृतज्ञता व्यक्त करावी, ममत्वाने त्यांच्याशी व्यवहार करावा, असे दर्शविले आहे. जेणेकरुन ते जरब आणि धाकाऐवजी प्रेमापोटी ते राजाशी एकनिष्ठ राहतील.

**४.३.१२.५) राजाचे सद्वर्तन -** राजाचा विनय (discipline) हा उत्तम प्रशासनाकरिता अत्यंत आवश्यक आहे. जर राजाची अंगी सद्शीलता आणि शिस्त नसेल तर इतर सर्व राज्याची अंगे समृद्ध असून सुद्धा ती राजाला फलित होणार नाहीत. त्यामुळेच कौटिल्याने अर्थशास्त्रम् या त्याच्या ग्रंथाचे प्रथम अधिकरण राजाच्या विनयावर रचले आहे. राजाने इंद्रियांचा निग्रह करणे आणि त्यासाठी षड् रिपूंचा त्याग करणे कौटिल्याने सुद्धा आवश्यक मानले आहे.[47] राजसिंहावर बसणे म्हणजे सुखोपभोगाचा आस्वाद घेणे नाही, तर समर्थपणे

---

[47] विद्याविनयहेतुरिन्द्रियजयः कामक्रोधलोभमानमदहर्षत्यागात्कार्यः। कौटिलीय अर्थशास्त्र, १.६.१.

अनेक जबाबदाऱ्या पेलणे, सतत दक्ष राहणे येथे अभिप्रेत आहे. यासाठी कौटिल्याने दिवस व रात्र यांचे प्रत्येकी समान आठ प्रहरांमध्ये विभाजन करुन राजाची दिनचर्या सुद्धा सुनिश्चित केली आहे, जेणेकरुन तो राज्याप्रतीच्या सर्व जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडू शकेल. सुयोधनाने सुद्धा त्यानुसार षड् रिपूंवर विजय मिळविला आहे आणि विशेषकरुन अहंकार त्यागला आहे. वेळेचे नियोजन केले आहे. राज्याच्या ज्या तीन शक्ति कौटिल्याने सांगितल्या आहेत, त्यापैकी एक उत्साहशक्ति ही केवळ राजाच्या स्वतःच्या गुणांवर अवलंबून आहे. त्यास अनुसरुन सुयोधनाने सुद्धा आळस सोडला आहे. (*अस्ततंद्रिणा वितन्यते तेन नयेन पौरुष*/ १.९)

**४.३.१२.६) आंतर-राज्य संबंध –** कौटिल्याने अर्थशास्त्रात राज्यांचे परस्परांशी असणारे सहा प्रकारचे आंतर-राज्य संबंधांचे प्रकार नमुद केले आहेत, ते म्हणजे संधि, विग्रह, यान, आसन, द्वैधीभाव, संश्रय होय. भारवीने त्यांचा थेट उल्लेख केला नसला तरी, विद्वषां नयवर्त्म या सहाव्या श्लोकातील शब्दाचे स्पष्टकीरण देताना मल्लिनाथाने त्याचा अर्थ षाड्गुण्य करुन वरील सहा संबंधाचा संदर्भ दिला आहे. त्याचा दृश्य परिणाम वनेचराने योग्यरित्या टिपला आहे. त्याचे राजवाड्याचे अंगण हे सामंत राजांच्या हस्ति, अश्व, रथांनी व्यापून गेले आहे. तसेच त्यांच्या कडून सुयोधनास उंची भेटस्वरूपात अनेक मदोन्मत्त हत्ती प्राप्त झाले आहेत. यावरून सुयोधनाचे इतर राष्ट्रांशी असणारे संबंध आणि त्यामध्ये त्याचे असणारे वर्चस्व अधोरेखित केले आहे. तसेच तो सुचरित्र असणाऱ्या हेरांद्वारे तो इतर राजांच्या कृत्यावंर नजर ठेवून आहे. तसेच प्रत्येक व्यक्तिच्या बाबतीत साम, दान, भेद व दंड यांपैकी योग्य त्या नीतीचे अनुसरण त्याने केले आहे.

**४.३.१२.७) सावधपणा –** युधिष्ठिर आणि सुयोधन यांमध्ये प्रत्यक्ष युद्धभूमीवरील युद्ध येथे दिसून येत नसले तरी युद्धाची मानसिकता आणि त्याला अनुषंगिक तयारी ही दोघांकडून सुरु आहे. दोघेही सावधपणे आपल्या शत्रूवर नजर ठेवून वागत आहेत. राजसिंहावर आरूढ झालेल्या राजास खरे तर सत्ता व सुबत्ता दोन्ही असल्याने यापैकी काहीच नसणाऱ्या युधिष्ठिराकडून भीतीचे काहीच कारण वरकरणी वाटत नाही. मात्र त्याने कपटाने पांडवांचे राज्य बळकाविले आहे, हा विचार त्याच्या मनास सतत त्रासवित असेल. कारण कपटाने जिंकलेल्या राज्यातील प्रजा कपटी राजावर सहज प्रेम आणि निष्ठा दाखवेल, याची खात्री नसते. त्यामुळे त्या प्रजेला प्रेमाने जिंकून घेण्याची मोठी जबाबदारी त्याच्यावर येऊन पडली आहे. ती निभाविण्याकरिता त्याने त्याच्या नीतीत आमुलाग्र बदल केलेला दिसतो.या सावधगिरीतूनच राजमहालात आणि कडेकोट सुरक्षितेत राहणाऱ्या सुयोधनाने आपल्या आजूबाजूस विश्वासू लोकांची नियुक्ती केली आहे. त्यास भयाची साशंकता तर आहे मात्र तो शंकारहित असल्याप्रमाणे दाखवित आहे. (*विधाय रक्षान् परितः परेतरान् अशङ्किताकारम् उपैति शङ्कितः*।) त्याचे संपूर्ण आचरण हेच जणू काही त्याच्या शीतयुद्धातील खेळीचा एक भाग आहे. कपटाने जिंकलेले राज्य नेहमीसाठी आपल्याकडेच राहण्याकरिता ते प्रेमाने आणि नीतीने जिंकण्याचा त्याचा हा एक प्रयास आहे.

इकडे युधिष्ठिर सुद्धा तब्बल तेरा वर्षे वनवासात राज्यापासून दूर घालवायची आहेत म्हणून अजिबात निश्चिंत नाही. वनात असून सुद्धा त्याचे सर्व लक्ष हस्तिनापूराकडेच आहे. म्हणून त्याने सुद्धा आपल्या शत्रूच्या, सुयोधनाच्या हालचालींवर, क्रियाकलापांवर नजर ठेवण्याकरिता वनातील एका

वनेचरालाच हेर म्हणून पाठविले आहे आणि त्याचे वनात शांतपणे काल-यापन करणे ही सुद्धा युधिष्ठिराची एक खेळीच आहे, जेणेकरुन मित्र राष्ट्र युद्धप्रसंगी शब्दाला जागणाऱ्या आणि अटीशर्तीचे पालन करणाऱ्या पांडवांसोबत उभे राहतील.

**४.३.१३) प्रथम सर्गातील निवडक भागाचे रसग्रहण -**

महाकाव्याच्या कथेला महाभारतातील कथेशी सांधणारा उत्तम उपाय म्हणजे वनेचर वृत्तांत होय. हा मूळ महाभारतातील कथेत येत नाही. महाभारतातील कथेच्या सलगतेमुळे द्रौपदीचा राग व भीमाचा त्वेष लगेच समजून येतो. मात्र महाकाव्याच्या बाबतीत प्रथम सर्गापासून तृतीय सर्गापर्यंत येणाऱ्या द्रौपदी, भीम व युधिष्ठिर यांच्या राजकीय चर्चेला कारण काय घडले, कोणत्या घटनेमुळे ते या प्रखर वैचारिक चर्चेला उद्युक्त झाले, हे उमगण्याकरिता व पुढील कथानकाला पार्श्वभूमी देण्याकरिता वनेचरवृत्तांताचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. हा प्रसंग पूर्णतः कवीनिर्मित आहे. दुर्योधनाचे एकूणच वर्तन, त्याचा अंहकारी व सत्ता लोलूप स्वभाव हा सर्वज्ञातच आहे. मात्र पांडव वनात गेल्यापासून त्याने त्याच्या स्वभावात आमुलाग्र बदल केलेला जाणवतो. दुर्योधनाच्या बाबतीत हा बदल मूलतः होणे दुरापास्त असल्याने त्यास नक्कीच राजकीय अंग आहे. ते हेराने अचूक हेरल्याने दुर्योधन हा पुढील राजकीय खेळीच्या दृष्टीकोनातून सद्वर्तनशील झाला आहे आणि त्यामुळे त्याचा व राज्याचा उत्तरोत्तर उत्कर्षच होत आहे आणि आपण मात्र वनामध्ये शांतपणे कंदमुळे खात जीवन यापन करीत आहोत, या विचाराने क्षात्रधर्मास साजेसा असा द्रौपदीचा व भीमाचा अनिवार सात्त्विक संताप त्यांच्या वक्तव्यातून व्यक्त होतो. त्यांच्या वक्तव्याची तीव्रता ही या वनेचर-वृत्तांतामुळे आली आहे. एखादा राजा म्हणजे दुर्योधन हा आपल्या म्हणजे युधिष्ठिराच्या प्रजेशी व इतरांशी सद्वर्तन करीत असल्यास ती खरोखर कौतुकास्पद गोष्ट ठरली असती. मात्र येथे या वर्तनापेक्षा हे वर्तन कोणाचे आहे आणि त्या व्यक्तीची एकूण पार्श्वभूमी याची पुरती जाणीव असल्यामुळे त्याच्या सद्वर्तनाला दुष्ट हेतूंचा दर्प आहे. त्यामुळे या वनेचर-वृत्तांतात येणारे वर्णन हे केवळ वर्णन नसून यास एक राजकीय कंगोरा सुद्धा आहे आणि तो जाणणे आवश्यक आहे.

महाभारतातील साक्षात युद्धा अगोदर येणारे वनपर्व ही जेवढी युद्धा अगोदरची शांतता आहे तेवढीच युद्धाची तयारी सुद्धा आहे. किं बहुना, हे शीत युद्धच आहे. एकूणच, युद्ध जिंकण्याकरिता प्रत्यक्ष युद्धभूमीवर जेवढे शौर्य महत्त्वाचे असते तेवढाच शीतयुद्धात चाणाक्षपणा गरजेचा असतो आणि त्याचेच दर्शन आपल्याला या वृत्तांतातून होते.

मूळकथानकात अशाप्रकारे काहीही कथाभाग आलेला नसताना कवीने तो त्याच्या काव्यात घालण्यामागे निश्चितच काही हेतु असावा. तो म्हणजे भारवीचा काळ हा महाकाव्याच्या इतिहासात पंडिती काव्याचा मानावा लागतो. दरबारी कवींकडून लिहिली गेलेली काव्ये ही केवळ काव्यसेवा न करता आपली काव्ये येण-केन प्रकारे आश्रयदात्या राजाला उपयोगी पडू शकतील काय, याचाही वेध घेत होती. म्हणजे आपली काव्ये राजाला "*उपदेशयुजे...*" करण्याच्या उद्देशाने असे प्रसंग कथानकात कवींकडून गुंफण्यात आले.

वनेचराच्या मुखी घातलेली वचने ही कवीची राजनैतिक विषयांचे ज्ञान दर्शविणारी आहेत. यात राज्यांचे विविध अंगे आणि त्याबाबतची वनेचराची निरीक्षणे येतात. भारवीला तीन राजांचा राजाश्रय मिळाल्यामुळे त्याच्याकडून राजव्यवहार नक्कीच जवळून पाहिला गेला असेल. त्यामुळे भारवी राजनैतिक संकल्पनाशी आणि त्यांच्या उपयोजनाशी हा पूर्णपणे अनभिज्ञ असू शकत नाही.

भारवीची भाषा मर्मग्राही आहे. वनेचराच्या भाषणाकरिता वापरलेली शब्दसामर्थ्य (सौष्ठव), अर्थगर्भ (औदार्य) व निःसंदिग्धता ह्या विशेषणातून तो नकळतपणे आपल्या वाणीची सुद्धा ही वैशिष्ट्ये असल्याचे सुचित करीत आहे. त्याची भाषा सरळ, सोपी आणि प्रवाही आहे, त्यास बोली भाषेची झाक आहे.[48] राजनैतिक वृत्तांत हा निरस वाटू नये, यासाठी अनेक अर्थालांकारांचे साज त्यामध्ये गुंफले आहेत. उपमा, अर्थांतरन्यास, विरोधाभास अशा अनेक समर्पक अलंकारांचा यथोचित वापर करुन विचाराधीन विषय हा लौकिक संदर्भांनी स्पष्ट आणि सुरम्य करण्याचे प्रयोजन कवीने एकाचवेळी साधले आहे. कालिदासाला प्रिय असणाऱ्या क्व-क्व रचनेचा अनुसर[49] त्याने वनेचराची अल्पबुद्धी आणि राजांचे चरित्र यांतील महदंतर दाखविण्याकरिता केला आहे.[50] राजनीतीपर विषयांना उपयुक्त अशा वंशस्थ छंदात[51] रचलेल्या प्रथम सर्गातील काव्याची भाषा प्रसादयुक्त, ओजस्वी आहे. वीर रसाचा परिपोष करणारी आहे. भारवीच्या काव्याचे वैशिष्ट्य असणारी कमी शब्दात जास्त आशय अभिव्यक्त करण्याची क्षमता म्हणजे अर्थगौरवता येथे दिसून येते. त्याच्या वाक्यांमध्ये काव्याच्या संदर्भाशिवाय सुद्धा स्वतंत्ररित्या अर्थ अभिव्यक्तीची क्षमता असल्याने अनेक वाक्ये ही सुभाषित अथवा म्हणीवजा वापरली जाऊ शकतात. जसे, '*न हि प्रियं प्रवक्तुमिच्छन्ति मृषा हितेषिणः।*', '*हितं मनोहारि च दुर्लभं वचः ।*' '*समुन्नयन्भूतिमनार्यसङ्गमाद् वरं विरोधोऽपि समं महात्मभिः।*', '*अहो दुरन्ता बलवद्विरोधिता।*' इत्यादी. तसेच *धनार्चिता धनुर्भृतः*...(१.१९), *निःशेषमशेषितक्रियः* (१.२०), *निधाय दुःशासनमिद्धशासनः* (१.२२), *हव्येन हिरण्यरेतसम्* (१.२२) *वसूनि वाञ्छन्न वशी...*(१.१३), *परितः परेतरान्* (१.१४), *द्वैतवने वनेचरम्* (१.१), *महीं महीभुजे* (१.२), ...*दुर्बोधमबोध*... (१.६), *जेतुं जगतीं* (१.७), *विधीयतां तत्र विधेयमुत्तरम्* (१.२५) अशा पदरचनेने त्याने अनुप्रास अलंकाराचे विविध प्रकार हाताळून पदलालित्य सुद्धा साधले आहे. म्हणजे एकाच वेळी काव्याचे शरीर असणाऱ्या शब्द आणि अर्थ या दोघांचे समान सौंदर्य साधत विषय-वस्तूला पुढे नेण्याची कसब भारवीच्या लेखणीने साधली आहे. त्यामुळे उत्तरोत्तर संस्कृत भाषेच्या समीक्षकांनी आणि कवींनी भारवीला आदर्शवत् मानून अनुक्रमे त्याने घातलेल्या पायंड्याला एक मापदंड मानले आणि त्याचे यथाशक्य अनुकरण केलेले दिसते.

---

[48] स किं सखा साधु न शास्ति योऽधिपं हितान्न यः संश्रृणुते स किम्प्रभुः। किरातार्जुनीयम्, १.५.

[49] (अ) क्व सूर्यप्रभवः वंशः क्व चाल्पविषया मतिः।, रघुवंशम्, १.

(ब) धूमज्योतिःसलिलमरुतां संनिपातः क्व मेघः संदेशार्थाः क्व पटुकरणैः प्राणिभिः प्रापणीयाः। मेघदूत, १.५.

[50] निसर्गनिर्बोधमबोधविक्लवाः क्व भूपतीनां चरितं क्व जन्तवः। किरातार्जुनीयम्, १.६.

[51] षाड्गुण्यप्रगुणा नीतिर्वंशस्थेन विराजते। क्षेमेन्द्र.

**४.४) स्वंय अध्ययनाचे प्रश्न**

१) वनेचराने कोणता वेष धारण केला होता?

१) बह्मचारीचा  २) संन्याशासाचा  ३) कोणताच नाही  ४) सैनिकाचा

२) युधिष्ठिराने कोणाचा वृत्तांत गोळा करण्यासाठी वनेचराला पाठविले होते ?

१) भीष्माचा  २) द्रोणाचार्यांचा  ३) सुयोधनाचा  ४) माता कुंतीचा

३) भारवीच्या काव्याच्या कथावस्तूचा उद्‌गम कोणता आहे ?

१) रामायण  २) महाभारत  ३) लोककथा  ४) पुराण

४) खालीलपैकी कोणते काव्य हे बृहत्त्रयींपैकी नाही ?

१) रघुवंशम्  २) शिशुपालवधम्  ३) किरातार्जुनीयम्  ४) नैषधीयचरितम्

५) वनेचर वृत्तांत घेऊन आला त्यावेळी पांडवांचे वास्तव्य कोठे होते ?

१) इंद्रप्रस्थात  २) हस्तिनापूरात  ३) विराटनगरीत  ४) द्‌वैतवनात

६) सुयोधन  हा त्याच्या मित्रांशी कशाप्रकारे वर्तणुक करीत आहे?

१) मित्राप्रमाणे  २) शत्रूप्रमाणे  ३) बांधवांप्रमाणे  ४) अधिपत्य मिळालेल्या राजाप्रमाणे

७) सुयोधनाने कोणास युवराजपदी नेमले आहे?

१) स्वतःस  २) अभिमन्यूस  ३) दुःशासनास  ४) कोणासही नाही

८) सुयोधनास भविष्यकालीन कोणाचे भय वाटत आहे?

१) मृत्यूचे  २) युधिष्ठिराचे  ३) कोणाचेही नाही  ४) नियतीचे

९) सुयोधन कशापद्‌धतीने राज्य जिंकून घेण्यासाठी प्रयत्नशील आहे?

१) नीतीने  २) पराक्रमाने  ३) छल-कपटाने  ४) सामंजस्याने

१०) किरातार्जुनीयम् या महाकाव्याच्या कथेचे मूळ कोणत्या पर्वात आहे ?

१) सभापर्वात  २) वनपर्वात  ३) कर्णपर्वात  ४) आदिपर्वात

**४.५) पारिभाषिक शब्द, शब्दार्थ**

किरातार्जुनयम् च्या प्रथम सर्गातील वनेचर वृत्तांतात राजनैतिक विषयाची चर्चा असल्याने त्यामध्ये काही प्राचीन राजनैतिक संकल्पनांचा नामोल्लेख आपल्याला आढळतो. त्यांचे विवेचन मुख्य पुस्तकात दिलेले आहे. येथे त्यांचे थोडक्यात स्पष्टीकरण दिले आहे.

**१) चार -** गुप्तहेर. गुप्तहेरांचे राज्यव्यवस्थेतील महत्त्व जाणून त्यांस राजाचे चक्षू असे म्हटले आहे.

**२) नयवर्त्म -** राजनीतीचा मार्ग/पद्धत. राज्यांचे परस्परांशी असणारे सहा प्रकारचे आंतर-राज्य संबंधांचे प्रकार असतात. ते म्हणजे, संधि, विग्रह, यान, आसन, द्वैधीभाव, संश्रय होय. (१) संधी म्हणजे तह करणे, (२) विग्रह म्हणजे युद्ध पुकारणे, (३) आसन म्हणजे जैसे थे परिस्थिती ठेवणे, (ना युद्ध करणे ना तह करणे), (४) यान म्हणजे दुसऱ्या राज्यावर चढाई करणे, (५) संश्रय म्हणजे बलशाली राज्याचा आश्रय घेणे आणि (६) द्वैधीभाव म्हणजे एका राज्याबरोबर युद्ध करणे आणि दुसऱ्या राज्याबरोबर तह करणे होय. याचा अर्थ काहींनी एकाच राज्याशी वरकरणी मैत्रीचे संबंध आणि अंतःस्थ शत्रूत्व असा सांगितला आहे.

**३) षड् रिपू -** काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर यांना षड् रिपू म्हणतात. राजाने इंद्रियाचा निग्रह करण्याकरिता षड्रिपूंचा त्याग केला पाहिजे, असे कौटिल्याने सांगितले आहे.

**४) उपाय -** साम, दान, भेद आणि दंड यांना क्रियेचे उपाय म्हणतात.

**५) त्रिगण –** धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे हिंदु संस्कृतीनुसार मनुष्याची चार ध्येये आहेत. त्यांस पुरुषार्थ असे म्हटले जाते. राज्य करणाऱ्या सुयोधनाच्या बाबतीत येथे मोक्ष हे ध्येय नसल्याने ते सध्या लक्षात घेतलेला नाही. त्यामुळे उर्वरित प्रथम तीन पुरुषार्थांस त्रिगण ही संज्ञा वापरली आहे. त्याच्या ठायी तिन्ही पुरुषार्थांचा जणू मेळ आणि मैत्र दिसून येत होते कारण तो समान बुद्धीने, अनासक्त होऊन योग्यपद्धतीने त्यांचे विभान करुन त्यांचा आस्वाद घेत होता.

**६) देवमातृका –** देव म्हणजे साक्षात पर्जन्य हीच ज्याची जननी आहे, अशी भूमी. म्हणजे धान्योत्पत्तीसाठी केवळ पावसांवर अवलंबून असणारी भूमी. या उलट अदेवमातृका म्हणजे जिरायती जमीन, जेथे नदी, कालवा इत्यादींद्वारे शेतजमिनीला पाणीपुरवठा केला जातो, अशी भूमी.

**४.६) स्वयं अध्ययनाच्या प्रश्नाची उत्तरे**

घटक ३.४ मधील प्रश्नांची उत्तरे येथे दिली आहेत.

(१) १ - बह्मचारीचा (२) ३ - सुयोधनाचा (३) २ - महाभारत

(४) १ - रघुवंशम् (५) ४ – द्वैतवनात (६) ३ - बांधवांप्रमाणे

(७) ३ - दुःशासनास (८) २ - युधिष्ठिराचे (९) १ - नीतीने

(१०) ४ - आदीपर्वात

**४.७) सारांश -** प्रस्तुत घटकामध्ये आपण किरातार्जुनीयम् या महाकाव्याचा सामान्य परिचय करुन घेतला. तसेच त्यातील प्रथम सर्गात येणारा वनेचराचा वृत्तांत जाणून घेतला. त्यातून तत्काली राजकीय नीति-

नियमांची आपणास ओळख झाली. तसेच भारवीकवीच्या काव्यकृतीचा व त्याच्या भाषाशैलीचा परिचय सुद्धा झाला.

**४.८) स्वाध्याय – सरावासाठी प्रश्न**

**अ) विवेचक टीपा लिहा.**

१) किरातार्जुनीयम् मध्ये येणाऱ्या राजनैतिक संकल्पनांचे स्पष्टीकरण करा.

२) राजव्यवस्थेतील हेरसंस्थेचे महत्त्व.

३) हेराचे आवश्यक गुण.

४) सुयोधनाचे चरित्र-चित्रण करा.

५) वनेचराचे चरित्र-चित्रण करा.

**ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) वनेचराचा वृत्तांत सविस्तर विशद करा.

२) भारवीच्या शैलीची वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा.

३) महाकाव्याची लक्षणे किरातार्जुनीयम् या महाकाव्यास कशी लागू होतात, ते सोदाहरण स्पष्ट करा.

४) वनेचर वृत्तांतातून दिसून येणाऱ्या राजकीय संकल्पनांचा विचार करा.

५) संस्कृत महाकाव्यांच्या विकासक्रमात किरातार्जुनीयम् चे स्थान व महत्त्व विशद करा.

६) किरातार्जुनीयम् च्या वनेचरवृत्तांतातून दिसून येणारा भारवीचा अर्थगौरव स्पष्ट करा.

**४.९) क्षेत्रीय कार्य**

**१)** किरातार्जुनीयम् या महाकाव्याचे मूळ स्रोतसाहित्य महाभारत यातील संबंधित कथानक वाचून त्यांचा तौलनिक अभ्यास करा.

२) माघाच्या शिशुपालवधाचा भारवीच्या किरातार्जुनयम् या महाकाव्याशी तौलनिक अभ्यास करा.

**४.१०) अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ**

**(अ) प्राथमिक संदर्भग्रंथ -**

१) *किरातार्जुनीयम्,* प्रथम तीन सर्ग (इंग्रजी), काळे, मो. रा., मोतीलाल बनरसीदास, दिल्ली, १९६६.

२) *किरातार्जुनीयम्,* प्रथम सर्ग (हिंदी), सिंह अमलधारी, भारतीय विद्या प्रकाशन, दिल्ली, द्वितीय आवृत्ती, १९८२

३) *किरातार्जुनीयम्,* प्रथम सर्ग (हिंदी) पाण्डेय जनार्दन, मोतीलाल बनरसीदास, दिल्ली, तिसरी आवृत्ती, १९८४.

४) *किरातार्जुनीयम् महाकाव्यम्,* प्रथम सर्ग (हिंदी) दुबे रामसेवक, शारदा पुस्तक भवन, अलाहाबाद, तिसरी आवृत्ती, २०१०.

५) *किरातार्जुनीयम्,* (मराठी) पर्वते अंजली, प्रसाद प्रकाशन, पुणे, २०१२.

**(ब) दुय्यम संदर्भग्रथ -**


१) उपाध्याय, बलदेव, *संस्कृत सुकवि समीक्षा*, चौखम्बा विद्‌याभवन, वाराणसी, तृतीय आवृत्ती, १९८७.

२) महाजन, सुरेश, *किरातार्जुनीयम्*, अलंकार प्रकाशन, सांगली, २००४.

३) रस्तोगी, उमेश *प्रसाद भारवि काव्य में अर्थान्तरन्यास*, चौखम्बा प्रकाशन, वाराणसी, १९६५.

४) वाटवे, केशव नारायण, *संस्कृत काव्याचे पंचप्राण,* मनोहर ग्रंथमाला, पुणे, १९७०.

५) शर्मा उमाशंकर, संस्कृत साहित्य का इतिहास, चौखम्बा भारती अकादमी, वाराणसी, २००८.

६) हर शक्तिपद, *Bhāravīand Kirātarjuniyam*, (इंग्रजी), संस्कृत पुस्तक भांडार, कोलकाता, १९८३.

Estd. 1962
A +++ Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० शैक्षणिक वर्ष -२०२४-२५ पासून

शिवाजी विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त अभ्यासक्रमानुसार

**दूरशिक्षण केंद्र**

बी .ए –एक : संस्कृत (DSC)

# संस्कृत दृश्यकाव्याचा परिचय

Course Number: 02

Sem– II (सत्र -२) Course Code: BAU0325DSL205B02

**स्वयं अध्ययन साहित्य**

**२०२४**

## अभ्यास-घटकांचे लेखक

## संस्कृत दृश्यकाव्याचा परिचय

| घटक क्र. | घटक नाव | लेखक |
|---|---|---|
| १ | नाटकाचा उद्गम व विकास | प्रा. रुपाली रघुनाथ वाडेकर<br>विलिंग्डन महाविद्यालय, सांगली. |
| २ | नाट्यशास्त्रीय संज्ञा- नायक, नायिका, नांदी, सूत्रधार, पताकास्थान, प्रस्तावना | डॉ .कावेरी नारायणराव जाधव<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे |
| ३ | उत्तररामचरितम् (अंक पहिला- सूक्ष्मअध्ययन) | डॉ .कावेरी नारायणराव जाधव<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे |
| ४ | उत्तररामचरितम् (अंक दुसरा व तिसरा – स्थूल-अध्ययन) | प्रा.(डॉ.) श्रीमती मृणालिनी आबासाहेब शिंदे<br>वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड |

**संपादक**


**डॉ. कावेरी नारायणराव जाधव**
**सहाय्यक प्राध्यापक,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे**

**प्रा. (डॉ.) श्रीमती मृणालिनी आबासाहेब शिंदे**
**अध्यक्ष, सं. अ. मं. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**
**संस्कृत विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड**

**प्रस्तावना**

सहृदय, विद्यार्थी बंधुभगिनींनो,

आपण शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर दूरशिक्षण केंद्राचे विद्यार्थी आहात. त्याबद्दल आपले मन:पूर्वक हार्दिक स्वागत ! संस्कृत विषयाचे अध्ययन करण्यास आपण प्रवृत्त झालात. त्याबद्दल आपले हार्दिक अभिनंदन !

प्रतिवर्षप्रमाणे याही वर्षी बी. ए. भाग-१ च्या संस्कृत (DSC) सत्र -१, पेपर नं. १, (संस्कृत महाकाव्यांचा परिचय) व सत्र -२, पेपर नं. २, (संस्कृत दृश्यकाव्याचा परिचय)चे स्वयं अध्ययन साहित्य आपणास बहाल करीत असताना संपादक मंडळाला व घटक लेखकांना मनस्वी आनंद होत आहे. प्रतिवर्षप्रमाणे याही वर्षी स्वयं अध्ययन साहित्याचा उपयोग करून आपण संस्कृत विषयाच्या अध्ययनाचा आनंद प्राप्त कराल, असा पूर्ण विश्वास वाटतो. तसेच पुढील वर्षीही Mejor संस्कृत हा विषय निवडाल, अशीही खात्री वाटते. आपली संस्कृत विषयातील जिज्ञासा, आवड वृद्धिंगत होवो आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० चे ध्येय सफलतेप्रत जावो, हीच सदिच्छा!

अध्ययन करताना काही समस्या, अडचणी आल्यास आपण ह्या स्वयं अध्ययन साहित्य निर्मिती संपादक मंडळाशी किंवा घटक लेखकांशी आनंदाने संपर्क साधावा.

**प्रा. (डॉ.) श्रीमती मृणालिनी आबासाहेब शिंदे**
**अध्यक्ष, सं. अ. मं. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**
**संस्कृत विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड**

## अनुक्रमणिका

## संस्कृत दृश्यकाव्याचा परिचय


| घटक क्र. | घटक नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | नाटकाचा उद्गम व विकास | १ ते ८ |
| २ | नाट्यशास्त्रीय संज्ञा- नायक, नायिका, नांदी, सूत्रधार, पताकास्थान, प्रस्तावना | ९ ते २९ |
| ३ | उत्तररामचरितम् (अंक पहिला- सूक्ष्मअध्ययन) | ३० ते ६० |
| ४ | उत्तररामचरितम् (अंक दुसरा व तिसरा – स्थूल-अध्ययन) | ६१ ते ११० |

## घटक क्रमांक - ०१

**नाटकाचा उदगम व**

**१.१ उद्दिष्टे**

**१.२ प्रस्तावना**

**१.३ विषय विवेचन**

**१.३ .१ नाट्यवेदाच्या निर्मितीची कथा**

**१.३.२ नाट्यवेदाच्या प्रायोगिक अंगांची योजना**

**१.३.३ इंद्रध्वज महोत्सवप्रसंगी पहिला नाट्यप्रयोग**

**१.३.४ नाट्यगृहाची निर्मिती**

**१.३.५ ब्रह्मदेवाकडून विघ्नकर्त्यांचे उद्बोधन**

**१.३.६ ब्रह्माद्वारे नाट्यस्वरूपाचे विवरण**

**१.३.७ नाट्याचा विकास**

**१.४ स्वयं अध्ययनाचे प्रश्न**

**१.५ स्वयं अध्ययनाच्या प्रश्नांची उत्तरे**

**१.६ स्वाध्याय**

**१.७ क्षेत्रीय कार्य**

**१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके**

**१. १) उद्दिष्टे:**

१) नाट्यवेदाच्या निर्मितीची गरज व महत्त्व माहिती करून देणे.

२) प्राचीन भारतीय नाट्यशास्त्राची ओळख करून देणे.

३) भारतीय नाट्यपरंपरेतील नाट्यनिर्मितीची कथा माहिती करून देणे

४) प्राचीन नाट्यगृह निर्मितीची माहिती करून देणे.

**१.२) प्रस्तावना :**

संस्कृत नाट्यशास्त्राच्या अध्ययनासाठी भरतमुनींचे नाट्यशास्त्र हे प्रमाण मानले जाते. यातील प्रथम अध्यायात भरतमुनी नाट्यशास्त्राची निर्मिती कशी झाली ते आपल्या पुत्रांना आणि आत्रेयादी मुनीगणांना सांगतात. नाट्याला संस्कृतमध्ये पाचवा वेद म्हंटले आहे. ऋग्वेदादी चार वेदांमध्ये स्त्रिया आणि शूद्र यांना अधिकार नाही. पण, नाट्यामध्ये असा भेदभाव नाही. समाजातील प्रत्येक स्तरातील व्यक्तीला नाट्यामध्ये प्रवृत्त होता येते. नाट्य हे दृश्यकाव्य आहे. त्यामुळे ते मनोरंजक आणि प्रबोधक असे दोन्ही परिणाम साधणारे आहे. जे ज्ञान अनेक कष्टांनी साध्य होऊ शकते ते नाटकाच्या माध्यमातून अल्पावधीत झटकन होऊ शकते. ज्यांना शास्त्रार्थांचे अध्ययन शक्य होत नाही त्यांना नाट्यातून ज्ञानाचे मर्म सुबोधतेने कळून येते. जटील असे तत्त्वज्ञान रसभावपूर्ण अभिनयातून सहज आत्मसात होते म्हणून नाटक हा पाचवा वेद म्हंटला जातो. या नाट्यवेदाची निर्मिती ही ऋग्वेदातून संहिता (पाठ्य), सामवेदातून संगीत, यजुर्वेदातून अभिनय आणि अथर्ववेदातून रस घेऊन केली गेली आहे. या नाट्यवेदाची निर्मिती ब्रह्मदेवाने केली असे स्वयं भरतमुनी आपल्या नाट्यशास्त्राच्या प्रारंभी सांगतात. एका अनध्यायदिनी भरतमुनी आपल्या पुत्रांना ब्रह्मदेवाकडून नाट्यवेदाची निर्मिती कशी झाली याची कथा सांगतात.

### १.३ विषयविवेचन:-

### १. ३.१) नाट्यवेदाच्या निर्मितीची कथा :

पूर्वी स्वायम्भुव मनूच्या मन्वंतरात कृतयुग उलटून गेले असता आणि वैवस्वत मनूचे त्रेतायुग सुरु झाले असता लोक जप-तप-उपासनादी सोडून लोभ, क्रोध, ईर्ष्या इत्यादी ग्राम्य धर्मांमध्ये प्रवृत्त होऊ लागले तेव्हा ते स्वकर्मानुसार प्राप्त सुख-दुःखादी भावनांमध्ये व्यस्त होऊ लागले आणि ज्ञानापासून विन्मुख होऊ लगले. तेव्हा लोकांच्या नियमनासाठी देव, दानव, गंधर्व, यक्ष, राक्षस सर्पाधिपतींना तसेच लोकपालांना नियुक्त केले गेले. त्यावेळी ज्ञानमार्गापासून विचलित झालेल्या लोकांना आत्मबोध व्हावा आणि बऱ्या वाईटाची ओळख व्हावी म्हणून महेंद्रादी देवतागण पितामह ब्रह्मदेवाकडे गेले आणि त्यांनी लोकांना पाहण्या-ऐकण्यायोग्य असे मनोरंजनाचे एक साधन निर्माण करण्याची याचना ब्रह्मदेवाकडे केली.

वेद हे सामान्य जनांसाठी अनाकलनीय आहेत. त्याशिवाय विधि-निषेधात्मक स्वरूपामुळे शूद्रांना तेथे प्रवेश नाही. म्हणून सर्वांना कळून येईल असा पाचवा वेद निर्माण करण्याची आवश्यकता आहे हे जाणून ब्रह्मदेव एकांतात समाधिस्थ झाले व त्यांनी चार वेदांचे स्मरण केले. त्यांनी संकल्प केला की धर्म, पुरुषार्थ, यश, उपदेश, संग्रह, लोकांना भविष्यातील सर्व कर्मफल दाखविणारे सर्व शास्त्रसंपन्न, सर्व शिल्पप्रवर्तक अशा नाट्य नावाच्या पाचव्या वेदाचा मी इतिहाससहित निर्माण करीन. अशा संकल्पाने ब्रह्मदेवाकडून चारवेदांच्या अंगांतून नाट्यवेदाची निर्मिती झाली. ऋग्वेदातून पाठ्य, यजुर्वेदातून अभिनय, सामवेदातून संगीत आणि अथर्ववेदातून रस घेऊन ब्रह्मदेवाने नाट्यवेदाची निर्मिती केली. नाट्यवेदनिर्मिती नंतर सर्वप्रथम हा वेद ब्रह्मदेवाने देवाधिपती इंद्राला देऊ केला आणि देवतांकडून त्याचा प्रयोग घडवून आणायला सांगितला. पण, इंद्राने नाट्यवेदाच्या ग्रहण, धारण, ज्ञान आणि प्रयोगाच्या बाबतीत देवगणांची असमर्थता दाखविली. तेव्हा ब्रह्मदेवाने हा नाट्यवेद शतपुत्र असलेल्या भरतमुनींना दिला आणि आपल्या पुत्रांना हा नाट्यवेद शिकवून त्यांच्याकडून प्रयोग करवून घ्यायला आज्ञापित केले.

**१. ३.२) नाट्यवेदाच्या प्रायोगिक अंगांची योजना:**

ब्रह्मदेवांकडून प्राप्त झालेल्या नाट्यवेदाचे सूक्ष्म अध्ययन करून आणि आपल्या पुत्रांची निरनिराळ्या भूमिकांमध्ये यथायोग्य नियुक्ती करून भरतमुनींनी आपल्या पुत्रांकरवी प्रयोग करवून घेतला. यामध्ये त्यांनी भारती, सात्वती आणि आरभटी या वृत्तीच्या आश्रयाने ब्रह्मदेवासमोर प्रयोग सादर केला. तेव्हा ब्रह्मदेवाने कैशिकी वृत्तीचा वापर करण्यास सुचविले. पण, स्त्री पात्रांशिवाय आणि नृत्य अंगहारांशिवाय कैशिकी वृत्तीमध्ये प्रयोग होऊ शकत नाही म्हणून ब्रह्मदेवाने स्त्रीपात्र प्रयोगासाठी अप्सरांना योजिले आणि गीत-संगीतासाठी स्वातीमुनी, नारद आणि गंधर्वांना नियुक्त केले.

**१. ३.३) इंद्रध्वज महोत्सवप्रसंगी पहिला नाट्यप्रयोग:**

नाट्यकोविद भरतांनी अशाप्रकारे देव आणि दैत्य यांच्यातील युद्ध व देवांचा दैत्यांवर विजय या कथानकाचा नाट्यप्रयोग सिद्ध केल्यानंतर ब्रह्मदेवांनी त्यांना इंद्रध्वज

महोत्सवामध्ये या नाट्याचा प्रयोग सादर करण्यास सांगितले. या प्रयोगाच्या सुरवातीला मंगलकारक अशी नांदी भरतमुनींनी रचली. या प्रयोगाने संतुष्ट झालेल्या देवांना भरतपुत्रांना निरनिराळी उपकरणे पारितोषिक स्वरूपात दिलीत. जसे इंद्राने ध्वज दिला. ब्रह्मदेवाने कुटिलक (वेडावाकडा दण्डकाष्ठ), वरुणाने झारी, सूर्याने छत्र, शिवाने सिद्धी, वायुने पंखा, विष्णूने सिंहासन, कुबेराने मुकुट, देवी सरस्वतीने प्रेक्षणीय नाट्याला ऐकण्याचे सामर्थ्य प्रदाने केले. तसेच अन्य देवता, गंधर्व, यक्ष, राक्षस, पन्नग यांनी सुद्धा अत्यंत प्रसन्न होऊन स्व-अंशातून उत्पन्न होणाऱ्या विभिन्न जाती आणि गुणयुक्त रस, रूप, बल तसेच क्रिया आणि तदनुरूप अनेक अलंकार भरतपुत्रांना दिले.

परंतु आपल्या पराजयाची कथा नाटकामधून मांडल्याने क्रोध अनावर होऊन असुर तेथून बाहेर पडले व मायेच्या आश्रयाने नाट्यप्रयोगात निरनिराळी विघ्ने निर्माण करू लागले. त्यांच्या प्रभावाने नटांची स्मृती, वाणी आणि अभिनयपूरक हालचाल अडखळू लागली. या नाट्यप्रयोगातील अडथळ्यांना पाहून देवराज इंद्राने ध्यानयोगाने जाणले की असुरांनी सर्व बाजूंनी नाट्यप्रयोगाला विघ्नांनी घेरले आहे. तेव्हा इंद्राने क्रुद्ध होऊन त्या दिव्य ध्वजाला हातात घेतले आणि त्या ध्वजाच्या मदतीने रंगमंचावरील सर्व विघ्नांना जर्जरित करून सोडले. अशाप्रकारे त्या ध्वजाचेच नाव जर्जर असे सिद्ध झाले. या ध्वजाला निव्वळ पाहण्याने सर्व विघ्ने स्थानीच जर्जर होतील, नाश पावतील असा सर्व देवांनी आशीर्वाद दिला. विघ्नांचा प्रभाव पाहता भरतमुनींनी ब्रह्मदेवाकडे अधिक सुरक्षेसाठी याचना केली.

**१. ३.४) नाट्यगृहाची निर्मिती:**

नाट्यप्रयोगाच्या सुरक्षित प्रस्तूतीसाठी ब्रह्मदेवाने विश्वकर्माला नाट्यगृहाची निर्मिती करायला सांगितले. विलंब न करता विश्वकर्माने शीघ्र नाट्यगृह बनविले; ज्याला पाहून ब्रह्माने सर्व देवतांना आपापल्या अंशांनी नाट्यगृहाची रक्षा करण्याचा आदेश दिला.

मुख्यतः नाट्यमंडपाच्या रक्षेसाठी चंद्राची नियुक्ती केली. चारी दिशांना सुरक्षेची जबाबदारी त्या दिशांच्या लोकपालांना दिली आणि उपदिशांना मरुद्गण नेमले. नेपथ्यभूमीची रक्षा मित्राने आणि आकाशप्रदेशाची रक्षा वरुणाने करावी असे ठरले. रंगमंचाच्या रक्षेसाठी अग्नी आणि वाद्यांच्या रक्षेसाठी सर्व देवतांना नियुक्त केले. स्तंभांच्या ठिकाणी चारी वर्ण आणि स्तंभांच्या मध्यवर्ती भागात आदित्य आणि रुद्रगण स्थापित केले. धारणीच्या रक्षेसाठी भूतगण आणि वरच्या मजल्याच्या बैठकीच्या रक्षेस्तव अप्सरांची नियुक्ती केली. उर्वरित सर्व स्थानांच्या रक्षेसाठी यक्षिणी आणि पृथ्वीतलाच्या रक्षेसाठी समुद्राची योजना केली. नाट्यशाळेच्या द्वारांशी कृतांत काळाची आणि द्वारांच्या पाठीमागे दोन सर्पाधिपती अनंत आणि वासुकी यांची नेमणूक केली. उंबरठ्याशी यमदंड नेमून त्याच्यावरती शूल स्थापित केला. नियती आणि मृत्यू या दोन देवतांना द्वारपाल म्हणून नेमले. रंगमंच्याच्या पार्श्वभागी रक्षार्थ स्वतः इंद्र विराजमान झाला. मत्तवारणीच्या ठिकाणी विद्युतदेवतेला नेमले आणि मत्तवारणीच्या चारी स्तंभांमध्ये महाबलशाली भूत, यक्ष, पिशाच आणि गुह्यकांची स्थापना केली. जर्जरध्वजामध्ये दैत्यनाशक वज्राची स्थापना केली आणि त्याच्या पेरांमध्ये अपरिमित शक्तीसंपन्न देवगण नियुक्त झाले. पहिल्या पेरात शीर्षस्थानी ब्रह्मा, दुसऱ्या पेरात शिव, तिसऱ्या पेरात विष्णू, चौथ्या पेरात स्कंद आणि पाचव्या पेरात शेष, वासुकी आणि तक्षक या नागांनी निवास केला. रंगमंचाच्या मध्यभागी स्वयं ब्रह्मदेव विराजमान आहेत म्हणून रंगमंच्याच्या मध्यभागी फुले वाहतात. पाताळवासी यक्ष, गुह्यक, पन्नग यांना रंगमंच्याच्या अधोभागी रक्षणाची जबाबदारी दिली. नायकाची रक्षा इंद्र करतो. नायिकेची रक्षा सरस्वती करते. विदूषकाची रक्षा ओंकार आणि शेष पात्रांची रक्षा शिव करतात. अशाप्रकारे सर्व बाजूंनी सुरक्षित अशा नाट्यगृहाची रचना पूर्ण झाली.

**१. ३.५) ब्रह्मदेवाकडून विघ्नकर्त्यांचे उद्बोधन:**

नाट्यगृहात आपापले स्थान ग्रहण केल्यानंतर सर्व देवतागणाने ब्रह्मदेवांना विनंती केली की आपल्या द्वारे विघ्ननिवारणार्थ प्रथम साम, नंतर दान, तदनंतर भेद आणि सर्वात शेवटी दंडाचा प्रयोग व्हावा. तदनुसार ब्रह्मदेवांनी विघ्नाना त्यांच्या उत्पाताचे कारण

विचारले. तेव्हा विघ्नांसह दैत्यांमधील विरुपाक्ष म्हणाला की, 'देवांच्या इच्छेने हा जो नाट्यवेद आपण निर्माण केला आहे त्यात देवांची प्रशस्ती आणि दैत्यांचा निरादर केला गेला आहे. देव-दैत्य दोन्ही ब्रह्मदेवांचेच पुत्र असताना असा भेदभाव करणे उचित नाही.' विघ्नांचे हे वचन ऐकून ब्रह्मदेव त्यांना उद्देशून म्हणाले की, ' माझ्याकडून हा जो नाट्यवेद निर्माण झाला आहे तो देव आणि दैत्य यांच्या शुभ आणि अशुभ कर्मांना दर्शविणारा आणि कर्म आणि भाव यांचा अन्वय सांगणारा असा आहे.'

**१. ३.६) ब्रह्माद्वारे नाट्यस्वरूपाचे विवरण:**

या नाट्यवेदात केवळ देव किंवा दैत्यांचे अनुभावन नाही. तर, संपूर्ण त्रैलोक्यातील सर्व भावांचे प्रस्तुतीकरण आहे. धर्म, क्रीडा, अर्थ, शम, हास्य, युद्ध, काम, वध इत्यादी सर्व या नाटकात दाखविले आहे. धर्मपरायण लोकांचा धर्म, कामोपसेवींचा काम, दुर्विनीतांचा निग्रह, मत्तांचे दमन, भित्र्यांमध्ये धैर्य आणि शूरांमध्ये उत्साह तसेच अबोधांमध्ये बोध, विद्वानांमध्ये विद्वत्ता, ईश्वरांचा विलास, दुःख पीडितांमध्ये स्थैर्य, अर्थोपजीविंचा अर्थ आणि उद्विग्नमानसांना धीरता प्रदान करणारा हा नाट्यवेद आहे.

नाना भावांनी संपन्न, नाना अवस्थान्तरांनी युक्त, लोकवृत्ताचे अनुकरण सांगणारा असा हा नाट्यवेद आहे. उत्तम-अधम-मध्यम वृत्तीच्या लोकांच्या कर्माचा आधार, हितोपदेश करणारा, धृती, क्रीडा आणि सुख देणारा, यातील रस, भाव, सर्व कर्म-क्रिया द्वारे सर्वांना उपदेश करणारा असा हा नाट्यवेद आहे. दुःखार्त, श्रमार्त, शोकार्त, तपस्वी यांना वेळप्रसंगी विश्रांती देणारे आहे. धर्म, यश, आयुष्य, हित आणि बुद्धी वाढविणारे लोकोपदेश करणारे असे हे नाट्य ठरेल. जे नाटकात पाहायला मिळणार नाही असे ज्ञान, शिल्प, विद्या, कला, योग किंवा कर्म नाही. सर्व शास्त्र, शिल्प, विविध कर्म या नाट्यात सामावलेली आहेत म्हणून हे नाट्य ब्रह्माने निर्माण केले.

**१. ३.७) नाट्याचा विकास:**

संस्कृतमध्ये नाट्यवेदाची उत्पत्ती ही अलौकिक आहे. पण, नाट्यनिर्मितीचे कारण हे लोकोपदेश, कर्माकर्माविषयी सामान्यजनांचे प्रबोधन असेच आहे. त्यामुळे नाट्य हे प्रबोधनपर मनोरंजनाचे प्रभावी साधन ठरले. त्यामुळे नाटकाला लोकजीवनात सहज स्थान व मान मिळाला. भरतमुनींनी आपल्या नाट्यशास्त्रात नाट्यप्रस्तुतीकरणाविषयीचे सामान्य नियम निर्धारित करून दिले. पण, काही विशेष अपवादात्मक प्रयोगांमुळे त्याचे प्रकार पडत गेले. त्यातून दशरूपकांचा विकास झाला. नाटक, प्रकरण, भाण, प्रहसन, डिम, व्यायोग, समवकार, वीथी, अंक, ईहामृग अशी दहा रूपके विकसित झालीत. त्यापैकी नाटक हे पताकास्थानकांनी युक्त दहा अंकांचे. प्रकरणात लौकिक पण, कविकल्पित कथानक. भाण प्रकारात धूर्तचरित. एकांक प्रकारात एकच अंक. व्यायोगामध्ये प्रख्यात इतिवृत्त आणि स्वल्प स्त्रीपात्र. समवकार रूपकात देवासुरांचे प्रसिद्ध इतिवृत्त. डिम रूपकात मायेन्द्रजाल प्रयोग. ईहामृगामध्ये मिश्रवृत्त आणि चार अंक, वीथीमध्ये आकाशभाषितांचा प्रयोग. प्रहसनामध्ये कविकल्पित निंद्यचरितपर कथानक. पुढे या दशरुपकांचा विस्तार होत कालौघात अनेक उपरूपके निर्माण झालीत. त्यापैकी काही नाटिका, त्रोटक, गोष्ठी, सट्टक, नाट्यरासक, प्रस्थानक, उल्लाप्य, काव्य, प्रेङखण, रासक, संलापक, श्रीगदित, शिल्पक, विलासिका, दुर्मल्लिका, प्रकरणिका, हल्लीश आणि भाणिका अशी आहेत. आधुनिक काळात इतर भाषांमध्ये रंगभूमीवर जशी प्रयोगशील नाटके सादर होतात; त्याप्रमाणे आधुनिकतेला स्वीकारत संस्कृत नाटकांमध्ये देखील नवनवीन प्रयोग होऊ लागले. सामाजिक, प्रबोधनपर, कालसुसंगत असे नवे प्रयोग विसाव्या शतकात संस्कृत रंगभूमीवर पाहायला मिळू लागले.

**१. ४) स्वयम् अध्ययनाचे प्रश्न :**

प्रश्न १) योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.

१) संस्कृत नाट्यशास्त्राच्या अध्ययनासाठीचा प्रमाणग्रंथ कोणता?

अ) भरतमुनींचे नाट्यशास्त्र ब) काव्यादर्श क) ध्वन्यालोक ड) साहित्यदर्पण

२) संस्कृतमध्ये पाचवा वेद कुणाला म्हंटले आहे?

अ) महाभारताला ब) आयुर्वेदाला क) नाट्याला ड) रामायणाला

३) नाट्यवेदाच्या निर्मितीमध्ये ऋग्वेदातून काय घेतले?

अ) संहिता ब) संगीत क) अभिनय ड) रस

४) नाट्यवेदाच्या निर्मितीमध्ये यजुर्वेदातून काय घेतले?

अ) संगीत ब) रस क) अभिनय ड) पाठ्य

५) नाट्यवेदाच्या निर्मितीमध्ये सामवेदातून काय घेतले?

अ) अभिनय क) संहिता क) रस ड) संगीत

६) नाट्यवेदाच्या निर्मितीमध्ये अथर्ववेदातून काय घेतले?

अ) रस ब) अभिनय क) संगीत ड) संहिता

७) नाट्यवेदाची निर्मिती कुणी केली ?

अ) ब्रह्मा ब) विष्णू क) महेश ड) इंद्र

८) लोकांच्या आत्मबोधपर मनोरंजनासाठी दृक्श्राव्य साधनाची मागणी ब्रह्मदेवाकडे कोणी केली ?

अ) शिवाने ब) विष्णूने क) इंद्राने ड) मनूने

९) ब्रह्मदेवाने नाट्यवेद निर्माण करून सर्वप्रथम तो कोणाला देऊ केला ?

अ) इन्द्राला ब) भरताला क) शिवाला ड) दैत्यांना

१०) ब्रह्माने नाट्यवेदाच्या प्रयोगासाठी तो कुणाला दिला ?

अ) भरताला ब) विरुपाक्षाला क) महेंद्राला ड) नटराजाला

**१. ५) स्वयं अध्ययनाच्या प्रश्नांची उत्तरे**

**प्रश्न १) योग्य पर्याय**

१) अ) भरतमुनींचे नाट्यशास्त्र २) क) नाट्याला ३) अ) संहिता

४) क) अभिनय ५) ड) संगीत ६) अ) रस

७) अ) ब्रह्मा ८) क) इंद्राने ९) अ) इन्द्राला

१०) अ) भरताला

**१. ६) स्वाध्याय :**

**१. ६.१) बहुपर्यायी प्रश्न:**

१) ब्रह्मदेवाने भरतमुनींना नाट्यात कोणत्या वृत्तीचा समावेश करण्यास सांगितले?

अ) भारती  ब) सात्वती  क) आरभटी  ड) कैशिकी

२) ब्रह्मदेवाने नाटकातील गीत संगीतासाठी कुणाला योजले ?

अ)स्वातीमुनी  ब) नारद  क) गंधर्व  ड) सर्व पर्याय योग्य

३) ब्रह्मदेवाने भरताला पहिला नाट्यप्रयोग कुठे सादर करण्यास सांगितले ?

अ) इंद्रध्वज महोत्सवात  ब) कालभैरव यात्रेत

क) वसंत महोत्सवात  ड) यापैकी नाही

४) नाट्यप्रयोगाने संतुष्ट इंद्राने भरतपुत्रांना कोणते पारितोषिक दिले?

अ) कुटिलक  ब) ध्वज  क) मुकुट  ड) पंखा

५) नाट्यप्रयोगाने संतुष्ट ब्रह्माने भरतपुत्रांना कोणते पारितोषिक दिले?

अ) कुटिलक  ब) सिद्धी  क) छत्र  ड) ध्वज

**१. ६.२) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) नाट्यवेदाची निर्मिती या विषयावर सविस्तर निबंध लिहा.

२) भरताकडून पहिल्या नाट्यप्रयोगाचे सादरीकरण विस्तृतपणे सांगा.

३) नाट्यगृहाची निर्मिती व सुरक्षा या विषयावर निबंध लिहा.

### १.७ क्षेत्रीय कार्य

नजीकच्या नाट्यगृहाला भेट देणे.

संस्कृत नाटकांविषयी ऑनलाइन माहिती मिळविणे.

### १.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

**प्राथमिक संदर्भ:**

श्रीभरतमुनीप्रणीत नाट्यशास्त्र, शुक्ल बाबुलाल, चौखम्भा संस्कृत संस्थान, वाराणसी, २०२०.

साहित्यदर्पणम्, रेग्मी शेषराजशर्मा, चौखम्बा कृष्णदास अकादमी, वाराणसी, २०१९.

**दुय्यम संदर्भ:**

त्रिपाठी राधावाल्लभ, आधुनिक संस्कृत साहित्य का समग्र इतिहास, न्यू भारतीय बुक कॉरपोरेशन, दिल्ली, २०२३.

**घटक क्रमांक – २**

## नाट्यशास्त्रीय संज्ञा

### २.१ उद्दिष्टे

**२ .२ प्रस्तावना**

**२.३ विषय विवेचन**

**२.४ स्वयं अध्ययनाचे प्रश्न**

**२.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ**

**२.६ स्वयं अध्ययनाच्या प्रश्नाची उत्तरे**

**२.७ सारांश**

**२.८ स्वाध्याय**

**२.९ क्षेत्रीय कार्य**

**२.१० अधिक वाचनासाठी**

**२.१) उद्दिष्टे -**

या घटकाच्या अध्ययनातून विद्यार्थ्यांना -

१) नाट्यशास्त्रातील महत्त्वाच्या संकल्पनांची ओळख होईल.

२) या नियमांचे नाटककारांनी त्यांच्या नाट्यात कसे उपयोजन केले आहे, ते कळून येईल.

३) संस्कृतनाट्यांचा आस्वाद आणि समीक्षणासाठी सहाय्य होईल.

४) नाट्यशास्त्राच्या विकासक्रमाशी ओळख होईल.

**२.२) प्रस्तावना**

घटक क्रमांक १ मध्ये आपण संस्कृत नाट्याचे स्वरूप आणि विकास यांचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत घटकात आपण संस्कृत नाट्याच्या काही निवडक संकल्पनांचा परिचय करुन घेणार आहोत. पुढील घटक क्रमांक ३ व ४ मध्ये येणाऱ्या उत्तररामचरितम् या नाटकाच्या शास्त्रीय अभ्यासासाठी या घटकातील विषयवस्तुशी परिचय करुन घेणेकरिता नितांत आवश्यक आहे.

संस्कृत वाङ्मयात काव्य ही अत्यंत व्यापक संकल्पना असून याचे प्रामुख्याने दृश्य आणि श्रव्यकाव्य या दोन भागांमध्ये विभाजन केले जाते. यापैकी श्रव्य काव्यातील महाकाव्यांचा परिचय आपण करुन घेतला आहे. यातील दृश्य काव्य म्हणजेच सामान्यतः नाटक होय. मात्र मराठीत ज्याला सर्रासपणे आपण नाटक म्हणतो त्यास संस्कृत

काव्यपरिभाषेत रूपक असे म्हणतात आणि या रूपकांच्या प्रमुख दहा प्रकारांपैकी एक प्रकार म्हणजे नाटक होय. रूपकाचे प्रमुख प्रकार दहा आणि उप-प्रमुख प्रकार अठरा आहेत, हे आपणास ज्ञात आहे. या सर्व रूपक प्रकारांना एकत्र बांधणारी काही तत्त्वे म्हणजेच नाटकीय संकल्पना होत. काही रूपकप्रकारांमध्ये त्यांच्याबद्दल विशेष नियम केलेले आढळतात तर काही रूपकांमध्ये त्याच्या विकसनाला वावच असत नाही. मात्र तरीही, सर्व रूपक-प्रकारांमध्ये प्रकर्षाने आढळणाऱ्या काही सामान्य संकल्पनांचा अभ्यास आपण या घटकात करणार आहोत. या संकल्पांमध्ये नाट्यशास्त्राच्या विकासाबरोबर काही बदल, परिवर्तन झालेले दिसून येते. नाट्यकला ही बहुतकरून सादरीकरणावर आधारलेली असल्याने त्यात व्यावहारिक पातळीवर होणाऱ्या बदलांची नोंद ही नाट्यशास्त्रावर ग्रथित होणाऱ्या पुढील ग्रंथानी घेतली आहे. त्यामुळे या संकल्पनांचा सुद्धा कालौघात बदल आणि विकास झालेला आढळतो. आपण  या बदलत्या स्वरूपाचे सुद्धा परीक्षण करणार आहोत. नाट्यशास्त्रातील या महत्त्वाच्या निवडक संकल्पना पुढीलप्रमाणे आहेत.

**१) नांदी** – नाट्याच्या प्रयोगाची सुरुवात ईश्वराच्या ज्या स्तुतिवाचक पदांनी केली जाते, त्या मंगलवाचक पदास नांदी असे म्हणतात. भरतमुनींनी  भरतनाट्यशास्त्राच्या पाचव्या अध्यायात पूर्वरंगाचे विधान सांगितले आहे. पूर्वरंग म्हणजे नाट्यप्रयोग सादर करण्या अगोदर पडद्यामागे जे देवतांचे पूजन केले जाते, तसेच वादकांची बैठक व्यवस्था, वाद्यांची जुळणी, संगीताचे स्वरसंयोजन इत्यादी जी पूर्वतयारी केली जाते, त्यास पूर्वरंग असे म्हणतात. पूर्वरंगाचे भरतमुनींनी एकूण एकोणीस भाग सांगितले आहेत. त्यापैकी प्रथम नऊ भाग हे यवनिका म्हणजे पडद्यामागे आणि उर्वरित दहा भाग हे पडद्याच्या पुढे म्हणजे प्रेक्षकांसमोर रंगमंचावर सादर केले जातात. नाट्यप्रयोगात येणाऱ्या अडचणी दूर व्हाव्यात म्हणून पूर्वरंगाचे विधान आचार्यांनी सांगितले आहे. अशाप्रकारे पूर्वरंग हा प्रामुख्याने धार्मिक विधींनी आणि नाट्यप्रयोगपरक क्रियांनी युक्त असतो. यामध्ये रंगमंचावर सादर केल्या जाणाऱ्या पूर्वरंगाच्या क्रियाकलापांपैकी चौथ्या क्रमांकाचा आणि पूर्वरंगाच्या एकूण विधीपैंकी तेराव्या क्रमांकाचा विधी म्हणजे नांदी होय.

नाट्यांच्या प्रारंभी असणाऱ्या नांदीच्या आवश्यकतेबाबत आणि अपरिहार्यतेविषयी नाट्यपरंपरेतील सर्वच प्राचीन विचारवंताचे एकमत आहे. सूत्रधाराने मध्यम स्वराचा आश्रय घेऊन बारा किंवा आठ पदे असणारी नांदी म्हणावी, असे भरतमुनींनी म्हटले आहे.[1]

[1] सूत्रधारः पठेत्तत्र मध्यमं स्वरमाश्रितः। नान्दी पदैर्द्वादशभिरष्टाभिर्वाप्यलङ्कृताम्।।ना.शा. ५.१०५.

साहित्यदर्पणकार विश्वनाथाने सुद्धा (प्रेक्षकांसाठी ) आशिर्वादयुक्त वचने आणि देव, द्विज व नृप इत्यादीकांची स्तुति ज्यात असते, म्हणून त्यास नांदी म्हणावे, अशी नांदीची व्याख्या केली आहे.[2] तसेच यात मांगलिक वस्तूंचा जसे, शंख, चंद्र, चक्रवाक पक्षी, कुमुद इत्यादींचे वर्णन असते, असे विश्वनाथाने सूचित कले आहे. तर भरतमुनींनी त्यातून व्यक्त करावयाच्या विषयांची ओळख सुद्धा करुन दिली आहे. त्यानुसार, सर्व देवतांना नमस्कार, द्विज, सोम(चंद्र) रूप राजा, गो-बाह्मण यांचे मंगल होवो, बाह्मणांची निरंतर प्रगती होवो, त्यांच्या शत्रूंचा क्षय होवो, महाराज सागरांपर्यंतच्या भूमीमध्ये राज्य करो, राष्ट्राची वृद्धी होवो, रंगमंच समृद्ध होवो, काव्यकर्त्याला यश आणि धर्म प्राप्त होवो, या रंगसाधनारूपी यज्ञाने देवतागण प्रिय होवोत, या विषयांपैकी एका विषयाला अनुलक्षून नांदी म्हणावी, असे भरतमुनींनी स्पष्ट केले आहे. अशाप्रकारे जनकल्याणवाचक मंगलप्रार्थना भरतास नांदीश्लोकातून अपेक्षित आहे, असे दिसून येते. भरतमुनींनी दिलेल्या या यादीत प्रेक्षकांचा कोठेही उल्लेख नसला तरी नंतरचे अनेक नाटककार आपल्या नांदीतून नाट्यप्रयोगासाठी जमलेल्या प्रेक्षकांच्या रक्षणासाठी देवांकडे विनंती करताना दिसून येतात. अशाप्रकारे काळानुरूप नाटककारांनी सैद्धान्तिक नियमांना प्रयोगातून व्यापक बनविलेले दिसते. जर नांदी योग्य पद्धतीने सादर केली तर चंद्रदेव प्रसन्न होतो, असेही नाटकलक्षणरत्नकोषामध्ये नमुद केले आहे.[3] कारण रसाची अधिष्ठात्री देवता चंद्र आहे आणि रस हा नाट्याचा आत्मा आहे. अशाप्रकारे नांदीमधून प्रामुख्याने आशीः (आशीर्वाद), स्तुति (प्रशंसा) आणि वस्तुनिर्देश (नाट्याचे सूचन) हे प्रदर्शित केले जाते. सूत्रधाराबरोबर असणारे त्याचे सहकारी, पारिपार्श्वक हे नांदीपदाच्या गायनानंतर “असेच होवो” (एवम् अस्तु । ) असे नांदीच्या अनुमोदनाप्रित्यर्थ म्हणतात.[4]

नांदी शब्दाचा अभ्यासकांनी वेगवेगळ्या पद्धतीने अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आह. नांदीचा एक अर्थ भेरी, दुन्दुभि,असा आहे.[5] मुख्य प्रयोग सुरु होणार आहे, याची जणू उद्घोषणा म्हणून नाट्यप्रयोगा अगोदर भेरीवादन केले जात असे. तसेच जमलेले प्रेक्षक साहजिकच परस्परांमध्ये कुजुबुज, संवाद करणार. त्यामुळे अशा गोंधळात नाट्यप्रयोगाची

---

2 आशीर्वचनसंयुक्ता स्तुतिर्यस्मात्प्रयुज्यते। देवद्विजनृपादिनां तस्मान्नान्दीति संज्ञिता।।सा.द. ५.२४.

3 नान्दीप्रयोगे च कृते प्रीतो भवति चन्द्रमाः। ना.ल.र.को.

4 नान्दीपदान्तरेष्वेषु ह्येवमस्त्विवति नित्यशः। वदेतां सम्यगुक्ताभिर्वाग्भिस्तौ पारिपार्श्वकौ। ना.शा. ५.११०.

5 दुन्दुभिस्त्वानको भेरी भंभा नासूश्च नान्द्यपि। वैजयंती

सुरुवात होणे, अभिप्रेत नसल्याने प्रेक्षकांचे चित्त वेधण्याकरिता प्रयोगा अगोदर भेरीवादन केले जायचे. ते भेरीवादन म्हणजेच नांदी होय. आजही दक्षिण भारतामध्ये प्रयोगाच्या आरंभी भेरीवादन केले जाते. हे पूर्वीच्या नांदीचे अवशिष्ट रूप होय. अशाप्रकारे ‘नान्द्यन्ते ततः प्रविशति सूत्रधारः’ (नांदी संपल्यानंतर सूत्रधार प्रवेश करतो.) या संस्कृत रूपकांच्या प्रारंभी येणाऱ्या वाक्याची समर्पकता अभ्यासकांनी सिद्ध केली आहे. तसेच कालपरत्वे पूर्वरंगातील क्रियाकलाप कमी होत गेले आणि पूर्वरंगापैकी तेवढी नांदी हीच शिल्लक राहिली. पूर्वरंग म्हणजेच नांदी असे समजून ‘नान्द्यन्ते ततः प्रविशति सूत्रधारः’ (नांदी संपल्यानंतर सूत्रधार प्रवेश करतो.) या संस्कृत रूपकांच्या प्रारंभी येणाऱ्या वाक्याचा अर्थ ‘पूर्वरंग संपल्यानतंर सूत्रधार प्रवेश करतो’, असा लावण्याचा प्रयत्न सुद्धा केलेला दिसून येतो. भेरीवादनाचा लक्ष्यार्थाने कोणतेही वाद्यवादन किंवा संगीत यांचे आयोजन असा अर्थ करुन कार्यक्रमापूर्वी केले जाणारे सांगीतिक आयोजन, हा नांदीचा व्यापक अर्थ केला आहे. तसेच नंद (नंदति १ प.प. ) आनंदित होणे या अर्थवाची धातूपासून सुद्धा नांदी शब्दाची व्यत्पत्ती दर्शविली आहे. नन्दन्ति सामाजिकाः अस्याम् । यामध्ये सामाजिक म्हणजे जमलेले प्रेक्षक आनंद मानतात, कारण पूर्वरंगविधानामुळे दीर्घकाळ खोळंबलेला नाट्यप्रयोग नांदीच्या सुरुवातीने सुरु होणार आहे, अशी जाणीव झाल्याने सामाजिक आनंदीत होतात. तसेच नांदी श्लोकातून देव, द्विज, ब्राह्मण, राजा, कवि, प्रेक्षक यांपैकी ज्यास उद्देशून नांदीतून स्तवन केल्याने तसेच त्यास सांगीतिकतेची जोड असल्याने त्यात देव अथवा ती-ती व्यक्ति आनंद मानते. (नन्दति देवता अस्याम्।)

भावप्रकाश या ग्रंथात नांदीबाबत एक पौरणिक कथा दिली आहे. त्यानुसार एकदा भगवान शंकर नृत्य करीत असताना त्यांचा नंदी ते नृत्य पाहत होता. ते नृत्य पाहून तो इतका तल्लीन झाला, की त्यास जणू काही आपण अत्युच्चकोटीचा नाट्यप्रयोगच पाहत आहोत, असे वाटले. भगवान शंकराच्या नृत्यप्रयोगाशी नंदीच्या असलेल्या या संबंधावरुन देवताचे पूजन करणाऱ्या श्लोकांना नांदी म्हटले गेले. अशाप्रकारे नांदी ही जशी शंकराच्या नंदीच्या स्मरणार्थ आहे तशीच ती भगवान शंकराप्रती केल्या जाणाऱ्या पूजेचे प्रतीक सुद्धा आहे.

भरतमुनींनी तसेच विश्वनाथाने नांदी ही अष्टपदी किंवा द्वादशपदी असावी, असे सांगितले आहे. मात्र, पद या संज्ञेतून व्याकरणातील पद असा अर्थ केल्यास कोणत्याही

कवीची उपलब्ध नांदी या नियमाचे पालन करताना दिसून येत नाही. त्यामुळे पद या शब्दाबाबत मतभिन्नता आढळते. ते नाटकलक्षणरत्नकोषात नोंदविले आहे. काहींच्या मते पद म्हणजे श्लोकाचा एक पाद किंवा एक ओळ होय, तर काहींच्या मते एक व्याकरणिक वाक्य, तर इतर काहींनी पद म्हणजे एक पूर्ण श्लोक असा अर्थ केला आहे.

संस्कृतभाषेतील नाटककारांनी भरताच्या विषयवस्तूचे तंतोतंत पालन केलेले दिसून येत नाही.  त्यांनी राजा, गो-ब्राह्मण, राज्य यांच्या कल्याणाकरिता नाट्याच्या शेवटी भरतवाक्यातून प्रार्थना केलेली दिसते. अनेक नाटककारांनी आपल्या अभीष्ट देवतेला नांदी वाहिलेली दिसते. कविकुलगुरु कालिदासाच्या तीनही रूपकांचे नांदीश्लोक हे भगवान शंकराला उद्देशून गायलेले आहेत. तसेच विशाखदत्तच्या मुद्राराक्षसामधील दोन नांदी श्लोक व शुद्रकविरचित मृच्छकटिकाची नांदी ही शंकरालाच समर्पित आहे. भगवान शंकर हे नाट्यकलेची अधिष्ठात्री देवता असल्याने ते समर्पकच आहे. भवभूतीने मात्र पूर्वकवींना व सरस्वतीला उद्देशून नांदी श्लोक गायलेले दिसतात तर भासाच्या बहुतेक रूपकांच्या नांदींमधून त्याने प्रेक्षकांसाठी आशीर्वाद मागितले आहेत.

**२) सूत्रधार** –   संस्कृत नाट्याची सुरुवात सूत्रधाराच्या रंगमंचावरील आगमनाने होते.[6] संस्कृत नाट्याच्या उद्गमाविषयी एतद्देशीय ज्या अनेक सिद्धांतांची कल्पना केली गेली आहे, त्यापैकी एका सिद्धांतानुसार कठपुतळीच्या खेळापासून भारतीय नाट्याची उत्पत्ती सुचविली आहे. कठपुतळीच्या खेळामध्ये वेगवेगळ्या पात्रांना आपल्या हातातील दोरांच्या आश्रयाने जसे नियंत्रणात ठेवले जाते, त्याप्रमाणे नाट्यातील पात्रांना त्यांच्या-त्यांच्या भूमिकांमध्ये सादर करणारा नियंत्रक म्हणजे सूत्रधार होय. सूत्रधार हे नाव तसेच्या तसे संस्कृत नाट्यात स्वीकारण्याचे कारण म्हणजे त्याच्या वर उद्धृत स्रोताची अवशिष्ट स्मृति होय, असे काही संस्कृत नाट्याच्या अभ्यासकांचे म्हणणे आहे. सूत्रं धारयति इति सूत्रधारः।, जो सूत्र धारण करतो, त्यास सूत्रधार म्हणावे, असा सूत्रधार या शब्दाचा अर्थ होतो.

अनेक भावांमध्ये बद्ध असे गीत, वाद्य, पाठ्य यांचे ज्ञान असणाऱ्या जाणत्या व्यक्तींकडून झालेल्या उपदेशामुळे सूत्राचा जाणकार असा सूत्रधार होय, अशी भरतनाट्यशास्त्रात भरतमुनींनी सूत्रधाराची व्याख्या केली आहे.[7]  नाटकलक्षणरत्नकोष या

---

[6] नाद्यन्ते ततः प्रविशति सूत्रधारः।

[7] गीतस्य च वाद्यस्य च पाठ्यस्य च नैकभावविहितस्य। शिष्टोपदेशात् सूत्रज्ञः सूत्रधारस्तु।। ना.शा. ३५.३०

ग्रंथात शातकर्णी या नाट्यशास्त्रावरील प्राचीन आचार्यांची सूत्रधाराची व्याख्या उद्धृत केली आहे. त्यानुसार, नाट्याचे अनुष्ठान करणे, हेच नाट्याचे सूत्र होय. जो ते सूत्र धारण करतो, तो सूत्रधार होय.[8] शातकर्णीनुसार सूत्रधार नाट्यातील कोणतीही भूमिका पार पाडत नाही. ते नाट्याचे कोणतेही पात्र म्हणून रंगमंचावर येत नाही, तर तो सूत्रधार याच भूमिकेत वावरतो. म्हणून ते नाट्याचे बाह्यपात्र ठरते. त्याचे कार्य नाट्यसादरीकरणा अगोदर केल्या जाणाऱ्या धार्मिक विधीचे आणि वाद्य, रंगमच यांच्या नियोजनाचे कार्य म्हणजेच पूर्वरंगाची जबाबदारीहे असते. विविध प्रकारची वाद्ये, गति, भाषा, भाषण, नीतिशास्त्र, वेष यांमध्ये सूत्रधार निष्णात असणे आवश्यक आहे. तसेच रसभाव, छंदशास्त्र, नाट्यप्रयोग, विविध कला, शास्त्र यांमधील कौशल्य सुद्धा त्याच्याकरिता गरजेचे मानले आहे. तो रंगमंचावर संस्कृत भाषेत संभाषण करतो. केवळ शुद्रकाचा सूत्रधार हा त्याच्या पत्नीसह बोलताना प्राकृत भाषेत बोलतो.

पूर्वरंगाच्या समाप्तीनंतर सूत्रधार हा सर्वात पहिले प्रेक्षकांना सम्मुख होतो. भरतमुनींनी नाट्याच्या नांदीगायनाची जबाबदारी सूत्रधारास दिली आहे.[9] क्वचित प्रसंगी तो नांदीच्या पद्यातून नाट्याचा विषयवस्तु, नेता, रस यांची सूचना देतो. नाट्यशास्त्र, दशरूपक व साहित्यदर्पण या ग्रंथांनुसार पूर्वरंगाच्या समाप्तीनंतर सूत्रधार हा त्याच्या सहकाऱ्यांबरोबर रंगमंचावरुन निघून जातो आणि त्याच्याप्रमाणेच गुण असणारी स्थापक नावाची  व्यक्ति रंगमंचावर प्रवेश करते व स्थापकाद्वारे प्रस्तावना सादर केली जाते.[10] मात्र उपलब्ध संस्कृत नाट्यांमध्ये स्थापकाचा उल्लेख आढळून येत नाही.[11] सूत्रधारच नाट्याच्या नांदीची व प्रस्तावनेची जबाबदारी पार पाडताना दिसून येतो. सूत्रधार हा त्याची पत्नी, नटी किंवा त्याचा सोबती, पारिपार्श्वक किंवा विदूषक यांसहित वार्तालाप करुन नाट्याला सुरुवात करुन देतो. मात्र उपलब्ध रूपकांमध्ये सूत्रधाराचा विदूषकाशी झालेला संवाद उपलब्ध नाही. त्यांच्या संवादातून तो नाट्याचे नाव, नाटककर्त्याचे नाव, प्रमुख पात्रे यांची माहिती देतो. तसेच नाट्यातील एखाद्या पात्राचे आगमन सूचित करतो. त्याचा

---

[8] अनुष्ठानं प्रयोगस्य सूत्रं तद्धारयतीति सूत्रधारः। पूर्वरङ्गोपयोगी बहिः पात्रमित्यर्थः। ना.ल.र.को, ११.

[9] सूत्रधारः पठेन्नान्दीं मध्यमस्वराश्रितः। ना.शा. ५.१०४.

[10] प्रयुज्य रङ्गान्निष्क्रामेत् सूत्रधारः सहानुगः।। तत्रैव, ५.१६४.
प्रयुज्य विधिनैवं तु पूर्वरङ्गं प्रयोगतः । स्थापकः प्रविशेत् तत्र सूत्रधारगुणाकृतिः।। तत्रैव, ५.१६८.

[11] इदानीं सम्यक्प्रयोगाभावादेक एव सूत्रधारः सर्वं प्रयोजयतीति व्यवहारः। सा.द.

पारिपार्श्वकाबरोबरील किंवा त्याच्या पत्नीसह संवाद हा मोठा रंजक आणि कौटुंबिक पार्श्वभूमी असणारा असतो. आणि त्याद्वारे तो आपसूकच मूळ कथानकात प्रेक्षकांना प्रवेश करवून देतो. प्रस्तावनेनंतर सुद्धा सूत्रधार पडद्यामागे राहून संपूर्ण नाट्याच्या क्रियाव्यापाराचे संचालन करतो.

विशाखदत्ताच्या मुद्राराक्षस आणि शुद्रकाच्या मृच्छकटिकमधील सूत्रधाराचा त्यांच्या त्यांच्या पत्नीसहित संवाद हा अधिक दीर्घ आणि कौटुंबिक स्वरूपाचा आणि त्यामुळे मनोरंजक असा आहे. भासाचा सूत्रधार अधिक संवाद न करता लगेचच मूळ नाट्याला सुरुवात करवून देतो.

**३) प्रस्तावना** – प्रस्तावना ही नाट्याच्या प्रमुख अंगांपैकी एक आहे. नांदीनंतर प्रेक्षकांना नाट्याकडे आकर्षित करण्याची महत्त्वाची जबाबदारी प्रस्तावनेवर असते. त्यामुळे ती रोचक, आकर्षक आणि थोडक्यात सादर करण्यात सूत्रधाराचे कसब असते. वर उद्धृत केल्या प्रमाणे नांदीच्या गायनानंतर सूत्रधार रंगमंचावरुन निघून जातो आणि सूत्रधाराप्रमाणेच गुण आणि आकृति असणारी स्थापक नावाची व्यक्ति रंगमंचावर प्रवेश करते. स्थापक नाटककाराच्या व नाट्याच्या नावाच्या उल्लेखासहित प्रस्तावना सादर करतो, असे भरतमुनींनी सांगितले आहे.[12] तो काव्याच्या अर्थाची स्थापना करतो, म्हणून त्यास स्थापक म्हणावे, असे विश्वनाथ सांगतो. (काव्यार्थस्य स्थापनात्स्थापकः।) तसेच विश्वनाथाच्या काळात पूर्वरंगाचा प्रयोग हा योग्य व विस्तारित रूपाने होत नसल्याने सूत्रधारच स्थापकाची सर्व कार्ये पार पाडतो, असे त्याने नोंदविले आहे.[13] प्रस्तावनेची अन्य नामाभिधाने स्थापना आणि आमुख अशी आहेत. भारतीवृत्तीच्या प्ररोचना, वीथी, प्रहसन व आमुख या चार अंगांपैकी एक अंग म्हणजे प्रस्तावना होय. भारती वृत्ती म्हणजे पुरुष पात्रांकडून वापरला जाणारा, स्त्रीवर्जित, संस्कृतभाषेचा वापर असणारा, वाक्यबहुल, असा भरत म्हणजे नटांकडून प्रयुक्त केला जाणारा शब्दव्यापार. वृत्ती म्हणजे नाटकीय सादरीकरणाचा विशिष्ट मार्ग. प्रस्तावना ही पूर्णतः वाचिक अभिनयाने सादर केली जाते, म्हणून तिला भारतीवृतीचा प्रकार मानले आहे.

---

[12] प्रसाद्य रङ्गं विधिवत् कवेर्नाम च कीर्तयेत्। प्रस्तावनां ततः कुर्यात् काव्यप्रख्यापनाश्रयाम्।। ना.शा. ५.१७२.

[13] इदानीं पूर्वरङ्गस्य सम्यक्प्रयोगाभावादेक एव सूत्रधारः सर्वं प्रयोजयतीति व्यवहारः। सा.द. ६.२७ वरील वृत्ति.

जेथे सूत्रधार, नटी किंवा मारिष किंवा विदुषक यांच्याशी संवाद करुन बहुविध वाक्यांतून नाट्याचा आक्षेप, सूचन करतो, त्यास आमुख किंवा प्रस्तावना म्हणावे, अशी भरतमुनींनी प्रस्तावनेची व्याख्या केली आहे[14] तर विश्वनाथाने मारिष ऐवजी पारिपार्श्वकाचा उल्लेख केला आहे.[15] मारिष किंवा पारिपार्श्वक हे सूत्रधाराचे सहकारी आहेत. उपलब्ध संस्कृत नाट्यांमध्ये बहुतकरुन सूत्रधाराचा नटीबरोबर किंवा मारिषासह संवाद दिसून येतो. या संवादातून सूत्रधार नाटककाराचे नाव, नाट्याचे नाव, त्यांच्यांविषयी काही विशेष माहिती देऊन प्रेक्षकांचे चित्ताकर्षण व उत्कंठा वाढवितो. हा प्रयोग कोणाच्या सांगण्यावरुन, कोणत्या प्रसंगी सादर केला जात आहे, अशी जुजबी माहिती सुद्धा येथे थोडक्यात मिळते. थोडक्यात, काही नाट्यात देश-ऋतु व काळाची सुद्धा माहिती दिलेली आढळते. प्रस्तावनेतील संवाद हा स्वल्प आणि रोचक असतो व त्याद्वारे प्रेक्षकांना मूळ कथानकात आपसूक प्रवेश करवून दिला जातो. तसेच नाट्यातील लगेचच येऊ घातलेल्या एखाद्या पात्राचे वा प्रसंगाचे आगमन सुद्धा येथे सूचित केले जाते, जेणेकरुन प्रस्तावना ही मुख्य कथानकाशी योग्यरित्या सांधली जाईल.

भरतमुनींनी प्रस्तावनेचे पाच प्रकार तर दशरूपककार धनंजयाने केवळ तीन प्रकार सांगितले आहेत. भरतनाट्यशास्त्राने सांगितलेले पाच प्रकार म्हणजे, उद्घात्यक, कथोद्घात, प्रयोगातिशय, प्रवृत्तक व अवलगित होय.[16] तर दशरूपकाने केवळ कथोद्घात, प्रयोगातिशय, प्रवृत्तक हे तीन प्रकार सांगितले आहेत. आणि उद्घात्यक व अवलगित हे भारतीवृत्तीचा एक प्रकार असणाऱ्या वीथीचे प्रकार म्हणून सांगितले आहेत.

**३.१) उद्घात्यक** – उद्धात्यक हे भारतीवृतीच्या वर उद्धृत केलेल्या चार अंगांपैकी वीथी या अंगाच्या तेरा प्रकारांपैकी एक प्रकार आहे. जेव्हा अज्ञातविषयाचे ज्ञान करुन देण्याकरिता जेव्हा ज्यांचे उत्तर माहित नाही (असे प्रश्न) आदरपूर्वक प्रस्तुत केले जातात आणि ते समर्पक

---

[14] सूत्रधारो नटीं ब्रूते मारिषं वा विदुषकम्। स्वकार्यं प्रस्तुताक्षेपि चित्रोक्त्या यत्तदामुखम् प्रस्तावना वा ।। द.रू.,३.७.

[15] नटी विदुषको वापि पारिपार्श्वक एव वा। सूत्रधारेण सहितः संलापं यत्र कुर्वते।
चित्रैर्वाक्यैः स्वकार्योत्थैः प्रस्तुताक्षेपिभिरर्मिथः। आमुखं तत्तु विज्ञेयं नाम्ना प्रस्तानावनापि सा।। सा. द. ६.३१, ३२.

[16] उद्धत्यकः कथोद्धातः प्रयोगातिशस्तथा। प्रवृत्तकावलगिते पञ्चाङ्गान्यामुखस्य तु।। ना.शा. २२.३०.

उत्तरांनी इतरांकडून जोडले जातात, तेव्हा उद्धात्यक नावाचा प्रस्तावनेचा प्रकार होतो. **उद्धात्यक** या शब्दाचा अर्थ समर्पक प्रश्न असा गो.के. भट यांनी दिला आहे. एकूण सूत्रधार आणि त्याचे सहकारी यांतील प्रश्नोत्तररूपी संवाद ज्यातून नाट्याचे नाव, नाटककाराचे नाव, प्रारंभिक प्रसंग किंवा नायकाचे नाव अशा स्वरूपाची माहिती प्रेक्षकांना कळू शकेल. विश्वनाथाने या प्रकाराचे दिलेले उदाहरण चूकीचे आहे, असे गो. के. भट यांचे म्हणणे योग्यच आहे. अभिनवगुप्ताने पांडवानंद या रूपकातील प्रस्तावना उद्धात्यकाचे  उदाहरण म्हणून उद्धृत केली आहे. मात्र ते रूपक आज उपलब्ध नाही.

**३.२) अवलगित -** उद्धात्यकाप्रमाणे अवलगित हे सुद्धा भारतीवृतीच्या वर उद्धृत केलेल्या चार अंगांपैकी वीथी या अंगाच्या तेरा प्रकारांपैकी एक प्रकार आहे. अव उपसर्गयुक्त लग् (लगति १ प.प.) चिकटणे, संलग्न होणे यापासून अवलगित हा शद्ब सिद्ध झाला आहे. जेथे एका प्रस्तुत कार्याच्या संपादनातून अन्य अप्रस्तुत कार्य सुद्धा साध्य केले जाते, तेव्हा अवलगित प्रस्तावना होते. प्रस्तुत कार्य म्हणजे सूत्रधाराच्या संवादातून प्रस्तावनेत प्रतीत होणारे कार्य तर नाट्याच्या मूळ कथानकाचा विषय हे अप्रस्तुत कार्य होय. या प्रस्तुत व अप्रस्तुत कार्यांचा मेळ सांधणे, हे अवलगिताचे कार्य होय. धनंजयाने अवलगिताचा विचार हा प्रस्तावनेचा प्रकार असा न करता वीथ्यंग म्हणून केलेला असल्याने त्याने उत्तररामचरितामध्ये सीतेचे दोहद पुरविण्याच्या (मिषाने) प्रस्तुत कार्याने रामाने लोकनिंदेमुळे सीतात्यागाचे  अप्रस्तुत कार्य सुद्धा संपादित केले, हे उदाहरण दिले आहे.

**३.३) कथोद्धात -** जेव्हा सूत्रधाराने उद्गारलेल्या पदांचा किंवा वाक्यार्थाचा अन्य संदर्भाने अर्थ घेऊन जेव्हा मुख्य नाट्यातील पात्र प्रवेश करते तेव्हा कथोद्धात प्रस्तावना होते.[17] उदाहरणार्थ, मुद्राराक्षस नाटकामध्ये नटी आपल्या घरी ब्राह्मणभोजन ठेवण्याचे कारण सांगताना म्हणते की आज चंद्राला राहूने ग्रासले आहे. हे शब्द कानावर पडताच मुख्य नाटकातील चाणक्य हे पात्र  ‘मी असताना कोण हा चंद्राला ग्रासण्याची इच्छा करतो?’ असे म्हणून त्वेषपूर्वक प्रवेश करतो. येथे नटीच्या वाक्यातील ‘चंद्र’ या शब्दाचा कौटिल्याने अर्थ

---

[17] सूत्रधारस्य वाक्यं वा यत्र वाक्यार्थमेव वा। गृहीत्वा प्रविशेत् पात्रं कथोद्धातः स कीर्तितः।। ना.शा. २२.३३.

'चंद्रगुप्त' असा केल्याने चंद्रगुप्ताला कोण अभिभूत करण्याचा प्रयत्न करीत आहे, या विचाराने तो रागाने रंगमंचावर प्रवेश करतो. अशाप्रकारे नटीच्या व चाणक्याच्या अनुषंगाने चंद्र या पदाचे अर्थ भिन्न आहेत. येथे द्वयर्थी पदाचा उपयोग होतो.

**३.४) प्रयोगातिशय** – या प्रस्तावनेत सूत्रधार एक विषय हाताळत असतानाच पडद्यामागे काही ऐकल्याचे निमित्त करुन प्रमुख नाट्यविषयाचे उपस्थापन करतो.[18] येथे एका प्रयोगामध्ये (प्रस्तावनेच्या) दुसरा प्रयोग (मुख्य कथानक) योजला जातो, जेणेकरुन मुख्य कथानकातील पात्राचा रंगमंचावरील प्रवेश सुकर होईल. उदाहरणार्थ, भासाच्या स्वप्नवासवदत्तम् या नाटकात सूत्रधार हा प्रेक्षकांशी बोलत असताना काही आवाज ऐकू येत असल्याचे सांगतो. नेपथ्यातून दूर व्हा, दूर व्हा अशी घोषणा ऐकू येते. सूत्रधार म्हणतो की, हा कसला आवाज आहे, हे कळाले. मगध राजकन्येच्या मागोमाग जाणारे सैनिक तपोवनातील लोकांना दूर सारत आहेत, असे म्हणून तो मुख्य कथानकास प्रारंभ करुन देतो आणि त्यानंतर लगेचच मुख्य कथानकातील सैन्य रंगमंचावर प्रवेश करतात.

**३.५) प्रवृत्तक** – जेथे विशिष्ट काळ, ऋतु यांच्या वर्णनाच्या आश्रयाने मुख्य कथानकातील पात्र प्रवेश करते तेव्हा, प्रवृत्तक प्रस्तावना होते. नाटकलक्षणरत्नकोष या ग्रंथात शर्मिष्ठा-परिणय या सध्या अनुपलब्ध नाटकातील संदर्भ दिला आहे. यात सूत्रधार जेव्हा नटीस वसंतऋतूवरील गीत गाण्यास सांगतो, तेव्हा नटी परस्परांपासून दूरावलेले प्रेमीजन यामुळे दुःखी होतील, या विचाराने त्यास नकार देते. त्यानंतर लगेचच त्याच विरहिनी रूपातील शर्मिष्ठेच्या रंगमंचावरील आगमनाने नाट्याचे मुख्य कथानक सुरु होते. येथे ऋतुवर्णनाच्या सामाईकतेने प्रस्तावनेतील कथानक आणि मुख्य कथानक सांधले जाते.

कथोद्घात, प्रयोगातिशय, प्रवृत्तक हे प्रस्तावनेचे तीन प्रकार मुख्य कथानकातील पात्राच्या प्रवेशाचा मार्ग सुकर करतात तर उर्वरित दोन प्रकार हे नाटकीय संदर्भ देतात. प्रस्तावना ही केवळ अशाच प्रकारे सादर करावी, असा दंडक नसून नाट्यशास्त्र प्रस्तावनेच्या

---

[18] प्रयोगे तु प्रयोगं तु सूत्रधारः प्रयोजयेत्। ततश्च प्रविशेत् पात्रं प्रयोगातिशयो हि सः। तत्रैव, २२.३४.

सादरीकरणाचे या प्रकारांद्वारे उदाहरणादाखल नमुने देत आहे. उपलब्ध संस्कृत नाटकात बाहुल्याने कथोद्धात आणि प्रयोगातिशय हे दोन प्रकार वापरलेले दिसून येतात.

**४) पताका व पताकास्थानक -** भरतनाट्याशास्त्रात पताका आणि पताकास्थानक या दोन स्वतंत्र संकल्पना आल्या आहेत. त्यांच्या नावातील साधर्म्यामुळे यांच्याबाबतीत संभ्रम निर्माण होऊ शकतो. भरतमुनींनी पताकास्थानकाचे स्पष्टीकरण हे पताकाच्या विवेचनानंतर लगेचच केले आहे. यातील पताका ही संकल्पना आधी पाहू.

**४.अ) पताका** - पताका हे नाट्याच्या पाच अर्थप्रकृतींपैकी एक होय. अर्थ म्हणजे ध्येय, फलित आणि प्रकृति म्हणजे त्या फलिताच्या प्राप्तीचे उपाय. अशाप्रकारे नाट्यशास्त्राचे प्रसिद्ध टीकाकार अभिनवगुप्त यांनी त्यांच्या अभिनवभारती या टीकेमध्ये अर्थप्रकृतीचा अर्थ ‘फलहेतवः’, ध्येयप्राप्तीचे उपाय असा केला आहे. यांचे पाच भाग नाट्यशास्त्रात कल्पिले आहेत. ते म्हणजे बीज, बिंदु, पताका, प्रकरी व कार्य होय.[19]

अर्थप्रकृति म्हणजे नाट्याचे इतिवृत्त, कथाभाग ज्याद्वारे नाट्य फलिताचे साफल्य अनुभवते. हे नाट्याचे शरीर मानले आहे. इतिवृत्ताचे प्रामुख्याने अधिकारिक आणि प्रासंगिक असे दोन भाग केले जातात. त्यापैकी आधिकारिक म्हणजे प्रमुख कथानक. कथानकाच्या व्यापारातून प्राप्त होणाऱ्या फळाचा जो भोक्ता अशा रूपकाच्या नायकाशी या कथानकाचा साक्षात संबंध असतो. तर प्रासंगिक इतिवृत्त हे आधिकारिक कथानकाला सहाय्यभूत असते तसेच त्याच्या फलप्राप्तीकरिता उपकारक असते. या प्रासंगिक कथानकाचे त्याच्या विस्तारावरुन पताका आणि प्रकरी असे दोन भाग केले जातात. मुख्य कथानकाबरोबर समांतर धावणाऱ्या आणि नाट्याच्या कथानकाच्या विस्तृत रूपाला व्यापणाऱ्या उपकथानकाला पताका असे म्हणतात. तर नाट्यातील स्वल्पविस्तारी उप-कथानकाला प्रकरी असे म्हणतात. या दोन्ही कथानकांचा समानधर्म म्हणजे ते मुख्य कथानकाला पोषक व उपकारक असतात. शब्दकोषानुसार पताकाचा अर्थ ध्वज असा आहे. मात्र नाट्यशास्त्रीय परिभाषेनुसार नाट्यामध्ये येणारे असे कथानक की, जे दुसऱ्याला म्हणजे मुख्य कथानकाला उपकारक असते व जे मुख्य कथानकाप्रमाणे व्यापक असते, त्यास पताका असे म्हणतात.[20] दशरूपककार धनंजयाने पताकाचे, मुख्य कथानकाबरोबर दूरपर्यंत विस्तार, हे वैशिष्ट्य

---

[19] बीजं बिन्दुः पताका च प्रकरी कार्यमेव च। अर्थप्रकृतयः पञ्च ज्ञात्वा योज्या यथाविधिः। तत्रैव, २१.२१.

[20] यद्वृत्तन्तु परार्थं स्यात् प्रधानस्योपकारकम्। प्रधानवच्च कल्प्येत सा पताकेति कीर्तिता।।तत्रैव, २१.२३.

आपल्या व्याख्यतून प्रकर्षाने मांडले आहे.[21] साहित्यदर्पणकार विश्वनाथाने सुद्धा व्यापक आणि प्रासंगिक कथानक म्हणजे पताका, अशी व्याख्या केली आहे. तसेच पताकानायकाचे स्वतःचे असे स्वकीय फळ असूही शकते. तसेच या कथानकाची समाप्ती हा नाट्याच्या गर्भ किंवा विमर्श किंवा निर्वहण संधींमध्ये करावी, असे त्याचे म्हणणे आहे.[22] भरताने सुद्धा गर्भसंधी किंवा विमर्शसंधीपर्यंत पताका कथानकाचा उपसंहार करावा, असे सांगितले आहे. कारण याची रचना हीच मुळी परार्थासाठी म्हणजे मुख्य कथानकासाठी असते. यामुळे याच्या अवसानानंतर मुळ कथानकाचे अवसान होते.[23]

नाट्याच्या कथाविकासाच्या पाच संधि कल्पिल्या आहेत. त्या मुख, प्रतिमुख, गर्भ, विमर्श आणि निर्वहण या होत. यांना इंग्रजी भाषेमध्ये अनुक्रमे Action, Reaction, Climax, Anti-climax आणि Conclusion असे म्हटले जाते.

उदाहरणार्थ, मृच्छकटिकम् या शूद्रक कविलिखित प्रकरणरूपकाच्या सहाय्याने कथानकाचे प्रकार पाहू. यातील चारुदत्त व वसंतसेना यांची प्रणयकथा हे प्रमुख म्हणजे आधिकारिक कथानक आहे. तर मदनिका आणि शर्विलक यांची प्रणयकथा ही प्रकरी कथानकात मोडते. तसेच राजा पालक याची सत्ता उलथवून गोपालदारक आर्यक याचे राज्यारोहण हे पताका कथानक आहे. या दोन्ही प्रासंगिक कथा मुख्य कथेच्या विकसनाला प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या मदत करतात. मदनिका व शर्विलक यांचा विवाह हा आपल्या मुख्य नायक-नायिकेंच्या विवाहासाठी एक प्रशस्तपथ निर्माण करतो. त्यांच्या प्रणयाच्या पूर्तीमध्ये आपल्या प्रमुख नायक-नायिकेच्या प्रेमाच्या साफल्याची आशा पल्लवित होते. मुख्य नायिका आपल्या प्रेमाच्या भावीरूपाचे प्रतिबिंब मदनिकेच्या प्रेमाच्या साफल्यात पाहू लागते. पुढे जाऊन मदनिका पुन्हा रंगमंचावर येत नाही. त्यांच्या कथानकातून साध्य करावयाचा हेतु सिद्ध झाल्यानंतर त्या कथानकाचे अवसान होते. तसेच त्याच रूपकामध्ये द्वितीय अंकामध्ये खुंटमोडकाचा प्रसंग येतो. खुंटमोडक नावाचा हत्ती उज्जयिनी नगरीमध्ये उधळल्याने शहरांतील स्त्री-पुरुषांचा उडालेला संभ्रम आणि गोंधळाची अवस्था यांचे वर्णन केले आहे. यात वसंतसेनेच्या सेवकाने कर्णपूरकाने हत्तीला नियंत्रित आणण्यासाठी केलेला

---

[21] सानुबन्धं पताकाख्यं प्रकरी च प्रदेशभाक्। दूरं यदनुवर्तते प्रासङ्गिकं सा पताका, सुग्रीवादिवृत्तान्तववत्। द.रू., १.१३.

[22] व्यापी प्रासङ्गिकं वृत्तं पताकेत्यभिधीयते। पताकानायकस्य स्यान्न स्वकीयं फलान्तरम्।। सा.द.६.६७.
गर्भे सन्धौ विमर्शे वा निर्वाहस्तस्य जायते।तत्रैव, ६.६८.

[23] आगर्भादाविमर्शाद्वा पताका विनिवर्तते। कस्माद् यस्मान्निबन्धोऽस्याः परार्थः परिकीर्त्यते।।ना.शा. २१.२८.

यशस्वी प्रयत्न आणि त्याच्या कौतुकासाठी पुढे सरसावलेल्या चारुदत्ताच्या वर्णानातून त्याची गुणग्राही आणि दानशूर वृत्ती वसंतसेनेच्या आणि वाचकाच्या नजरेस आणून देणे, हे त्याचे प्रयोजन होते. ते ध्येय साध्य करुन खुंटमोडकाचे कथानक संपते. यास प्रकरी कथानक म्हणतात. तर शर्विलकाच्या मदतीने बंधनातून सुटलेला गोपालदारक आर्यक क्रूर पालकाचे राज्य उलथवून राजा बनतो. तसेच सूळावर चढविल्या जाणाऱ्या चारुदत्ताची सुटका करतो व वसंतसेनेचा हात सुद्धा चारुदत्तास देतो. अशाप्रकारे नायकाच्या मुक्ततेसाठी आणि नायक-नायिका यांच्या मिलनासाठी हे कथानक सहाय्यभूत ठरते. तसेच या कथानकाचा विस्तार आपणास या रूपकाच्या चतुर्थ अंकापासून ते शेवटच्या दहाव्या अंकापर्यंत अंतःप्रवाहरूपाने धावताना दिसतो. त्यामुळे ते व्यापक परार्थ कथानक असल्याने पताका ठरते.

रामायणाची कथा जर नाट्यरूपाने सादर केली गेली तर त्यातील रावणाने अपहृत केलेल्या सीतेची रामास पुनः प्राप्ती हे काव्याचे आधिकारिक कथानक ठरते आणि किष्किंधाकांडापासून युद्धकांडापर्यंत येणारे कथानक, वानरराज सुग्रीवाची सीताप्राप्तीसाठी मदत हे पताका कथानक होईल तर शबरीवृत्तांत हा रामाचे गुणसंकीर्तन करणारा, भक्ताच्या सेवेप्रति रामाचा आदरभाव दर्शविणारा असल्याने तेवढेच ध्येय प्राप्त करुन त्याचा शेवट होतो. त्याचा पुढे पुन्हा विस्तार अथवा संदर्भ येते नाही, असे स्वल्पविस्तारी कथानक प्रकरी होईल.

**४.ब) पताकास्थानक** – पताकाचे विवेचन केल्यावर नामसाधर्म्यामुळे भरतमुनींनी त्यानंतर लगेचच पताकास्थानकाचे विवेचन केले आहे. पताकास्थानक हा इतिवृत्तास रोचक बनविणारा जणु एक अलंकार (मंडन) आहे, असे नाट्यदर्पणकार रामचंद्र-गुणाचंद्र यांनी म्हटले आहे.[24] पताकास्थानक ही कथानक सूचनाची एक नाट्यक्लृप्ति, युक्ति आहे.

जसे नाटक व रूपकांमध्ये पताका असणे आवश्यक आहे तसे पताकास्थानक असणे आवश्यक नाही. मात्र त्याच्या असण्याने नाट्याला वेगळेच सौंदर्य प्राप्त होते. तिचा वापर विरळा, योग्य आणि समर्पक स्थानीच करावयाचा असतो. पताकाकथानकाप्रमाणे ते विस्तृत नसते. नाटकाकाराच्या प्रतिभेची चुणूक दाखवितानाच पताकास्थानक हे कथानकाला गती देण्याचे सुद्धा कार्य करते आणि भावी, पुढे येणाऱ्या अथवा घडणाऱ्या घटनांचे अनाहूतपणे, अप्रत्यक्षपणे सूचन करते आणि नाट्याला एक वेगळीच खुमारी देते. ज्याप्रमाणे पताका

[24] चिन्तितार्थात् परप्राप्तिः वृत्ते यत्रोपकारिणी। पताकास्थानकं ततु चतुर्द्धा मण्डनं क्वचित्।। ना.द. १.३०.

म्हणजे ध्वज हा जसे येणाऱ्या सैन्याचे किंवा राजाचे त्याच्या आगमना अगोदर सूचन करतो त्याप्रमाणे पताकास्थानक येऊ घातलेल्या कथानकाविषयी संकेत देते. म्हणून, यास पताकास्थानक म्हटले आहे. [25]

जेव्हा एका प्रयोजनाचा विचार करीत असताना त्या विचारासहित अचानक तसेच स्वरूप असणाऱ्या अन्य प्रयोजनाची अकल्पितरित्या तेथे प्राप्ती होते, तेव्हा त्यास पताकास्थानक म्हणावे, अशी भरतमुनींनी पताकास्थानकाची व्याख्या केली आहे.[26] नाट्यशास्त्राचे टीकाकार, अभिनवगुप्त म्हणतात की, पताकास्थानकाचा अनेकदा प्रस्तुत ठिकाणी काहीच संदर्भ नसतो. परंतु, तो मुख्य कथानकाशी नकळत मेळ घालतो आणि येऊ घातलेल्या घटनांचे सूचन करतो आणि अशाप्रकारे संदर्भहीन प्रसंग हा मूळ मुख्य कथानकाच्या प्रयोजनाशी मेळ घालतो आणि त्यास मदत करतो. भरतमुनींनी पताकास्थानकाचे चार प्रकार कल्पिले आहेत तर दशरूपकामध्ये याचे दोन प्रकार सांगितले आहेत.

पताकास्थानकाचे भवभूतीच्या उत्तररामचरितम् मधील उदाहरण पाहू. या नाटकाच्या प्रथम अंकात राम आणि सीत एकांतात बसलेले असताना रामाचा एक स्वगत श्लोक येतो. त्यात राम म्हणतात की, सीतेचे मला सर्व काही प्रिय आहे, काय प्रिय नाही तर तिचा विरह.(किमस्याः न प्रेयो यदि पुनरसह्यस्तु विरहः।। १.३४) त्याचवेळी दालनाच्या बाहेर उपस्थित असलेला प्रतिहारी, रामाने नियुक्त केलेल्या दुर्मुख नावाच्या हेराच्या आगमनाची घोषणा करतो आणि त्याच्या येण्याची वर्दी देताना तो “ महाराज, उपस्थित आहे”,  (देव, उपस्थितः।) असे म्हणतो. आपल्या पत्नीच्या सहवासात निवांत क्षण अनुभवणाऱ्या रामाच्या आणि अनुषंगाने प्रेक्षकाच्या मनःपटलावर रामाच्या वाक्यातील शेवटचा शब्द ’विरह’ आणि दुर्मुखाच्या मुखातील शब्द ’उपस्थित आहे’ हे एकत्रित सांधले जातात आणि विरह उपस्थित आहे, असा त्याचा अर्थ निघतो.  राम सुद्धा दचकून विचारतो की, कोण ? (उपस्थित आहे ? ) (अयि कः।) आणि काहीच वेळात राम स्वतःहून सीतेचा परित्याग करण्याची आज्ञा लक्ष्मणाला करतात. म्हणजे पुढे येऊन ठेपलेल्या सीतेच्या परित्यागाचे अकल्पितपणे व अप्रत्यक्षरित्या सूचन हे या वाक्य-संयोजनाने साधले आहे. त्यामुळे येथे कवीने कल्पकतेने पताकास्थानक योजिले आहे.

---

[25] प्राकरणिकस्य भाविनोऽर्थस्य सूचकं रूपं पताकावद्भवतीति पताकास्थानकम्। द.रू. १.१४.

[26] यत्रार्थे चिन्तितेऽन्यस्मिन् तल्लिङ्गोऽन्यः प्रयुज्यते। आगन्तुकेन भावेन पताकास्थानकं तु तत्।तत्रैव, २१.२९.

**५) नायक -** कोणतेही नाटक हे तत्कालीन समाजाचे एक विहंगम रूप सादर करते. नाटककार त्याच्या नाट्यासाठी कोणती पात्रे निवडतो व त्याना कसे रंगवितो, यातून त्या नाटककाराची अभिरुची, जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन प्रतीत होतो. संस्कृत नाट्याचा आत्मा हा रस असल्याने रसाच्या अनुषंगाने पात्रांची निवड आणि चित्रण केले जाते. संस्कृत नाट्यात प्रामुख्याने शृंगार व वीर रसाचे आधिक्य दिसून येते. रस कोणताही असला तरी नाट्यात कोणत्यातरी स्वरूपातील फल आणि त्याच्या प्राप्तीसाठी त्यारोखाने केलेले प्रमुख पात्रांचे प्रयत्न दिर्शविले जातात. नाट्याच्या ध्येयाला फल आणि त्या फलाच्या आस्वादाला अधिकार असे म्हणतात. जो कोणी त्याकरिता प्रयत्न करतो किंवा ज्याच्याकरिता प्रयत्न केला जातो तो त्या नाट्यफलाचा अधिकारी असतो आणि तो त्या नाट्याचा प्रमुख पात्र असतो. त्यास नेता, नायक असे म्हटले जाते, कारण नाट्याचा सर्व क्रियाव्यापार हा त्याच्या हिताकरिता अथवा फायद्याकरिता सुरु असतो. अशाप्रकारे तो सर्व नाट्यक्रियांचा व रसाचा आधार, आलंबन असतो.

प्रथमतः नाटकाचा नायक असणाऱ्या पुरुषाकडे काही प्राथमिक आणि सर्व नायक प्रकारांमध्ये सामायिक गुणांची अपेक्षा नाट्यशास्त्रकारांनी सांगितली आहे. ते गुण म्हणजे औदार्य, उदात्तता, उच्चकुलीनता, चातुर्य, सौंदर्य, पराक्रम आणि धार्मिकता. या गुणांनी तो एक परिपूर्ण पुरुष होतो. त्याला त्याच्या स्वतःबाबतच्या आणि आजूबाजूच्या व्यक्ती आणि समाजाबाबतच्या जबाबदारींची पूर्ण जाणीव असते. तो विनयशील, मधुर, त्यागी, कुशल, दक्ष, प्रिय बोलणारा, लोकप्रिय, पवित्र, उत्तम वक्ता, स्थिर, तरुण, बुद्धिमान, उत्साही, उत्तम स्मरणशक्ती असणारा, शूर, दृढ, तेजस्वी, कलांमध्ये पारंगत, शास्त्रांचे ज्ञान असणारा व धार्मिक प्रवृत्तीचा असतो.[27]

मनुष्याचा स्वभाव हा खूपच गुंतागुंतीचा आहे. त्याच्या स्वभावाच्या विविध पैलुंमुळे त्याची काही विभागणी करणे तसे दुष्कर कार्य असले तरी नायक स्वरूपातील पुरुष पात्राचे भारतीय नाट्यशास्त्रात मुख्यत्वे धीरोदात्त, धीरोद्धत, धीरललित, धीरप्रशान्त हे चार प्रकार सांगितले आहेत.[28] या प्रकारांचे विवेचन पुढीलप्रमाणे आहे.

---

[27] नेता विनीतो मधुरस्त्यागी दक्षः प्रियंवदः। रक्तलोकः सुचिर्वाग्मी रूढवंशः स्थिरो युवा।।
बुद्ध्युत्साहस्मृतिप्रज्ञाकलामानसमन्वितः। शूरो दृढश्च तेजस्वी शास्त्रचक्षुषः धार्मिकाः।। द.रू. २.१,२.

[28] धीरोदात्तो धीरोद्धतस्तथा धीरललितश्च। धीरप्रशान्त इत्ययमुक्तः प्रथमश्चतुर्भेदः।। सा.द. ३.३१.

**१) धीरोदात्त -** धीरोदात्त नायक हा बलशाली, अत्यंत गंभीर स्वभावाचा, क्षमावान, स्वतःची स्तुती न करणारा असतो. तसेच तो स्थिर बुद्धीचा (कार्यामध्ये विचलित न होणारा), विनयाने अहंकार झाकला गेलेला आणि अंगीकृत केलेले व्रत, प्रतिज्ञा पूर्णत्वास नेणारा असतो.[29] उत्तररामचरितम् मधील नायक राम किंवा वेणीसंहार नाटकातील नायक युधिष्ठिर, नागानंद नाटिकेतील जीमूतवाहन हे धीरोदात्त नायकाचे उदाहरण होय. यातील काही गुण नायक म्हणून सामान्यरूपाने अपेक्षित असताना पुन्हा यांचे प्रतिपादन करण्याचे कारण म्हणजे ते या नायकांमध्ये प्रकर्षाने, आधिक्याने दिसून येतात.

**२) धीरललित -** धीरललित नायक हा निश्चिंत, कलासक्त, सुखी आणि मृदु स्वभावाचा असतो. सचिव, मंत्री यांवर राज्याची जबाबदारी दिल्याने तो चिंतारहित असतो. त्यामुळे तो गीत, नृत्य, संगीत, इत्यादी कलांमध्ये प्रविण आणि आसक्त असतो. धीरललित नायक असणारे नाट्य हे शृंगाररस प्रधान असतात. त्यामुळे तो नायक मृदु आणि ललित स्वभावाचा असतो. कालिदासाच्या मालविकाग्निमित्र नाटकातील नायक अग्निमित्र तसेच हर्षाच्या रत्नावली नाटिकेतील नायक उदयन हे धीरललित प्रवृत्तीचे नायक होत.

**३) धीरप्रशांत** – सर्व प्रकारांतील नायकांमध्ये सामान्यपणे दिसून येणारे जे सामान्यगुण आहेत, त्यांनी युक्त असा द्विज, व्यापारी (वणिक्), राजाचा सचिव इत्यादी जे प्रकरण या प्रकाराच्या रूपकांचे नायक असतात ते, धीरप्रशांत नायक ठरतात. धीरललित प्रकारातील नायंकाचा जो निश्चिंतता (चिंता विरहित असणे) हा गुण सांगितला आहे, तो या द्विज, व्यापारी, सचिव यांच्यामध्ये सुद्धा असतो. परंतु, त्यापेक्षा त्यांचा शांत स्वभाव हा प्रमुख गुण मानला आहे. संस्कृत नाट्यात क्षत्रिय नायक धीरप्रशांत प्रवृत्तीचा दिसून येत नाही. तो विप्र, वणिक् या वर्णाच्या नायकांसाठी सांगितला आहे. मालतीमाधव आणि मृच्छकटिकम् या अनुक्रमे भवभूतीच्या व शुद्रकाच्या प्रकरण रूपकांतील नायक माधव आणि चारुदत्त हे धीरप्रशांत स्वभावाचे नायक आहेत.

**४) धीरोद्धत** – जो नायक अत्यंत अहंकारी, मत्सरी, क्रोधी, अस्थिर (चंचल वृत्तीचा) असतो. तसेच माया, कपट हे करण्यात पटाईत असतो, स्वतःची स्तुति करण्यात रत असतो, त्यास धीरोद्धत नायक म्हणावे. वेणीसंहार या भट्टनारायणाच्या नाटकातील भीमसेन हा धीरोद्धत नायकाचे उदाहरण म्हणून विश्वनाथाने दिले आहे. तर धनंजयाने महावीरचरितम्

---

[29] महसत्त्वोऽतिगम्भीरः क्षमावानविकत्थनः। स्थिरो निगुढोहङ्कारो धीरोदात्त दृढव्रतः।। द.रू.२.४.

या भवभूतीच्या नाटकातील जामदग्नीचे पात्र तसेच रामकथांमधील रावणाचे पात्र हे या प्रकाराच्या नायकाचे उदाहरण म्हणून दिले आहे.

धनंजयाच्या मतानुसार प्रत्येक व्यक्ति ही पूर्णवेळ एकाच स्वरूपात असू शकत नाही. ती कधी ललित कधी उदात्त तर कधी प्रशांत स्वभावाचे प्रत्यंतर देते. त्यामुळे हे नायकाचे प्रकार न होता नायकाचे गुण, अवस्था म्हणून समजले पाहिजेत. ज्याप्रमाणे वृषभाकरिता वयाने लहान असताना वत्स (वासरु), तरुण वयात वृषभ आणि वृद्ध वयात महोक्ष असे शब्द वापरले जातात. बैल हा एकच असतो मात्र त्याचे वयानुसार गुण बदलतात त्याप्रमाणे व्यक्ति तीच असते, तीचे परिस्थितीनुसार वेगवेगळे गुण प्रकर्षाने दिसून येतात. परंतु, एका नायकाचे एका नाट्यामध्ये ज्या रूपात अथवा अवस्थेत वर्णन सुरु केले असले तेच शेवटपर्यंत दाखविणे उचित ठरेल, असे मत धनंजयाने मांडले आहे. अशाप्रकारे नायकांमध्ये, उदात्त, उद्धत, शांत व ललित या विभिन्न प्रवृत्ति दिसून येत असल्या तरी, प्रत्येक नायकामध्ये धीर हा गुण सदोदित असला पाहिजे, हे या प्रत्येक नायकाच्या नामाभिधानात अंतर्भूत केलेल्या धीर या पदाने अधोरेखित केले आहे.

नाट्यशास्त्रावरील ग्रंथामध्ये नायकांचे विभाजन हे विविध तत्त्वांच्या आधारे केलेले आपल्याला दिसून येते. शृंगार रसप्रधान नाट्यांमध्ये नायकाचे त्याच्या स्वभावाला अनुलक्षून दक्षिण, शठ, धृष्ट व अनुकूल असे चार प्रकार सांगितले आहेत. संस्कृत भाषेतील प्रणयप्रधान नाट्यांमधून प्राचीन भारतीय संस्कृतीचे पुरुषप्रधान व बहुपत्नीत्व हे स्वरूप प्रकर्षाने दिसून येते. त्यामुळेच कालिदासाच्या मालविकाग्निमित्रम् या नाटकातील नायक अग्निमित्र हा त्याच्या दोन ज्येष्ठ राण्या असताना सुद्धा नव्या नायिकेच्या, मालविकेच्या प्रेमात पडला आहे. दुसऱ्या नायिकेच्या प्रेमात पडलेला नायक हा पहिल्या नायिकेप्रति दक्षिण, शठ व धृष्ट या स्वरूपात दिसून येतो.

**१) दक्षिण नायक -** असा नायक जो नवीन प्रेमिकेच्या प्रेमात पडलेला असताना सुद्धा ज्येष्ठ नायिकेच्या बाबतीत दाक्षिण्यपूर्ण व्यवहार करतो आणि तिच्या बाबतीत तो सहृदय असतो, तो दक्षिण नायक होय. हा मालिविकेच्या प्रेमात पडलेला असताना त्याच्या ज्येष्ठ राण्यांशी म्हणजे धारिणी व इरावती यांच्याशी सौजन्यपूर्ण आणि दाक्षिण्यपूर्ण व्यवहार करतो. तसेच विक्रमोर्वशीयम् या त्रोटक रूपकातील नायक पुरुरवा हा उर्वशी या अप्सरेकडे आकर्षित झालेला असताना सुद्धा त्याच्या ज्येष्ठ राणीशी, औशिनरीशी प्रेमपूर्वक आचरण करतो.

**२) शठ नायक** – जो नायक नवीन नायिकेकडे आकर्षित झाला असता ज्येष्ठ अथवा पूर्व नायिकेला फसवितो, खोटे बोलतो, त्यास शठ नायक म्हणतात. दक्षिण नायक व शठ नायक हे दोघेही ज्येष्ठ नायिकेचे अप्रियच करतात. त्यापैकी दक्षिण नायकाच्या ठायी ज्येष्ठ नायिकेप्रति किमान सौजन्य व सहृदयत्व असते, मात्र शठ नायक तेवढे सुद्धा दाखवित नाही. तो एका नायिकेच्या आकण्ठ प्रेमात असतो आणि अन्य ज्येष्ठ नायिकेशी बाह्यात्कारी प्रेमपूर्वक संवाद करतो, मात्र तिच्या परोक्ष तिचे अप्रिय करतो.

**३) धृष्ट नायक** – ज्या नायकाने ज्येष्ठ नायिकेचा अपराध केला असता त्याबद्दल त्यास खंत, खेद वाटत नाही, उलट तो निलाजरेपणे आचरण करतो, असत्य भाषण करतो, तो धृष्ट नायक होय.

**४) अनुकूल नायक** – जो नायक एकाच नायिकेवर आसक्त असतो व तिच्याशी एकनिष्ठ असतो, त्यास अनुकूल नायक म्हणतात. भवभूतीच्या उत्तररामचरितम् मधील राम हा सीतेप्रति तिच्या परित्यागानंतर सुद्धा एकनिष्ठ आहे, म्हणून तो अनुकूल नायक ठरतो.

नायकांच्या वरील उद्धृत प्रकारांपैकी पहिले तीन प्रकार हे एकाच नायकात प्रसंगपरत्वे दिसून येऊ शकतात. उदाहरणार्थ, कालिदासाच्या मालविकाग्निमित्रम् या नाटकातील अग्निमित्र आपले नवीन प्रेम मिळविण्याच्या प्रयत्नात असताना प्रसंगानुसार ज्येष्ठ राण्यांशी काही वेळेस दाक्षिण्यपूर्ण आहे, काही वेळेस शठ आहे, काही वेळेस धृष्ट आहे. त्यामुळे नायकांची अत्यंत कठोर किंवा बंदिस्त अशी विभागणी होऊ शकत नाही.

धनंजयाने पूर्वी सांगितलेल्या धीरोदात्त इत्यादी चार नायकांचे प्रत्येकी वरील चार प्रकार सांगितले आहेत. म्हणजे उदाहरणार्थ, धीरोदात्त नायकाचे प्रसंगानुसार दक्षिण, शठ, धृष्ट व अनुकूल असे चार प्रकार दिसून येतात. तसेच इतर नायकांच्या बाबतीत प्रत्येकी चार प्रकार होतील आणि असे मिळून एकूण नायकाचे सोळा प्रकार होतात.

तसेच संस्कृत नाट्यातील नायकांची विभागणी ही त्यांच्या नाट्यातील क्रियाकलापांच्या ध्येयाच्या आधारावर, क्रियाव्यापारातून प्राप्त होणाऱ्या फळावर सुद्धा केलेली आढळते. अशावेळी जर नायक हा पराक्रमी असून युद्धाद्वारे आपले फलित प्राप्त करुन घेणारा असेल तर, तो युद्धवीर, इतरांवर प्रेम, ममत्व, दयाभाव ठेवणारा नायक दयावीर आणि धार्मिकवृत्तीने दानधर्म करणारा नायक हा दानवीर अशी सुद्धा नायकांची विभागणी केलेली आढळते.

तसेच नायकाच्या नायिकेबरोबर असणाऱ्या संबंधांस धार्मिक व सामाजिक अधिष्ठान किंवा मान्यता आहे किंवा नाही, यावर सुद्धा नायकाची विभागणी झालेली दिसते. जसे, धर्मशास्त्रानुसार नायिकेशी विवाहित असणारा नायक म्हणजे पति, प्रियकर नायक म्हणजे उपपति आणि गणिकेशी प्रेम संबंध असणारा नायक म्हणजे वैशिक असे तीन नायकांचे प्रकार सांगितले आहेत.

संस्कृत नाट्यामध्ये पात्रांचे उत्तम, मध्यम आणि अधम पात्र असे विभाजन त्यांच्या गुण आणि सामाजिक उतरंडीवरील त्यांचे स्थान या आधारे केलेले दिसते. ती विभागणी नायकांच्या बाबतीत सुद्धा केलेली आढळते. जसे, नायकाच्या वर उद्धृत सर्व गुणांनी संपन्न असा उत्तम नायक होय. तर त्या गुणांपैकी काही गुणांची कमतरता असणारा मध्यम नायक होय. नाट्यदर्पणकारांनी पताका व प्रकरी कथानकाच्या नायकास मध्यम नायक म्हटले आहे. काहींनी त्यास उप-नायक म्हटले आहे. प्रतिनायक हा नेहमी धीरोद्धत स्वरूपात रंगविला जातो. तो मध्यम किंवा अधम प्रतीचा नायक असतो. तर वीट, चेट, विदुषक, सेवक हे अधम प्रतीचे ठरतात.

**६) नायिका -** शृंगारप्रधान नाट्यांमधील नायिकेचे चित्रण करण्यात नाटककाराचा खरा कस लागतो. तो आपल्या नायिकेला कशाप्रकारे रंगवितो, यावर त्याचे स्वतःचे आणि नाट्याचे प्रायशः यशापयश अवलंबून असते. संस्कृत नाट्यात नायकांहून जास्त प्रकार-भेद हे नायिकेचे सांगितलेले आहेत.

संस्कृत नाट्याचे विभाजन हे इतर अनेक तत्त्वांसहित नायकाच्या आधारावर सुद्धा झालेले दिसते. त्यामुळे अनेकदा नाट्यातील नायकाला साजेशी अनुरुप अशी नायिकाच तेथे घ्यावी लागते. त्यामुळे नायकाच्या ठायी जे सामान्य व साधारण गुण आवश्यक म्हणून सांगितले आहेत, ते नायिकेसाठी सुद्धा अभिप्रेत आहेत. याचा अर्थ नायिकेच्या निर्धारणाचे एक तत्त्व हे त्या नाट्यातील नायक हा असतो. त्याबरोबरच तिची सामाजिक प्रतिष्ठा, शीलशौच, तिचे वय, कामावस्थेतील तिच्या अवस्था ह्या तत्त्वांच्या सहाय्याने सुद्धा नायिकांचे विभाजन केलेल दिसते. नायक हा नायिकेशी कशा व कोणत्या प्रकारे संबंधित झाला आहे, या अनुषंगाने नायिकांचे स्वीया, परकीया आणि साधारणा अशी विभागणी केली आहे.[30]

---

[30] अथ नायिका त्रिभेदा स्वाऽन्या साधारणा स्त्रीति। नायकसामान्यगुणैर्भवति यथासंभवैर्युक्ता। सा.द. ३.५६.

**१) स्वीया -** धार्मिक अनुष्ठानाने नायकाशी विवाहित असलेली, आपल्या पतीवरच अनुरक्त असणारी, मर्यादाशील, गृहकर्तव्यांमध्ये रत आणि नायकाच्या सुख-दुःखामध्ये बरोबर असणारी अशी स्वीया नायिका असते. मृच्छकटीकम् या प्रकरण रूपकातील चारुदत्ताची पत्नी धूता ही स्वीया नायिका आहे तसेच मालविकाग्निमित्रम् मधील नायक अग्निमित्राच्या दोन राण्या, धारिणी व ईरावती ह्या त्याच्या स्वीया नायिका आहेत.

**२) परकीया -** काही वेळेस नायिका विवाहित असून विवाहबाह्य नायकाच्या किंवा अविवाहित नायिका आपल्या प्रियकराच्या प्रेमात असेल तर ती परकीय नायिका होते. यातील विवाहित परकीया नायिका ही मुख्य कथानकाची नायिका म्हणून दर्शवू नये, असा दंडक धनंजयाने घातला आहे. मात्र ती प्रहसन रूपकात नायिका असू शकते. मालविकाग्निमित्रम् मधील अविवाहित मालविका ही (वागदत्त) नायक अग्निमित्राची परकीया नायिका आहे.

**३) साधारणा -** जर नायिका ही गणिका असेल तर तिला साधारणा असे म्हणतात. ती संगीत, नृत्य वादन इत्यादी कलांमध्ये पारंगत असते आणि तसेच ती स्वभावाने धूर्त सुद्धा असते. मृच्छकटीकम् या प्रकरण रूपकातील चारुदत्ताची प्रेयसी, गणिका वसंतसेना ही साधारणा नायिका आहे.

नायकासोबतच्या नायिकेच्या संबंधाच्या स्वरूपावर आधारीत नायिकेचे पुन्हा तीन भेद कल्पिले आहेत. हे भेद खरोखर तिच्या नायकाबरोबरच्या प्रणयातील अनुभवावर आणि तिच्या वयावर अवलंबून आहेत.

**१) मुग्धा** – ती नुकतीच तारुण्यात प्रवेश करणारी, प्रथमच मदनविकार जिच्यात आविष्कृत होत आहे अशी, सलज्ज, तिच्या मर्यादाशील वागण्याने जीचे प्रेम झाकोळले गेले आहे, जी रागावली असताना सुद्धा कोमल असते, असे तिचे वर्णन शास्त्रग्रंथांनी दिले आहे. मालविकाग्निमित्रम् मधील मालविका ही या प्रकारात येते.

**२) मध्या -** जीचा लाजरेपणा कमी झाला आहे. नायकाच्या सहवासात राहिल्याने जी मुक्तपणे तिच्या भावना व्यक्त करु शकते, जिच्यात कामविकार वृद्धिंगत झाला आहे, असे मध्या नायिकेचे वर्णन केले

आहे. मालविकाग्निमित्रम् मधील इरावती ही या प्रकारात येते.

**३) प्रगल्भा** – ही नायिका नायकाशी व्यवहार करताना स्वभावाने धीट, प्रेमासक्त, नायकावर अधिकार सांगणारी, स्वतःच्या भावना पूर्णपणे व्यक्त करणारी, नायकाशी प्रसंगी उपरोधिक बोलणारी असते.

यातील मध्या व प्रगल्भा या नायिकांचा प्रणयामध्ये नायकाकडून मानभंग झाल्यास तिच्या नायकाप्रतिच्या प्रतिक्रियांवरुन यांचे पुन्हा (**१) धीरा, (२) अधीरा व (३) धीराधीरा** असे तीन उपप्रकार करण्यात आले आहेत.

**१) धीरा -** नायिका जेव्हा शांतपणे व समंजस प्रतिक्रिया व्यक्त करेल तेव्हा तिला धीरा म्हटले आहे.

**२) धीराधीरा -** काही वेळेस नायिका मानभंगाने उत्तेजित होते मात्र तिचा राग व्यक्त करण्याइतपत ती धीट नसते तेव्हा ती अश्रूंनी आपल्या दुःखास वाट करुन देते. अशा नायिकेस धीरा-अधीरा असे म्हटले आहे. **३) अधीरा** - काही वेळेस नायिका ही मानभंगाच्या रागाने नायकास रागावते आणि प्रसंगी मारहाण सुद्‌धा करते.अशा नायिकेला अधीरा नायिका म्हटले आहे.

उदाहरणार्थ, जर मध्या धीरा नायिका नायकावर रागावली तर ती त्यास उपरोधिक बोलते. मध्या अधीरा नायिका नायकास कटु व कठोर वचन बोलते तर मध्या धीरा-अधीरा नायिका ही स्वतः रडते आणि नायकास रागावते सुद्‌धा. प्रगल्भा धीरा ही आपला राग लपविते आणि नायकाशी औपचारिक व्यवहार करते. प्रगल्भा अधीरा ही नायकाला रागावते व क्वचित प्रसंगी मारते सुद्‌धा. तर प्रगल्भा धीरा-अधीरा ही मध्या धीरा प्रमाणे उपरोधिक बोलते. नायिकांचे हे विभाजन पूर्णतः नायिकेच्या वैयक्तिक स्वभाव प्रकृतीवर अवलंबून आहे. तसेच प्रेमसंबंधात प्रगल्भ झालेल्या पारस्परिक बंधन आणि कर्तव्याची जाणीव याची सुद्‌धा त्यास जोड आहे.

शास्त्रकारांनी सर्वात प्रथम सांगितलेल्या स्वीया, परकीया आणि साधारणा या प्रत्येकीचे मुग्धा, मध्या आणि प्रगल्भा असे पुन्हा उपप्रकार कल्पिले आहेत.

नायिकांच्या विभाजनाचे चौथे तत्त्व हे प्रणयावस्थेतील नायिकेच्या अवस्था दर्शविणारे आठ प्रकार आहेत.[31] ते पुढीलप्रमाणे आहेत.

---

[31] तत्र वासकसज्जा च विरहोत्कण्ठितापि वा। स्वाधीनभर्तृका चापि कलहान्तरितापि वा।।
खण्डिता विप्रलब्धा वा तथा प्रोषितभर्तृका। तथाभिसारिका चैव ज्ञेयास्त्वष्टौ तु नायिकाः।। ना.शा. २४.२१०,२११.

**१) वासकसज्जा -** ही नायिका आपल्या प्रियकराशी निश्चित भेट होणार आहे, या विचाराने आनंदी असते तसेच त्या भेटीसाठी ती स्वतःला वस्त्रालंकारांनी सुशोभित करते, अशी प्रियकर अथवा पतिसाठी आनंदी वृत्तीने सज्ज झालेली आणि त्याची वाट पाहणारी नायिका म्हणजे वासकसज्जा होय.

**२) विरहोत्कण्ठिता** – अनेक कार्यांमध्ये व्यस्त असल्याने जिचा प्रियकर तिच्याकडे येत नाही, तेव्हा त्याच्या न येण्याच्या दुःखाने व्याप्त, अशी नायिका ही विरहोत्कण्ठिता नायिका होय. प्रियकराच्या विरहाने उत्कंठित झालेली नायिका म्हणजे विरहोत्कण्ठिता नायिका होय.

**३) स्वाधीन-भर्तृका -** भर्तृ म्हणजे पति जिच्या अधीन आहे, अशी नायिका. नायिका आपल्या प्रियकराच्या सहवासाचे सुख अनुभवते, त्यामुळे ती आनंद, सौभाग्य आणि अभिमान या भावनांनी युक्त असते.

**४) कलहान्तरिता** – ज्या नायिकेचा प्रियकर अथवा पति हा तिच्या ईर्ष्या आणि कलह यांमुळे तिच्यापासून दूर गेला आहे आणि तिच्याकडे येत नाही, त्यामुळे दुरावलेली, रागावलेली नायिका म्हणजे कलहान्तरिता होय.

**५) खण्डिता** - अनेक कार्यांमध्ये व्यस्त असल्याने किंवा अन्य स्त्रीकडे आकर्षित झाल्याने जिचा प्रियकर तिच्याकडे येत नाही. त्यामुळे दुःखाने आर्त झालेली नायिका म्हणजे खण्डिता होय.

**६) विप्रलब्धा -** प्रियकराकडून अथवा पतिकडून दिलेला शब्द किंवा भेटीचे आश्वासन न पाळण्याने अपमानित झालेली, फसवली गेलेली नायिका म्हणजे विप्रलब्धा होय.

**७) अभिसारिका** – जी नायिका मदाने किंवा मदनाने व्याप्त झालेली, लज्जा सोडून आपल्या प्रियकरास भेटावयास जाते, तिला अभिसारिका म्हणतात. मृच्छकटिकम् या रूपकातील नायिका वसंतसेना ही भर पावसात आपल्या प्रियकराला, चारुदत्ताला भेटावयास त्याच्या घरी जाते. तेव्हा ती साधारणा अभिसारिका होते.

**८) प्रोषितभर्तृका** – जिचा पति हा काही महत्त्वाच्या कार्यामुळे तिच्यापासून दूर परदेशी गेला असेल त्यावेळी त्याच्या विरहाने व्रतस्थ, केशसंस्कारविरहीत, सुशोभना विरहीत राहणारी, ती प्रोषितभर्तृका नायिका होय. मेघदूतम् या कालिदासाच्या खंडकाव्यामध्ये यक्षाच्या पत्नीचे प्रोषितभर्तृका या अवस्थेतील चित्रण केले आहे.

खरे पाहता वर उद्‌धृत केलेले हे नायिकेचे प्रकार नसून नायिकेच्या प्रणयावस्थेतील विविध अवस्था किंवा शारीरिक, मानसिक प्रतिक्रिया आहेत. यापैकी वासकसज्जा स्वाधीन-भर्तृका आणि अभिसारिका या तीनच केवळ तिच्या आनंदी व उत्साही अवस्थांचे निदर्शक आहेत, अन्यथा इतर सर्व या तिच्या दुःखी, कष्टी अवस्थांचे प्रत्यंतर देतात.

भरतमुनींनी नायिकेचे अजून तिच्या कुलोत्पत्तीवर अवलंबून विभाजन केलेले दिसते. त्यानुसार ती दिव्या, नृपपत्नी, कुलस्त्री आणि गणिका असे चार भेद केले आहेत. कालिदासाच्या मालविकाग्निमित्रम् नाटकातील ज्येष्ठ दोन राण्या, धारिणी आणि ईरावती, विक्रमोर्वशीयम् या त्रोटकातील औशिनरी या नृपपत्नी आहेत. तर त्याच त्रोटकातील राजा पुरुरवाची प्रेयसी, उर्वशी ही अप्सरा असल्याने दिव्या नायिका आहे. तर मृच्छकटिकम् मधील नायक चारुदत्ताची पत्नी, धूता ही कुलजा नायिका असून प्रेयसी वसंतसेना ही गणिका आहे. याचे पुढे जाऊन पुन्हा धीरा, ललिता, उदात्ता व निभृता  हे चार प्रकार भरतमुनींनी सांगितले आहेत. यापैकी दिव्या आणि नृपपत्नी या चारपैकी कोणत्याही प्रकारच्या दाखविल्या जाऊ शकतात, मात्र  कुलजा ही केवळ उदात्ता आणि निभृता या दोनच अवस्थांमध्ये असून शकते.

अशाप्रकारे नायकांपेक्षा नायिकांचे वर्गीकरण करण्यात नाट्यशास्त्राकारांनी जास्त शक्ति खर्ची घातलेली दिसते. नाट्यकला ही लोकाभिमुख व लोकरंजनाची कला असल्याने ती समाजाचे प्रतिबिंबच दर्शविते. कोणतीही नाट्यकृती एकवेळ धाडसी असेल मात्र, ती समाजविमुख असू शकत नाही. त्यामुळे नायिकांच्या या वर्गीकरणातून शास्त्रकारांनी तत्कालीन समाजाचे रूप हेरून, स्त्रीस्वभावाचे विविध पैलू उत्तमरित्या उचलून त्यास शास्त्रीय बैठक देण्याचा प्रयत्न हा, नायिकेच्या अवस्थांतरातून केल्याचे दिसून येते.

### २.४) स्वंय अध्ययनाचे प्रश्न

१) नान्दी हे पूर्वरंगाचे कितवे अंग आहे ?

१) तेरावे २) बारावे ३) चौथे ४) तिसरे

२) नांदीचे गायन खालीलपैकी कोण करतो/ करते?

१) नटी २) नायक ३) सूत्रधार ४) मारिष

३) खालीलपैकी कोणत्या नायिकेच्या बाबतीत धीरा, अधीरा व धीराधीरा हे भेद

संभवत नाहीत?

१) मध्यमा २) मुग्धा ३) प्रगल्भा ४) यापैकी कोणीही नाही.

४) आमुख हा कोणत्या वृत्तीचा एक प्रकार आहे?

१) सात्वती २) आरभटी ३) कैशिकी ४) भारती

५) उत्तररामचरितम् या नाटकातील रामाचे पात्र हे कोणत्या प्रकारच्या नायकाचे प्रतिनिधीत्व करते?

१) अनुकूल २) दक्षिण ३) शठ ४) धृष्ठ

६) मालविकाग्मनमित्रम् मधील अग्निमित्र हा कोणत्या नायकाचे प्रतिनिधीत्व करतो?

१) धीरप्रशांत २)धीरोदात्त ३)धीरललित ४) धीरोद्धत

७) नाट्यशास्त्रानुसार प्रस्तावना कोण सादर करतो ?

१) सूत्रधार २) स्थापक ३) नायक ४) पारिपार्श्वक

८) कोणत्या प्रकारच्या नायिकेला प्रमुख नायिका म्हणून दर्शवू नये, असे धनंजयाचा सांगितले आहे?

१) मुग्धा स्वीया २) साधारणा

३) अविवाहित परकीया ४) विवाहित परकीया

९) प्रस्तावनेचे किती प्रकार दशरूपकामध्ये सांगितले आहेत?

१) पाच २) तीन ३) दोन ४) चार

१०) नांदीमध्ये कोणत्या घटकाचा समावेश हा शास्त्रात सांगितला नसताना प्रयोगामध्ये दिसून येतो ?

१) राजा २) ब्राह्मण ३) प्रेक्षक ४) देव

**२.५) पारिभाषिक शब्द, शब्दार्थ**

या घटकामध्ये नाट्यशास्त्रीय संकल्पना सांगत असताना काही पारिभाषिक संज्ञांचा नामोल्लेख आपल्याला आढळतो. त्यांचे विवेचन मुख्य पुस्तकात दिलेले आहे. येथे त्यांचे थोडक्यात स्पष्टीकरण दिले आहे.

**१) नांदी** - आशिर्वादयुक्त वचने आणि देव, द्विज व नृप इत्यादीकांची स्तुति ज्यात असते, म्हणून त्यास नांदी म्हणावे.

**२) सूत्रधार -** अनेक भावांमध्ये बद्ध असे गीत, वाद्य, पाठ्य यांचे ज्ञान असणाऱ्या जाणत्या व्यक्तींकडून झालेल्या उपदेशामुळे सूत्राचा जाणकार असा सूत्रधार होय.

**३) प्रस्तावना -** जेथे सूत्रधार, नटी किंवा मारिष किंवा विदुषक यांच्याशी संवाद करुन बहुविध वाक्यांतून नाट्याचा आक्षेप, सूचन करतो, त्यास आमुख किंवा प्रस्तावना म्हणावे.

**४) भारती वृत्ती -** पुरुष पात्रांकडून वापरला जाणारा, स्त्रीवर्जित, संस्कृतभाषेचा वापर असणारा, वाक्यबहुल, असा भरत म्हणजे नटांकडून प्रयुक्त केला जाणारा शब्दव्यापार म्हणजे भारती वृत्ती होय.

**५) अर्थप्रकृती** – नाट्याच्या ध्येयप्राप्तीचे उपाय. त्यास नाट्यतत्त्वे अथवा नाट्याचे घटक असे सुद्धा म्हणता येईल. ते बीज, बिंदु, पताका, प्रकरी व कार्य असे एकूण पाच आहेत.

**६) पताका -** नाट्यामध्ये येणारे असे कथानक की, जे दुसऱ्याला म्हणजे मुख्य कथानकाला उपकारक असते व जे मुख्य कथानकाप्रमाणे व्यापक असते, त्यास पताका असे म्हणतात.

**७) पताकास्थानक** – नाट्यातील आगामी कथानकाच्या सूचनाची एक नाट्यक्लृप्ति, युक्ति.

**८) नायक** – जो नाट्यकथेला पुढे नेतो व नाट्यफलाचा जो अधिकारी असतो, त्यास नेता, नायक असे म्हटले जाते.

**२.६) स्वयं अध्ययनाच्या प्रश्नाची उत्तरे**

घटक ३.४ मधील प्रश्नांची उत्तरे येथे दिली आहेत.

| | | |
|---|---|---|
| (१) १ - तेरावे | (२) ३ - सूत्रधार | (३) २ - मुग्धा |
| (४) ४ - भारती | (५) १ - अनुकूल | (६) ३ - धीरललित |
| (७) २ - स्थापक | (८) ४ -विवाहित परकीया | (९) २ - तीन |
| (१०) ३ - प्रेक्षक | | |

**२.७) सारांश -** प्रस्तुत घटकातून आपण नाट्यशास्त्रीय संकल्पानांचा सामान्य परिचय करुन घेतला. या संकल्पनाचा विकास व त्याबाबत असलेली मतमतांतरे सुद्धा जाणून घेतली. तसेच नाट्यसाहित्यामध्ये दिसून येणारी त्यांची उदाहरणे सुद्धा पाहिली.

**२.८) स्वाध्याय – सरावासाठी प्रश्न**

**अ) विवेचक टीपा लिहा.**

१) पताकास्थानक

२) सूत्रधार

३) पताका

**ड) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) नान्द्यन्ते ततः प्रविशति सूत्रधार या वाक्याचा अर्थ व स्पष्टीकरण संस्कृत अभ्यासकांनी कसे केले आहे, ते स्पष्ट करा.

२) नायकांचे प्रकार सोदाहरण सविस्तर विशद करा.

३) प्रस्तावनेचे प्रकार सोदाहरण विशद करा.

**२.९) क्षेत्रीय कार्य**

**१**) नायिकांचे प्रकार सांगून संस्कृत साहित्यात त्यांचे प्रकार कसे रंगविले आहेत, ते दाखवून द्या.

**२.१०) अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ**

**प्राथमिक स्रोत** –

१) *दशरूपकम्*, मुसळगावकर, केशवराव, चौखम्बा प्रकाशन, पुनर्मुद्रण, २०१७.

२) *भरतनाट्यशास्त्रम्*, शास्त्री, बाबूलाल शुक्ल, चौखम्बा संस्कृत संस्थान, वाराणसी, पुनर्मुद्रण, २०१८.

*३) साहित्यदर्पण*, मिश्र, हरेकान्त, चौखम्बा ओरियान्टालिया, दिल्ली, २०१७.

**दुय्यम स्रोत**

१) भट, गोविन्द केशव, *नाट्य-मञ्जरी-सौरभ*, (इंग्रजी) भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंडळ, पुणे, १९८१.

२) शास्त्री सुरेंद्रनाथ, *The Laws and Practics of Sanskrit Drama*, (इंग्रजी) चौखम्बा संस्कृत सीरिज ऑफीस, वाराणसी, १९६१.

**घटक क्रमांक – ३**

## घटक क्रमाक – ३

# उत्तररामचरितम् (प्रथम अंक – सूक्ष्म अध्ययन)

**अनुक्रम**

**३.१) उद्दिष्टे**

**३.२) प्रस्तावना**

**३.३) विषय विवेचन - भाषांतर**

**३.४) स्वयं अध्ययनाचे प्रश्न**

**३.५) पारिभाषिक शब्द, शब्दार्थ**

**३.६) स्वयं अध्ययनाच्या प्रश्नाची उत्तरे**

**३.७) सारांश**

**३.८) स्वाध्याय**

**३.९) क्षेत्रीय कार्य**

**३.१०) अधिक वाचनासाठी**

### ३.१) उद्दिष्टे -

या घटकाच्या अध्ययनातून विद्यार्थ्यांना -

१) भवभूती नामक संस्कृत कवीची व त्याच्या ग्रंथसंपदेची ओळख होईल.

२) उत्तररामचरितम् या नाटकाच्या कथानकाचा परिचय होईल.

३) नाटककार म्हणून भवभूतीची प्रतिभा व नाट्यकौशल्य कळून येईल.

४) संस्कृतनाट्यांचा आस्वाद आणि समीक्षणासाठी सहाय्य होईल.

### ३.२) प्रस्तावना

घटक क्रमांक १ व २ मध्ये आपण संस्कृत नाट्याचे स्वरूप आणि विकास तसेच नाट्यसंकल्पांचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत घटकात आपण संस्कृतमधील भवभूतीच्या उत्तररामचरितम् या नाटकाच्या प्रथम अंकाचा सूक्ष्म परिचय करुन घेणार आहोत.

भवभूति हा संस्कृत साहित्यातील अग्रगण्य नाटककार मानला जातो. उत्तररामचरितम् या संस्कृत नाटकात त्याच्या कलासामर्थ्याने अत्युच्च बिंदू गाठलेला दिसून येतो. त्यामुळे त्याचे हे नाटक संस्कृत

साहित्यातील अजोड कलाकृती मानली जाते. या करुणरसप्रधान व प्रभावशाली नाटकानेच भवभूतीला रसिकांच्या हृदयात अनन्यसाधारण स्थान मिळवून दिले आहे. यामुळेच 'उत्तरे रामचरिते भवभूतिर्विशिष्यते।' ही सार्थ उक्ति प्रचलित झाली.

भवभूतीचे उत्तररामचरितम् हे संस्कृत काव्यातील दृश्य काव्यापैकी नाटक या रूपक प्रकाराचे उदाहरण आहे. नाट्यशास्त्राच्या नियमानुसार नाटक व प्रकरण हे नाट्यतंत्रदृष्ट्या पूर्णपणे विकसित अशी रूपके आहेत. यातील विषय-वस्तु (कथानक) हा प्रसिद्ध (ख्यातवृत्त) तसेच देवता, मनुष्य, राजे किंवा महात्मा यांच्या आयुष्यातील एखाद्या प्रसंगाचा किंवा त्यांच्या आयुष्याचा पट मांडणारा असावा. नाटक हे पाच ते दहा अंकांमध्ये विभागलेले असावे. त्याचा नायक हा राजा असल्यास क्षत्रियकुलोत्पन्न व धीरोदात्त वृत्तीचा असावा. शृंगार, वीर किंवा करुण रसाचा त्यांत अंगीरूपात परिपोष केलेला असावा. चार पुरुषार्थांपैकी एका पुरुषार्थाचे संकीतर्न यातून व्हावे, असे ठोबळ नियम नाट्यशास्त्रीय ग्रंथांनी घालून दिलेले आहेत. या नाट्यशास्त्रीय नियमांचे तंतोतंत पालन भवभूतीने त्याच्या उत्तररामचरितम् या नाटकात केलेले दिसते. यात कवीने आदिकवी वाल्मिकींच्या रामायण या महाकाव्याच्या नायकाचे, रामाचे उत्तरचरित्र मांडणे, हा या रूपकाचा विषय-वस्तु म्हणून निवडला आहे. हे काव्य व त्याचे कथानक भारतीय संस्कृतीचे अविभाज्य अंग असल्याने तत्कालीन सामाजिकांना (प्रेक्षकांना) आणि सार्वकालीक वाचकांना सुपरिचित आहे. किंबहुना, रामाचे चरित्र हे कथानक म्हणून निवडल्या बरोबर, धीरोदात्त नायक, वीर व करुण रस, पुरुषार्थ संकीर्तन, देव किंवा क्षत्रियकुलोत्पन्न राजा असा नायक, असे अनेक नियम एकाच कथानिवडीमुळे कवीकडून साध्य झाले आहेत. तसेच रामचरित्राचा उत्तरार्धच केवळ कथानकासाठी निवडल्याने कवीने त्याच्या प्रतिभेने उलगडलेले कथेचे पदर आणि त्याची वैशिष्ट्यपूर्ण मांडणी यांचा सम्यक आस्वाद रसिक वाचक आणि प्रेक्षक उत्तमरित्या घेऊ शकतील, या विचाराने सुपरिचित कथानकच कवीने आपल्या सात अंकी काव्यातून हाताळले आहे. केवळ या तांत्रिक नियमांच्या परिपूर्तीसाठी नव्हे तर रामाच्या उदात्त आणि आदर्शवत् चरित्राने भारावून गेल्याने अगदी भासापासून अनेक नाटककारांनी ही कथा नाट्यरूपाने हाताळली असली तरी पुन्हा स्वयंप्रज्ञेतून आणि प्रतिभेतून या कथेकडे पाहण्याचा भवभूतीला झालेला मोह, हे सुद्धा रामचरित्राच्या निवडीचे कारण असू शकेल.

**१) भवभूतीची वैयक्तिक माहिती -** संस्कृत कवी आपली स्वतःची माहिती स्वलेखणीने सांगताना अगदी विरळाच आढळतात. त्यामुळे त्यांच्या वैयक्तिक माहितीकरिता आपल्याला किंवदंती, इतर संदर्भांवर अवलंबून राहते. यास भवभूति हा सुदैवाने हा अपवाद ठरतो कारण भवभूतीने आपल्या तिन्ही नाट्यकलाकृतींमधून त्याच्या कुटुंबाबद्दल पुरेशी माहिती दिलेली आढळते. दक्षिणापथातील पद्मपूर हे भवभूतीच्या काश्यपगोत्रीय घराण्याचे मूळ ग्राम. कृष्णयजुर्वेदाच्या तैत्तिरीय शाखेचे हे घराणे अनुयायी होते. महाकवी आणि वाजपेययाजी भट्टगोपाल यांचा तो नातू असून उदुंबर हे त्याचे कुलनाम होते. त्यांच्या पूर्वजांकडून सोमयाग, अग्निहोत्र यांचे अनुष्ठान चालत असे. त्याच्या आईचे नाव जातूकर्णी व वडिलांचे नाव नीलकंठ असे होते. यावरुन, त्याचे घराणे धार्मिक व कर्मठ वृत्तीचे होते असे दिसते. भवभूती स्वतः

व्याकरण (पद), मीमांसा (वाक्य) आणि न्याय (प्रमाण) या तिन्ही ज्ञानशाखांत पारंगत असल्याचे तो स्वत: नमूद करतो. अशाप्रकारे त्याच्या कुटुंबाकडून त्यास धार्मिक आचरणाचा, शास्त्रीय आणि साहित्यिक अभ्यासाचा असा समृद्ध वारसा लाभला होता. ज्ञाननिधी हे भवभूतीचे गुरु होते. तो स्वतः चा उल्लेख 'श्रीकण्ठपदलाञ्छन' असा करतो. याचा अर्थ श्रीकंठ हे त्याचे बिरुद असून भवभूती हे त्याचे खरे नाव आहे. मात्र काही अभ्यासकांच्या मते श्रीकंठ हे त्याचे खरे नाव असून भवभूति हे त्याचे टोपणनाम आहे, कारण त्याच्या वडीलांचे नाव नीलकंठ आणि त्याचे नाव श्रीकंठ अशाप्रकारे मुद्दाम किंवा सहजगत्या पिता-पुत्रांच्या नावांतील साधर्म्य पाळलेले दिसते. भवभूति याचा अर्थ भव म्हणजे शंकर आणि भूति म्हणजे भस्म, अशाप्रकारे 'शंकाराचा भस्म', 'शिवभस्म' असा होतो. मात्र, काहींच्या मते भूति म्हणजे समृद्धी असा अर्थ करुन 'शंकराच्या प्रसादाने मिळालेली समृद्धी' असा या शब्दाचा अर्थ केला आहे. मालतीमाधवाच्या एका उपलब्ध हस्तलिखितामध्ये भवभूतीस कुमारिलशिष्य म्हणून संबोधले असून त्याचे उंबेकाचार्य हे नाव दिले आहे. मात्र, भवभूतीने स्वत: आपल्या गुरुचे नाव ज्ञाननिधी असे सांगितल्याने आणि या हस्तलिखितानुसार कुमारिलभट्ट हे गुरु ठरत असल्यामुळे, येथे त्याच्या आचार्यांबाबतीत विरोधाभास निर्माण होत आहे. परंतु, त्यास एकाहून अधिक गुरु असू शकतील, असे समजून दोन्ही संदर्भांची विश्वासर्हता सांभाळता येऊ शकते. त्याची सर्व नाटके ही कालप्रियनाथाच्या जत्रेत सादर केली गेली होती, असे तो स्वतः त्याच्या रूपकांच्या प्रस्तावनेत सांगतो. या कालप्रियनाथाचे ठिकाण विद्वानांनी वेगवेगळे ठरविले आहे. काहींच्या मते उज्जैनचे प्रसिद्ध महाकाल मंदिर तर काहींच्या मते यमुनेच्या दक्षिणतीरावरील काल्पी येथील सूर्यमंदिर म्हणजेच कालप्रियनाथाचे मंदिर होय. अभ्यासकांनी दक्षिणपथावरील पद्मपूर म्हणजे यवतमाळ जिल्ह्यातील पैनगंगा नदीवरील उमरखेड हे गाव असे सिद्ध केले आहे. एकूण, भवभूति हा विदर्भ आणि माळवा प्रांताचा रहिवासी होता, असे सामान्यपणे सांगता येईल.

**२) भवभूतीचा काळ -** भवभूतीचा काळ हा निश्चित करण्यासाठी त्याच्या काळाच्या पूर्वोत्तर सीमा निश्चित करणे आवश्यक आहे. याकरिता सुदैवाने आपणास अनेक संदर्भ उपलब्ध होतात. बाराव्या शतकातील कल्हणलिखित राजतंरगिणी या ऐतिहासिक काव्यग्रंथात काश्मीरचा राजा ललितादित्य याने कन्नोजचा राजा यशोवर्मा यास युद्धात हरविल्याचा उल्लेख आला आहे आणि तो यशोवर्मा राजा वाक्पतिराज आणि भवभूती या कवींकडून सेविला गेला होता, असा उल्लेख सुद्धा आला आहे.[32] राजा यशोवर्मा याच्या दरबारी असणाऱ्या कवि वाक्पतिराज याने गउडवहो नावाचे प्राकृत काव्य लिहिले आहे. यातून त्याने राजा यशोवर्म्याचे चरित्र आणि त्याने गौड राजाचा केलेला पराभव काव्यमय पद्धतीने सांगितला आहे. यात तो भवभूतीचा मोठ्या आदराने उल्लेख करतो.[33] त्या काव्यात एका ग्रहणाचा उल्लेख आलेला आहे. त्यावरुन त्या काव्याचा काळ अभ्यासकांनी इ.सन ७४०असा निश्चित केला आहे. भवभूतीकडून प्रेरणा घेऊन वाक्पतिराज लिहितो, असे त्याने स्वतः सांगितले असल्याने तसेच ते दोघे एकाच राजाच्या आश्रयी

[32] कविवाक्पतिराजश्रीभवभूत्यादिसेवितः। जितो ययौ यशोवर्मा तद्गुणस्तुतिबन्दिताम्। राजतंरगिणी, ४.१४४.

[33] भवभूतिजलधिनिर्गतकाव्यामृतरसकणा इव स्फुरन्ति। यस्य विशेषा अद्यापि विकटेषु कथानिवेशेषु।। गउडवहो, ७९९.

असल्याने समकालीन ठरतात आणि त्यात भवभूति हा वयोज्येष्ठ ठरतो. त्यामुळे भवभूतीचा काळ हा सातव्या शतकाचा उत्तरार्ध किंवा आठव्या शतकाचा पूर्वार्ध असा निश्चित करण्यात आला आहे. भवभूतीचा निश्चित केलेला हा काळ त्याच्या आठव्या शतकाअगोदर लिहिलेल्या ग्रंथात न येणाऱ्या आणि आठव्याशतकांनतरच्या लिहिलेल्या ग्रंथात येणाऱ्या उल्लेखांवरुन योग्य व बरोबर असल्याची खात्री सुद्धा पटते. बाणभट्टाने त्याच्या काव्यात पूर्वकवींचा आदराने उल्लेख केला आहे. मात्र त्यात भवभूतीचा उल्लेख नाही, यावरुन तो बाणानंतर होऊन गेला, असे मानावे लागेल. बाण हा सम्राट हर्षाचा आश्रित होता, म्हणून त्याचा काळ सातव्या शतकाचा पूर्वार्ध ठरतो. म्हणून ही भवभूतीच्या कालाची पूर्व मर्यादा झाली. वामनकृत काव्यालंकारसूत्रवृत्तीत भवभूतीच्या महावीरचरितातील श्लोक (१.५४) उद्धृत केला आहे. आणि वामनाचा काल इ.स. ८०० च्या सुमाराचा आहे. म्हणजे भवभूती इ.स.८०० पूर्वी होऊन गेला. म्हणजे इ.स. ६५० ते इ.स. ८०० च्या दरम्यान भवभूतीचा काल होता, असा निष्कर्ष काढता येतो. त्याचप्रमाणे अधिक निर्णायक काल ठरविण्यास इतर प्रमाणे देखील आढळतात.

**३) भवभूतीच्या काव्यकृती –** भवभूतीच्या आजमितीस तीन नाट्यकृती उपलब्ध आहेत. कालानुक्रमानुसार त्या पुढीलप्रमाणे आहेत.

**३.१) महावीरचरितम् –** रामाचे जीवनचरित्र अत्यंत रोचक व प्रदीर्घ असल्याने त्याने त्याचे दोन नाटकांत विभाजन केले आहे. यापैकी भवभूतीची पहिली नाट्यकृती, महावीरचरितम् यामध्ये कवीने रामाच्या आयुष्यातील निवडक जीवन-वृत्तांतांचे प्रसंग हे वाल्मिकींच्या रामायण या महाकाव्यातील प्रथमकांडापासून युद्धकांडापर्यंतच्या भागातून घेऊन नाट्य स्वरूपात सादर केला आहे. महावीरचरितम् नंतर येणाऱ्या उत्तररामचरितम् या नाटकातील कथेची सुरुवात पाहता ती रामाच्या राज्याभिषेकापासून सुरु होते. म्हणजे रामचरित्राचा याच्या अगोदरचा भाग हा महावीरचरितम् मध्ये असणे आवश्यक आहे. आजमितीस हे नाटक सात अंकात उपलब्ध आहे. परंतु यातील पाचव्या अंकापर्यंतचा भागच केवळ भवभूतीने लिहिलेला आहे. या नाटकाच्या उत्तर व दक्षिण भारतातील हस्तलिखितांमध्ये अंक क्रमांक सहा ते सात पर्यंतच्या भागाचे अनेक पाठभेद आढळतात. तसेच काव्यशास्त्रीय ग्रंथांमध्ये जेथे जेथे महावीरचरितम् चे संदर्भ दिलेले आहेत तेथे ते पाचव्या अंकापर्यंतचे आहेत. वाल्मीकिरामायणातील बालकांड ते किष्किंधाकांड येथपर्यंतचा निवडक वृत्तांत भवभूतीने या नाटकातील पहिल्या पाच अंकात वर्णिला आहे तर उर्वरित दोन अंकामध्ये तेथून पुढील युद्धकांडापर्यंतचा कथावृत्तांत येतो. नाटकाच्या नामाभिधानाला साजेसा असा, रामाच्या आयुष्यातील त्याच्या पराक्रमाचे वर्णन करणारा आणि त्याद्वारे वीर रसाचा परिपोष करणारा कथाभाग यात प्रामुख्याने येतो. परशुरामाशी कलह, मंथरावृत्तांत, वालीवध, या सर्व घटनांचे मूळ हे रावणच असल्याचे भवभूतीने यात दर्शविले आहे. जरी राम हा नाटकाचा नायक असला तरी यात केवळ रामाचे शौर्य आणि पराक्रम कवीला दाखवायचा नसून रामाबरोबर परशुराम, रावण, हनुमान, जटायु, विश्वामित्र यांचा पराक्रम सुद्धा त्याने गौरविला आहे आणि या सर्वांच्या संदर्भात त्याने 'वीर' हा शब्द अनेकदा वापरला आहे. मूळ रामायणकथेत कथानकासाठी कवीने अनेक फेरबदल केलेले येथे आढळतात. भवभूतीचे हे पहिलेवहिले नाटक

समीक्षकांच्या पसंतीस काही उतरले नाही. याचे शल्य त्याने त्याच्या दुसऱ्या नाटकाच्या सुरुवातीस व्यक्त केले आहे.

**३.२) मालतीमाधव –** मालतीमाधव हे शुद्ध व संकीर्ण यापैकी शुद्ध प्रकारचे प्रकरणरूपक आहे. बृहत्कथेतील दोन कथा घेऊन त्यातून कवीने दहा अंकात एक कलात्मक नाट्यनिर्मिती केलेली येथे दिसते. यात पद्मावतीच्या राजाच्या मंत्र्याची कन्या, मालती व विदर्भराज्याच्या मंत्र्याचा पुत्र, माधव यांच्या प्रमुख प्रणय कथानकासहित त्यांचे मित्र व मैत्रीण, मकरंद व मदयंतिका यांच्या प्रणयाचे उप-कथानक सुद्धा दिले आहे. यातील नायिका ही कुलीन कन्या असल्याने ते नाट्यशास्त्रीय दृष्ट्या शुद्ध प्रकरण होते. प्रकरण रूपक असल्याने यातील कथानक हे ऐतिहासिक नसून कविकल्पित असते. नायिकेचे तिच्या मर्जीविरुद्ध मातापित्यांनी लग्न ठरविले असता नायक-नायिकांची ताटातूट व पुनर्मिलन असा कथानकाचा विषय आहे. शेवटी अनेक संकटांना पार करुन या दोन प्रणयी जोडप्यांचा विवाह संपन्न होतो. यातून कवीने आपले प्रेमासंबधी मौलिक व उदात्त विचार मांडले आहेत. तसेच तत्कालीन समाजातील अनेक चाली व रुढींचा अंमल यातून प्रतीत होतो, जसे सिद्धी-प्राप्तीसाठी स्मशानगमन, तांत्रिक अघोरघंटाद्वारे नायिका मालतीचा नरबळी देण्याचा प्रयत्न, अघोरघंटाची शिष्या कपालकुंडलेकडून केले गेलेले मालतीचे अपहरण इत्यादी. या प्रकरणात श्रृंगार व अद्भूत रसाचा आविष्कार पहावयास मिळतो तसेच कवीचे योग व तंत्रशास्त्रासंबंधीचे ज्ञान सुद्धा प्रतीत होते.

**३.३) उत्तररामचरितम् –** हे तिसरे व शेवटचे नाटक रामायणाचा उत्तरार्ध म्हणजे उत्तरकांडातील रामचरित्र सात अंकात प्रस्तुत करते. यात कवीने स्वप्रतिभेने रामायणाच्या शेवटात बदल करुन राम व सीता यांचे पुनर्मिलन पडद्यावर दाखविले आहे. प्रथम अंकात सीतापरित्यागाचा प्रसंग दर्शविल्यानंतर पुढील अंक हे त्यांचे प्रथम मानसिक शल्यनिवारण आणि पुनर्मिलनासाठी मानसिक पूर्वतयारी करण्यात खर्ची घातले आहेत. गर्भांकांचा (नाटकात नाटकाचे सादरीकरण) प्रयोग कवीने नाटकात सादर करुन अयोध्यावासीयांना सीतेच्या बाबतीत त्यांनी केलेली जनापवादरूपी घोडचूक निदर्शनास आणून दिली आहे. हे भवभूतीच्या नाटकातील सर्वश्रेष्ठ नाटक आहे. हे सुखान्त पर्यवसायी असूनही हे करुण रसाने भारलेले आहे. या नाटकात प्रत्यंतरीत होणाऱ्या कवीच्या अत्युच्च नाट्यकौशल्यामुळे व प्रतिभेमुळे “उत्तरे रामचरिते भवभूतिर्विशिष्यते।“ ही उक्ति रूढ झाली आहे.

या तीन नाटकांखेरीज अनेक स्फुट श्लोक हे भवभूतीच्या नावाने सुभाषितसंग्रह ग्रंथांमध्ये दिसून येतात. ते श्लोक वरील तीनही नाटकात आढळून येत नाहीत. तसेच तत्त्वप्रदीपिका नामक चित्सुखाचार्यांच्या ग्रंथात भवभूतीच्या नाटकनाटिकादिप्रबन्ध रचनेचा उल्लेख केला आहे. याचाच अर्थ या तीन नाटकांव्यतिरिक्त त्याच्या इतर काही कलाकृती असू शकतील. मात्र, त्या कालपरत्वे नष्ट झाल्याने आज आपल्याला अनुपलब्ध आहेत.

**४) प्रथम अंकाचा गोषवारा-** रामाचे जीवनचरित्र अत्यंत रोचक व प्रदीर्घ असल्याने त्याने त्याचे दोन नाटकांत विभाजन केले आहे. यापैकी भवभूतीची पहिली नाट्यकृती, महावीरचरितम् यामध्ये कवीने रामाच्या

आयुष्यातील निवडक जीवन-वृत्तांतांचे प्रसंग हे वाल्मिकींच्या रामायण या महाकाव्यातील प्रथमकांडापासून युद्धकांडापर्यंतच्या भागातून घेऊन नाट्य स्वरूपात सादर केला आहे. रामायणाच्या उत्तरकांडामधील रामचरितासंबंधीचे चित्रण करणे एवढाच विषय हा उत्तररामचरितम् या नाटकाचा आहे. मात्र हा विषय-वस्तु असंबद्ध वाटू नये, याकरिता कवीने कल्पकतेने प्रस्तुत नाटकाच्या प्रथम अंकाच्या सुरुवातीला प्रस्तावनेतून अयोध्या आगमनानंतरचा वृत्तांत थोडक्यात कथन करुन, कोणत्या पाश्वर्भूमीवर नाटक सुरु होत आहे, याची कल्पना वाचकांस दिली आहे. तसेच कवीने प्रथम अंकात चित्रपट-दर्शन प्रसंग अंतर्भूत केला आहे, जेणे करुन त्या पार्श्वभूमीवर राम-सीतेच्या आयुष्यातील प्रसंगाची संगती वाचकाच्या मनःपटलावर उमटेल. तसेच या पार्श्वभूमीवर सीतात्यागाचा पुढील प्रसंग हा उठावदार दिसेल. राम आणि सीता यांच्या अद्वैत प्रेमासमोर सीतात्याग हा कवीला विपर्यस्त वाटल्याने त्याने संस्कृत काव्यांमध्ये तसेच आधुनिक भारतीय साहित्यामध्ये कोठेही दिसून न येणारे राम-सीतेचे पुनर्मिलन हे घडवून आणले आहे आणि सीतेला काव्यगत न्याय दिला आहे. राम-सीतेच्या वैवाहिक आयुष्यातील अत्यंत आनंदी क्षण, जीवन हे त्यांनी वनवासात घालविले होते. त्यामुळे सीतात्यागाच्या अगोदर त्यांचे पारस्पारिक प्रेम अधोरेखित करणे, हा सुद्धा कवीचा हेतु आहे. प्रथम अंक जरी दीर्घ असला तरी सर्वच घटनाप्रसंग हे कथाविकासासाठी आवश्यक आहेत.

भवभूतीने राम व सीतेच्या संवादातून परस्परांवर अत्यंत प्रेम करणारे एक तरुण विवाहीत जोडपे उभे केले आहे आणि त्यापार्श्वभूमीवर सीतेचा परित्याग हा रामाकरिता कशी अगतिकता होती, हे दाखवून दिलेले आहे.

**४.१) नाटकाची प्रस्तावना –** प्रथम अंकाच्या सुरुवातीला कवीने कवींच्या पूर्वसूरींना म्हणजेच आदिकवींना नमन करुन विद्येची अधिष्ठात्री देवी, सरस्वती हिला वंदना करुन आपल्या नाटकाला सुरुवात केली आहे. भवभूतीने नाटकाच्या प्रस्तावनेचा पूरेपूर आणि कल्पकतेने उपयोग केलेला दिसतो. सूत्रधार आणि नट यांच्यातील माफक संवादातून त्याने पुढील घटनांचे सूचन केले आहे.

१) नाटक कालप्रियनाथाच्या यात्रेमध्ये सादर केले जात आहे, याची माहिती दिली.

२) नाटककाराचे कूळ व वैयक्तिक माहिती दिली, जेणेकरुन प्रेक्षकांना नाटक पाहण्याची ओढ लागेल. कवीचे नाव भवभूती असून तो काश्यपवंशीय आहे. त्याचे टोपणनाव श्रीकंठ आहे. तो व्याकरण (पद), मीमांसा (पद) आणि न्याय (प्रमाण) शास्त्रात पारंगत आहे. त्याच्या वडीलांचे नाव नीलकंठ आणि मातेचे नाव जातूकर्णी आहे. त्यास वाग्देवता वश झाली आहे.

३) नाटक हे कोणत्या पार्श्वभूमीवर सुरु होत आहे, याची कल्पना दिली आहे. अर्थातच, पुलस्त्य कुळाचा धूमकेतु ठरलेल्या रामाच्या राज्याभिषेकानंतर हे कथानक सुरु होते.

४) रामाच्या राज्याभिषेकानंतर प्रदीर्घ काळ चाललेला आनंदोत्सव अचानक थंडावलेला आहे. कारण सीतेचे पिता जनकासहित राज्याभिषेकासाठी उपस्थित असलेल्या अनेक पाहुण्यांना, लंकाधीश्वर वानरराज, दशदिशातून आलेले ब्रह्मर्षी, राजर्षी यांना रामाने निरोप दिला आहे.

५) तसेच, रामाच्या घरातील वडीलधारी मंडळी, कुलगुरु वसिष्ठ व त्यांची पत्नी अरुन्धती, रामाच्या सर्व माता, जावयाच्या घरी गेल्या आहेत. राजा दशरथाला शांता नावाची मुलगी होती, ती त्याने अपत्यरहित रोमपाद राजाला दत्तक दिली होती आणि तिचा विभांडकाच्या मुलाशी, ऋष्यश्रृंगाशी विवाह झालेला आहे. त्याने तब्बल बारा वर्षे चालणारे यज्ञसत्र आयोजित केले आहे. त्यानिमित्ताने कठोरगर्भ असणाऱ्या जानकीली एकटे सोडून त्यांना जावे लागले. म्हणजेच सीतात्यागाचा कठोर निर्णय घेताना, रामाच्या घरातील वडीलधारी मंडळी घरी नव्हती, ज्यांनी रामाच्या निर्णयास प्रत्यवाय केला असता.

६) सीतेचे गरोदरपणाचे दिवस भरत आले आहेत (कठोरगर्भ)

७) सीतेबाबतच्या लोकापवादाचे सूचन श्लोक क्रमांक ५ व ६ मध्ये केले आहे. (यथा स्त्रीणां तथा वाचां साधुत्वे दुर्जनो जनः।, देव्यामपि हि वैदेह्यां सापवादो जनो यतः। रक्षोगृहस्थितिर्मूलमग्निशुद्धौ त्वनिश्चयः।।)

८) ही बातमी राजा रामाच्या कानावर पडल्यास कष्टप्रद होईल, याचे सूचन केले आहे. रामाने पुढे जाऊन सीतात्यागाचा कठोर निर्णय घेतला.

९) सर्व ऋषी आणि देवता श्रेयस्कर करतील, असा आशावाद सुद्धा व्यक्त केला आहे. यातून रामाच्या व सीतेच्या पुनर्मीलनाकडे निर्देश केला आहे.

१०) नातलग मंडळी दूर निघून गेल्याने सीतेची विमनस्क मनःस्थिती झाली आहे व तिचे सांत्वन करण्यासाठी राम राजगृहात प्रवेश करीत आहे. नाटकाचा मुख्य प्रसंग कोणत्या व्यक्तींमध्ये व कोठे सुरु होत आहे, याची माहिती प्रेक्षकांना दिली आहे.

**४.२) चित्रपटदर्शन -** प्रमुख प्रसंगात राम सीतेचे सांत्वन करताना दिसतो. त्यांच्या संवादातील भावनिकता त्यांच्या दृढ प्रेमाचे द्योतक आहे. रामाची सीतेबद्दलची काळजी यातून व्यक्त होते. तोच राम पुढे जाऊन सीतेचा त्याग करतो. या दोन प्रसंगातील विदारकता व भेद सुद्धा कवीला दाखवायचा आहे. त्याच वेळी रामाने सीतेचे मनोविनोदन करण्यासाठी लक्ष्मणास वनवासातील त्यांच्या प्रवासाचे काही चित्रण रेखाटण्यासाठी सांगितले होते. त्याप्रमाणे चित्रकाराकडून ते काढून ती चित्रे घेऊन लक्ष्मण प्रवेश करतो. या चित्रणातून राम-सीतेच्या वनवासातील रम्य सहवासाची पुनश्च अनुभूती व आठवण त्यांना होते. या पार्श्वभूमीवर सीतेचा परित्याग हा अजूनच विदारक, क्रूर वाटतो. चित्रपट दर्शनाने पुढील सूचन केलेले दिसते.

१) कोठपर्यंत चित्रे रेखाटली आहेत, याचे उत्तर लक्ष्मण सीतेच्या अग्निपरीक्षेपर्यंत असे उत्तर देतो. त्याच्या या उच्चारणानेच सीतेबद्दलच्या लोकापवादाचे स्मरण होते व राम स्वतः सीतेच्या शुद्धतेची ग्वाही देतो. (उत्पत्तिपरिपूतायाः किमस्याः पावनान्तरैः तीर्थोदकं च वह्निश्च नान्यतः शुद्धिमर्हतः।) राम सीतेची क्षमा मागतो व हा जनापवाद तुझ्या जीवितापर्यंत तुझ्या बरोबर राहणार असे म्हणतो. या शब्दातून त्या जनापवादाच्या अस्तित्वाची कवी अनाहूतपणे रामास, सीतेस व प्रेक्षकांना कल्पना देतो.

२) जृम्भकास्त्राच्या चित्राने ती रामाला कशी प्राप्त झाली, ते लक्ष्मणाने सांगितले. तेव्हा, राम हा सीतेच्या गर्भांना सुद्धा प्राप्त होतील, असे आशीर्वचन उद्गारतो. व ही पुढे जाऊन लव-कुशांना ओळखण्याची महत्त्वाची खूण ठरते.

३) मिथिलानगरीतील त्यांच्या लग्न सोहळ्याच्या व लग्नानंतर अयोध्येला परत आल्यानंतरच्या रम्य आठवणींमध्ये ते रमतात. राम-सीता या दांपत्याच्या पुढे येणाऱ्या विरहाला या सुखस्मृतींची झालर कवी घालतो.

४) भागीरथी नदीच्या दर्शनाने राम सीतेचे कल्याण करण्याची अनाहूतपणे विनंती भागीरथीस करतो आणि सीतापरित्यागानंतर भागीरथी नदीच्या परिसरात त्यागलेल्या सीतेची काळजी घेतली जाते. सीतेच्या परित्यागानंतरही रामाच्या विनंतीने सीतेचे क्षेमकुशल पाहिले जाते .

५) पंचवटीच्या दर्शनाने त्यांच्या सुखी दाम्पत्यजीवनात पंचवटीचे असलेले महत्त्व अधोरेखित केले आहे. पुढील अंकातील प्रसंग तेथेच दर्शविला असल्याने रामाचा दुःखावेग एवढा तीव्र का झाला आहे, याचे कारण येथे मिळते.

६) सीतेच्या अपहरणामुळे रामाचा झालेला क्षोभ, लक्ष्मणाकडून ऐकून रामाच्या तिच्यावरील प्रेमाचा तिला पुनः प्रत्यय आला. सीतेच्या विरहाने झालेले दुःख रामाला आत्ता सुद्धा अयोध्येत वेदना देत आहे. यातून केवळ स्मरणाने रामाला किती यातना होत आहेत, याची जाणीव सीतेला व प्रेक्षकांना होते. अशा पार्श्वभूमीवर राम सीतेचा त्याग करतो तो जाणून-बजून नसून काही परिस्थितीजन्य दायित्वामुळे त्याला हा निर्णय घ्यावा लागला आहे, याची किमान कल्पना सीतेला व प्रेक्षकांना देण्याचा प्रयत्न कवीने केला आहे. रामाच्या त्या दुःखावेगाला पाहून सीतेला सुद्धा पतीचा विरह झाल्याचा भास निर्माण होतो. माल्यवान पर्वतावरील राम दुःखावेगाने मूर्छित झाल्याचे चित्रण पाहून रामाला सुद्धा तो दुष्ट सीताविरह परत जणू जवळ येऊन ठेपला आहे, असे वाटते. यामुळे मनुष्याला आगामी घटनांची अनाहूत चाहूल आधीच लागते, याचा अनुभव सीतेने व रामाने घेतल्याचे जाणवते.

७) या चित्रांमुळे सीतेस पुन्हा भागीरथी नदीच्या वनराजीत विहार करण्याची (दोहद) इच्छा बळावते. सीतेचे दोहद संपूर्ण करण्याचा नुकताच निरोप अरुन्धती व बहिण शांतेकडून मिळाल्यामुळे, राम तत्परतेने त्याची पूर्तता करण्यास लक्ष्मणास सांगतो. लोकापवादाचे कारण पुढे समजल्यानंतर राम, सीतेच्या दोहदाच्या मिषाने सीतेच्या परित्यागासाठी तेच स्थान वापरतो.

कोणताही क्रिया-कलाप यात नसूनही भावनिक व मनोवैज्ञानिक पातळीवर चित्रपट-दर्शन मोठा परिणाम साधताना दिसतो.

**४.३) दोन दूत-वृत्तांत -**

प्रथम अंकात चित्रपट दर्शना अगोदर ऋष्यशृंगांच्या आश्रमातून अष्टावक्र नावाच्या दूताचे आगमन दाखविले आहे. तो प्रस्तावनेत निर्देश केल्याप्रमाणे, ऋष्यशृंगांच्या आश्रमातून सुखरूप पोहोचलेल्या रामाच्या घरातील वडीलधाऱ्या मंडळींकडून निरोप घेऊन येतो. तो पुढील निरोप रामास व सीतेस देतो.

१) सीतेस वीर्यवान पुत्रप्राप्तीचा आशीर्वाद कुलगुरु वसिष्ठ देतात. तो पुढील अंकात इतर लहान मुलांच्या बाबतीत न दिसणारा मात्र, लहानग्या लव-कुशांच्या युद्धातील शौर्यातून प्रकट झालेला दिसतो.
२) कुलगुरुंची पत्नी, अरुन्धती, रामाच्या माता व शांता यांनी रामाला निरोप दिला आहे, की सीतेचे जे काही दोहद असेल, ते तात्काळ पूर्ण करावे. त्यामुळे सीतेचे भागीरथीच्या वनराजीत विहाराचे व्यक्त केलेले दोहद रामाने त्वरीत तडीस नेण्यास, हा वडीलधाऱ्यांचा प्रेमळ आदेश कारणीभूत ठरला.
३) कुलगुरु वसिष्ठांनी रामास संदेश दिला आहे, की आम्ही धार्मिक कार्याने येथे निरुद्ध झालो आहोत. तू वयाने लहान आहेस आणि राज्याची जबाबदारी सुद्धा नवीन आहे. त्यामुळे प्रजेचे अनुरंजन करण्यास स्वतःस व्यस्त ठेव. त्यातून मिळणारे जे यश आहे, तेच आपले परम धन आहे. रामास या त्याच्या नवीन कर्तव्याची जाणीव वसिष्ठांनी करुन दिल्याने, राम अत्यंत कठोरपणे त्याची शब्दशः अंमलबजावणी सुरु करतो. आणि त्या प्रजानुरंजनाचा परिपाक म्हणून तो अयोध्यावासींकडून केल्या जाणाऱ्या सीतापवादाचे शल्य सीतापरित्याग करुन पूर्ण करतो. नवीन जबाबदारी, नवखा अनुभव, वडीलधाऱ्यांची अनुपस्थिती अशा सर्व परिस्थितीत घेतला गेलेला निर्णय म्हणजे सीतापरित्याग होय. राम सुद्धा अगदी अनाहूतपणे वसिष्ठांना आश्वस्त करतो, की लोकानुरंजनासाठी स्नेह, दया, सौख्य अगदी जानकीला सुद्धा सोडावयाची वेळ आली, तरी मला दुःख होणार नाही. असे बोलताना रामाला जरा सुद्धा कल्पना नव्हती, की नियती त्याच्याकडून त्याचे शब्द अक्षरशः खरे करवून घेईल. आणि सीतापरित्यागाच्या प्रसंगी रामाला सीतात्यागाच्या रूपाने खरोखर स्नेह, दया, सौख्य या सगळ्यांचा त्याग करावा लागला. अगदी जानकीला सुद्धा रामाच्या या बोलण्याचा अभिमान वाटला. रामाला प्रजेप्रति त्याच्या कर्तव्याची अगदी ताजी जाणीव करुन दिल्यानेच, राजा या सीतापरित्यागाच्या निर्णयाला घाईघाईने पोहोचला.

यानंतर या अंकात येणारा दुसरा दूत म्हणजे दुर्मुख. कवीने मूळ कथानकातील दूताचे नाव बदलून दुर्मुख केले आहे. त्याच्या येण्याने, म्हणजेच वृत्तांताने रामाच्या आयुष्यात झालेल्या विपरीत परिणामांना अनुसरुन त्याने त्याच नाव दुर्मुख केले असावे. चित्रपटदर्शनानंतर थकलेली सीता रामाच्या अंगावर झोपली असता, तो रामाच्या राजगृहात प्रवेश करतो. रामाने त्यास नगर आणि ग्रामांमध्ये गुप्तहेर म्हणून नेमलेला होता. तो त्याचा वृत्तांत कथन करण्यासाठी रामाकडे हजर झाला आहे. प्रथम तो रामाची प्रजाजनांकडून होत असलेल्या स्तुतीबद्दल सांगतो. मात्र राम त्यास दोष कथन करण्यास सांगतो. त्यानंतर तो रामाच्या कानामध्ये जनापवादाबद्दल सांगतो. यानंतर रामाच्या प्रतिक्रियेवरुन त्याच्या वृत्तांताची भीषणता जाणवते. वृत्तांत ऐकताच राम म्हणतो, की सीतेचे परगृहवासरूपी दूषण जे अद्भूत उपायांनी शमले होते ते दैवाच्या दुर्विपाकामुळे कुत्र्याच्या विषाप्रमाणे सर्वत्र पसरत आहे. यावरुन सीतेचा जनापवाद, लोकांमध्ये किती कटु पद्धतीने पसरला होता, याची जाणीव होते. यावर रामाची प्रतिक्रिया पाहण्याजोगी आहे. तो पहिले म्हणतो, आता मी मंदभागीने काय करावे आणि दुसऱ्या क्षणी तो याहून भिन्न काय मार्ग आहे. म्हणजे एकमेव मार्गच उरला आहे. तो म्हणजे त्याच्या वडीलांनी दशरथाने लोकांचे आराधन करणे हे व्रत आपल्या प्राणांच्या त्यागाने पाळले. आत्ताच भगवान वसिष्ठांचा संदेश आला आहे. त्यामुळे माझ्यामुळे सूर्यकुलोत्पन्न कुळाला कलंक लागणार असेल तर, माझा धिक्कार असो.

राम निर्णयाप्रत पोहोचला आहेच, फक्त त्याचे उच्चारण आता बाकी आहे. निर्धास्तपणे त्याच्या अंगावर पहुडलेल्या सीतेबद्दल कीव करत राजा राम, लक्ष्मणाला जो आदेश देतो, तो दुर्मुखाच्या कानात सांगतो. तो आदेश ऐकून दुर्मुखाला धक्का बसतो. राम रघुकुळाचे वंश जिच्या गर्भात आहेत, अशा सीतेबद्दल लोकांच्या बोलण्यावरुन असा निर्णय कसा देऊ शकतो, असे तो आश्चर्य व्यक्त करतो. मात्र तो पौरजनांना दुर्जन संबोधल्याबद्दल त्यास बोल लावतो. त्याच्या निर्णयावर चर्चेला वावच नको, म्हणून राम दुर्मुखास तेथून जावयास सांगतो.

**४.४) रामाचा शोक –**

रामाच्या दोन भूमिकांचा येथे पारस्पारिक विरोध दिसतो. एक म्हणजे राजा राम आणि पती राम. राजा रामाने घेतलेल्या निर्णयाने पती राम हा दुःखाच्या खाईत गेला आहे. लहानपणापासून सांभाळलेल्या, प्रेमामुळे इतर कोणताही आश्रय न घेतलेल्या माझ्या सीतेला, मी दोहदाच्या मिषाने मृत्यूला अर्पण करीत आहे, याचे अपार दुःख त्यास होते. त्याने दिलेली उपमा तर त्याच्या निर्दयीपणाची सीमाच दर्शविते. लहानपणापासून प्रेमाने वाढविलेल्या मैनेला जसे खाटकाला द्यावे, तसा मी सीतेला मृत्यूला सोपवित आहे. आपल्यावर पूर्ण विसंबलेल्या, विश्वास ठेवणाऱ्या आणि ती विशुद्ध आहे, याची पूर्ण खात्री असताना सुद्धा आपण तिला गहाळ ठेवून सीतेच्याबाबतीत असा क्रूर निर्णय घेत आहोत, यामुळे त्याला स्वतःची घृणा वाटू लागते, तो स्वतःची हेटाळणी करतो. म्हणजे जेवढे त्याला सीतेला सोडत आहोत, याचे दुःख आहे तेवढेच दुःख त्याला आपण तिला कशा पद्धतीने सोडत आहोत, याचे सुद्धा आहे. अत्यंत विश्वासाने तीने त्याच्या बाहूंचा आश्रय घेतला मात्र, तो स्वतःला चंदनवृक्ष नसून मी विषवृक्ष आहे, असे म्हणून हेटाळतो. तो त्याच्या प्रिय गृहिणीला, घरच्या लक्ष्मीला व त्याच्या वंशाच्या गर्भांना धारण करणाऱ्या सीतेला स्वतःहून मृत्यूला सोपवित आहे, याची पूर्ण जाणीव त्याला आहे. तरी सुद्धा तो हे करण्यास धजावतो. सीतेच्या जाण्याने त्याचे आयुष्य आणि घर उजाड आणि उध्वस्त होणार आहे, याच्या केवळ जाणीवेनेच तो दुःखसागरात लोटला जातो. माझ्या स्पर्शाने सीता अपवित्र होत आहे, असे त्यास वाटते. (तत्किमस्पृश्यः पातकी देवीं दूषयामि।) तो सीतेच्या पायांना मस्तकाने स्पर्श करतो आणि हा आपल्यातील अंतिम स्पर्श, असे म्हणून त्यास रडू कोसळते. (अयं पश्चिममस्ते रामशिरसा पादपङ्कजस्पर्शः।)

केवळ दुःख भोगणे, याकरिताच रामाच्या देहात चैतन्य आहे, सीतेविना जग हे ओसाड झाले आहे, जगण्याचे प्रयोजनच संपले आहे, संसार असार झाला आहे, मला आधार उरला नाही, असे उद्विग्न उद्गार तो काढतो. देवी वसुंधरेला सीतेला सांभाळायची विनंती करुन तो लवणासुराच्या वधाचे कार्य शत्रुघ्नाला सोपवून रडत रडत राजगृहातून बाहेर पडतो.

**५) चरित्र चित्रण –** प्रथम अंकामध्ये राम आणि सीता ही प्रमुख पात्रे तर लक्ष्मण, सूत्रधार, नट, कचुंकी, प्रतीहारी, अष्टावक्र व दुर्मुख ही दुय्यम पात्रे रंगमंचावर येतात. तसेच रंगमचावर न येता अयोध्येतील प्रजाजन, जनक, वसिष्ठ, अरुंधती, रामाच्या माता, रामाची बहिण शांता, तिचे पती ऋष्यश्रृंग, भगवती भागीरथी नदी, सीतेची माता वसुंधरा, स्वर्गीय दशरथ यांच्या उल्लेखांद्वारे आणि संदेशांद्वारे ही पात्र

आपल्याला भेटतात. यातील नाटकाचे नायक-नायिकारूपातील राम व सीता या दोन प्रमुख पात्रांचे चरित्र-चित्रण येथे प्रस्तुत केले आहे.

**५.१) राम -** सूर्यवंशीय इक्ष्वाकु कुळातील अयोध्याचा राजा राम हा या नाटकाचा धीरोदात्त नायक आहे. त्याच्या चरित्रातून उत्तम पुत्र, पती, राजा व व्यक्ति यांचे दर्शन घडते. या सुशील गृहस्थी मनुष्याचे कौटुंबिक जीवन यात दर्शविले आहे. पौलस्त्य कुळातील रावणाचा संहार करुन रामाचा राज्याभिषेक झाला असून त्याने राज्याभिषेकाकरिता आलेल्या स्नेही व गुरुजनांना निरोप दिल्याचे वृत्त सांगितले आहे. प्रथम अंकात त्याचे आगमन हेच मुळी उदास मनस्थितीतील सीतेचे सात्वंन करण्यासाठी होते. निरोप घेऊन येणारा कंचुकी पूर्वानुभवामुळे राजा रामाला ‘रामभद्रा’ अशी हाक मारतो आणि त्याला त्याची चूकीची जाणीव होताच तो मध्येच थांबून रामाला ‘महाराज’ म्हणून संबोधतो. राम त्यास ‘रामभद्र’ अशीच हाक मारण्यास सांगतो. वडीलांच्या परिजनांकडून हेच संबोधन योग्य वाटते, असेही तो म्हणतो. यावरून रामाचा मोठेपणा, कोणताही आडंबर नसलेला रामाचा लोभस सरळ स्वभाव येथे प्रत्यंतरित होतो. राम अष्टावक्र दूताकडे आपल्या वडीलधाऱ्या मंडळींची आस्थेवाईकपणे खुशाली विचारतो. कुलगुरु वसिष्ठांचा त्याच्याप्रति संदेश ऐकल्यानंतर तो त्याचे कर्तव्य बजावण्यासाठी त्याच्या प्रेम, दया, सौख्य अगदी जानकी यांची सुद्धा आहुती देण्यास आत्तसज्ज असा दिसतो. त्याच्या आपल्या कर्तव्याप्रति असलेल्या दृढ जाणीवेमुळेच तो सीतेच्या कौतुकास पात्र ठरतो. (अत एव राघवधुरन्धर आर्यपुत्रः।) आपल्या वहिनीची काळजी घेणाऱ्या लक्ष्मणाचे तो कौतुक करतो. (वत्स, जानासि त्वं दुर्मनायमानां देवीं विनोदयितुम्।) चित्रपट दर्शनाच्यावेळी सीतेच्या शुद्धतेची तो स्वतः खात्री देतो व झाल्या प्रसंगाबद्दल तिची माफी सुद्धा मागतो. ताटकावधाच्यावेळी विश्वामित्राकडून रामास प्राप्त झालेली दिव्य जृंभकास्त्रे तो सीतेच्या गर्भस्थ मुलांना देऊ करतो. परशुरामाचा रामाने केलेला पराभव लक्ष्मण सीतेला दर्शवित असताना आत्मश्लाघतेचा सोस नसणारा राम त्याला मध्येच थांबवितो. राम व सीतेच्या मंगल विवाहाचे चित्र पाहताना ते त्या रम्य काळात रमून जातात. सीतेचे ते लाघवी व गोजिरे रूप तेव्हा त्याच्या कुतुहलाचा विषय झाले होते. चित्र-पटात लक्ष्मणाने मंथरावृत्तांत दाखविला असता राम खुबीने दुसऱ्या चित्राकडे सीतेचे लक्ष वेधतो जेणेकरून मध्यममातेने केलेल्या कृत्यासंबधी संकीर्तन होऊ नये. यातून मध्यममातेसंबंधी त्याच्या मनातील आदरभाव तर व्यक्त होतोच, त्याच बरोबर वडीलधाऱ्यांच्या चुका पोटात घालण्याचा मोठेपणा सुद्धा दिसून येतो. भगवती भागीरथीचे दर्शन तो भक्तिभावाने घेऊन सीतेचे मंगल करण्याची विनंती करतो. सीतेबद्दलची अनामिक काळजी त्याच्या प्रार्थनेतून व्यक्त होते. जनस्थानातील त्यांच्या दांपत्यजीवनाच्या रम्य आठवणी त्यांना प्रफुल्लित करतात. रामाचे मन सीतेच्या बाबतीत इतके हळवे आहे की चित्रातून स्मरलेला सीतावियोग हा सुद्धा रामाला तीव्र दुःखाचा अनुभव करून देतो. हनुमानाचे चित्र पाहताच तो त्यांच्याप्रति त्याची कृतज्ञता व्यक्त करतो. माल्यवान् पर्वतावरील रामशोकाचा प्रसंग पाहताच रामाला सीतावियोग परत फिरुन आला आहे, असे वाटून असह्य होते आणि तो येथून पुढील चित्रे पाहू शकत नाही. सीतेने डोहाळेपूर्ततेची विनंती केली असता तो तिला ‘ (विनंती नाही तर) आज्ञा कर’ असे सांगतो. सीतेच्या सहवासात त्याला मिळणाऱ्या परमानंदाची अनुभूती ही त्याच्या मुखी घातलेल्या श्लोकातून व्यक्त होते. सीतावियोगाच्या केवळ

गतस्मृतींनी घाबरलेला हाच तो राम काही वेळातच तिच्या परित्यागाचा निर्णय करतो, हा दैवदुर्विपाक नियती त्याच्याकडून घडवून घेते. रामाच्या सीतेवरील निस्सीम प्रेमाची कबुलीच या चित्रपटदर्शनातून आणि त्यापुढे येणाऱ्या त्याच्या मुखातील श्लोकातून होते. या पार्श्वभूमीवर रामाने सीतापरित्यागाचा घेतलेला निर्णय हा द्वेषभावनेने अथवा परस्परांतील कटुतेने घेतलेला नसून परिस्थितीच्या अगतिकतेने घेतलेला आहे आणि त्याचा थेट परिणाम सीते इतका रामाला सुद्धा भोगावा लागत आहे, हे दाखविण्याचा कवीने प्रयत्न केला आहे. रामाच्या शोकातून त्याचे पूर्ण मानवीकरण किंवा मनुष्यरूप दाखवून या दुःखाला सामोरे जात असताना सुद्धा तो सीता परित्याग न करण्याचा सोपा मार्ग निवडत नाही, यातच त्याचे मोठेपण आहे. त्याच्यातील कर्तव्य व प्रेम या द्वंद्वात तो कर्तव्याला जास्त महत्त्व देतो. कवीने प्रथम अंकात रामाच्या अगाध चरित्रापैकी त्याच्या गृहस्थी, पती, पुत्र, भाऊ ह्या त्याच्या कौटुंबिक भूमिका विशेषत्वाने येथे दर्शविल्या आहेत. मात्र क्वचित झळकणारी राजा ही भूमिका इतर सर्व भूमिकांना कवेत घेऊन कवलित करते.

**५.२) सीता –** जनककन्या सीता ही रामाची एकमेव पत्नी ही या नाटकाची नायिका आहे. नाटकाची सुरुवातच ही रामाच्या राज्याभिषेकानंतर सीतेचे पिता, राजा जनक हे विदेहास निघून गेल्याने नाराज झालेल्या सीतेच्या सांत्वनासाठी रामाच्या आगमनाने होते. वडीलधाऱ्यांची कार्यांमधील व्यस्तता समजून देखील नातलगांचे दूर जाणे, तिला त्रासदायक वाटते. अष्टावक्राकडून नणंदेचा व मातांचा निरोप आला असता ती आपुलकीने सर्वांची चौकशी करते. रामाच्या गुणांचे ती अभिमानाने कौतुक करते. वसिष्ठांच्या संदेशानंतर राम जेव्हा सर्व काही त्यागून लोकरंजनासाठी स्वतःची तयारी दाखवितो तसेच आत्मस्तुती टाळण्यासाठी परशुरामाच्या पराभवाचे चित्र तो टाळतो, तेव्हा सीतेच्या प्रतिक्रिया या वाचनीय आहेत.

अग्निशुद्धीचा प्रसंग पाहताना राम सीतेच्या शुद्धतेची ग्वाही देतो, ती तिच्याकरिता सर्वात मोठी आश्वासक गोष्ट आहे.आणि 'एष ते जीवितावधिः प्रवादः।' या रामाच्या वाक्यातून तिच्या आयुष्यभरासाठी हा कलंक तिच्या नशीबी लागला आहे, याची जाणीवही तो करुन देतो. सीता रामावर पूर्णपणे विसंबून आहे. (सौहृदादपृथगश्रयाम्) अगदी तिच्या लहान असल्यापासून तारुण्यापर्यंत रामाने तिचे संगोपन केले आहे. (शैशवात्प्रभृति पोषितां प्रियां) (त्याकाळी मुलींचे लहान वयात विवाह होत असत.) तिने आपले गर्भार शरीर त्याच्या खांद्यावर व उरस्थळावर झोकून दिले आहे. सीतेच्या रामावरील प्रेमाचा प्रत्यंतर आणि त्याच्या आयुष्यातील तिच्या स्थानाचे महत्त्व हे रामाच्या सीतापरित्यागाच्या निर्णया अगोदर आणि नंतर उच्चारलेल्या उक्तींमधून आपल्याला कळून येते. ती त्याच्या घराची लक्ष्मी आहे. येथे 'गृहिणी गृहम् उच्यते।' या वाक्याची आठवण आल्याशिवाय राहत नाही. तिच्या सहावासात त्याला अवर्णनीय आनंदाची अनुभूति होते तर तिच्या जाण्याने त्याचे आयुष्य ओसाड आणि निरर्थक होते. तसेच रामाने सीतेप्रति दुःख व्यक्त करताना तिच्यासाठी वापरलेली विशेषणे हे सीतेच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू दर्शवितात. ती साक्षात देवयज्ञातून जन्मास आली आहे. त्यामुळे तिला शुद्धीकरिता अजून कशाचीही आवश्यकता नाही. तिने स्वतःच्या जन्माने वसुंधरेलाच अनुगृहीत केले आहे. ती राजर्षी जनकांना, आपल्या पित्याला आनंद देणारी आहे. तिच्या शीलाचे कुलगुरु वसिष्ठांनी व अरुंधती यांनी प्रंशसा केली आहे. तिच्या आयुष्याचे सार केवळ

राम हेच आहे, ती रामाची वनवासातील महारण्यात प्रिय सखी होती, ती रामाच्या वडीलांची दशरथांची सुद्धा लाडकी आहे, ती मितभाषिनी आहे. यातून सर्व कुटुंबियांनी गौरविलेली, पतीचे पूर्ण प्रेम व विश्वास असलेली, एक पतिव्रता गृहिणी सीता आपल्या मनःपटलावर कवीने साकारली आहे.

**६) रसग्रहण –** उत्तररामचिरतम् ही भवभूतीची अजोड कलाकृती आहे**.** याचे वैशिष्ट्य म्हणजे रामकथेवर भारतात व भारताबाहेर अनेक काव्यकृती निर्माण झाल्या व अजूनही होत आहेत. मात्र कोणीही रामायणकथेचा प्रचलित राम-सीतावियोग रूपातील शेवट बदललेला दिसून येत नाही. मात्र राम-सीता या सारख्या परस्परांवर निस्सीम प्रेम आणि विश्वास असणाऱ्या दांपत्याची वियोगरुपी शोकांतिका होऊच शकत नाही, या विचाराने झपाटलेल्या कवीने या जोडप्यास काव्यगत न्याय देण्याचा धाडसी प्रयत्न केला आहे. याचे अनुकरण अन्य कोणीही आजवर केलेले नसल्याने उत्तररामचरितम् ही आजमितीस अक्षरशः अजोड, असाधारण आणि अद्वितीय अशी कलाकृती ठरते.

वर उद्धृत केल्याप्रमाणे यामध्ये रामाच्या राजा राम आणि पती राम दोन भूमिकांचा येथे पारस्पारिक विरोध दिसतो. परंतु रामासारख्या उदात्त चरित्रात हा मुद्दा केवळ भूमिकेपर्यंत सीमित नसून या भूमिकांच्या मागे असणाऱ्या रामाच्या दोन कर्तव्यांचा, जबाबदारींचा आणि विचारांचा येथे संघर्ष आहे. कर्तव्य (Duty) किंवा प्रेम (Love) यामंधील एक रामास निवडायचे आहे. त्याच्या कर्तव्यबुद्धीने समष्टीवर, पूर्ण प्रजेवर परिणाम होणार आहे तर प्रेमाने केवळ व्यष्टीवर म्हणजे वैयक्तिक आयुष्यावर परिणाम होणार आहे. यातील व्यापक परिणाम करणारा, स्वार्थापेक्षा परार्थ साधणारा, निर्णय रामाने घेतला आहे आणि त्यामुळे तो स्वतः च्या सुखरूपी सीतेस त्यागण्यास तयार झाला. निर्णय घेताना त्याच्या मनामध्ये द्वंद्वाला स्थानच नव्हते, कारण राज्याच्या नव्या जबाबदारीमुळे आणि त्यात भर म्हणून नुकत्याच आलेल्या वसिष्ठांच्या, त्यास कर्तव्याची जाणीव करुन देणाऱ्या संदेशामुळे अगोदरच रुजलेली आणि नेहमीच अग्रभागी असलेली कर्तव्य भावना यामुळे राजा राम ही भूमिका अधिकच जोरकस झाली. मात्र निर्णय घेतल्यानंतर त्याचा दारुण परिणाम त्याला स्वतःला आणि त्याच्यामुळे काहीही कारण नसताना सीतेला भोगावा लागला.

कवीने प्रथम अंकात सीतापरित्यागाचा प्रसंग दाखविल्यानंतर उर्वरित अंकात त्यांचे प्रथम मानसिक दुःख, शल्यनिवारण, अमूर्त मनोमिलन आणि नंतर मूर्त मिलन दाखविण्यासाठी पुढील अंक खर्ची घातले आहेत. रामाला सीतापरित्यागाचे दुःख जेवढे तिला सोडताना प्रथम अंकात होते तेवढेच दारुण दुःख तब्बल बारा वर्षांनतंरही होते. त्याची ती आयुष्यभराची खुपरी नस आणि भळभळती जखम झाली आहे. त्या दुःखावेगाने तो वेळोवेळी शोक करताना, ढसाढसा रडताना आणि प्रसंगी शुद्ध हरपलेला सुद्धा दाखविला आहे. चालत्या-फिरत्या रामाचे निर्जीवत्व प्रेक्षकाचे व वाचकाचे मन विषण्ण करणारे आहे. त्यामुळे पूर्ण नाटकभर करुणरसाचा दारुण आविष्कार पहावयास मिळतो. मात्र केवळ नाट्यतंत्राच्या कृत्रिम नियमानां अनुसरुन नव्हे, तर कथानकाची अपरिहार्यता, सहजता म्हणून काव्यगत न्यायाने त्याने दोघांचे मिलन घडवून कवीने कथेचा सुखांत साधला आहे. त्यामुळे हे नाटक संस्कृत नाट्यसृष्टीत शोकात्म सुखान्तिका म्हणून प्रसिद्ध आहे. उत्तररामचरितम् हे रामाच्या आयुष्यावरील एकमेव सुखांत नाटक आहे.

त्याने घडविलेला सुखांत हा स्त्रियांप्रतिच्या त्याच्या उदात्त दृष्टीचे द्योतक आहे. आणि या त्याच्या जनरहाटणीच्या विरुद्ध विचारसरणीमुळे तो संस्कृत साहित्यातील बंडखोर नाटककार ठरतो. अशाप्रकारे राम व सीता यांचे अलौकिक प्रेम हे भवभूतीने मिलन, वियोग व पुनर्मिलन या त्रिविध अवस्थांमधून घालवून पूर्णत्वास पोहोचविलेले दिसून येते.

प्रथम अंकाच्या सुरुवातीला कल्पिलेला चित्रपटदर्शन प्रसंग हा कवीच्या प्रगल्भ नाट्यतंत्राची साक्ष देतो. रामचरित्राचा प्रदीर्घपट जो दोन नाटकात कवीने विभागला आहे, तो मनःपटलावर सांधण्यासाठी त्याचा उपयोग तर होतोच त्याचबरोबर तो पुढील घटनांसाठी कथेची पार्श्वभूमी आणि मनाची तयारी करवितो. प्रथम नाटकाच्या प्रस्तावनेपासून पुढे येऊ घातलेल्या दारुण संकटाचे नकळत सूतोवाच तो करत येतो. चित्रपट दर्शनातील सीतेच्या अपहरणाच्या दर्शनाने त्यांना जणू वियोगावस्थाच अनुभवत आहोत, असा दोघांनाही अनुभव येतो. त्यामुळे कोणतेही धक्कातंत्र न वापरता प्रेक्षकांची वियोगासाठी मानसिकता कवीने तयार केली आहे. तो पात्रांकडून अर्धोक्तीचा अनेकदा वापर करुन अपेक्षित अर्थ अधोरेखित करतो. प्रथम अंक जरी दीर्घ असला तरी सर्वच घटनाप्रसंग हे कथाविकासासाठी आवश्यक आहेत. नाटकाच्या प्रथम अंकामध्ये कोणत्याही प्रकारचा आंगिक क्रिया-कलाप (Action) दिसून येत नाही, तर राम-सीतेच्या संवादातून भावनिक क्रिया-प्रतिक्रियांवर कवीचा भर आहे. त्यामुळे प्रदीर्घ असला तरी प्रथम अंक त्याच्या निर्वाहकतेस पूर्ण न्याय करताना दिसतो.

भवभूतीने यात दैवीरूपात जनमानसात रुजलेल्या पात्रांचे मानवीकरण केले आहे. प्रभु राम हा हाडामांसाच्या माणसाप्रमाणे पत्नीच्या सहवासाचे सुख आणि तिच्या वियोगाचे दुःख अनुभवताना दिसतो. तो प्रभु राम न वाटता आपल्यापैकीच एक वाटतो आणि त्यामुळे त्याची प्रेक्षकांशी आत्मीयता वाढते. मनुष्याचे अपरिमित दुःख धीरोदात्तपणे झेलल्यानेच त्याचे दैवत्व सुद्धा अधिक ठळक होते.

भवभूतीचे प्रेमाबद्दल विचार हे अत्यंत उच्चकोटीचे आहे. भवभूतीचे सर्व नायक हे एकपत्नी असणारे आहेत. ही बाब कालिदासाच्या नायकांसमोर विशेषत्वाने नजरेत भरते. दांपत्य जीवनातील प्रेमाचे त्याने अगदी हृद्य वर्णन केले आहे. त्यास वैषयिकतेचा वास नाही, मात्र हृदयाची शांती आहे. सर्व अवस्थांमध्ये टिकणारे ज्यात अद्वैत आहे, वार्धक्याने सुद्धा ज्यातील गोडी सरत नाही, उलट कालपरत्वे ज्यातील स्नेहसार परिपक्व होत जातो, असे दांपत्यजीवन काहींच्याच नशीबी सौभाग्याने प्राप्त होते, असे तो सांगतो. त्याचे हे भाष्य भारतीय संस्कृतीत कल्पिलेल्या वैवाहिक संबंध व कुटुंबव्यवस्थेवरील साररूप आहे.

भवभूती हा कालिदासाप्रमाणेच भावनांचा उत्कट व हळुवार आविष्कार करणारा, निसर्गाच्या कोमल आणि भीषण अशा दोन्ही रूपांवर प्रेम करणारा, सृजनशील कवी म्हणून प्रसिद्ध आहे. मात्र करुण हा त्याचा आवडता रस आहे. "एको रसो करुण एव साक्षात्।" असेच त्याने मानले आहे. इतर रस ही या करुण रसाची केवळ भिन्न रूपे आहेत, असे तो मानतो. त्याच्या लेखणीतून कारुण्यरसाला वेगळीच तीव्रता प्राप्त होते. त्यामुळे "कारुण्यं भवभूतिरेव तनुते।" ही समीक्षकांची प्रशंसोक्ति सर्वार्थाने सार्थ होते. प्रथम अंकातील दुर्मुखाच्या प्रवेशानंतर कारुण्यरस आपले अस्तित्व दाखविण्यास सुरुवात करतो. चित्रपट दर्शनात व्यक्त

होणारा राम व सीता यांचा परस्परांच्या सहवासातील संभोगश्रंगार हा जणू कारुण्याला तीव्रता देण्यासाठीच वापरला आहे. त्याचा सुरुवातीलाच जोर इतका आहे की, त्याचे पडसाद पुढील अंकात अनुरणित होत द्विगुणित होत जातात. जेथे सामान्यजनांचा अनुभव असा आहे की, जेथे काळानुसार दुःख हलके होत जाते, तेथे रामाच्याबाबतीत त्याचा दुःखावेग वाढतच जातो. भवभूतीच्या तिन्ही नाटकात विदूषक नसल्याने त्यास हास्य रसाचे वावडे आहे, असा आक्षेप त्यावर केला जातो, मात्र आरोप चुकीचा वाटतो. शास्त्राभ्यास, घरची धार्मिक पार्श्वभूमी आणि स्वतःचा जात्या गंभीर स्वभाव यांमुळे भवभूतीच्या काव्यात खळखळून हसण्याजोगा विनोद नसला तरी चेहऱ्यावर स्मिताची लकेर उमटविणारे नर्मविनोद नक्कीच आहेत.

कवीच्या भाषेला एकाचवेळी बोलीभाषेची झाक आहे, घरगुती संवादाची लोभस किनार आहे आणि विचारांची प्रौढता व प्रगल्भता सुद्धा आहे. त्याचे काही शब्द दुर्बोध वाटतात. त्याने बाहुल्याने समासबहुला गौडी रीतीचा वापर केलेला दिसून येतो. त्याचा शास्त्राभ्यास, विद्वत्ता आणि वेदांतिक सिद्धांत हे त्याच्या नकळत अनेकदा सहजरूपात त्याच्या नाटकातून पाझरताना दिसतात. पूर्वानुभवाने कंचुकीने राजा रामाला 'रामभद्रा' म्हणून मारलेली हाक, भावजयीचे डोहाळे पुरविण्याचा नणंदेचा भावाला प्रेमळ संदेश, सीतेने उर्मिलेचे चित्र पाहता लक्ष्मणाची घेतलेली फिरकी, ही आनंदी कौटुंबिक संवादाचे व प्रेमळ नातेसंबंधाचे दर्शन घडविते. भाषेची लेणी म्हणावीत अशी अनेक वाक्ये, वाक्प्रचार काव्यात विखुरलेले आहेत. 'ते हि न दिवसा गताः।', 'यथा स्त्रीणां तथा वाचां साधुत्वे दुर्जनो जनः।' अशी वाक्ये ही नाटकीय संदर्भविरहीतही सार्थ ठरतात. उपमा, उत्प्रेक्षा, विरोध अशा अनेक अलंकारांनी त्याची भाषा माफकच सजविली आहे. ती सहज आणि निर्मळ भावनेनेच अधिक पुष्ट झालेली आहे. भाषेची प्रौढता आणि विचारांची गभीरता हे त्याच्या शैलीचे वैशिष्ट्य आहे. महावीरचरितम् या नाटकात तो स्वतःला 'वश्यवाक्' हे विशेषण लावतो, ते अगदी सार्थ आहे कारण त्याच्या लेखणीमध्ये त्याला अभिप्रेत असणाऱ्या अर्थाची छटा नेमक्या शब्दात व्यक्त करण्याचे सामर्थ्य आहे.

### ३.३) विषय विवेचन – भाषांतर

**प्रथम अंक**

(वाल्मीकिप्रभृती) पूर्वकालीन कवींना (उद्देशून) आम्ही आधी (इदम्) वंदनपर वचन उच्चारितो आणि (नंतर) आत्मतत्त्वाचा अंश अशा अमर वाणीला वंदन करितो.

(नांदी आटोपताच)

**सूत्रधार -** फार विस्तार करणे पुरे झाले ! आज भगवान कालप्रियानाथाच्या (शंकराच्या) यात्रेमध्ये मी सामाजिकांना (प्रेक्षकांना) विनंती करतो. आपल्याकडून हे जाणले जावे, की आदरणीय कश्यप गोत्रीय श्रीकंठ हे उपनाम असणारा, व्याकरण, मीमांसा, तर्क या शास्त्रांत पारंगत, असा जातूकर्णीचा पुत्र भवभूती नामक (एक) कवी आहे.

ब्रह्मदेवास जशी सरस्वती, तशी वाग्देवता ज्याला वश होऊन राहते अशा त्या (ह्या) कवीने रचिलेले 'उत्तररामचरित' प्रयोगरूपाने (आज) सादर करण्यात येत आहे. २

या कार्यानुसार हा मी अयोध्यावासी असा त्या काळातील नागरिक बनलो. (सभोवार पाहून) काय हो ! रावणकुळाला धूमकेतू ठरलेल्या महाराज रामचंद्रांचा अहर्निश उत्सवाचे नगारे वाजत आहेत असा राज्याभिषेकाचा सोहळा (चालू) असता तर मग या समयी चव्हाट्यावर सतत स्तुतिस्तोत्रे पढणारे भाट शांत झालेले (दिसतात) हे कसे ?

**नट -** (प्रवेश करून) - महाशय, महाराज रामचंद्रानी लंकेतील युद्धात मित्र बनलेले महाभाग वानरवीर व राक्षसश्रेष्ठ यांची स्वगृही पाठवणी केली आहे, तसेच (महाराजांच्या) सत्कारार्थ दशदिशांतून येऊन उपस्थित राहिलेले ब्रह्मर्षी व श्रेष्ठ राजे यांचीही रवानगी केली आहे. त्यांच्या स्वागतार्थ इतके दिवस हा सोहळा चालू होता.

**सूत्रधार -** हां, हे कारण आहे खरेच !

**नट -** अन् दुसरे म्हणजे -

वसिष्ठ आणि अरुंधती यांना पुढे घालून, रामाच्या माता राण्या यज्ञात (उपस्थित होण्यासाठी) जावयाच्या आश्रमाकडे गेल्या आहेत. ३

**सूत्रधार -** मी परस्थ (प्रवासी) म्हणून विचारितो, हे जावई कोण आहेत?

**नट -** राजा दशरथाला शान्ता नावाची मुलगी झाली, तिला त्याने रोमपाद राजाला दत्तक (मानिलेली) म्हणून दिली.४

विभांडकाचा मुलगा ऋष्यश्रृंग याने तिच्याशी विवाह केला. आणि त्याने सध्या बारा वर्षे चालणारे यज्ञसत्र आरंभिले आहे. त्याचा मान ठेवावा म्हणून सीतेचे (गर्भारपणाचे) दिवस पूर्ण भरत आले असतानाही तिला मागे ठेवून ती वडीलधारी माणसे तिकडे निघून गेली आहेत.

**सूत्रधार -** (जाऊ द्या,) आपल्याला त्याच्याशी काय करावयाचे आहे? चल, आपल्या जातीच्या (व्यवसायाच्या) पद्धतीप्रमाणे राजद्वारीच जाऊन उभे राहूया.

**नट -** तर मग महाराजांसमोर उपस्थित होण्यावेळी म्हणण्यास योग्य असा पूर्ण निर्दोष असलेला स्तुतिपर श्लोक सुचवा पाहू.

**सूत्रधार -** सेवका, (आपण) सर्व प्रकारे (आपले) काम करीत राहावे (त्यात) पूर्ण निर्दोषत्व कसे (आणता येईल)? स्त्रियांच्या काय किंवा वाचेच्या (काव्याच्या) काय, चांगुलपणाबाबत (निर्दोषत्वाविषयी) लोक हे कुत्सितच असावयाचे! ५

**नट -** अहो, अतिकुत्सित म्हणा !

कारण राणी सीतेविषयी सुद्धा लोक आक्षेप घेत आहेत, याला निमित्त म्हणजे तिचा रावणगृही निवास; अन् अग्नीने झालेल्या तिच्या शुद्धीविषयी मात्र यांना संशय ! ६

**सूत्रधार-** पण जर का ही कुजबुज (जनापवाद) महाराजांच्या कानी पोहोचली तर अनर्थ ओढवेल!

**नट -** सर्व प्रकारे ऋषी व देवता कल्याण घडवून आणतील. (थोडे चालून) अहो, महाराज आता कोठे आहेत बरे ? (ऐकून) लोक असे सांगतात (की)-

सोहळा साजरा करण्यासाठी, स्नेहामुळे (अयोध्येस) येऊन व इतके दिवस आनंदात कालक्रमणा करून, आजच जनक राजा विदेहाला परतले आहेत. त्यामुळे विमनस्क झालेल्या राणी सीतेचे हरप्रकारे सांत्वन करावे, म्हणून राजा रामचंद्र न्यायासनावरून उठून प्रासादाकडे (अंतःपुराकडे) चालला आहे ! ७

(दोघे जातात)

येथे प्रस्तावना संपली.

(नंतर राम व सीता हे बसले आहेत असा प्रवेश)

**राम -** राणी सीते, धीर घर, त्या वडील माणसांना आपणांला सोडून जाववत नव्हतेच!
पण धार्मिक क्रियांचे नित्याचरण माणसाच्या स्वातंत्र्याला खीळ घालते. खरोखर, गृहस्थधर्म हा अग्निहोत्री व्यक्तींना अडथळ्यांनी गजबजलेला बाटतो (यात नवल नाही). ८.

**सीता -** माहीत आहे, आर्यपुत्र, माहीत आहे मला. परंतु (नाही म्हटले तरी) नात्यागोत्याच्या माणसांची ताटातूट ही मनस्ताप देणारी ठरतेच!

**राम -** हो, असे आहे खरे, प्रपंचातील या घटनाच मुळी अशा हृदयाची मर्मे छेदून टाकणाऱ्या असतात की त्यांना विटून, सर्व इच्छा-आकांक्षांना पूर्णविराम देऊन, बाणेदार (संयमी) व्यक्ती अरण्यांत विसावतात. (प्रवेशून)

**कंचुकी -** रामभद्रा (जीभ चावून, भीतीने) महाराज!

**राम -** (हसत) आर्य, (तुमच्या सारख्या) वडिलांच्या सेवकाच्या तोंडी रामभद्रा हेच संबोधन मला उद्देशून शोभून दिसते, नाही? म्हणून पूर्वापार सवयीनुरूप संबोधीत जावे मला.

**कंचुकी -** महाराज, ऋष्यशृंगाच्या आश्रमाहून अष्टावक्र येऊन पोहोचला आहे.

**सीता -** आर्य, मग उशीर का करतोस (त्याच्या प्रवेशाला)!

**राम-** लवकर प्रवेश दे (त्याला).

(कंचुकी जातो.) (प्रवेश करुन)

**अष्टावक्र -** आपणां उभयतांचे कल्याण असो !

**राम -** भगवन्, मी अभिवादन करितो. येथे बसा !

**सीता -** भगवन्, नमस्ते ! जावयासह सर्व वडील मंडळी आणि शांता ताई सुखरूप आहेत ना ?

**राम -** माझा मेहुणा सोमयाजी भगवान् ऋष्यशृंग आणि शांताताई खुशाल आहे ना?

**सीता -** आमची आठवण येते का त्यांना ?

**अष्टावक्र -** (खाली बसून) तर काय? राणी, कुलगुरू भगवान वसिष्ठांचा तुला उद्देशून निरोप आहे (तो असा):-

विश्वाचे पोषण करणा□या भगवती पृथ्वीने तुला जन्म दिला आहे, प्रजापती सारखा राजा जनक हा तुझा पिता आहे. हे मुली, ज्यांच्या कुळाचे गुरू म्हणून (प्रत्यक्ष) सूर्य व आम्ही आहोत अशा राजांची तू सून आहेस ! ९

मग (या उपर) दुसरा कोणता आशीर्वाद द्यावा आम्ही (तुला)? तू वीर्यवान् पुत्रांना जन्म देणारी हो एवढेच !

**राम -** आमच्यावर अनुग्रह झाला.

या जगातील सज्जनांची वाणी त्याच्या अभिप्रेत आशयाला अनुसरते, परंतु आद्य (वैदिक) ऋषीबाबत मात्र अर्थ हा त्यांच्या वाणीमागोमाग धावत असतो ! १०

**अष्टावक्र** - तसेच साध्वी अरुंधती, राण्या व शांता यांनी पुन्हा पुन्हा (आवर्जून) सांगितले आहे की, हिला जो कोणता तरी डोहाळा लागेल तो लगेचच अवश्य पुरवावा !

**राम -** ही सांगेल तर (तसे) करण्यात येईल.

**अष्टावक्र -** नणंदेच्या पतीने - ऋष्यश्रृंगाने, सीतेला निरोप दिला आहे की,

'बाळे, तुझे दिवस भरत आल्यामुळे तुला (इकडे) आणिले नाही. चिरंजीव रामचंद्र सुद्धा तुझे मन रमविण्यासाठी म्हणूनच (इकडे न आणिता) तेथे ठेविला आहे. तेव्हा (यापुढे) पुत्राने ओटी भरलेल्या तुला आम्ही (यथावकाश). भेटू '

**राम -** (आनंदाने, लाजून, स्मित करीत) तसेच होवो ! भगवान वसिष्ठांनी मला काही आदेश दिला नाही काय ?

**अष्टावक्र -** ऐकावे.

"जावयाच्या यज्ञामुळे आम्ही (इकडे) गुंतून पडलो आहोत; तू (तर) अजून कोवळ्या वयाचा; राज्यभार नव्याने अंगावर पडलेला; (अशा परिस्थितीत) प्रजेचे अनुरंजन करण्यात रत रहा. त्यापासून मिळणारें जे यश तेंच तुमचे (राजेलोकांचे) श्रेष्ठ धन होय ! ११

**राम -** भगवान वसिष्ठ सांगतात तसेच (आहे).

'लोकांचे मन राखण्यासाठी स्नेह, दया, सुख यांचा, (वेळ आल्यास) सीतेचा सुद्धा त्याग करिताना मला कष्ट होणार नाहीत.' १२.

**सीता -** म्हणूनच तर आर्यपुत्र रघुकुलाचे अग्रणी ठरतात !

**राम -** कोण आहे रे तिकडे ? अष्टावक्राला विश्रांति द्या.

**अष्टावक्र -** (उठून व थोडे चालून) अरे वा, कुमार लक्ष्मण आला ! (निघून जातो.) (प्रवेशून)

**लक्ष्मण** - महाराजांचा जय, जय! महाराज, त्या चित्रकाराने आम्ही सांगितलेले आर्यांचे चरित्र या पटावर रेखाटले आहे. तरी आपण ते पहावे.

**राम** - बाळ, उदासवाण्या राणी सीतेला रिझविण्याचे (चांगले) जाणतोस तू. मग कोठपर्यंत काढली आहेत ती (चित्रे)?

**लक्ष्मण -** वहिनींच्या अग्निद्वारा झालेल्या शुद्धीकरणापर्यंत.

**राम -** इडापिडा टळो ! (समजुतीच्या स्वरात)

जन्मानेच जी पवित्रमय, तिला इतर पावन वस्तूंची गरजच काय? तीर्थातील जल काय अन् अग्नी काय, यांना दु      सऱ्याकडून शुद्ध करून घेण्याची आवश्यकताच नसते ! १३

देवांच्या यज्ञातून जन्म घेणाऱ्या हे राणी, क्षमा कर. हा लोकापवाद तुला जन्मभर चिकटणार (असे दिसते) !

हलक्या लोकांची मनधरणी कुळाची चाड बाळगणाऱ्यांना करावी लागतेच; म्हणून तुजविषयी आम्ही जे अशुभ उल्लेखिले त्याला तू मुळीच पात्र नाहीस. सुवासिक पुष्पांची नैसर्गिक अवस्था ठरलेलीच असते, ती म्हणजे मस्तकावर विराजमान होणे; ती पायतळी तुडविली जात नाहीत. १४

**सीता –** असू द्या आर्यपुत्र, असू द्या. चला, आता तुमचे (चित्रांमध्ये रेखाटलेले) चरित्र पाहू या. (असे म्हणून उठून थोडे चालून जाते.)

**लक्ष्मण -** हा तो चित्र-पट.

**सीता** (निरखून पाहून) - हे अंतराळात दाटीवाटीने उभे असलेले, आर्य-पुत्रांची जणू स्तुती करीत असलेले, कोण आहेत बरे ?

**लक्ष्मण -** राणी, हीच ती रहस्य (गुप्तमंत्र) युक्त जृंभकास्त्रे ! ही भगवान कृशाश्वमुनीकडून विश्वामित्र ऋषीला प्राप्त झालीं, अन् त्याने ताटकावधप्रसंगी दादांना प्रसन्न होऊन भेट म्हणून देऊन टाकिली !

**राम -** राणी, या दिव्य अस्त्रांना अभिवादन कर.

"ब्रह्म आदी आचार्यांनी वेदांच्या (ब्रह्म) रक्षणार्थ सहस्राधिक वर्षे तपश्चर्या करुन त्यांनी स्वतःचे तेजरूप असणारे प्रकाशमय अशी ही (अस्त्रे) पाहिली !" १५

**सीता -** यांना (माझे) वंदन असो !

**राम -** ही आता सर्वप्रकारे तुझ्या संततीला लाभतील (संक्रान्त होतील).

**सीता –** माझ्यावर अनुग्रह झाला.

**लक्ष्मण** - हा मिथिलेतील वृत्तांत !

**सीता –** अग बाई ! उमलत्या नीलकमलाप्रमाणे सावळ्या, मृदु, शोभिवंत व पुष्ट शरीरकांतीने युक्त असे, आश्चर्याने स्तिमित झालेल्या माझ्या वडिलांकडून ज्यांची सौम्यसुंदर देहशोभा अवलोकन केली जात आहे असे, सहजगत्या शिवाचे धनुष्य खण्डित केलेले, मस्तकावरील (शेंडीच्या) झुपक्यांनी मुखमंडलास सौंदर्य प्राप्त झालेले असे हे आर्यपुत्र येथे रेखाटले आहेत !

**लक्ष्मण** - वहिनी, पहा पहा !

हे तुमचे वडील वसिष्ठप्रभृती पाहुण्यांचा सत्कार करीत आहेत, अन् त्यांच्या सोबत जनक घराण्याचे पुरोहित, गोतमाचे पुत्र शतानन्द हेही (रेखाटले आहेत)! १६

**राम -** हे फार योग्यच आहे.

जनक व रघु या घराण्यांचा जुळून येणारा संबंध कोणाला प्रिय वाटणार नाही? यांत दान करणारे व स्वीकारणारे हे स्वतः कुशिकपुत्र (विश्वामित्र) च आहेत ! १७

**सीता -** हे पाहा, नुक्ताच, 'गोदान' संस्काराचा सोहळा उरकलेले, विवाहासाठी सज्ज झालेले तुम्ही चौघे भाऊ (येथे दिसत आहांत)! अग बाई ! मी जणू त्याच स्थळी, त्याच काळी आहे, असे मला वाटते.

**राम** - असेच (आहे).

"हे सुमुखी, ती वेळच जणू आली आहे, असे वाटते जेव्हा मला आनंद देणारा, गौतमाने (जनकाच्या कुलाचार्यांनी) माझ्या हाती दिलेला, रमणीय कंकण बांधलेला, तुझा हा हात जणू मूर्तिमंत महोत्सव असे वाटते! १८

**लक्ष्मण -** या तुम्ही, या मांडवीवहिनी अन् या (धाकट्या) श्रुतकीर्तिवहिनी.

**सीता -** वत्स, ही दुसरी कोण हो ?

**लक्ष्मण -** (लाजून, स्मित करीत, एकीकडे) अरे, उर्मिलेला उद्देशून विचारते वहिनी ! ठीक, यांना दुसरीकडे नेतो. (उघड) वहिनी, प्रेक्षणीय असे हे दृश्य पहा बरें ! अन् हे भगवान परशुराम !

**सीता -** (घाबरून) मी कंपित झाले.

**राम -** ऋषिवर्य, प्रणाम आपणांला !

**लक्ष्मण -** वहिनी, पाहा पाहा ! दादांनी ह्या त्याला (अर्धवट बोलताच)

**राम -** (झिडकारून) अरे, अजून खूप पाहावयाचे आहे, इतरत्र दाखीव.

**सीता -** (प्रेमाने व आदराने निरखून) आर्यपुत्र, या विनयाच्या मोठेपणामुळे आपण छान शोभून दिसता.

**लक्ष्मण** - हे आपण अयोध्येस येऊन पोहोचलो.

**राम -** (साश्रुनयनांनी) होय, आठवते, मला आठवते !

वडील हयात असता व नुकतेच आमचे विवाह झाले असता, मातांकडून आपली काळजी वाहिली जाणाऱ्या आमचे ते (रम्य) दिवस खरंच निघून गेले! १९

ही सीता सुद्धा त्यावेळीं -

" चेहऱ्याच्या कडा मनोहर करणाऱ्या, अत्यंत बारीक व विरळ अशा केसांनी, दंतकळ्यांनी रमणीय कांती धारण करणाऱ्या मुखाची बालिका (सीता), चांदण्यासारख्या अत्यंत ललितकोमल व सहजसुंदर मोहक हालचालींनी युक्त अशा आपल्या अवयवांनी माझे आणि मातांचे कौतुक निर्माण करीत असे. ।। २०

**लक्ष्मण -** ही मंथरा !

**राम -** (त्वरेने इतरत्र दर्शवीत) राणी सीते, पूर्वी शृंगवेर नगरीत जेथे निषादपति (गुह) सह (माझी) प्रेमळ गाठ पडली तो हा इंगुदी वृक्ष! २१

**लक्ष्मण -** (हसून स्वगत) ओह, मधल्या (कैकेयी) आईचा वृत्तांत दादांनी (खुबीने) टाळला !

**सीता -** ओह, हा जटा बांधण्याचा वृत्तांत (येथे चितारला आहे.)

**लक्ष्मण -** 'पुत्रांवर राज्यवैभव सोपवून वृद्ध इक्ष्वाकुकुलीन राजांनी जे पवित्र अरण्यव्रत (वानप्रस्थाश्रम) स्वीकारिले ते आर्यांनी (दादांनी) बालवयातच स्वीकारले ।' २२

**सीता -** ही स्वच्छ, पवित्र जलाने युक्त अशी भगवती भागीरथी नदी !

**राम -** रघुकुळाची देवता असलेल्या हे देवी (भागीरथी)! तुला माझा प्रणाम !

हे देवि भागीरथी, सगराच्या अश्वमेधप्रसंगी यज्ञीय अश्व शोधण्यात गुंतलेल्या, (पाताळापर्यंत) पृथ्वी फोडणाऱ्या, कपिलमुनीने क्रोधामुळे आपल्या तेजाने भस्म करून टाकलेल्या वडिलांच्या आजोबांना, शरीराला अगणित (तपाने) ताप देणाऱ्या भगीरथाने उग्र तपश्चर्या करून तुझ्या (पवित्र) जलाचा स्पर्श करविला व (अशा रीतीने) त्यांचा उद्धार केला. २३

माते ! अशी तू अरुंधतीप्रमाणे (या आपल्या) सुनेचे-सीतेचे कल्याण चिंतणारी हो !

**लक्ष्मण -** चित्रकूटाला जाणाऱ्या मार्गावरील, यमुनातटीं वसलेला, भरद्वाजांनी (खूण म्हणून) सांगितलेला हा श्याम नावाचा वड ।

(राम लोभसवाणें पाहतो)

**सीता -** आर्यपुत्रांना या प्रदेशाची आठवण आहे का ?

**राम -** अगं, कसा मी विसरेन?

" प्रवासाच्या थकव्यामुळे आळसाने जडावलेली, मोहक, गाढ आलिंगनांनी मर्दन केली गेलेली, कमलदेठासारखे चुरगळलेली (तुझी) दुर्बल अंगे माझ्या छातीवर टेकवून तू जेथे झोपी गेलीस " २४

**लक्ष्मण -** ही विन्ध्यारण्याच्या तोंडाशी विराधराक्षसाने केलेली अडवणूक !

**सीता -** नको आता हे. आता आर्यपुत्रांनी स्वतःच्या हाताने माझ्यावर धरलेल्या तालपत्राच्या छत्रीने ऊनाचे निवार केले आहे असा माझा दक्षिणारण्यातील प्रवेशाचा आरंभ पाहते.

**राम -** हीच ती पर्वतातील नद्यांच्या काठांवरील वानप्रस्थ तपस्व्यांकडून आश्रय केली गेलेली वृक्षे असलेली तपोवने । येथे पाहुणचाराचे अगत्य बाळगणारे संयमी गृहस्थाश्रमी मूठभर नीवार-धान्य शिजवून, घरे करून राहतात !! २५

**लक्ष्मण -** दाट वृक्षांच्या समुहांनी नेहमी स्निग्ध (तुकतुकीत) व कृष्णवर्णी परिसर झालेला व अरण्यांनी वेढलेल्या गोदावरीने (तिच्या जलाने) ज्याचे गुहाप्रदेश सशब्द केलेला आणि सतत वृष्टी करणा□या मेघांनी ज्याचा नीलवर्ण वृद्धिंगत केलेला असा हा जनस्थानाच्या मध्यभागी वसलेला हा प्रसवण पर्वत!

**राम -** हे सुंदरी, त्या पर्वतावर लक्ष्मणाने आपली (चोख) व्यवस्था ठेवल्यामुळे स्वस्थचित्ताने आपण जे दिवस घालविले ते आठवतात का तुला? तसेच तेथील चविष्ट जलाची गोदावरी नदी आठवते का ? अन् तिच्या परिसरातील आपले ते (स्वैर) विहार ? २६

आणि तसेच

एकमेकांना बिलगून बसल्यामुळे गालाला गाल भिडलेल्या स्थितीत हळू हळू काहीना काही, असंबद्ध गुजगोष्टी करणाऱ्या (आणि) (परस्परांना) गाढ आलिंगन देण्यात आपल्या दोघांचे एकेक हात गुंतलेल्या आपल्या दोघांची, कोणता प्रहर उलटून गेला आहे याची जाण नसणारी अशी रात्र संपून गेली (पण आपल्या गोष्टी संपल्या नाहीत) ! २७

**लक्ष्मण -** ही पंचवटीत शूर्पणखा (आली).

**सीता -** हे नाथ ! येथवरच आपले दर्शन !

**राम -** अग विरहभीरू ! हे चित्र आहे!

**सीता -** कसे का असेना ! दुष्ट माणूस व्यथा उत्पन्न करतोच.

**राम -** हाय ! जनस्थानातील हकीकत कशी आज घडल्यासारखी वाटत आहे मला.

**लक्ष्मण -** यानंतर त्या दुष्ट राक्षसांनी सुवर्णमृगाच्या मिषाने असे काही घडवून आणिले की त्या (कृत्याचे) (शत्रूचा सूड घेऊन) क्षालन केले तरीही (मनाला) ते व्यथा निर्माण करिते. (त्या वेळी) निर्जन अशा जनस्थानात आर्यांच्या (दादांच्या) इंद्रियविकल करणाऱ्या (करुणपूर्ण) आचरणाने साक्षात पाषाणाला सुद्धा रडू आले अन् वज्राचे हृदय दुभंगले जाते !! २८

**सीता -** (अश्रुपूर्ण, स्वतःशी) हाय, रघुकुलनंदन महाराज, अशा रीतीने मजकरिता आपण दुःखीकष्टी झालांत ना !

**लक्ष्मण -** (रामाला निरखून, आशययुक्त) दादा, काय हे ? तुटलेल्या मोत्यांच्या सराप्रमाणे हा (तुमचा) अश्रुप्रवाह (गालावरून) धारांनी ओघळत जमिनीवर (पडताच) कणाकणात विखुरला जात आहे. भावनावेग (हुंदका) दाबून ठेवण्याचा प्रयत्न केला तरी मोठ्या भरामुळे ऊर दाटून टाकीत, तो अधरोष्ठ व नाकपुड्यांच्या थरथरण्यामुळे लोकांच्या लक्षांत येत आहे ! २९

**राम –** बाळा !

प्रिय पत्नीच्या विरहामुळे उत्पन्न झालेला माझा दुःखरूपी अग्नी त्यावेळी तो तीव्र असूनही सूडाच्या इच्छेमुळे कसाबसा मी सहन केला! पण आता तो अंतःकरणात उकळत असून हृदयाच्या मर्मस्थानी होणाऱ्या व्रणांप्रमाणे मला (तीक्ष्ण) वेदना देत आहे! ३०

**सीता -** हाय, धिक्कार ! माझेही दुःख पराकोटीला पोचल्यामुळे जणू आर्यपुत्रांचा विरह झाल्यासारखे मला भासत आहे !

**लक्ष्मण -** (स्वगत) असो, यांचे लक्ष अन्यत्र वेधतो. (चित्र पाहून, उघड) अन् हे (पूर्व) मन्वंतराइतक्या पुरातन अशा गृध्रश्रेष्ठ जटायूच्या जीवनातील पराक्रमाचे चित्रण.

**सीता -** हाय तात ( जटायू)। अपत्यप्रेमाची तू अगदी परिसीमा गाठलीस !

**राम -** हाय रे कश्यपकुलीन पक्षिश्रेष्ठा, तात जटायु, तुझ्यासारख्या थोर तीर्थस्वरूप महात्म्याच्चा-साधूचा पुनः पृथ्वीवर अवतार कोठून व्हावयाचा ?

**लक्ष्मण -** हा जनस्थानाच्या पश्चिमेकडील 'चित्रकुंजवत्' नामक दण्डकारण्याचा विभाग; कबंधरूपाने 'दनु' दैत्य येथे राहात असे. हे ऋष्यमूक पर्वतावरील मतंगत्रऋषीचे आश्रमस्थल. ही 'श्रमणा' नामक वन्य (सिद्ध ) भिल्ल तपस्विनी. अन् हे ते पंपानामक सरोवर !

**सीता -** येथेच आर्यपुत्रांनी शौर्य, धैर्य सोडून मुक्तकंठाने रोदन केले म्हणतात (किल ) !

**राम** - राणी, हे सरोवर (खरोखर) रमणीय आहे !

या सरोवरात आनंदाने सुस्वर काढणारे (निळ्या चोची व पाय असलेले) 'मल्लिकाक्ष' हंस आपले पंख फडफडावून लांबलचक देठाच्या श्वेतकमळांना गदगदा हलवून सोडीत; (त्यामुळे) अश्रुबिंदू नेत्रांतून गळत व पुनः डोळ्यांत उभे राहीपर्यंतच्या मध्यंतरात मला हे भूभाग (जणू) नीलकमलव्याप्त आहेत असे दिसले ! ३१

**सीता -** हाच तो महात्मा मारुती, याने मर्त्य जगाचा उद्धार करण्याचे चिरकाळ चालणारे कार्य करून (जगावर) महदुपकार केले आहेत !

**राम -** मोठे बाहु असणारा( पराक्रमी ) व अंजनेचा आनंद वाढविणारा हाच तो मारुती, सुदैवाने ज्याच्या पराक्रमी कृत्यांनी आम्ही आणि सर्व जग सुद्धा कृतकृत्य झाले! ३२

**सीता -** वत्सा लक्ष्मणा, फुललेल्या कदंबवृक्षामुळे मोर तांडवनृत्य करीत आहेत अशा या पर्वताचे नाव काय बरे ! येथे केवळ प्रतापाचे सौंदर्य उरल्याने निस्तेज देहकांती बनलेले आर्यपुत्र क्षणभर मूच्छित झाले तेव्हा रडतरडत तू त्यांना, वृक्षतळी सावरून धरिले आहेस असे चित्र काढले आहे ?

**लक्ष्मण -** ककुभ वृक्षांनी सुगंधित झालेला तोच माल्यवान नामक पर्वत. याच्या शिखराचा, नवा निळसर तुळतुळीत मेघ, आसरा घेत आहे. यावर दादांनी-

**राम -** थांब थांब ! यापुढील (वर्णन) मला सहन होत नाही. तो दुष्ट सीताविरह माझ्यापाशी जणू परत येऊन ठेपला असे वाटू लागते ! ३३

**लक्ष्मण -** यापुढे आपली व वानरराक्षसांची असंख्य व एकापेक्षा एक वरचढ अशी अद्भुत कृत्ये (रेखाटली) आहेत. पण वहिनी दमलेल्या दिसतात. तेव्हा विसावा घ्यावा, अशी विनंति करितो.

**सीता -** नाथ, या चित्रांना पाहून डोहाळा उत्पन्न झाला आहे माझ्या मनात, म्हणून विनंति आहे माझी.

**राम** - अगं (विनंती काय), आज्ञा कर (मला ) !

**सीता -** मला असे वाटते की, पुनः प्रसन्न घनदाट वनराजीत हिंडावे, पवित्र, निर्मळ व थंड जलाने भरलेल्या भागीरथीत स्नान करावे !

**राम -** वत्सा लक्ष्मणा !

**लक्ष्मण -** हा आहे मी !

**राम -** वत्सा, हिचा डोहाळा लगेचच पूर्ण करावा, असे गुरुजनांनी नुकतेच आज्ञापिले आहे. तरी न अडखळतां सुलभतेने मार्गक्रमण करणारा रथ (प्रवासार्थ) तयार करून आण.

**सीता -** नाथ, आपणसुद्धा आलं पाहिजे बरं का !

**राम -** अगं कठोर मनाच्या प्रिये, हे सुद्धा सांगायला पाहिजे ना !

**सीता -** तर मग माझ्या मनाजोगते झाले, मनाजोगते झाले !

**लक्ष्मण -** जशी दादांची आज्ञा (जातो).

**राम -** प्रिये या खिडकीजवळ जरा बसू या !

**सीता -** ठीक आहे. श्रमाने उत्पन्न होणाऱ्या झोपेने खरंच घेरले आहे मला !

**राम -** तर मग माझ्याबरोबर चलण्यासाठी मला घट्ट विलग.

'भय व शीण यांमुळे घर्मबिन्दूने युक्त (व म्हणून) चंद्रकिरणांचा स्पर्श झाल्यावर पाझरणाऱ्या चंद्रकांतमण्यांच्या हाराची शोभा धारण करणारा हा तुझा बाहू, माझ्या गळ्याभोवती टाक-जणू मला नवजीवन देण्यासाठीच. ३४ (तसे करावयास लावून, आनंदाने) प्रिये हा काय बरे चमत्कार !

(मला) हे निश्चित करता येत नाही की, हे सुख आहे की दुःख, ही मूर्च्छा आहे की निद्रा, हा विषाचा प्रसार आहे की मद. तुझ्या प्रत्येक स्पर्शागणिक माझ्या इंद्रिय समुहाला बधिर करून टाकणारा (हा) विकार माझ्या चेतनाशक्तीला भ्रमित करीत आहे आणि झाकून टाकीत आहे. ! ३५

**सीता -** तुमचे माझ्यावर अढळ प्रेम आहे, यापेक्षा दुसरे ते काय (कारण) असणार ?

**राम -** हे कमललोचने ! हे कमललोचने, तुझे हे गोड शब्द कोमेजलेल्या जीवपुष्पाला विकसित करणारे, आनंद देणारे, सर्व इंद्रियांना मुग्ध करणारे, कर्णांना जणू अमृत आणि चित्ताला (संजीवन देणारे) रसायनेच होत !३६

**सीता -** हे मधुर भाषी प्रिया, चला, पडू या (जरा). (असे म्हणून शयनार्थ सभोवार निरखून पाहू लागते)

**राम -** अगं शोधतेस काय (किंवा, कशाला) ?

विवाह झाल्या दिवसापासून, घरी, रानात, बालपणी त्यानंतर पुन्हा तारुण्यात झोपण्यासाठी, कोणा अन्य स्त्रीने ज्याचा कधीही आसरा घेतला नाही, असा हा रामाचा बाहू तुला उशी म्हणून आहे ! ३७

**सीता –** (झोप आल्याचा अभिनय करीत) होय, नाथ, आहे खरे असेच, असेच आहे खरे. (झोपते )

**राम -** काय ! प्रियभाषिणी माझ्या वक्षःस्थलावर मस्तक टेकवून झोपली सुद्धा इतक्यांत ! (निरखून पाहात)

ही घराची प्रत्यक्ष लक्ष्मी, नेत्रांना अमृताची शलाका; हिचा हा स्पर्श म्हणजे शरीराला चंदनाची दाट उटीच! हिचा हा गळ्याभोवती असलेला हात म्हणजे थंडगार तुकतुकीत असा मुक्ताहारच! खरोखर, हिचे मला काय म्हणून प्रिय नाही, (परंतु) जर हिचा विरह झाला तर तो असह्य आहे. ३८

(प्रवेश करुन)

**प्रतीहारी -** महाराज, येऊन ठेपला !

**राम -** अरे कोण !

**प्रतीहारी** - महाराजांचा निकटवर्ती सेवक दुर्मुख !

**राम -** (स्वगत) अन्तःपुरात काम करणारा हा सेवक दुर्मुख. याला मी नागरी व ग्रामीण जनतेमध्ये हेर म्हणून पाठविला होता. (उघड) येऊ दे (त्याला आत).

(प्रतीहारी निघून जाते)

**(प्रवेशून)**

**दुर्मुख -** (स्वगत) हाय हाय, आता राणीविषयी असला अतर्क्य लोकापवाद महाराजांना कसा सांगू मी ? पण कमनशिबी अशा माझी ही कामगिरीच पडली (ती टळणार कशी ?)

**सीता -** (झोपेत बोलते) हे आर्यपुत्रा, प्रियकरा, कोठे आहेस ?

**राम -** अरे, चित्रे पाहिल्यापासून (मनात) उद्‌भवलेली तीच ही पीडादायक वियोगाची कल्पना, जी राणीला झोपेत त्रस्त करीत आहे ! (प्रेमाने तिचें अंग कुरवाळीत)

सुखदुःखात समान राहणारा, सर्व अवस्थांमध्ये अनुसरण करणारा, हृदयाचे विश्रामस्थान असणारा, ज्यातील रस हा वार्धक्य हरण करु शकत नाही असा, विवाहापासून मरणापर्यंत कालपरत्वे परिणत झालेल्या स्नेहसारामध्ये वास करणारा, त्या भाग्यशाली मनुष्याचा काही अवर्णनीय (भद्र) असा (हा दांपत्यजीवनातील) आनंद (त्यास) खरोखर कसाबसा प्राप्त होतो. (मोठ्या भाग्याने प्राप्त होतो.) ३९

**दुर्मुख** - (जवळ जाऊन) महाराजांचा जय असो !

**राम -** जे कळले असेल तें सांग पाहू !

**दुर्मुख -** 'आम्हांला रामचंद्रांनी दशरथ महाराजांचा विसर पाडला', अशी नागरी व ग्रामीण प्रजाजन महाराजांची प्रशंसा करीत आहेत.

**राम -** हा (केवळ) स्तुतीचा भाग (झाला), पण माझा काही दोष आढळला असल्यास तो सांग म्हणजे त्याविरुद्ध योजना करिता येईल.

**दुर्मुख -** (साश्रुनयनांनी) ऐकावे महाराज. (कानात) असे असे !

**राम -** हाय हाय ! तीक्ष्ण धक्का देणारा शब्दरूपी वज्रपातच हा ! ( मूच्छित होतो)

**दुर्मुख -** सावध व्हा महाराज.

**राम –** (सावध होऊन)

हायहाय ! धिक्कार असो ! सीतेचा इतरांच्या गृही राहण्याचा जो कलंक दिव्य उपायांनी दूर केला होता, तो पुन्हा एकदा दैवदुर्विलासामुळे (पिसाळलेल्या) कुत्र्याच्या विषाप्रमाणे सर्वत्र पसरला आहे ! ४०

तेव्हा मंद भाग्य असणाऱ्या मी काय करावे? (विचार करून, दयापूर्ण स्वरात) किंवा दुसरे काय (करायचे आहे?)

कोणत्याही प्रकारे लोकांचे आराधन करणे, हे सज्जनांचे व्रत, ते माझा व प्राणांचा त्याग करणाऱ्या (माझ्या) वडिलांनी पूर्ण केले ! ४१

आणि आताच भगवान वसिष्ठांनी आदेश दिला आहे. शिवाय -

सवितृ कुळातील जगात श्रेष्ठ असणाऱ्या राजांनी जे चांगले व शुद्ध चारित्र्य जगांत उज्ज्वल केले जर (चेत्) त्या चारित्र्यामध्ये (अस्मिन्) माझ्या संदर्भामुळे दूषित जनापवाद अस्तित्वांत असेल, तर हाय! अशा माझा अभाग्याचा धिक्कार असो! ४२

हाय गे देवयज्ञोद्भव सीते ! पृथ्वीवर जन्म घेण्याच्या अनुग्रहाने तिला (पृथ्वीला) पवित्र करणाऱ्या! मुनि जनक यांना आनंद देणारी, अग्नी, वसिष्ठ, अरुंधती यांच्याकडून प्रशंसा केलेल्या सच्छीलाने शोभणाऱ्या, राम हेच जीवित बनलेल्या, महान् अरण्यवासातील प्रिय सखी! वडिलांच्या (दशरथाच्या) लाडक्या, मितभाषिणि! अशा प्रकारचा दैवाघात तुझ्यावर कोसळावा ना !

तुझ्यामुळे जगात पुण्ये आहेत (मात्र) तुझ्याविषयी जनापवाद अपवित्र ? तुझ्यामुळे जग हे सनाथ आहे अन् तू मात्र अनाथ अवस्थेत नष्ट होणार ! ४३

(दुर्मुखाला उद्देशून) दुर्मुखा, लक्ष्मणाला सांग, हा नवा राजा राम तुला आज्ञा करीत आहे.(कानात) असे असे !

**दुर्मुख –** हाय रे देवा, अग्नीने पूर्ण शुद्ध केलेल्या, गर्भात (रघुकुलाचे) पवित्र संतान असलेल्या देवींच्या बाबतीत (सीतेच्याबाबतीत) दुष्टांच्या बोलण्यावरून असे ठरविले तरी कसे महाराजांनी!

**राम -** असे नको बोलू ! प्रजाजन दुष्ट कसे ?

इश्वाकूंचा वंश प्रजेचा आवडता आहे, पण दुर्दैवामुळे (त्या घराण्यात) निंदेला कारण निर्माण झाले; आणि (तिच्या) शुद्धीच्या वेळी जे अद्भुत (घडले) ते जर दूरदेशी असेल तर कोण (त्यावर) विश्वास ठेवेल? ४४

तेव्हा जा पाहू !

**दुर्मुख -** अरेरे राणी ! (जातो)

**राम -** हाय, किती वाईट (घटना) ! अत्यंत घाणेरडे कृत्य हातून घडणारा असा मी क्रूरकर्मा बनलो (खराच)!

'बालपणापासून पालनपोषण केलेल्या, सौहार्दामुळे तोच एक (माझा) आश्रय घेतलेल्या या (माझ्या) प्रियेला मी (दोहदपूर्ति) मिषाने, ज्याप्रमाणे पाळीव मैनेला खाटिकाला द्यावे त्याप्रमाणे मृत्यूला देत आहे ! ४५

तेव्हा ज्याला स्पर्श करु नये असा मी पापी राणीला स्पर्शाने का दूषवीत आहे बरे ! (असे बोलून सीतेचे मस्तक  हळुवारपणे (अलगद उचलून हात काढून घेत),

(असे बोलून सीतेचे मस्तक हळुवारपणे (अलगद उचलून हात काढून घेत),

हे सरलस्वभावी (किवा सुंदर) स्त्रिये, पूर्वी कधी न घडलेले कृत्य करणाऱ्या मला, चाण्डाळाला सोड. तू चंदनवृक्षाच्या भ्रमाने वाईट परिणाम करणाऱ्या विषवृक्षाला कवटाळले आहेस. ४६

(उठून) अरेरे, सर्व पृथ्वीची आता उलथापालथ झाली, आज रामाचे जगण्याचे प्रयोजन संपले! आता वठलेल्या रानासारखे जग ओसाड झाले । संसार असार झाला. शरीर ही एक व्यथा बनली, मला आधार उरला नाही.

काय करू, कुठे जाऊ।किंवा

दुःख भोगण्यासाठीच रामाच्या देहात चैतन्य उरले आहे. कारण मर्मस्थानावर आघात करणाऱ्या प्राणांनी हृदयात खिळ्याप्रमाणे कार्य केले आहे. (प्राण शरीरात अडकले आहेत.) ४७

हे माते अरुंधती, हे भगवन् वसिष्ठ व विश्वामित्र, हे अग्नी, हे पृथ्वीदेवी, अहो तातजनक, हे मातापित्यांनो, हे प्रिय मित्र सुग्रीवा, हे सुस्वभावी हनुमाना, हे अत्यंत उपकारक लंकाधिप विभीषणा, हे सखि त्रिजटे, हाय! या दुष्ष रामाने तुमचा अपमान केला आहे, किंवा पण त्यांना (अशा रीतीने) आता आवाहन करणारा मी कोण (मला काय अधिकार)

मला असे निश्चित वाटते की, ज्यांची नावे (मी) घेतली आहेत असे हे महात्मे कृतघ्न, दुष्ट आणि पापी अशा माझ्याकडून जणू काही स्पर्शिले जात आहेत. ४८

ज्याप्रमाणे श्वापदांना बलि टाकावा त्याप्रमाणे विश्वासाने (माझ्या) वक्ष:स्थली पडून झोपी गेलेल्या, (माझ्या) प्रियगृहिणीला, (माझ्या) घराच्या लक्ष्मीला, (चित्रदर्शनाच्या) उद्वेगाने स्फुरण पावणाऱ्या कठोर गर्भाने जड झालेल्या हिला (सीतेला) निर्दयी मी टाकून देत आहे ! ४९

(सीतेच्या पावलांना डोक्यावर ठेवून) हा (तुझ्या) पायांच्या धुळीचा रामाच्या शिराबरोबर तुझा हा शेवटच स्पर्श.

(पडद्यात) - अहो अनाचार, अनाचार !

**राम -** अहो ही काय गडबड आहे, पाहा बरे (कोणीतरी) ?

(पुनः पडद्यात) लवणाकडून (नामक राक्षसाकडून) त्रासित झालेला, उग्र तपश्चर्या करणाऱ्या आणि यमुनातीरी वास करणाऱ्या ऋषींचा हा समुदाय, हा शरण्य असलेल्या आपणासमोर उपस्थित झाला आहे. ५०

**राम** - काय, अजूनहि राक्षसांची पीडा ? तेव्हा आता या मधुरा (मथुरा) निवासी, दुष्ट कुंभीनसीच्या पुत्राच्या (लवण राक्षसाला) उन्मूलनासाठी मी शत्रुघ्नास पाठवितो ! (काही पावले चालून, पुन्हा परतून) हाय, राणी!तू अशा अवस्थेत कशी बरे जाशील ? हे पृथ्वी देवी, प्रशस्यतर अशा तुझ्या या कन्येचा-जानकीचा सांभाळ कर !

(कारण)'जनक' व 'रघु' यांचे जे संपूर्ण कुलांचे कल्याण अशा या पुण्यशील कन्येला तू पवित्र देवयज्ञात जन्म दिला आहेस (हे लक्षात असू दे)! ५१

(असे बोलून रडतरडत निघून जातो)

**सीता -** अहो, प्रिय आर्यपुत्र, कोठे आहात? (एकदम उठून) हाय, धिकार धिकार असो ! दुष्ट स्वप्नामुळे फसून नाथांचा (खरोखरच) वियोग झाला असे समजते आहे मी ! (पाहून) अगं बाई! झोपलेली असता मला एकटीला सोडून आर्यपुत्र गेले तरी कुठे! ही काय भानगड असेल ! असू दे, (नाथ आले की) त्यांच्यावर खूप रागवेन मी - पण जर का त्यांना पाहताच माझा माझ्यावर ताबा राहिला तरच (रागवायची गोष्ट) येथे (आसपास) नोकरवर्गापैकी कोण आहे ?

(प्रवेशून)

**दुर्मुख** - राणीसाहेब, युवराज लक्ष्मण विनंती करितात की, रथ तयार आहे. राणीसाहेबांनी चढावे त्यात.

**सीता -** ही चढले मी. (उठून, थोडे चालत) माझा गर्भ स्फुरण पावत आहे - हळूहळू जाऊं या.

**दुर्मुख -** इकडून, इकडून यावे राणीसाहेबांनी !

**सीता -** तपस्विजनांस वंदन असो! रघुकुळांच्या देवतांना नमस्कार ! आर्य-पुत्रांच्या चरणकमलांना वंदन! सर्व गुरुजनांना पण माझे नमन असो !

(सर्वजण निघून जातात)

अशाप्रकारे महाकविभवभूतिप्रणीत उत्तरामचरिताचा **'चित्रदर्शन'** नामक पहिला अंक समाप्त.

**३.४) स्वंय अध्ययनाचे प्रश्न**

१) रामाच्या बहिणीचे नाव काय होते ?

१) शांता २) श्यामा ३) सुलोचना ४) सुशीला

२)उत्तररामचरितम् हे नाटक कोणत्या देवाच्या यात्रेत सादर केले गेले?

१) महाकाल २)ओंकारेश्वर ३) कालप्रियनाथ ४) भैरवनाथ

३) चित्रपट दर्शन पाहिल्यानंतर सीतेला कोणत्या नदीकाठी विहार करण्याचे दोहद लागले?
१) गंगा २) भागीरथी ३) गोदावरी ४) यापैकी कोणतीही नाही.

४) सीतेचे दोहद पुरविण्याचा निरोप रामास कोणी दिला होता?
१) सुमित्रा २) वासंती ३) कौसल्या ४) अरुन्धती

५) रामास जृम्भकास्त्र कोणी भेट म्हणून दिले होते?
१)विश्वामित्र २) परशुराम ३) वसिष्ठ ४) वाल्मिकी

६) रामाने लवणासुराचा वध करण्यासाठी कोणास पाठविले?
१) लक्ष्मण २) भरत ३) शत्रुघ्न ४) हनुमानास

७) रामाच्या गृहातील सर्व वडीलधारी मंडळी कोणाच्या यज्ञास गेली होती ?
१) अष्टावक्राच्या २) ऋष्यश्रृंगाच्या ३) वसिष्ठांच्या ४) वाल्मिकींच्या

८) सीतेच्या लोकापवादाची बातमी रामास कोणी दिली?
१)अष्टावक्राने २) प्रतीहारीने ३) दुर्मुखाने ४) लक्ष्मणाने

९) रामास सीतेची कोणती गोष्ट अप्रिय आहे, असे रामाने सांगितले आहे?
१) सीतेचा हट्ट २) सीतेचा विरह ३) सीतेचा अबोला ४) काहीही नाही

१०) उत्तररामचरितम् हे कोणत्या प्रकारचे रूपक आहे?
१) वीथी २) प्रकरण ३) नाटक ४) त्रोटक

**३.५) पारिभाषिक शब्द, शब्दार्थ**

या घटकामध्ये नाटकात काही संज्ञांचा नामोल्लेख आपल्याला आढळतो. त्यांचे येथे थोडक्यात स्पष्टीकरण दिले आहे.

१) **तां वाणीममृतात्मनः कलाम् –** हे वाक्य नांदीत आले आहे. कवीने वाणीला अमृता – अमर्त्य असे म्हटले आहे. वाणी ही देवता असल्यामुळे ती देवादिकांच्या गुणांमुळे युक्त असल्याने अमर असणार. वाणीचे जरी ऐहिक रूप लक्षात घेतले तरी पूर्वमीमांसाकाच्या मतानुसार शब्द व अर्थ यांतील संबंध हा अनादि, शाश्वत असतो. त्यामुळे अशा स्वरूपातही ती अमर्त्य आहे. म्हणजे ऐहिक आणि पारमार्थिक या दोन्ही स्वरूपात

वाणी ही अमर आहे. तसेच वाणीला आत्म्याची, परब्रह्माची एक कला म्हणजे एक अंग, भाग मानलेले आहे. विष्णुपुराणात काव्य हे विष्णुचे शरीर मानले आहे.

**२) आहिताग्नि – द**क्षिण, गार्हपत्य व आहवनीय ह्या तीन अग्नींचे अनुष्ठान म्हणजे त्यांची स्थापना व संरक्षण करण्याचे व्रत ज्याने अंगिकारलेले असते, त्यास आहिताग्नि किंवा साग्निक म्हणतात. हा श्रौत विधि आहे. ज्यांनी हे व्रत स्वीकारले असेल त्यांना इतर ठिकाणी अग्नींना सोडून जास्त काळ राहता येत नाही, कारण या व्रताची जबाबदारी इतरांवर, स्वपत्नी इत्यादींवर स्वल्पकाळासाठीच टाकता येते. राजा जनक ह्यांनी आहिताग्नि व्रत स्वीकारलेले असल्याने त्यांना अयोध्येस दीर्घकाळ राहणे शक्य नव्हते, असे राम सीतेस सांगतो.

**३) जृम्भकास्त्र -** ही अस्त्रे रामास विश्वामित्र ऋषींकडून प्राप्त झाली. यांचा शब्दशः अर्थ केल्यास जांभई निर्माण करणारे अस्त्र असा होतो. युद्धामध्ये शत्रुपक्षाला या अस्त्राने चित्रात रेखाटल्याप्रमाणे स्तंभित करता येत असे. या नाटकातील पाचव्या अंकात रामाचा पुत्र लव हा रामाच्या अश्वमेध यज्ञातील अश्वाचे रक्षण करणाऱ्या सैन्यावर हे अस्त्र सोडतो. त्या अंकात सुद्धा त्याची माहिती सांगताना असे सांगितले आहे की, ती कृशाश्व नामक मुनींची संताने आहेत. ती तेथून कौशिकाला, कुशिकाच्या पुत्राला म्हणजे विश्वामित्राला प्राप्त झाली व त्यानंतर ती आता रामाला संक्रमित करण्यात आली आहेत. विश्वामित्रांचा उल्लेख प्रथम अंकात कुशिकनंदन, कुशिकाला आनंद देणारा, असा केला आहे. ती अस्त्रे लवाने वापरलेली पाहून सुमंत्राला व चंद्रकेतुला आश्चर्य वाटते. मात्र केवळ राम, लक्ष्मण व सीता या तिघांनाच माहित आहेत की, ती अस्त्रे रामाने चित्रपटदर्शनाच्या वेळी सीतेच्या गर्भांना संक्रमित केली होती. ही अस्त्रे रामाचा आणि लव-कुशांचा संबंध सिद्ध करण्याचे महत्त्वाचे कार्य करतात.

**४) शंकरशरासन –** हे धनुष्य साक्षात विश्वकर्म्याने भगवान शंकरासाठी बनविले होते. शंकराने हे दक्षाच्या यज्ञात भगवान विष्णुखेरीज इतर देवतांच्या विरुद्ध यशस्वीपणे वापरले होते. नंतर त्यांनी ते राजा जनकाचे पूर्वज, देवरताकडे ठेवण्यास दिले. जनकाने त्याचे यथोचित पूजार्चन केले व सीतेच्या स्वयंवराच्या वेळी जो कोणी हे शिवधनुष्य उचलेल त्यास सीतेचा हात देण्याचा निर्णय केला. रामाने ते यशस्वीपणे पेलले आणि त्याला प्रत्यंचा लावताना ते मध्यभागी तुटले.

**५) भगवान भार्गव –** भृगुवंशीय, ऋषि जमदग्नीचा पुत्र, परशुराम. ते भगवान शंकराचे मोठे शिष्य होते. मात्र रामाने सीतेच्या स्वयंवरात शिवधनुष्य तोडल्यामुळे ते कुपित झाले होते. त्यामुळे सीतास्वयंवरानंतर अयोध्येला परत जात असताना रामास त्यांनी अडविले व त्यास त्यांच्याकडील वैष्णवधनुष्याला प्रत्यंचा लावण्याचे आव्हान रामास दिले. आणि जर राम हे यशस्वीरित्या करु शकले तरच राम त्यांच्याशी युद्ध करु शकेल, असे सांगितले. परशुरामाने क्षत्रियांचा एकवीस वेळा संहार केलेला असल्याने राजा दशरथ व इतर सर्व याच्या परिणामाबद्दल भयभीत झाले. म्हणूनच भार्गवाचे चित्र पाहताच तो प्रसंग आठवून सीता भयकंपित झाली. मात्र रामाने त्या धनुष्यास प्रत्यंचा तर लावलीच आणि त्यास बाण लावून परशुरामास विचारले की, या बाणाने कशाचा वेध घ्यावा, परशुरामाच्या गतीचा कि परशुरामाने तपाने मिळविलेल्या लोकांचा (जगाचा)? परशुरामाने लोकांचा वेध घेण्यास सांगितले. त्यानुसार रामाने लोकांचा वेध घेतला

आणि म्हणून ती निस्तेज व जड झाली, असे वर्णन रामायणातील बालकांडात आले आहे. रामाने परशुरामाकडून त्यांनी मिळविलेली लोके (जग, भूमी) हरण केली, हे रामाचे कौतुक लक्ष्मण सीतेस सांगू पाहत होता, मात्र आत्मस्तुतीचा सोस नसलेल्या रामाने त्यास थांबविले.

**६) गोदानमंगलम् –** गोदान हा एक विधी असून त्यास केशान्त असेही म्हटले जाते. यात केशकर्तन केले जाते. हा विधी लग्नाच्या लगेचच अगोदर करावयाचा असतो. मिताक्षरात याबाबत असे सांगितले आहे की, ब्राह्मणाचा जन्मापासून सोळाव्या वर्षी हा विधी करावा. मल्लिनाथ म्हणतो की, यात गो म्हणजे केस दिले जातात, कापले जातात, म्हणून यास गोदान असे म्हणतात. (गावो लोमानि केशा दीयन्ते, खण्ड्यन्तेऽस्मिन्निति।) मनुस्मृतीने ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांचा अनुक्रमे सोळा, बारा व चौदाव्या वर्षी हा संस्कार करावा, असे विधान केले आहे. काहींनी या विधीचा वेगळा अर्थ सांगितला आहे. विवाहापूर्वी गोदान करण्याच्या क्षत्रियांच्या मंगल कार्याला गोदान म्हटले जाते. (विवाहात् प्राक् गोवितरणरूपो मङ्गलहेतुः क्षत्रियाणामाचारः।) वाल्मिकीरामायणातील वर्णनावरून गोदानाचा हा दुसरा अर्थ समर्पक व योग्य वाटतो.

**३.६) स्वयं अध्ययनाच्या प्रश्नांची उत्तरे**

घटक ३.४ मधील प्रश्नांची उत्तरे येथे दिली आहेत.

| | | |
|---|---|---|
| (१) १ - शांता | (२) ३ - कालप्रियनाथ | (३) २ – भागीरथी |
| (४) ४ - अरुन्धती | (५) १ - विश्वामित्र | (६) ३ - शत्रुघ्न |
| (७) २ - ऋष्यश्रृंगाच्या | (८) ३ - दुर्मुखाने | (९) २ - सीतेचा विरह |
| (१०) ३ - नाटक | | |

**३.७) सारांश -** प्रस्तुत घटकातून आपण उत्तररामचरितम् या नाटकाच्या प्रथम अंकाचा सूक्ष्म परिचय करुन घेतला. नाटकाच्या सुरुवातीला येणाऱ्या प्रस्तावनेमधून आपल्याला पुढे घडणाऱ्या घटनांचे आणि त्यांच्या एकूण परिपाकाचे सूचकपणे निदर्शन केले आहे. यातून संपूर्ण नाटकाचा आराखडा व कथावस्तूची वाटचाल यांचा सूज्ञ वाचकास अंदाज येतो.

**३.८) स्वाध्याय – सरावासाठी प्रश्न**

**अ) खालील श्लोकांचे भाषांतर लिहा.**

१) वितरति गुरु प्राज्ञे विद्यां यथैव तथा जडे ।न तु खलु तयोर्ज्ञाने शक्तिं करत्यपहन्ति वा।
भवति च पुनर्भूयान्भेदः फलं प्रति तद्यथा। प्रभवति शुचिर्बिम्बग्राहे मणिर्न मृदां चयः ।।

२) उत्पत्तिपरिपूतायाः किमस्याः पावनान्तरैः। तीर्थोदकं च वह्निश्च नान्यतः शुद्धिमर्हतः।।

३) शैशवात्प्रभृति पोषितां प्रियां सौहृदादपृथगाश्रयामिमाम्।
छद्मना परिददामि मृत्यवे सौनिको गृहशकुन्तिकामिव।।

४) अद्वैतं हि सुखदुःखयोरनुगतं सर्वास्वस्थासु यद्विश्रामो हृदयस्य यत्र जरसा यस्मिन्नहार्यो रसः।

कालेनावरणात्ययात्परिणते यत्स्नेहसारे स्थितं भद्रं तस्य सुमानुषस्य कथप्येकं हि तत्प्राप्यते।।

५) इयं गेहे लक्ष्मीरियममृतवर्तिर्नयनयोरसावस्याः स्पर्शो वपुषि बहुलश्चन्दनरसः।
अयं बाहुः कण्ठे शिशिरमसृणो मौक्तिसरः। किमस्यान प्रेयो यदि परिसह्यस्तु विरहः।।

**ड) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) अष्टावक्राने दिलेल्या निरोपाचा वृत्तांत व त्याचा पुढील कथानकावर झालेला परिणाम स्पष्ट करा.

२) चित्रपट दर्शनाचा वृत्तांत सांगून त्यातून कवीने काय साधले आहे, ते स्पष्ट करा.

३) नाटकाच्या प्रस्तावनेतून आपल्याला कोणकोणती माहिती मिळते, ते स्पष्ट करा.

४) रामाच्या शोकाचे वर्णन करा.

५) भवभूतीच्या काव्यकलाकृतींची थोडक्यात माहिती द्या.

६) उत्तररामचरितम् च्या नाटकाच्या प्रथम अंकाचे रसग्रहण करा.

**३.९) क्षेत्रीय कार्य**

**१**) *उत्तररामचरितम्* या नाटकाच्या प्रथम अंकातील कथानक सारांश रूपात लिहा.

**३.१०) अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ**


**प्राथमिक स्रोत –**

१) *उत्तररामचरितम्* , (इंग्रजी), भट, गोविंद केशव, द पॉप्युलर बुक स्टोअर, सुरत, १९५३.

२) *उत्तररामचरितम्* , (इंग्रजी),काणे, पा. वा., मोतीलाल बनारसीदास, दिल्ली, चौथी आवृत्ती, १९६२.

३) *उत्तररामचरितम्* , (इंग्रजी), काळे, एम. आर. मोतीलाल बनारसीदास, दिल्ली, पाचवी आवृत्ती, २०१०.

४) *उत्तररामचरितम्* , (मराठी) हातवळणे, दि. मो. व केळकर, म.मो., पहिली आवृत्ती, १९६५.

५) *उत्तररामचरितम्* , (हिंदी) त्रिपाठी, रमाशंकर, चौखम्बा कृष्णदास अकादमी, वाराणसी, पुनर्मुद्रण, २००५.

**२) दुय्यम स्रोत**

१) करमरकर, आर. डी., *Bhavabhuti*, (इंग्रजी), कर्णाटक विद्यापीठ, धारवाड, १९६३.

२) दीक्षित, एस. व्ही., *Bhavabhuti: His Life and Literature*, (इंग्रजी), श्री छत्रपती प्रिंटीग प्रेस, बेळगाव,
१९५८.

३) भट, गोविंद केशव, *पाच संस्कृत नाटके*, कोल्हापूर, १९६०.

४) भट, गोविंद केशव, *संस्कृत नाटके व नाटककार*, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९८०.

५) मिराशी, वा. वि., *भवभूति*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९६८.

६) वाटवे, केशव नारायण, *संस्कृत नाट्यसौंदर्य*, रा.ज.देशमुख आणि कंपनी, १९६२.

## घटक क्रमांक -४

## उत्तररामचरितम् (अंक दुसरा स्थूल अध्ययन)

### अ) अंक दुसरा- पंचवटी प्रवेश

**४.१) उद्दिष्ट्ये**

**४.२ प्रस्तावना**

**४.३ विषय विवेचन**

**४.४ स्वयं अध्ययनाचे प्रश्न**

**४.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ**

**४.६ स्वयं अध्ययनाच्या प्रश्नाची उत्तरे**

**४.७ सारांश**

**४.८ स्वाध्याय**

**४.९ क्षेत्रीय कार्य**

**४.१० अधिक वाचनासाठी**

**(अ)** ४.१ **उद्दिष्ट्ये:**

१) 'पंचवटीप्रवेश' या दुसऱ्या अंकाचा परिचय होईल.

२) 'पंचवटीप्रवेश'या दुसऱ्या अंकातील पात्रांच्या स्वभाववैशिष्ट्यांचा परिचय होईल.

३) 'पंचवटीप्रवेश'या दुसऱ्या अंकाचे महत्त्व कळेल.

**(अ) ४.२ प्रस्तावना:**

घटक क्रमांक १, २ व ३ मध्ये आपण संस्कृत नाटकाचा उद्गम आणि विकास तसेच नाट्यसंज्ञांचा परिचय आणि भवभूतीच्या उत्तररामचरितम् या नाटकाच्या प्रथम अंकाचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत घटकात आपण उत्तररामचरितम् या नाटकातील द्वितीय अंक-पंचवटीप्रवेश आणि तृतीय छाया-अंक याचे स्थूल अध्ययन करणार आहोत.

पहिल्या अंकात रामाच्या राज्याभिषेकानंतर सारे आप्तस्नेही, अतिथी आपापल्या घरी परतल्यावर, विशेषतः सीतेचे वडील विदेहदेशाचा राजा जनक परतल्यावर आणि वसिष्ठ ऋषी आपली पत्नी अरूंधतींसह तिन्ही राजमाता (कैकेयी, कौसल्या, सुमित्रा)

ऋष्यश्रृगांकडे यज्ञासाठी गेल्यावर एकाकीपण अनुभवणाऱ्या राम सीतेचे मन रिझवण्यासाठी लक्ष्मणाने आणलेल्या चित्रपटदर्शनाने वनवासातील कटुगोड स्मृतीमध्ये राम–सीता दोघेही हरवून गेले असता ऋष्यश्रृगांकडून अष्टावक्र नामक दूत वसिष्ठादिकांचे त्यांच्यासाठीचे निरोप व आशीर्वाद घेऊन येतो व सीतेच्या डोहाळेपूर्तीकडे रामाने आवर्जून लक्ष दिले पाहिजे व लोकानुरंजन हे सर्वोच्च ध्येय मानून, बाकी साऱ्या गोष्टी केल्या पाहिजेत, असे दोन महत्वपूर्ण निरोप रामाला मिळतात. रामाकडे नुकतीच सीतेने पुन्हा एकदा रामासह वनात जाण्याची इच्छा होत असल्याचे बोलून दाखविलेले असते. त्यामुळे तोच तिचा डोहाळा मानून तो अग्रक्रमाने पुरवण्याची आज्ञा राम लक्ष्मणाला देतो व प्रजानुरंजन हे सर्वस्व असल्यामुळे त्यासाठी प्राणच काय, प्राणाहून प्रिय अशा जानकीचाही त्याग करेन, असे भावनेच्या भरात बोलून जातो. तेवढ्यात प्रजेचे मनोगत जाणून घेण्यासाठी गेलेला दुर्मुख नावाचा गुप्तहेर येऊन सीतेविषयी लोकांत वेगाने पसरत जाणारा गैरसमज रामाच्या कानावर घालतो आणि त्यामुळे अस्वस्थ झालेला राम तातडीने सीतात्यागाचा निर्णय घेतो. तो निर्णय घेताना त्याच्या मनाला खूप यातना होतात. पण तरीही 'राजधर्म' म्हणून तो सीतेला वनात नेऊन सोडण्याची आज्ञा लक्ष्मणाला देतो. मधल्या या नाट्यमय घटनेची जराही कल्पना नसलेली रामाच्या सहवासात खुलून जाऊन निर्धास्त होऊन झोपलेली सीता लक्ष्मणाने रथ तयार असल्याचे सांगताच आनंदाने व निवांतमनाने ती डोहाळेपूर्ती मानून वनात जायला निघते.

पहिल्या अंकाच्या शेवटी अशा निवांत मनाने व आनंदाने वनात गेलेल्या सीतेला खरी परिस्थिती कळल्यावर तिचे काय झाले? रामाने पुढे काय केले? अशी उत्सुकता वाचकांना, प्रेक्षकांना लागून राहते. या उत्कंठेचे शमन करण्यासाठी दुसऱ्या अंकाच्या प्रारंभी एक तापसी व वनदेवता असा संवाद आला आहे व त्यानंतर रामाचे शंबुकवधासाठी पंचवटीत येणे, शंबुकाचा वध, शंबुकाने शापमुक्त केल्याबद्दल रामाचे आभार मानणे आणि रामाला दंडकारण्यातील निसर्गाचे दर्शन घडविणे, जून्या स्मृतींनी रामाचे अगस्ती आश्रमाकडे प्रस्थान असा कथाभाग दुसऱ्या अंकात आला आहे. अंकारंभीचा तापसी–वनदेवता संवाद अतिशय सहज–स्वाभाविक असा आहे. या सर्व तपशीलांचा अभ्यास आता आपण विस्ताराने करणार आहोत.

**(अ) ४.३ विषयविवेचन**

**(भाषांतर):**

(पडद्यात) : तपस्विनीचे स्वागत असो.

(नंतर प्रवासी वेषातील तापसी प्रवेश करते.)

तापसी : अगं बाई, ही वनदेवता फळे, फुले व पालवी असे अर्घ्य घेऊन दूरवरून (माझ्या स्वागतासाठी) माझ्याकडे येत आहे, असे वाटत आहे.!

(प्रवेश करून)

वनदेवता : (अर्घ्य अर्पण करून)

आपण या वनाचा इच्छेला येईल, तसा उपभोग घ्यावा. माझ्यासाठी हा सुदिन (भाग्याचा दिवस) आहे. कारण सज्जनांचा सज्जनांशी सहवास हा काहीतरी पुण्याईमुळेच घडतो. झाडांची सावली, पाणी, तपाला साजेसा जो आहार– फळे असोत किंवा कंदमुळे असोत. त्याबाबतीतही आपणाला दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागणार नाही. ॥ १ ॥

तापसी : याबाबतीत काय बोलावे ?

नेहमी प्रिय आचरण, नम्रतेमुळे गोड आणि नियंत्रित असे बोलणे, स्वभावतःच कल्याणप्रद अशी बुद्धी, विशुध्द असा परिचय, पूर्वी किंवा भविष्यातही ज्यातील प्रेम कमी होणार नाही, असा सज्जनांचा निर्व्याज, निर्मळ स्वभाव नेहमीच प्रगती करणारा ठरतो.॥ २ ॥

(दोघी बसतात.)

वनदेवता : माननीय अशा आपणास मी कोण म्हणून जाणावे ?

तापसी : मी आत्रेयी!

वनदेवता : आत्रेयी, आपण कुठून इथे आलात बरे? वा या दण्डकारण्यात येण्याचा हेतू काय ?

आत्रेयी : ह्या प्रदेशात अगस्ती ज्यांच्यात प्रमुख आहेत, असे

पुष्कळ ब्रह्मवेत्ते  राहतात, त्यांच्याकडून वेदान्तविद्या शिकण्यासाठी मी वाल्मिकींकडून इकडे फिरत फिरत आले आहे. ॥३॥

वनदेवता : पण जर इतर कित्येक ऋषीदेखील त्याच प्राचीन ब्रह्मवेत्या प्राचेतस (वाल्मिकी) महर्षीकडे जातात. मग आर्येचा एवढ्या लांब हा प्रवास कशासाठी?

आत्रेयी : तिथे अध्ययनात मोठा अडथळा निर्माण झाला. म्हणून  हा लांबचा प्रवास स्वीकारला.

वनदेवता : कसला अडथळा?

आत्रेयी : त्या महर्षीकडे कुण्या विशेष देवतेने सर्वप्रकारे अद्भुत, अपूर्व अशी अंगावर पिणे नुकतेच संपले असेल अशा वयाची दोन जुळी मुले आणून दिली आणि ती दोघे खरोखर केवळ महर्षींच्याच नव्हे तर, चराचर प्राणिमात्रांच्या मनात प्रेम निर्माण करीत आहेत.

वनदेवता : त्या दोघांची नावे समजली आहेत काय ?

आत्रेयी : त्याच देवतेने म्हणे त्यांची नावे 'कुश' व 'लव' अशी सांगितली आणि त्यांचा प्रभावही.

वनदेवता : प्रभाव  कसला ?

आत्रेयी : त्या दोघांना म्हणे रहस्यांसह जृम्भकास्त्रे जन्मतःच प्राप्त झाली आहेत !

वनदेवता : अगं बाई, हे खरोखरच आश्चर्यच आहे !

आत्रेयी : आणि महर्षि वाल्मिकींनी दाईपण स्वीकारून त्या दोघांचे पालनपोषण व संरक्षण केले. चौलकर्म झाल्यावर त्या दोघांना तीन वेद सोडून इतर तिन्ही ज्ञानशाखा काळजीपूर्वक शिकविल्या आणि नंतर अकराव्या वर्षी क्षत्रियांना साजेशा पध्दतीने उपनयन संस्कार करून गुरूकडून त्यांना तीन वेदही शिकविले. अशा अलौकिक बुद्धी व धारणाशक्ती असणाऱ्या ह्या दोघांबरोबर आमच्यासारख्यांचे अध्ययन होण्याचा योग नव्हता. कारण

गुरू जसे हुशार विद्यार्थ्याला ज्ञान देतात. तसेच ते मंदबुध्दी शिष्यालाही देतात. परंतु ते त्या दोघांची ज्ञानग्रहण करण्याची शक्ती खरोखर वाढवू वा कमी करू शकत नाहीत आणि तरीही ज्ञानाच्या फलाबाबत पुष्कळच फरक पडतो. उदा. स्वच्छ असा स्फटिक प्रतिबिंब धारण करण्यास समर्थ ठरतो, मातीचे ढेकूळ (समर्थ असत) नाही. ॥४॥

वनदेवता : हा आहे तर अध्ययनातला अडथळा !

आत्रेयी : आणखी एक आहे.

वनदेवता : आता याहून दुसरा कोणता ?

आत्रेयी : नंतर एकदा ते ब्रह्मर्षी दुपारच्या स्नानासाठी तमसा नदीवर गेले. तेथे जोडीने विहार करणाऱ्या क्रौंचपक्षांपैकी एकाला व्याधाने (शिकाऱ्याने) जखमी केलेले त्यांनी पाहिले. तेव्हा अचानक स्फुरलेल्या अनुष्टुभ छंदात परिणत झालेली दैवी वाणी त्यांच्या मुखातून बाहेर पडली.

'हे निषादा (व्याधा), शेकडो वर्षे लोटली तरी तुला शाश्वत असे पद लाभणार नाही. कारण क्रौंचपक्षाच्या जोडप्यातील कामासक्त अशा एकाला तू ठार केले आहेस.'॥५॥

वनदेवता : वेदांखेरीज अन्यत्र असा छंदोबध्द वाणीचा आविष्कार हा खरंच चमत्कारच म्हणायला हवा.

आत्रेयी : नंतर त्याचवेळी शब्दब्रह्माचा साक्षात्कार झालेल्या त्या महर्षीच्या जवळ येऊन सृष्टीकर्ते भगवान् ब्रह्मदेव म्हणाले, "हे ऋषिवर, वाग्ब्रह्माचा तुम्हाला साक्षात्कार झाला आहे, तेव्हा रामचरित्र

(ह्याच्याच साहाय्याने) सांग, तुमच्या अव्याहत प्रकाशाने युक्त अशा प्रतिभादृष्टीचे तेज पसरू दे. आद्य कवी आहात तुम्ही!" असे बोलून ते तेथेच अंतर्धान पावले. नंतर त्या महर्षी वाल्मिकींनी मानवांत प्रथमच (स्फुरलेला) शब्दब्रह्माचा आविष्कार असा रामायणरूपी इतिहास रचला.

वनदेवता : वा ! म्हणजे जगाला यामुळे शोभाच प्राप्त झाली म्हणावयाची.

आत्रेयी : म्हणून तर तिथे अध्ययनात मोठा अडथळा आला असं म्हटलं मी !

वनदेवता : योग्यच आहे (तुमचे म्हणणे!)

आत्रेयी : बाई, मला विश्रांती मिळाली. आता अगस्ती आश्रमाकडे जाण्याचा मार्ग सांग.

वनदेवता : येथून पंचवटीत प्रवेश करून या गोदावरीच्या काठाने जावे आपण.

आत्रेयी : (अश्रू ढाळत) काय हेच ते तपोवन आहे? आणि हीच पंचवटी ? हीच गोदावरी नदी आहे का ? आणि हाच प्रस्रवण पर्वत? आणि जनस्थानातली वनदेवता वासंती ती तूच का ?

वनदेवता : तुम्ही जसे म्हणता आहात तेच आहे हे सारे ।

आत्रेयी : अरेरे, मुली जानकी ।

जो प्रासंगिक गप्पांचा विषय होत असे. तो तुझा आवडता वृक्षसमूह हाच। तू आज नामशेष झाली असलीस तरी, तो दिसल्याबरोबर जणू तुलाच आम्ही प्रत्यक्ष पाहिल्याचा अनुभव देतो आहे. ॥६॥

वासंती : (घाबरून, स्वतःशीच) कशी बरे (सीतेला) नामशेष असे म्हणत आहेत ह्या? (प्रत्यक्ष) आर्ये, महाराणी सीतेवर आपत्ती आली आहे का?

आत्रेयी : केवळ आपत्तीच नव्हे तर, आरोपही आला आहे. (कानात) असे आहे.

वासंती : अरेरे, दैवाचा अतिशय क्रूर असा आघात आहे हा । (असे म्हणून मूर्च्छित होते.)

आत्रेयी : बाई गं, सावध हो, भानावर ये.

वासंती : अरेरे, प्रियसखी, हे सौभाग्यशाली स्त्रिये, तुझा असा भयंकर अपमान व्हावा ना । रामचंद्रा! किंवा तुझे नावच घ्यायला नको. आर्ये आत्रेयी, नंतर त्या अरण्यात तिला सोडून लक्ष्मण परतल्यावर त्या महाराणी सीतेचे काय झाले ? याची काही वार्ता वगैरे ?

आत्रेयी : नाही, नाही.

वासंती : अरेरे, किती दुःखद आहे हे! आर्या अरुंधती आणि वसिष्ठ यांच्यासारखे

मार्गदर्शक रघुकुळात असताना आणि अतिशय वृध्द अशा राण्या जिवंत असताना हे कसे काय घडले?

आत्रेयी : तेव्हा वडिलधारी (सारी) माणसे ऋष्यशृंगांच्या आश्रमात होती. आता मात्र बारा वर्ष चालणारे ते यज्ञसत्र समाप्त झाले आहे आणि ऋष्यशृंगानी गुरूजनांची पूजा करून त्यांना निरोप दिला आहे. नंतर भगवती अरूंधतीने 'सून नसलेल्या अयोध्येत मी जाणार नाही' असे सांगितले. त्यालाच रामाच्या मातांनीही दुजोरा दिला, त्यांच्या इच्छेनुसार वसिष्ठांनी आपल्या अतिशय शुध्द अशा वाणीने 'वाल्मीकीच्या तपोवनात जाऊन तिथे राहू' असे जाहीर केले.

वासंती : मग तो राजा सध्या काय करतो आहे?

आत्रेयी : त्या राजाने अश्वमेध यज्ञाचे आयोजन केले आहे.

वासंती : अरेरे! विवाहदेखील केला वाटते।

आत्रेयी : इडा पिडा टळो बाई! तसे अजिबात केलेले नाही.

वासंती : मग यज्ञात त्याची सहधर्मचारिणी कोण असणार?

आत्रेयी : सीतेची सोन्याची प्रतिमा!

वासंती : वा! छानच ।

वज्राहूनही कठोर असणारी लोकोत्तर पुरूषांची मने फुलाहूनही कोमल असतात, त्यांना कोण बरे जाणण्यास समर्थ ठरतो? ॥ ७ ॥

आत्रेयी : आणि वामदेवांनी अभिमंत्रित केलेला यज्ञीय अश्व सोडला गेला आहे आणि शास्त्रानुसार त्याचे संरक्षणकर्तेही नेमले गेले आहेत. त्यांचा प्रमुख म्हणून चतुरंग सेना आणि दिव्य शस्त्रास्त्रांचे ज्ञान परंपरेने प्राप्त झालेला लक्ष्मणाचा मुलगा चंद्रकेतू त्यांच्याबरोबर पाठवला गेला आहे.

वासंती : (प्रेमाने व कौतुकाने) कुमार लक्ष्मणालाही मुलगा आहे? वा! आता माझ्या जीवात जीव आला बाई ।

आत्रेयी : अलीकडेच एका ब्राह्मणाने आपला मृतपुत्र राजद्वारात आणून टाकून, ऊर बडवून घेत ' अनर्थ!' असा आक्रोश केला, तेंव्हा 'राजाच्या अनुचित

आचरणाशिवाय प्रजेत अकाली मृत्यु होऊ शकत नाही,' असा दोषारोप स्वतःला लावून घेत राजा राम कष्टी झाला असता अचानक आकाशवाणी झाली.

'शम्बुक नावाचा शुद्र पृथ्वीवर तप करतो आहे. हे रामा, तू त्याचा शिरच्छेद करायला हवा आणि त्याला ठार करून तू ब्राह्मणाला जीवदान द्यावेस.' ॥८ ॥

हे ऐकून हातातील धनुष्य सावरून पुष्पक विमानात चढून जगदीश रामाने शुद्र तापसाच्या शोधासाठी दशदिशांत फिरण्यास सुरूवात केली आहे.

वासंती : शम्बुक नावाचा एक धूर पिऊन राहणारा, शुद्र ह्याच जनस्थानात तप करतो आहे. म्हणजे मग आर्य राम पुन्हा एकदा हे वन सुशोभित करणार तर!

आत्रेयी : बाई, आता मी निघते.

वासंती : आर्ये आत्रेयी, असेच करा. दिवसही बराच वर आला आहे.

ज्यांच्या सावलीत चोचीने जमीन उकरणारे पक्षी खोडात राहणारे कीटक ओढून काढत आहेत, कलकलाट करणारी कबुतरे व थकलेल्या रानकोंबड्यांचे थवे ज्यांच्यावर बसले आहेत, असे पक्ष्यांच्या घरट्यांनी गजबजलेले गोदावरीकाठचे वृक्षांचे समूह त्यांच्यावर हत्तींनी आपल्या कण्ड (खाज) सुटलेली गण्डस्थळे घासल्यामुळे गदागदा हालत आहेत आणि उन्हाने आधीच ज्यांची देठे सुटली आहेत, अशा गळून पडणाऱ्या फुलांनी जणू गोदावरीची पूजा करत आहेत. ॥९॥

(असे म्हणत फिरून, दोघी निघून जातात.)

(**इथे शुध्द विष्कम्भक संपला**)

(नंतर पुष्पक विमानात बसलेला, दयाळूपणे तलवार उपसलेला राम प्रवेश करतो.)

राम : हे उजव्या हाता, ब्राह्मणाच्या मृत पुत्राला जीवनदान देण्यासाठी शुद्र

तापसावर चालव तलवार! पूर्ण दिवसाच्या गर्भभाराने शिणलेल्या सीतेला निर्वासित करण्यात कुशल असलेल्या तुला कुठून करूणा येणार? ॥ १०॥

(कसाबसा प्रहार करून)

रामाला साजेसे काम तर केले, पण तो ब्राह्मणपुत्र जिवंत होईल?

(प्रवेश करून)

दिव्यपुरूष : महाराज, विजयी होवोत, विजयी होवोत!
यमापेक्षाही सामर्थ्यशाली अशा शासनकर्त्याने, (म्हणजेच) तुम्ही, अभय दिल्यामुळे तो बालकही जिवंत झाला आणि मलाही हे ऐश्वर्य प्राप्त झाले. हा शम्बुक आपल्या चरणी नतमस्तक होतो आहे. सज्जनांच्या सहवासाने येणारी मरणेही तारणारी ठरतात. ॥ ११ ॥

राम : दोन्हीही गोष्टी आम्हाला आवडणाऱ्या घडल्या. तेव्हा आता उग्र तपाचे फळ भोग. जेथे आनंद व उत्साह असतो आणि जेथे कल्याणकारी संपदा नांदतात ते पावन व प्रकाशमय असे 'वैराज' नामक लोक तुला प्राप्त होवोत. ॥ १२ ॥

शम्बुक : महाराज, आपल्या कृपेमुळेच हा गौरव मला मिळाला आहे. ह्यात माझ्या तपाचे फळ कुठले? किंवा तपानेच खूप उपकार केलेत माझ्यावर.

जो तू हे लोकनाथा, जगात (सर्वांकडून) शोधला जातोस, तो शरण जाण्यास योग्य असा तू मला शुद्राला शोधत शेकडो योजने ओलांडून इथे आलास ही माझ्या तपाचीच कृपा आहे. जर याहून वेगळे काही (कारण) असते तर, अयोध्येहून पुन्हा या दंडकारण्यात तुमचे येणे कसे झाले असते? ॥ १३ ॥

राम : काय? हे दण्डकारण्य आहे? (सर्वत्र निरखून पाहून) अरेरे, हे कसे काय?

कोठे तुकतुकीत सावळ्या रंगाचे तर, अन्यत्र उग्र व रूक्ष भासणारे (रखरखीत व उजाड असे) जागोजागी खळखळणाऱ्या ओढ्याच्या आवाजांनी दिशा निनादून टाकणारी ही पवित्र तीर्थस्थळे,

आश्रम, पर्वत, नद्या, घळी, दाट झाडी, इ.नी युक्त असे दण्डकारण्यातील परिचित भूप्रदेश दिसत आहेत खरे! १४॥

शम्बुक : हे दण्डकारण्यच आहे. इथेच म्हणे पूर्वी राहत असता महाराजांनी.....

भयंकर कार्य चौदा हजार राक्षसांना आणि खर, दूषण व त्रिशिरा या तीन प्रमुख राक्षसांना युध्दांत ठार मारले होते. ॥१५॥

ज्यामुळे या जनस्थानासारख्या सिध्दी प्राप्त करून देणाऱ्या क्षेत्रात माझ्यासारख्या खेडूतांनाही न घाबरता संचार करणे शक्य झाले.

राम : केवळ दण्डकारण्यच नव्हे, तर हा जनस्थानाचाच भाग आहे?

शम्बुक : होय, नक्कीच, सर्व, प्राणिमात्रांना रोमांचित करणारी, उन्मत्त व भयंकर अशा हिंस्रपशूंनी जेथील पर्वतांच्या गुहा व्यापल्या आहेत. अशी जनस्थानापर्यंत विस्तारलेली ही विस्तृत अरण्ये दक्षिणेकडे पसरलेली आहेत.

तसेच,

कुठे निःशब्द असल्याने शांत तर, कुठे महाकाय श्वापदांच्या गर्जनांनी निनादणारे, स्वच्छंदपणे झोपलेल्या आक्राळविक्राळ फण्यांनीयुक्त असलेल्या सर्पांच्या फुत्कारांनी जिथे वणवे लागले आहेत असे, जेथील दऱ्यांच्या अंतर्भागात अल्प पण स्वच्छ पाणी आहे असे, हे सीमाप्रदेश येथे तहानलेल्या सरड्यांकडून अजगराचे घामरूपी पाणी प्यायले जाते. ।।१६ ॥

राम : 'खर' राक्षसाचे निवासस्थान असणारे हे जनस्थान मी पाहतो आहे आणि पूर्वी घडलेल्या गोष्टी जणू प्रत्यक्ष घडत असल्याचा अनुभव घेतो आहे. ॥१७॥

(सर्वत्र निरखून पाहून)

देवी सीतेला अशा उपवनांची अतिशय आवड आहे आणि तीच ही वने (माझ्यासमोर) आहेत. यापेक्षा अधिक भयंकर काय असू शकेल? (अश्रूभरल्या डोळ्यांनी)

'मधुर अशा सुवासांनी युक्त अशा वनांमध्ये तुमच्यासह राहीन'? असे म्हणत ती येथे रमलीसुध्दा. कारण तिचे प्रेमच तसे होते! ॥१८॥

काहीही न करणारादेखील एखादा सुखे देऊन (दुसऱ्याची) दुःखे दूर करतो. जो ज्याचा प्रिय माणूस तो तो त्याचा अलौकिक असा निधीच होय. ॥१९॥

शम्बुक : तर मग अशी दुःखद दृश्ये (पाहणे) पुरेच! आता महाराजांनी अतिशय शांत व गंभीर अशी ही मधली अरण्ये पाहावीत. जिथे मधुर केकारव करणाऱ्या मोरांच्या नाजूक पिसाऱ्यासारखे निळ्यासावळ्या रंगाने वेढलेले पर्वत आहेत, सावळ्या घनदाट वृक्षसमूहांनी ज्या (अरण्यांची) शोभा वाढवली आहे, आणि जिथे स्वच्छंदपणे विहार करणारे विविध प्राण्यांचे कळप आहेत.

इथे आनंदधुंद पक्षांनी वेताची झुडूपे भरून टाकल्यामुळे त्यांच्या गळून पडलेल्या फुलांनी सुगंधित झालेल्या थंड व निर्मल जलयुक्त नद्या, पिकलेल्या फळांच्या बहराने सावळ्या जांभूळ वनांमधून अडखळत वाहत गेल्याने निनादतात आणि अनेक छोट्या प्रवाहामध्ये विभागल्या जातात. ॥२०॥

आणि शिवाय –

येथे गुहांत राहणाऱ्या तरूण अस्वलांच्या गर्जनांचा नाद प्रतिध्वनित झाल्याने वाढत जातो आणि चुरगळून व विखरून टाकलेल्या सल्लकी वृक्षांच्या सांध्यामधून पाझरणाऱ्या द्रवाचा उग्र, थंड व तुरट वास सर्वत्र पसरत जातो.॥२१॥

राम : (अश्रू आवरत) भल्या माणसा, तुझा देवयान मार्गावरील प्रवास कल्याणकारी होवो. पुण्यशील अशा विश्वात विलीन होऊन जा.

शम्बुक : त्या आधी प्राचीन ब्रह्मज्ञानी महर्षी अगस्ती यांना वंदन करून मगच शाश्वत अशा स्थानी प्रवेश करेन.

(असे म्हणून निघून जातो.)

राम : पूर्वी जेथे आम्ही पुष्कळच काळ राहिलो, अरण्यवासी आणि गृहस्थ म्हणून स्वधर्माचरणात मग्न झालो आणि सांसारिक सुखांची गोडी अनुभवली. तेच ते वन आज पुन्हा कसे काय दिसले बरे! ॥२२॥

हेच ते पर्वत, जिथे मोर केकारव करत आहेत, मत्त हरिणे बागडत असलेला हाच तो वनपरिसर! आणि मनोहर अशा बांबूच्या वेलींनीयुक्त आणि दाटीने वाढलेले नीप व निचुल वृक्ष जेथे आहेत, ते नदीकाठही हेच! ॥२३॥

मेघमालेसारखा जो दुरूनच शोभतो आहे, तोच हा प्रस्रवण पर्वत, जेथे गोदावरी नदी आहे. ॥२४॥

ह्याच्याच उंच शिखरावर गृध्रराज जटायू राहत असे. त्याच्याच पायथ्याशी त्या पर्णकुटींमध्ये आम्हीही रमलो होतो. गोदावरीच्या पाण्यात ज्यांची प्रतिबिंबे उमटली आहेत, अशा वृक्षांच्या सावळ्या रंगाने सुशोभित आणि अंतर्भागी किलबिलणाऱ्या बोलक्या पक्षांच्या समूहाने युक्त असा रमणीय वनप्रदेशही येथेच आहे. ॥२५॥

पुष्कळ काळानंतर वेगाने उफाळणारा उग्र विखार पसरावा त्याप्रमाणे कोणत्यातरी तीव्र आघाताने (पूर्वीच्या) सलाचा अंश जाणवू लागावा किंवा हृदयातील भरून आलेली जखम फुटून वाहू लागावी तसा (मनात) दृढ झालेला (गोठलेला) शोक मला ताजा असल्याप्रमाणे व्याकूळ करतो आहे. ॥२६॥

तरीही पूर्वीचे त्या परिचित मित्रासारखे असणारे तेच भूप्रदेश पाहतो मी! (निरखून पाहत) अहो, प्राणिसृष्टी पूर्वीसारखी राहिली नाही.

कारण...

जिथे पूर्वी (नदी) प्रवाह होता. आता तेथे पुळण (वाळूचा किनारा)आहे. वृक्षांची दाटी आणि विरळपणाही उलटसुलट झाला आहे. पुष्कळ वर्षांनी पाहत असलेले हे वन काही वेगळेच वाटते आहे. पण पर्वतांचे तेथील (न बदललेले) स्थान हेच 'तेच हे वन' असा विचार दृढ करते आहे. ॥२७॥

अरेरे! टाळत असतांनाही पंचवटीचे प्रेम मला बळेच जणू इकडे खेचते आहे. (दुःखाने)

स्वतःच्या घरात राहिल्याप्रमाणे जिथे मी तिच्यासह (प्रियेसह) दिवस घालविले, जिच्याबाबत पुष्कळ काही बोलतच आम्ही राहत असू. त्या ह्या पंचवटीकडे ज्याची प्रिया नष्ट झाली आहे, असा एकटा राम पाहू किंवा तिला मान न देता जाऊ कसा शकेल बरे ! ॥ २८ ॥

(प्रवेश करून)

शम्बुक : महाराज, विजय असो. महर्षी अगस्तींनी माझ्याकडून आपण जवळच आला आहात हे ऐकून 'सर्व महर्षी व भगवती लोपामुद्रा ओवाळण्याची तयारी करून वाट पाहत आहेत, तेव्हा ये आणि आम्हांला अनुगृहीत कर. त्यानंतर वेगाने जाणाऱ्या पुष्पक विमानाच्या सहाय्याने स्वदेशी जाऊन अश्वमेघ यज्ञाला सज्ज हो.' असा निरोप दिला आहे.

राम : जशी महर्षींची आज्ञा !

शम्बुक : इकडून, इकडून महाराज !

राम : (पुष्पक विमान सुरू करून) भगवति पंचवटी, गुरुजनांच्या आज्ञेमुळे माझ्याकडून होणाऱ्या शिष्टाचारभंगाबाबत क्षणभर मला क्षमा कर, भगवती। क्षमा कर!

शम्बुक : महाराज, पहा,

हा क्रौंच नामक पर्वत आहे. याच्यावर कुञ्जरूपी कुटिरांमध्ये घुबडांच्या समूहांच्या पुत्काराप्रमाणे घुमणाऱ्या वेळूच्या नादामुळे जेथील कावळ्यांचे समूह मूक झाले आहेत आणि विहरणाऱ्या मोरांच्या

केकारवांनी भीतीने घाबरलेले सर्प जुन्या चंदनवृक्षांच्या ढोलीमध्ये वळवळत आहेत. ॥२९॥

आणि असे

हेच ते दक्षिणेकडील पर्वत, ज्यांच्या दऱ्यांमधून गोदावरीचे प्रवाह गद्गद् नाद करत वाहत आहेत. ज्यांची शिखरे मेघ त्यांच्यावर ओथंबल्यामुळे निळसर दिसत आहेत. परस्परांवर आपटणाऱ्या, नाद करणाऱ्या व वेगवान लाटांच्या उसळण्याने बेफाम भासणारे अथांग पाणी असलेले असे नद्यांचे पवित्र संगम आहेत. ॥३०॥

(**दुसरा अंक समाप्त**)

**(अ) ४.४. स्वयं अध्ययन प्रश्न**

**(अ) ४.४.१ दीर्घोत्तरी प्रश्न**

**१) शुध्द विष्कंभक/ तापसी आत्रेयी आणि वनदेवता वासंती यांच्यातील संवाद स्पष्ट करा.**

**प्रस्तावना:-** संस्कृत नाट्यरचनेतील एक महत्वाचा भाग आहे विष्कम्भक आणि प्रवेशक. नाटकातील नांदी व प्रस्तावना जितकी महत्वाची तसेच महत्वाचे असतात प्रवेशक या विष्कम्भक. दोन अंकांच्या दरम्यान ज्या घटना घडतात. त्यांची माहिती देणे, नाटकाला गती देण्यासाठी आवश्यक असते. मात्र त्या घटना रंगभूमीवर दाखविणे शक्य नसते. अशावेळी ती माहिती देण्याचे काम अंकारंभी एखाद्या संवादातून केले जाते. हे संवाद कधी दोन नीच वा दोन मध्यम पात्रांमध्ये घडत असतात. कधी दोन नीच व एक मध्यम पात्र असेही घडताना दिसतात. अंकात पुढे काय घडणार हेही या संवादांतून सूचित होते. अशा संवांदानाच 'प्रवेशक' किंवा 'विष्कम्भक' असे म्हणतात. दोहोंचे कार्य एकच असले तरी दोहोंत फरक असा की, प्रवेशक नेहमी दोन अंकादरम्यान येतो व विष्कम्भक मात्र पहिल्या अंकातही येऊ शकतो. प्रवेशकाचे प्रकार सांगितले जात नाहीत, विष्कम्भकाचे मात्र शुध्द व मिश्र असे दोन प्रकार केले जातात.

**विषयविवेचन:**- उत्तररामचरितातला दुसच्या अंकातील विष्कम्भक हा शुध्द विष्कम्भक आहे. कारण त्यात तापसी आत्रेयी व वनदेवता वासंती अशी दोन्ही मध्यम दर्जाची पात्रे आहेत, पहिल्या अंकाच्या शेवटी रामाने सीतेला पूर्वकल्पना न देता लोकापवादाचे परिमार्जन करण्यासाठी तिला वनात सोडून देण्याची आज्ञा लक्ष्मणाला केलेली असते.

सीताही झोपेतून जागी झाल्यावर वनात जाण्यासाठी रथ तयार आहे म्हटल्यावर रामाने आपला वनात जाण्याचा डोहाळा पुरविण्यासाठी तत्परतेने केलेली ती व्यवस्था मानून उत्साहाने रथात जाऊन बसते. इथेच प्रथम अंक संपतो. त्यामुळे सीतेला खरी परिस्थिती कळेल, तेंव्हा नेमके काय होईल? रामाची अवस्था सीता त्यागानंतर कशी असेल किंवा राहील? अशी उत्कंठा प्रेक्षकांच्या मनात निर्माण होते. या उत्कंठेचे थोडेफार शमन या अंकातील विष्कम्भकामुळे होते.

तापसी आत्रेयी महर्षि वाल्मीकींच्या आश्रमात अचानक एका देवतेने आणून दिलेल्या तल्लख बुद्धीच्या दोन जुळ्या मुलांबरोबर अध्ययन करण्यास असमर्थ ठरल्यामुळे अगस्त्यादि ब्रह्मवेत्ते मुनी राहतात, त्या दण्डकारण्यात येते. तिथे भेटलेल्या वनदेवता वासंतीने अगस्त्याश्रमाचा पत्ता सांगतांना उच्चारलेल्या गोदावरी, पंचवटी, इ. उल्लेखांनी तिला सीतेची आठवण होते आणि आता सीता उरली नाही म्हणून तिच्या तोंडून हळहळ व्यक्त होते. 'सीता नामशेष झाली' असे तिचे शब्द अस्पष्टसे कानावर पडल्यामुळे वनदेवता वासंती, जी सीतेची वनातील प्रियसखी असते. ती तिला काय घडले ते विचारते. तेव्हा लोकापवाद व सीतेचा त्याग इ. घटना तिला कळतात. साहजिकच ती सीतेला वनात सोडल्यावर पुढे काय घडले ते कळेल का? असा प्रश्न करते. आत्रेयीला त्याबाबत काही न कळल्याचे ती सांगते. मग वासंती वसिष्ठादि वडिलधारी मंडळी असताना हे कसे घडले? असा प्रश्न विचारते. त्यावर ते सारे ऋष्यशृंगाच्या द्वादशवर्षीय (१२ वर्षे) सत्राला गेल्याचे आत्रेयी सांगते आणि सीतात्यागाची घटना कळल्यावर ते सारे आता अयोध्येत न जाता वाल्मीकी आश्रमात राहायला आल्याचीही माहिती ती देते. विधात्याच्या आदेशावरून स्वतःला अचानक स्फुरलेल्या अनुष्टुभ छंदात रामायण लिहिण्यास वाल्मीकींनी आरंभ केला असल्याचेही ती नमूद करते.

वनदेवता जराशा रोषानेच 'राजा राम आता काय करतो आहे?' असा प्रश्न करते. तर तिला तो अश्वमेध करणार असल्याचे कळते. लक्ष्मणाच्या मुलाकडे यज्ञीय अश्वाच्या संरक्षणाची जबाबदारी आहे असे कळते. सीता त्यागानंतर लगेच राम यज्ञ करतो आहे. पण यज्ञ तर सहधर्मचारिणीशिवाय होत नाही. असे आहे. तर मग रामाने दुसरा विवाह केला नाही ना? अशी शंका लगेचच वासंतीला येते. पण सीतेची स्वर्णप्रतिमा ही रामाची कालची सहधर्मचारिणी असल्याचे कळल्यावर ती थोडीशी अस्वस्थ होते. पुढे

आत्रेयीकडूनच शम्बुक नावाच्या तर करणाऱ्या शुद्र तपस्व्याला शासन करून एका मृत ब्राह्मणाच्या पुत्राला जीवंत करण्याचा आदेश देणाऱ्या आकाशवाणीबाबत वासंतीला कळते आणि तिला आठवते. असा एक शुद्र तापस दण्डकारण्यातच तप करतो आहे. आपोआपच त्याला शोधत राम तिचे येणार हे तिला कळते आणि तिच्याचबरोबर प्रेक्षकांनाही कळते की नाटकाच्या या अंकातला मुख्य प्रवेश रामाचा व शम्बुकाचा दण्डकारण्यातला संवाद हाच आहे.

**आशय:-** थोडक्यात, आत्रेयी–वासंती संवादातून सीता त्यागामुळे काय काय कसे कसे घडले? याबाबत कळले. याशिवाय आता अंकातील मुख्य प्रवेश रामाचा आहे, हेही कळले. 'भूतकालीन घटनांची माहिती व भावी घटनांची सूचना देणे' हे जे विष्कम्भकाचे कार्य ते चोख पार पडले आहे. या विष्कम्भकातून तापसी आत्रेयी व वनदेवता वासंती अशा दोन अनोख्या व्यक्तिरेखा समोर येतात. जाता जाता भवभूति ' वितरति गुरूः प्राज्ञे... किंवा 'लोकोत्तराणां चेतांसि को हि विज्ञातुमर्हसि...' इ. सारख्या सुरेख मार्मिक सुभाषितांच्या माध्यमातून आपले विचार नेमकेपणाने व्यक्त करतो.

२) **उत्तररामचरिताच्या दुसऱ्या अंकांचे रसग्रहण करा.**

**प्रस्तावना**:- अंकाचे रसग्रहण म्हटले की, त्या अंकातील कथानक सारांश रुपाने व मग त्या अंकातील लोकांमध्ये वापरलेली विविध वृत्ते, त्या अंकातील रसाविष्कार, त्या अंकाचे संपूर्ण नाटकाच्या दृष्टीने असलेले महत्व, इ. गोष्टींचा विचार करावा लागतो. या दृष्टीने उत्तररामचरिताच्या दुसऱ्या अंकाचा विचार केला तर त्याचे कथानक थोडक्यात असे---

**विषयविवेचन:-** प्रारंभी वाल्मीकी आश्रमातून अगस्त्यादी ऋषींकडे ज्ञानग्रहणासाठी आलेल्या तापसी आत्रेयीला वनदेवता वासंती भेटते. तिची विचारपूस करते. तेव्हा आत्रेयीकडून वाल्मिकी आश्रमात कुण्या देवतेने आणून दिलेल्या व जन्मतःच जृम्भकास्त्रे ज्ञात असणाऱ्या, कुशाग्र बुद्धीच्या कुश–लवांविषयी कळते व वाल्मीकींना व्याधाच्या (शिकाऱ्याच्या) क्रूर/ नृशंस कृत्यांमुळे शाप देताना सहज स्फुरलेल्या अनुष्टुभ् वृत्तांत (छंदात) रामकथा रचण्याचा ब्रह्मदेवाचा आदेश मिळाल्यामुळे त्यांचे रामकथा लेखन चालू असल्याचेही कळते. अगस्त्याश्रमाचा पत्ता आत्रेयीला सांगतांना वासंतीकडून झालेल्या पंचवटी, गोदावरी, इ. उल्लेखांमुळे तापसीला सीतेच्या नामशेष होण्याची आठवण होते

आणि तिच्याकडून अस्पष्ट उल्लेख ऐकून अस्वस्थ होऊन वासंतीने केलेल्या चौकशीमुळे तिला सीतेवरील लोकापवाद, रामाचा सीतात्याग, रामाचा 'अश्वमेध'यज्ञ करण्याचा विचार, यज्ञात सीतेची सुवर्णप्रतिमा सहधर्मचारिणी म्हणून ठेवण्याचा निश्चय, रामराज्यात ब्राह्मणपुत्राचा अकाली मृत्यू, त्यावरील उपाय म्हणून शुद्र तापसाला करावयाच्या शासनाबद्दलची आकाशवाणी, सीतात्यागाचे रामाचे कृत्य न पटल्यामुळे वसिष्ठादि सर्व गुरूजनांचा अयोध्येत न परतता वाल्मीकि आश्रमात राहण्याचा निर्धार इ. अनेक गोष्टी कळतात. सीतेची प्रियसखी असल्यामुळे या सर्व वार्तांनी ती दुःखी अस्वस्थ, व्याकुळ होते. तर क्वचित रामाच्या सीतेची सुवर्णप्रतिमा ठेवण्याच्या निर्णयाने किंवा शम्बुकवधाच्या निमित्ताने रामाच्या दण्डकारण्यात होणाऱ्या संभाव्य आगमनाच्या शक्यतेने मनोमन किंचित सुखावतेही! तिचं सुखदुःखांच्या हिंदोळ्यावर हेलकावणारे मन भवभूतीने या संवादातून मार्मिकरीतीने व्यक्त केले आहे. या संवादाला नाट्यतंत्रदृष्ट्या 'विष्कम्भक' असे म्हटले जाते, जो मागच्या अंकातील शेवटच्या घटनेनंतर दरम्यानच्या काळात काय झाले व यापुढे काय घडणार याची माहिती प्रेक्षकांना करून देण्याच्या हेतूने नाटकात येतो.

त्याने दिलेल्या सूचनेनुसार यानंतर नाटकातला प्रमुख प्रवेश शम्बुकवधाला उद्युक्त असलेल्या रामाचा होताना दिसतो. राजा राम कर्तव्य म्हणून शुद्र तापसाला मारण्यास सज्ज होऊन आला असला तरी तो अशा क्रूर/ नृशंस कृत्यांमुळे मृत ब्राह्मणपुत्र जिवंत होईल की नाही? याबाबत साशंक असतो. अखेर तो आपणच केलेल्या सीतात्यागाच्या अतिक्रूर/ अतिनृशंस कृत्याची आठवण जागवत शम्बुकावर घाव घालतो. प्रत्यक्षात आकस्मिकपणे शम्बुकाच्या शरीरातून एक दिव्यपुरूष बाहेर पडतो आणि आपल्याला मुक्त केल्याबाबत धन्यवाद देऊन मृत ब्राह्मणपुत्र जीवंत झाल्याची वार्ता देतो. रामाची स्तुती करताना शम्बुक रामाचे लक्ष पंचवटीतील परिचित स्थानांकडे वेधतो. तेव्हा राम जुन्या स्मृतींनी अस्वस्थ होतो. शम्बुकाला तो पुण्यलोकी जाण्याचा आशीर्वाद देतो. अगस्तींचे दर्शन घेऊन मग पुण्यलोकी जावे, असा विचार करून शम्बुक अगस्तीकडे जातो. राम दण्डकारण्याचे बदललेले रूप न्याहाळत राहतो. त्याला निसर्गात झालेला आमूलाग्र बदल जाणवतो. शम्बुकाने त्याला अरण्याचा रूक्ष परिसरही दाखविलेला असतो. पंचवटीत सीतेशिवाय जाण्याची कल्पना रामाला करवत नाही.  पण तिथे प्रवेश न करता जाणे हेही त्याला अनादराचे वाटते.तेवढ्यात अगस्तींनी व लोपामुद्रेने बोलावल्याबद्दल निरोप घेऊन

शम्बुक येतो आणि त्यामुळे पंचवटीची क्षमा मागून राम अगस्त्यांच्या भेटीला निघतो. इथेच हा अंक संपतो.

ह्या अंकातील विष्कम्भक थोडा अन्य नाटकातील विष्कम्भकांपेक्षा दीर्घ आहे. पण ह्यातील संवाद चटकदार आहेत. 'वितरति गुरू प्राज्ञे विद्या' किंवा 'वज्रादपि कठोराणि' सारखी सुभाषिते मार्मिक विचार देणारी आहेत. अंकात असणारे एकूण ३० श्लोक शार्दुलविक्रीडित, वसंततिलका, हरिणी, अनुष्टुभ अशा विविध वृतांमध्ये असल्यामुळे रचनेत रंजकता आली आहे. प्रामुख्याने एकूण नाटकाचा प्राण असणाऱ्या करूणरसाचाच परिपोष ह्याही अंकात कमी अधिक मात्रेत झालेला आहे.

**आशय**:- रामाची एक माणूस म्हणून शम्बुकवध करताना मनाची झालेली घालमेल, त्याच्या मनात आलेली शंका ह्या भावच्छटा ही खास भवभूतीची निर्मिती आहे. भवभूतिपूर्वी अशा मानसिक संघर्षात अडकलेला राम कोणीही दाखविलेला नाही. भवभूतीने तो अतिशय उत्कटपणे उभा केला आहे. वाल्मीकिंसारख्या प्राचीन ब्रह्मवेत्त्याच्या आश्रमात तल्लख बुद्धिमत्ता असलेल्या विद्यार्थ्यांबरोबर शिकताना सामान्य बुध्दीच्या व्यक्तीची होणारी दमछाक, मात्र ती दमछाक फार काळ न करून घेता तिथून बाहेर पडून अन्यत्र ज्ञानग्रहणाचा केला गेलेला विचार, त्यासाठी घेतलेले शारीरिक कष्ट या साऱ्या गोष्टी भवभूतीने एका आत्रेयी ह्या व्यक्तिरेखेतून फार समर्थपणे व्यक्त केल्या आहेत आणि त्या सामान्य बुद्धीच्या पण काही चांगले शिकण्याची जिद्द असणाऱ्याला प्रेरणा देणाऱ्या आहेत, त्याची उमेद वाढविणाऱ्या आहेत. निसर्गाच्या केवळ लोभस रूपाचेच दर्शन भवभूती घडवत नाही, तर तो त्यातील भीषणता व रूक्षताही दाखवतो. म्हणूनच 'भिषणभोगरूक्ष' अशा वृक्षांचे वर्णनही तो करतो आणि पाण्याचे दुर्भिक्ष असल्यामुळे अजगरांचा घाम पिऊन तहान भागविणाऱ्या सरड्याचाही निर्देश त्याच्या वर्णनात येतो. याबाबतीत भवभूति कालिदासापेक्षा अधिक वास्तववादी आहे, असे निर्विवादपणे म्हणता येते. उत्तररामचरिताचा हा दुसरा अंक नाटकाच्या एकूण कथानकाला गती देणारा आहे.

**(अ) ४.४.१ योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा.**

१) तापसी आत्रेयी ............ऋषींच्या आश्रमातून दण्डकारण्यात आली होती.

अ) अगस्ती ब) वाल्मीकी क) वसिष्ठ ड) याज्ञवल्क्य

२) ............नावाचा शुद्र अरण्यात तप करत असल्याची वार्ता रामाला मिळाली,

अ) वृषल    ब) पुष्पक    क) दण्डक    ड) शम्बुक

३) रामाला जनस्थानात पर्वत दिसला.

अ) प्रस्रवण   ब) हिमालय  क) विन्ध्य   ड) देवगिरी

४) कुश-लवांना जन्मतःच...........प्राप्त होती.

अ) ब्रह्मास्त्रे ब) वायवास्त्रे क) जृम्भकास्त्रे    ड) आग्नेयास्त्रे

५) तापसी आत्रेयी वाल्मीकी आश्रम सोडून दण्डकारण्यात आली होती.

अ) कुश-लवांना घाबरल्यामुळे    ब) वाल्मीकी रागावल्यामुळे

क) अध्ययनात मोठे अडथळे निर्माण झाल्यामुळे

ड)अगस्तींनी बोलावल्यामुळे

**(अ) ४. ५ पारिभाषिक शब्द/ संक्षिप्त टिपा**

**१. उद्गीथविद**: 'उद्गीथ' म्हणजे ओंकार वा प्रणव छांदोग्योपनिषदात ओंकाराचा 'उद्गीथ' असा उल्लेख आढळतो. ओंकार उपासना करणारे वा ओंकाराचे महत्व जाणणारे ते 'उद्गीधविद्' म्हणून ओळखले जातात. उत्तररामचरिताच्या दुसऱ्या अंकात अगस्ती आदि ऋषींचे वर्णन करताना हा शब्द आला आहे.

**२. निगमान्तविद्या**: संस्कृतमध्ये 'निगम' म्हणजे वेद. निगमान्त म्हणजे वेदान्त आणि निगमान्त  विद्या म्हणजे उपनिषदांचा अभ्यास किंवा उपनिषदांचे ज्ञान होय. कारण उपनिषदांना 'वेदान्त' अशी संज्ञा आहे. हे ज्ञान किंवा हा ज्ञानाचा शेवटचा टप्पा वा प्रकर्षाने मानला जाई.

**३. चौलकर्म** : हा स्मृतिग्रंथातला नेहमी आढळणारा शब्द आहे. सोळा संस्कारांपैकी एका महत्वपूर्ण संस्काराचे हे नाव आहे. 'चूडाकरण' हे त्याचे मूळ नाव. मूल जन्मस्थानापासून तिसऱ्यावर्षी हा संस्कार केला जातो. एक चूडा म्हणजेच शेंडी ठेऊन मस्तकावरील सर्व केस (जन्मापासून असलेले) काढून टाकतात.

**४. त्रयी** : म्हणजे वेदत्रयी. ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद अशा तीन वेदांना मिळून 'त्रयी' असे म्हणतात. प्राचीन काळी अथर्ववेदाला 'वेद' म्हणून मान्यता नसल्यामुळे तीन वेदांचेच अध्ययन करण्याची प्रथा होती.

**५. तिस्त्रः विद्या**: तीन विद्या. उत्तररामचरिताच्या दुसऱ्या अंकात उल्लेखिलेल्या तीन विद्या म्हणजे वार्ता, आन्वीक्षिकी व दण्डनीती होत. यापैकी 'वार्ता' मध्ये

कृषी, गोरक्षण व वाणिज्य या तीन विषयांचा समावेश होतो. आन्वीक्षिकी म्हणजे तर्कशास्त्र. दण्डनीती म्हणजे राज्यशास्त्र होय. या तीन विद्या म्हणजे तीन महत्वपूर्ण ज्ञानशाखा आहेत. ज्यांच्या अध्ययनामुळे लौकिक व पारलौकिक कल्याण होते. थोडक्यात अभ्युदय व श्रेयस दोहोंची प्राप्ती होते, असे कौटिल्यादि राजनीतीज्ञ सांगतात.

६. **पन्थानो देवयाना**: हा धर्मशास्त्रातील प्रचलित शब्द आहे. देवयान व पितृयान असे मृतात्म्यांच्या गतीचे दोन मार्ग मानले जातात. पुण्यवान व विद्वान मृतात्मे ज्या मार्गाने जाऊन मोक्षप्राप्ती करून घेतात. तो 'देवयान' मार्ग होय. अन्य मृतात्मे पितृयान मार्गाने जाऊन चंद्रलोकी जातात व पुन्हा कालांतराने पृथ्वीवर जन्म घेतात. या देवयान व पितृयान मार्गांना अनुक्रमे अर्चिरादि व धूमादि असेही म्हणतात. गीतेत यांचा उल्लेख 'शुक्ल व कृष्णगती' म्हणून येतो.

७. **प्राचेतस्**ः हा शब्द ह्या अंकात महर्षी वाल्मीकींसाठी वापरला गेला आहे. प्रचेतस् म्हणजे वरूण होय. वाल्मीकी हे वरूणाचा दहावा पुत्र मानले जातात, म्हणून प्राचेतस् असा त्यांचा उल्लेख येतो. 'प्रचेतसस्य अपत्यं पुमान्' असा या शब्दाचा विग्रह होऊ शकतो.

**(अ) ४.६. (ब) स्वयम् अध्ययनाची उत्तरे**:

**२) योग्य पर्याय**:

१) १) ब २) ड ३) अ ४) क ५)क

**(अ) ४.७ सारांश:-**

डोहाळे पुरविण्याच्या निमित्ताने रामचंद्राने सीतेला त्याग करण्याच्या हेतूने वनाला पाठविल्यानंतर बारा वर्षे निघून गेली. ह्या कालावधीत वाल्मिकी ऋषींनी दिव्य संदेश देणारी रामायण कथा काव्यामध्ये ग्रंथित केली. तसेच लव व कुश या बालकांचा सांभाळ करून त्यांना सर्व विद्या व धनुर्वेद शिकविला. ह्याच कालावधीत रामचंदाने अश्वमेध यज्ञ करावयाचे ठरविले आणि सीतेची पत्नी म्हणून सोन्याची प्रतिमा तयार केली आणि यज्ञीय अश्व संचारासाठी सोडला. तो अश्र हिंडत असताना त्याच्याबरोबर रामचंद्राने लक्ष्मणाचा पुत्र चंद्रकेतु ह्याला सैन्यांसह पाठविले. तसेच मृत ब्राह्मणपुत्राला जिवन्त करण्याच्या

हेतूने शम्बुक नामक शुद्र तपस्व्याचा वध करण्यासाठी रामचंद्र त्याचा शोध घेत पुष्पक विमानातून दण्डकारण्याकडे गेला. हा कथानकाचा भाग विष्कंभकातून समजतो.

मुख्य अंकात रामचंद्र जनस्थानात येतो. शम्बुकाचा वध करून त्याला दिव्यदेह प्राप्त करून देतो. तसेच शम्बुक हा रामचंद्राला दण्डकारण्यातील परिचित स्थळे दाखवितो. ती पाहून रामचंद्राची मनःस्थिती विचित्र होते. त्यानंतर अगस्ती ऋषींनी शम्बुकाकडून दिलेल्या निरोपानुसार पंचवटीमध्ये प्रवेश करण्यापूर्वी रामचंद्र अगस्ती ऋर्षीच्या आश्रमाला भेट देतो.

ह्या अंकात रामचंद्र अगस्ती ऋषींना भेटण्याच्या निमित्ताने पंचवटी प्रदेशात प्रवेश करतो, त्यामुळे वनवास काळातील घडलेल्या घटना रामचंद्राला आठवतात. हा कथानकाचा मुख्य भाग असल्याने भवभूतीने दुसऱ्या अंकाला पंचवटीप्रवेश असे नाव दिले आहे.

### (अ) ४.८ स्वाध्याय

**सरावासाठी प्रश्न:**

प्रश्न १. 'उत्तररामचरितम्' या नाटकातील 'पंचवटीप्रवेश' या दुसऱ्या अंकाचे महत्त्व स्पष्ट करा.

प्रश्न २. 'उत्तररामचरितम्' या नाटकातील 'पंचवटीप्रवेश' या दुसऱ्या अंकाचा सारांश लिहा.

प्रश्न ३. 'उत्तररामचरितम्' या नाटकातील दुसऱ्या अंकामधील नाट्यदृष्ट्या शम्बुकवधाचे महत्त्व
कथन करा.

### (अ) ४.९ क्षेत्रीय कार्य

जवळच्या ग्रंथालयातून रामायण महाकाव्य तसेच रामचरित्रावर आधारित ग्रंथ मिळवून वाचणे.

### (अ) ४.१० अधिक वाचनासाठी पुस्तके :

**प्राथमिक स्रोत**

१. उत्तरराचरितमम्, (मराठी) हातवळणे दि. मो., केळकर म. मो. / पहिली आवृत्ती, १९६५

२.  उत्तररराचरितम्, (हिन्दी) त्रिपाठी रमाशंकर, चौखम्बा कृष्णदास अकादमी, वाराणसी, तृतीय
संस्करण, २०१४

**दुय्यम स्रोत**

१.  राय गंगासागर ,महाकवी भवभूति, चौखम्बा विद्याभवन, वाराणसी द्वितीय संस्करण,१९९०

२.  करंबळेकर वि. वा ., संस्कृत साहित्याचा सोपपत्तिक इतिहास, मॉडर्न बुक डेपो, पुणे, प्रथमावृत्ती, १९५४

## घटक क्रमांक ४
## उत्तररामचरितम् (तिसरा अंक-स्थूल अध्ययन)

**(ब) - तिसरा अंक- छायाङ्क**

**४.१ उद्दिष्ट्ये**
**४.२ प्रस्तावना**
**४.३ विषय विवेचन**
**४.४ स्वयं अध्ययनाचे प्रश्न**
**४.५ स्वयं अध्ययनाच्या प्रश्नाची उत्तरे**
**४.६ सारांश**
**४.७ स्वाध्याय**
**४.८ क्षेत्रीय कार्य**
**४.९ अधिक वाचनासाठी**

**(ब) ४.१ उद्दिष्ट्ये:**

१) तिसरा अंक 'छाया' याचा परिचय होईल.
२) छायारूपातील सीतेचा प्रवेश हा भवभूतिच्या कल्पक नाट्यतंत्राचा परिचय होईल.
३) तमसा व मुरला या नद्यांचा प्रवेश व त्यांच्यातील संवादाचे महत्त्व स्पष्ट होईल.
४) रामचंद्राचे सीतेवरील प्रेम व सीतेचे रामचंद्रावरील निःस्सीम प्रेम त्या दोघांच्या संवादातून कळून येईल.
४) छायांक याचे महत्त्व अधोरेखित होईल/ कळेल.

**(ब) ४.२ प्रस्तावना:**

दुसऱ्या अंकाच्या शेवटी रामचंद्र अगस्ती मुनींच्या निमंत्रणानुसार त्यांच्या आश्रमाकडे जाण्यास निघाल्याचे सांगितलेले आहे. त्यानुसार अगस्ती मुनींच्या भेटीनंतर रामचंद्र पंचवटीला येणार आहे. दोन अंकामधील ही घटना सांगण्यासाठी भवभूतीने तमसा व मुरला या दोन नद्यांच्या प्रवेशाची योजना केलेला शुध्दविष्कम्भक अंकापूर्वीच आला

आहे. त्यातून पंचवटीतील पूर्वस्मृती आठवून तो मूर्च्छित झाल्यास त्याला सावध करण्यासाठी भागीरथीने सीतेला अदृश्यरूपात राहण्याची योजना केली आहे. त्यामुळे रामचंद्राला सीतेचे अन्तःकरण जाणता येईल आणि सीतेलाही रामचंद्राचे अंतःकरण जाणता येईल, अशी योजना ह्या अंकात केली आहे.

ह्या योजनेनुसार सीता अदृश्यरूपात राहून त्या त्या वेळी मूर्च्छित होणाऱ्या रामाला सीता सावध करते. सीतेने लव–कुशाला जन्म दिला असून त्यांना आता बारावे वर्ष लागले आहे. त्यामुळे बारावी मंगलसूत्राची गाठ बांधण्याच्या निमित्ताने सीतेला पंचवटीमध्ये पाठविण्याची व्यवस्था भागिरथीने केली आहे. त्यासाठी तमसेने सीतेबरोबर राहाण्याबाबतही सूचना केली आहे. सीतेचे पशुपक्षांवर अतोनात प्रेम होते, हे मोर व वन्यहतीच्या प्रसंगातून दाखविले आहे.

मुख्यतः रामचंद्र व सीता ह्यांचे एकमेकांवरील प्रेम एकमेकांना कळावे, यासाठी छायारूपातील सीतेचा प्रवेश भवभूतीने योजिला आहे. वासंतीला पाहून रामचंद्राच्या आठवणी तीव्र होतात. ती रामचंद्राशी कठोरपणे बोलते. त्यामुळे रामचंद्र अधिक दुःखी होतो. ह्या योजनेमुळे सीतेला रामचंद्राचे प्रेम कळून येते. अश्वमेध यज्ञासाठी रामचंद्राने सीतेची सोनेरी प्रतिमा केली आहे, हेही या अंकातून समजते. शेवटी अश्वमेध यज्ञासाठी रामचंद्राचे अयोध्येला गमन आणि सीतेचे बारावी मंगलसूत्र गाठ बांधण्यासाठी गंगेजवळ गमन झाल्याचे दाखवून अंक समाप्ती केलेली आहे.

**(ब) ४.३ विषयविवेचन**

**(भाषांतर)**

(त्यानंतर दोन नद्या प्रवेश करतात)

पहिली : हे मैत्रिणी मुरले, गोंधळल्यासारखी का बरे दिसतेस?

मुरला : हे मैत्रिणी तमसे, भगवान अगस्तीच्या पत्नीने लोपामुद्रेने नद्यांमध्ये श्रेष्ठ असलेल्या गोदावरीला निरोप सांगण्यासाठी मला पाठविले आहे. सूनेचा (सीतेचा) त्याग केल्यापासून तू जसे आणतेस;

भिन्नपणे न दिसणारा (परंतु) गंभीर असल्यामुळे अंतरंगात गूढ व भयंकर पीडा निर्माण करणारा असा रामाचा करूणरस पुटकाप्रमाणे आहे. ॥१॥

आणि त्यामुळे तशाप्रकारे आवडत्या माणसांवर आलेल्या आपत्तीतून झालेल्या जन्माने आणि अत्यंत वाढलेल्या मोठ्या शोकाच्या विस्ताराने रामचंद्र आता अत्यंत क्षीण झाला आहे. त्याला पाहून फुलाप्रमाणे कोमल असलेले माझे हृदय जणूकाही कंपित झाले आहे. आता परत येत असलेल्या रामचंद्राकडून पंचवटीत, वनामध्ये सीतेच्या सहवासाचे मुक्त साक्षीदार असलेले प्रदेश पाहिले जातीलच! स्वभावतःच रामचंद्र धीट असला तरी; अशाप्रकारच्या अवस्थेत अतिशय गंभीर व विस्तृत शोकाच्या क्षोभयुक्त आवेगामुळे त्या त्या प्रदेशात रामचंद्राच्या बाबतीत पावलोपावली मोठ्या चूका घडण्याचे प्रसंग शंका घेण्याच्या योग्यतेचे आहेत. तेव्हा हे भगवती गोदावरी, त्याबाबतीत तू सावधान राहावेस.

कमळाच्या परागांचा सुवास सामावून (आकर्षून) घेणाऱ्या जलकणांमुळे शीतल झालेल्या व तू पाठविलेल्या लाटांवरील वाऱ्याने; क्षणोक्षणी मूर्च्छित होणाऱ्या रामचंद्राच्या जीवाला हुशारी आण. ॥२॥

तमसा : हे सौजन्य स्नेहभावाला उचित असेच आहे. परंतु रामचंद्राला सावध करण्याचा मौलिक उपाय आज येथे जवळच आहे.

मुरला : कसा बरे?

तमसा : ऐक. असे म्हणतात की, पूर्वी वाल्मीकींच्या तपोवनाजवळ सीतेला सोडून लक्ष्मण परत गेल्यानंतर प्रसूतीच्या वेदनेमुळे दुःखाचा आवेग प्राप्त झालेल्या स्वतःला (स्वतःच्या शरीराला) सीतेने गंगेच्या प्रवाहात झोकून दिले. तेव्हा तेथेच तिने दोन बालकांना जन्म दिला. पृथ्वी व भागीरथी या दोघींनी स्वीकार केलेल्या तिला पाताळात नेले. स्तनपानाचा त्याग केल्यामुळे गंगादेवीने स्वतः तिच्या दोन्ही बालकांना महर्षी वाल्मीकींच्या हवाली केले.

मुरला : (आश्चर्याने)

जेथे उपकार करण्याचा भाव येतो; तेव्हा अशा प्रकारच्या लोकांच्याठिकाणी अत्यंत आश्चर्यकारक परिणाम निर्माण होतो. ॥३॥

तमसा : परंतु आता शम्बुकाच्या ह्या वृतान्तामुळे 'रामचंद्र जनस्थानात येण्याचा संभव आहे,' हे शरयूच्या मुखातून ऐकल्यावर भगवती लोपामुद्रेने स्नेहापोटी जी शंका घेतली होती; तीच शंका घेऊन कोणत्यातरी गृहकर्माच्या निमित्ताने भगवती भागीरथी गोदावरीला भेटण्यास आली आहे.

मुरला : भगवती, भागीरथीने चांगला विचार केला आहे.
खरोखर, राजधानीमध्ये स्थित असलेल्या, जगातील उत्कर्ष करणाऱ्या त्या त्या कार्यामध्ये मग्न झालेल्या रामचंद्राच्याबाबतीत मन गुंतविण्याची साधने निश्चितच आहेत. परंतु (कशातही) मग्न नसलेल्या आणि केवळ शोकाची सोबत असलेल्या रामचंद्राचा पंचवटीतील प्रवेश (म्हणजे) मोठा अनर्थच आहे. तेंव्हा आता देवी सीतेकडून रामचंद्र कसा बरे सावध होईल?

तमसा : याबाबतीत भगवती भागीरथीने म्हटले आहे की;
"देवांच्या यज्ञातून जन्मलेल्या हे बाळे सीते, आज बारावे वर्ष लागलेल्या चिरंजीव कुश आणि लव यांची बारावी सूत्रगाठ मारण्याचा मंगल सोहळा येत आहे. तेव्हा तुझे प्राचीन सासरे व ह्या मानव (मनापासून निर्माण झालेल्या) राजर्षी वंशाचे निर्माण करणाऱ्या व पाप नाहीसे करणाऱ्या सूर्यदेवाची स्वतःच्या हातांनी गोळा केलेल्या फुलांनी पूजा कर. आमच्या प्रभावाने पृथ्वीच्या पाठीवर संचार करणाऱ्या तुला वनदेवतादेखील पाहू शकणार नाहीत, मग मर्त्य मानवांच्या बाबतीत काय बोलावे?" मलाही आज्ञा केली आहे की, "हे तमसे, सूनबाई जानकी तुझ्यावर अत्यंत प्रेम करणारी आहे. म्हणून तूच तिच्यासोबत राहा." ती मी, आता तिने सांगितल्याप्रमाणे सीतेच्या मागे उभी आहे.

मुरला : मीदेखील हा वृत्तांत भगवती लोपामुद्रांना सांगते, रामचंद्रदेखील आला असेलच असा माझा तर्क आहे.

तमसा : तेंव्हा ही गोदावरीच्या डोहातून बाहेर पडून –

अतिशय फिकट व कृश कपोलामुळे सुन्दर असलेले, रूळणाऱ्या सैल वेणीने युक्त असे मुख धारण करीत असलेली; करूणेची मूर्तीच किंवा साक्षात् विरहव्यथाच असलेली ही जानकी वनाकडे येत आहे. ॥४॥

मुरला : खरेच ही ती;

शरदऋतूकालीन उन्हे ज्याप्रमाणे केवड्याच्या अंतर्भागातील पाकळीला कोमेजून टाकतात; त्याप्रमाणे देठापासून तोडलेल्या नाजूक पालवीप्रमाणे असलेल्या हृदयरूपी फुलाला वाळविणारा हा दीर्घकालीन भयंकर शोक हिच्या फिकट व कृश शरीराला ग्लानी आणीत आहे. ॥ ५॥

(असे म्हणून सभोवताली फिरून दोघी निघून जातात.)

(शुध्दविष्कम्भक)

(पडद्यामागे)

अनर्थ झाला ! अनर्थ झाला !

(नंतर फुले गोळा करण्यात मग्न असलेली आणि करूणेसह व औत्सुक्याने ऐकत असलेली सीता प्रवेश करते.)

सीता : अहाहा! माझी प्रिय मैत्रीण वासंती बोलत आहे, हे मी जाणते.

(पुन्हा पडद्यामध्ये)

सीतादेवीच्या स्वतःच्या हाताने गोळा केलेल्या 'सल्लकी' वृक्षाच्या पालवीच्या शेंड्यांनी सीतादेवीच्या पुढे पुढे करणारा जो हत्तीचा छावा पूर्वी वाढविला होता;

सीता : त्याचे काय बरे (झाले)?

(पुन्हा पडद्यामागे)

तो आपल्या वधूसह जलामध्ये क्रीडा करीत असताना, गर्वाने दुसऱ्या एका उद्दाम हत्तीश्रेष्ठाबरोबर चाल करून लढला जात आहे. ॥६॥

सीता : (गोंधळून काही पावले जाऊन)

आर्यपुत्र! वाचवा! माझ्या पुत्राला वाचवा! (आठवल्याप्रमाणे अभिनय करून, व्याकुळतेने) अरेरे! धिक्कार असो! अरेरे! धिक्कार असो! तेच चिरपरिचित शब्द पंचवटीदर्शनामुळे भन्दभाग्याची असलेल्या मला चिकटत आहेत. (माझ्या तोंडी येत आहेत.) अरेरे! आर्यपुत्र! (बेशुध्द होते.)

(प्रवेश करून)

तमसा : हे बाळे! सावध हो.

(पडद्यामध्ये)

हे विमानश्रेष्ठा! येथेच थांब.

सीता : (सावध होऊन, धांदलीने उल्लसित होत) अहाहा! पाण्याच्या भाराने भारावलेल्या मेघाच्या मन्द गडगडाटाप्रमाणे गंभीर व भारदस्त असा हा कोठून बरे येणारा वाणीचा उच्चार कर्णविविरे बधीर झालेल्या मन्दभाग्य असलेल्या मला एकदम उत्सुक करीत आहे.

तमसा : (स्नेहाने व अश्रू ढाळीत) हे बाळे!

कोठून तरी येणारा व अस्पष्ट असलेल्या आवाजाने तू मेघगर्जनेच्यावेळी लांडोरी जशी चकित व उत्कंठित होते. त्याप्रमाणे तू चकित व उत्कंठित झाली आहेस.॥७॥

सीता : हे भगवती! अस्पष्ट असे का बरे म्हणतेस? स्वरांच्या संयोगामुळे आर्यपुत्रांनीच उच्चारलेले हे शब्द मी ओळखते.

तमसा : तप करणाऱ्या शुद्राला शिक्षा करण्यासाठी इक्ष्वाकू वंशाचा राजा (राम) जनस्थानामध्ये आला आहे, असे ऐकिवात आहे, म्हणतात.

सीता : सुदैवाने तो राजा खरोखरच राजधर्माबाबत दक्ष आहे.

(पडद्यामध्ये)

जेथे वृक्षदेखील व हरिणेसुध्दा माझे बांधव होते; ज्याठिकाणी प्रियेसह संचार करणारा मी दीर्घकाळ राहिलो; तेच हे पुष्कळ झरे व गुहा असलेले गोदावरीच्या परिसरातील पर्वतांचे काठ होत. ॥८ ॥

सीता : (पाहून) पहाटेच्या चंद्रबिंबाप्रमाणे पांढुरक्या व वाळून कृश झालेल्या

आकृतीने केवळ स्वतःच्या सौम्य व गंभीर प्रभावानेच हे आर्यपुत्र आहेत, असे ओळखणेच योग्य आहेत. हे भगवती तमसे! मला सावर.

तमसा : हे बाळे ! सावध हो.

(पडद्यामध्ये)

ह्या पंचवटीच्या दर्शनामुळे;

आतमध्ये दडलेल्या आणि आज जोराने पेट घेणाऱ्या दुःखरूपी अग्नीच्या धूराचा जणू काळलोटच असलेला हा मोह मला अगोदरच वेढून टाकीत आहे. ॥९॥

हाय! प्रिये! जानकी!

तमसा : (स्वतःशी) गुरूजनांनी शंका घेतलेले हेच ते!

सीता : (सावध होऊन) हाय! हे कसे बरे?

(पुन्हा पडद्यामध्ये)

हाय! देवी! दण्डकारण्यामध्ये वास्तव्य केलेल्या प्रिय मैत्रिणी। विदेह देशाच्या राजकन्ये!

सीता : हाय! धिक्कार असो! धिक्कार असो. मन्दभाग्याची असलेल्या मला

(उद्देशून) बोलून ------

निलकमलाप्रमाणे असलेले नेत्र मिटवून (आर्यपुत्र) मूर्च्छित झाले आहेत. हाय! धरणीच्या पाठीवर कोंडलेला श्वास सहन न करणारे हे अस्ताव्यस्त पडले आहेत. हे भगवती तमसे! वाचव! वाचव! आर्यपुत्रांना जीवदान दे!

(असे म्हणून तमसेच्या पाया पडते.)

तमसा : हे कल्याणी सीते! खरोखरच, तू या जगाच्या स्वामीला (रामाला) जीवदान दे. तुझा हात प्रिय स्पर्श करणारा आहे आणि त्यालाच हा आसुसलेला आहे. ॥१०॥

सीता : जे व्हायचे ते होऊ दे. भगवती जशी आपली आज्ञा! (असे म्हणून गोंधळून निघून जाते.)

(त्यानंतर जमिनीवर पडलेला; अश्रुपूर्ण नेत्रांनी सीतेकडून स्पर्श केला गेलेला आणि आनंदाने सुस्कारा टाकणारा राम प्रवेश करतो.)

सीता : (किंचित आनंदाने) त्रैलोक्याचे जीवित जणूकाही पुन्हा परत आले आहे, असे मला वाटते.

राम : छान! अहो! हे काय बरे आहे?

दिव्य चंदनवृक्षाच्या पालवीचा हा द्रव तर नसेल? पिळलेल्या चंद्रकिरणरूपी अंकूराचा हा शिडकावा तर नसेल ना? माझ्या संतप्त जीविताला पूर्णपणे संतुष्ट करणारा, संजीवनी वनस्पतीचा हृदयावर शिंपडलेला रस तर नसेल ना? ॥११॥

(आणखी देखील)

जीवन देणारा व मनाला पूर्णपणे संतुष्ट करणारा पूर्वीचा परिचित असलेला तोच स्पर्श आहे की, जो संतापामुळे निर्माण झालेल्या मूर्च्छेला तात्काळ टाकून देऊन आनंद पुन्हा बधिरता उत्पन्न करीत आहे. ॥१२॥

सीता : (घाबरून, थरथर कापून व बाजूला जाऊन) आता मला एवढेच पुष्कळ आहे.

राम : (बसून) प्रेमळ असलेल्या सीतादेवीने माझ्यावर अनुग्रह तर केला नसेल ना?

सीता : हाय! धिक्कार असो, धिक्कार असो! आर्यपुत्र काय म्हणून मला शोधत असतील?

राम : ठीक आहे! पाहतो.

सीता : हे भगवती तमसे, आपण तर दूर जाऊया. मला पाहिले तर अनुज्ञा नसताना मी जवळ राहिल्यामुळे राजा माझ्यावर अधिकच रागावेल.

तमसा : अगं बाळे, भागीरथीच्या प्रसादामुळे तू वनदेवांनासुध्दा न दिसणारी झाली आहेस.

सीता : हां, हे असेच आहे.

राम : प्रिये! जानकी!

सीता : (सदगद् वाणीने) आर्यपुत्र, खरोखर या वृत्तान्ताला हे साजेसे नाही. (अश्रू ढाळीत) किंवा अनेक जन्मांमध्येदेखील दुर्लभ असलेले दर्शन न संभवणाऱ्या मन्दभाग्याच्या मलाच उद्देशून अशाप्रकारे प्रेमळपणे बोलणाऱ्या आर्यपुत्रांच्या- बाबतीत मी काय म्हणून कठोर व्हावे बरे। मी ह्यांचे अन्तःकरण जाणते, आणि हेदेखील माझे अन्तःकरण जाणतात.

राम : (सर्वत्र पाहून, खिन्नतेने) हाय । येथे तर काहीच नाही.

सीता : हे भगवती तमसे! तशाप्रकारे कारणावाचून त्याग केलेल्या माझ्या हृदयाची अवस्था, ह्यांच्या अशाप्रकारच्या दर्शनाने कशी बरे होईल?

तमसा : जाणते बाळे! मी जाणते.

निराशेमुळे तटस्थ झाले असले तरी; अप्रिय गोष्ट झाल्यामुळे कलुषित झालेले, ह्या दीर्घकालीन वियोगामध्ये अचानक घडलेल्या (भेटीच्या) घटनेने जणूकाही स्तंभित झालेले, सौजन्यामुळे प्रसन्न झालेले, प्रियकराच्या करूणेमुळे अतिशय करूण झालेले, तुझे हृदय याक्षणी जणूकाही प्रेमामुळे द्रवू लागले आहे. ॥१३॥

राम : हे राणी!

जणूकाही मूर्तिमंत प्रसाद असलेला, स्नेहामुळे आर्द्र व शीतल असलेला तुझा हस्तस्पर्श अजूनही मला आनंदित करीत आहे. परंतु, आनंद देणारी ती तू मात्र कोठे आहेस बरे! ॥१४॥

सीता : खरोखर गाढ मनातील प्रेमाचे भांडार दाखविणारे, आनंद पाझरणारे अमृतमयी असे हे ते आर्यपुत्रांचे बोल आहेत की, ज्यांच्या प्रचितीमुळे कारणावाचून केलेल्या त्यागाने दुखावलेले असले तरी मला झालेला जन्माचा लाभ (मला) प्रिय वाटतो.

राम : किंवा प्रियतमा कोठून बरे असेल? बहुधा सतत चिंतन करण्याच्या निपुणतेमुळे स्वीकारलेला हा रामचंद्राचा भ्रम असावा.

(पडद्यामध्ये) अहो! मोठा अनर्थ मोठा अनर्थ (सीतेने स्वहस्ते, इ. श्लोकार्थ (३–६) म्हटला जातो.)

राम : (करूणेने व उत्सुकतेने) त्याचे काय?

(पुन्हा पडद्यामध्ये वधूसह इ. असा उत्तरार्ध म्हटला जातो.)

सीता : आता कोण बरे झुंज देईल?

राम : कोठे आहे? कोठे आहे तो दुरात्मा? की, जो माझ्या प्रियेच्या (मानलेल्या) मुलावर तो आपल्या प्रेयसीसह (विहार करीत) असताना हल्ला करीत आहे. (असे म्हणून उठतो.)

(प्रवेश करून गोंधळलेली)

वासंती : काय? हे महाराज रामचंद्र, घाई करा.

सीता : काय? माझी प्रिय मैत्रिण वासंती!

राम : (निरखून) काय? देवीची प्रिय मैत्रिण वासंती!

वासंती : महाराज I त्वरा करा, त्वरा करा. इकडून जटायू शिखराच्या दक्षिण दिशेने, सीतातीर्थाने गोदावरी नदीमध्ये उतरून महाराजांनी सीतादेवीच्या मुलाची संभावना करावी.

सीता : हाय! बाबा जटायू! तुझ्यावाचून हे जनस्थान ओसाड झाले आहे.

राम : अहाहा! खरोखर कथनाच्या ओघातील हे उल्लेख हृदयाची मर्मे छेदून टाकणारे आहेत.

वासंती : इकडून, इकडून यावे महाराजांनी!

सीता : हे भगवती तमसे! खरोखरच, वनदेवतादेखील मला पाहू शकत नाहीत ना?

तमसा : अगं बाळे, मंदाकिनीदेवीचे ऐश्वर्य सर्व देवतांहून अधिक श्रेष्ठ आहे. तर मग काय म्हणून शंका घेत आहेस?

सीता : तर मग आपण दोघी (यांच्या) मागोमाग जाऊया.

(असे म्हणून इकडे तिकडे फिरते.)

राम : भगवती गोदावरी! तुला नमस्कार असो.

वासंती : (निरखून) महाराज! वधूसह असलेल्या देवी सीतेच्या (मानलेल्या)

पुत्राने विजय मिळविल्यामुळे आनंदित व्हा.

राम : हे चिरंजीव! तू विजयी हो.

सीता : अहो! माझा (मानलेला) बाळ, एवढा (मोठा) झाला.

राम : हाय! देवी! सुदैवाने तुझा उत्कर्ष होत आहे.

हे सुंदरी । उगवणाऱ्या कमलतंतूप्रमाणे स्निग्ध असलेल्या दातांच्या कोंबाप्रमाणे ज्याने तुझ्या कानाच्या मूळातून लवलीची पालवी ओढून घेतली; तो तुझा हा (मानलेला) पुत्र मदोन्मत्त हत्तींना जिंकणारा झाला आहे. तरूण वयामध्ये जे कल्याणकारक आहे; त्याच्याबाबतीत योग्य स्थान झाला आहे. ॥१५॥

सीता : हाय, दीर्घायुषी, आता सौम्यदर्शन असलेल्या या हत्तीणींकडून नियुक्त न होवो.

राम : हे मैत्रिणी वासंती, पहा, पहा प्रियेला संतुष्ट ठेवण्याचे चातुर्यदेखील या बाळाने शिकून घेतले आहे.

सहजपणे उपटलेल्या कमळाच्या कांड्यांच्या घासाच्या तुकड्यांमध्ये तयार झालेल्या व विकसित कमळाच्या सुगंधाने सुगंधित झालेल्या पाण्याच्या चूळा (हिला) भरविल्या. सोंडेने पाण्याच्या फवाऱ्याने सिंचन केले आणि मनसोक्त आराम करण्याकरिता प्रेमाने सरळ दांडा असलेले कमलिनीचे जे पान आहे. ते छत्र म्हणून धारण केले आहे. ॥१६॥

सीता : हे देवी तमसे! हा तर अशाप्रकारचा झाला आहे, परंतु ते दोघे कुश व लव इतक्या वर्षांनंतर कशाप्रकारचे झाले असतील ते मला माहीत नाही.

तमसा : जसा हा झाला आहे, त्याप्रमाणेच ते दोघेही झाले असतील.

सीता : मी अशाप्रकारची मन्दभाग्याची आहे की, केवळ मला आर्यपुत्रांचा सहन न होणारा वियोग झालेला नाही तर, पुत्रांचादेखील विरह झाला आहे.

तमसा : अशी ही घडणारी गोष्टच होती.

सीता : किंवा नवप्रसूत झालेल्या अशा माझा काय बरे उपयोग! की ज्या आर्यपुत्रांनी तशाप्रकारच्या माझ्या पुत्रांची किंचित विरळ, कोमल व शुभ्र दातांनी उजळलेली, बोबडे बोल व हास्य असलेली, मस्तकावरील काकपक्षाप्रमाणे शेंडीची झुलुपे रूळणारी, निर्मळ व गौर वर्ण असलेली मुखकमले चुंबिली नाहीत.

तमसा : देवतांच्या कृपेने (तसे) होवो.

सीता : हे देवी तमसे। ह्या मुलांच्या आठवणीने स्तने उचंबळून पान्हा फुटलेली आणि बाळांच्या पित्याच्या उपस्थितीमुळे मी क्षणभर संसारिणी झाले आहे.

तमसा : ह्याबाबतीत काय बरे बोलावे? संतती म्हणजे प्रेमाची उत्कृष्ट सीमाच होय. (संतती) हे मातापित्याचे एकमेकांना जोडणारे श्रेष्ठ बंधनच होय.

स्नेहाच्या आश्रयामुळे पतिपत्नीच्या अन्तःकरणरूपी तत्त्वाची ही एक आनंदाची गाठच आहे; असे म्हटले जाते. ॥१७॥

वासन्ती : महाराजांनी इकडेदेखील पाहावे.

नुकताच मोहक व चंचल पिसारा बाहेर पडलेला आणि तुझ्या प्रियेने दररोज ज्याला (खाऊ घालून) वाढविले; तो रत्नमुकुटाप्रमाणे उंच तुरा असलेला; तुझ्या पत्नीचा सोबती असलेला हा मोर कदम्ब वृक्षावर केकारव करीत आहे. ॥१८॥

सीता : (कौतुकाने व स्नेहपूर्वक अश्रू ढाळीत) हाच तो आहे.

राम : बाळा, आनंदित हो. आज आम्ही तुझा आनंद वाढवितो.

सीता : असेच होवो.

राम : (नृत्याच्या वेळी) गिरक्या घेत असतांना, जिच्या डोळ्यांचा अन्तर्भाग वर्तुळाकृती झाला आहे; हलणाऱ्या चंचल भूवयांचे ताण्डवनृत्य करून भूषित केलेल्या आणि हातरूपी पल्लवांच्या मोहक तालावर नृत्य करीत असलेल्या जणूकाही पुत्रांप्रमाणे असलेल्या तुला मी वात्सल्ययुक्त मनाने आठवित आहे. ॥१९॥

अरेरे! पशुदेखील परिचयाची जाणीव ठेवतात.

(श्लोकार्थ – पहिली ओळ)
कांहीशी फुले फुललेला हा कदम्बवृक्ष अत्यंत प्रिय असलेल्या (सीतेने) तिने वाढविला होता.

सीता : (अश्रू ढाळीत) आर्यपुत्रांनी चांगल्याप्रकारे ओळखले.

राम : (श्लोकार्थ – दुसरी ओळ) ज्याअर्थी हा नातलगांप्रमाणे ह्या वृक्षावर आनंदित होत आहे. (त्याअर्थी) हा पर्वतावरील मोर देवी सीतेची आठवण करीत आहे. ॥२०॥

वासन्ती : महाराजांनी येथे आसनाचा स्वीकार करावा.
(रामचंद्र बसतो.)

घनदाट कोवळ्या केळीच्या वनाच्या मध्यभागी असलेले पत्नीसह शयन करण्याचे हे तुझे शिलातल आहे. येथे असलेल्या सीतेने ह्या हरिणांना पुष्कळ वेळा गवत दिले होते. त्यामुळे हरणांकडून हे ठिकाण सोडले जात नाही. ॥२१॥

राम : हे दृश्य तर आता पाहाणेही शक्य नाही. (असे बोलून रडत इतरत्र बसतो.)

सीता : हे मैत्रिणी वासन्ती!
हे दृश्य दाखवून माझ्या व आर्यपुत्रांच्या बाबतीत तू काय बरे केलेस? हाय! धिक्कार असो. हाय! धिक्कार असो. तेच आर्यपुत्र! तेच पंचवटी अरण्य! तीच प्रियसखी वासन्ती! तेच विविध विलासांचे साक्षीदार असलेले गोदावरीकाठचे वनप्रदेश! तेच संततीप्रमाणे असलेले पशू, पक्षी व झाडे! आणि मीही तीच आहे! परन्तु मन्दभाग्याच्या मला हे सर्व दिसत असूनही दिसत नसल्यासारखे झाले आहे.
ह्याप्रमाणे तो अशाप्रकारचा जीवलोकामध्ये परिणाम झाला आहे.

वासन्ती : हे मैत्रिणी सीते ! रामचन्द्राच्या अवस्थेला तू कशी बरे पाहात नाहीस?

ताज्या नीलकमलाप्रमाणे तुकतुकीत असलेल्या अवयवांनी नेत्रांना आनंद देणारा जो राम आम्हाला सतत इच्छेनुसार पाहता येत असूनही नवा नवा वाटत असे; तो इंद्रिय दुर्बळ झालेला, पांढुरकी कांती

असलेल्या दुःखामुळे सर्व बाजूंनी खचलेला राम तोच हा आहे, असे कसे तरी ओळखता येण्यासारखा असला तरीही नेत्रांना प्रियच वाटतो. ॥२२॥

सीता : पाहात आहे; मैत्रिणी! मी पाहात आहे.

तमसा : प्रियकराला पुन्हा पाहणारी हो.

सीता : हाय रे देवा! हे माझ्याशिवाय आणि मी ह्यांच्याशिवाय असेन; अशी स्वप्नांत तरी कोणी कल्पना केली होती बरे? तेव्हा पुनर्जन्मानंतर जणूकाही दर्शन लाभलेल्या प्रेमळ आर्यपुत्रांना अश्रूजलांमधून मी क्षणभर पाहाते.

तमसा : (आलिंगन देऊन, अश्रू ढाळीत)

आनंद व शोकाने निर्माण झालेल्या, प्रचंड पूर आलेल्या चंचल अश्रूना निर्माण करणारी; सुंदर पापण्यांना उंच व लांबवर पसरलेली; स्नेहाचा वर्षाव करणारी; दुधाच्या पाटाप्रमाणे शुभ्र, मधूर व मोहक असलेली दृष्टी जणूकाही आपल्या हृदयातील ईश्वराला स्नान घालीत आहे. ॥२३॥

वासन्ती : मध वाहणारे वृक्ष फुलांनी व फळांनी अर्घ्य देवोत. नेहमी फुललेल्या कमळांच्या सुगंधाने भरलेले अरण्यातील वारे जोराने वाहोत. मंजूळ कंठ असलेले पक्षी सतत मधुर कलकलाट करोत. कारण हे रामचन्द्र महाराज पुन्हा वनात आले आहेत. ॥२४॥

राम : मैत्रिणी वासन्ती! चल. येथे बस.

वासन्ती : (बसून, अश्रू ढाळीत) महाराज! लक्ष्मणाचे कुशल आहे ना?

राम : (न ऐकल्यासारखे करून)

आपल्या करकमळांनी पाणी, निवारधान्य व गवत दिलेल्या, वृक्ष, पक्षी, हरिण यांना सीतेने वाढविले; त्यांना पाहाताच दगड फोडणारा योग्य असा जणूकाही हृदयाचा रसच असलेला भावच माझ्याविकाणी निर्माण होत आहे. ॥२५॥

वासन्ती : महाराज! मी विचारीत आहे की, कुमार लक्ष्मणाचे कुशल आहे ना?

राम : (स्वतःशी) अरे। 'महाराज' असे प्रेमरहित संबोधन आणि अश्रू यांनी अडखळणाऱ्या अक्षरांनी कुशलविषयक प्रश्न त्यावरून असे वाटते की, हिला सीतेची हकिकत कळली असावी (उघडपणे) हां! कुमार लक्ष्मणाचे कुशल आहे.

वासन्ती : (रडत) हे महाराज । खरोखर इतके कठोर का बरे झाला आहात?

सीता : मैत्रिणी वासन्ती! तू असे का बरे बोलत आहेस.खरोखर आर्यपुत्र सर्वांनाच प्रिय होण्यास योग्य आहेत, विशेषतः माझ्या प्रिय मैत्रिणीला!

वासन्ती : तू माझे जीवन आहेस. तू माझे दुसरे हृदय आहेस. तू माझ्या नेत्रांची चांदणी आहेस. तू माझ्या शरीरावरील अमृतवृष्टी आहेस. ह्याप्रकारे शेकडो प्रियवचनांनी त्या भोळ्या सीतेला खूश करून तिलाच किंवा नकोच. ह्याबाबतीत उत्तर दिले तर काय उपयोग? ॥२६॥

(असे बोलून बेशुध्द होते.)

तमसा : हिचे बोलण्यापासून परावृत्त होणे आणि बेशुध्द होणे, हे योग्यच आहे.

राम : हे मैत्रिणी । सावध हो; सावध हो ।

वासन्ती : (सावध होऊन) तर मग हे वाईट कार्य महाराजांनी का बरे केले?

सीता : हे मैत्रिणी वासन्ती! थांब, थांब!

राम : लोक सहन करणार नाहीत म्हणून.

वासन्ती : कोणत्या कारणासाठी सहन करणार नाहीत?

राम : तेच जाणतात काय ते.

तमसा : खूप काळाने तिरस्कार झाला.

वासन्ती : अरे कठोरा! तुला कीर्ती प्रिय आहे? असे म्हणतात. ह्याहून भयंकर अपकीती कोठून बरे असेल? हरिणीप्रमाणे नेत्र असलेल्या सीतेचे अरण्यात काय बरे झाले असेल? हे नाथ! तुला काय बरे वाटते? सांगा. ॥२७॥

सीता : मैत्रिणी वासन्ती । तूच भयंकर व कठोर आहेस; की जी तू दुःखाने पेटलेल्या आर्यपुत्रांना अधिकच पेटवित आहेस.

तमसा : प्रेम आणि शोक असे बोलण्यास प्रेरित करत आहे.

राम : मैत्रिणी, ह्याबाबतीत काय बरे वाटायचे आहे?

भ्यालेल्या एक वर्षाच्या हरिणाप्रमाणे चंचल दृष्टी असलेल्या आणि सर्व बाजूंनी स्फुरण पावणाऱ्या गर्भाच्या ओझ्याने आळसावलेल्या तिची (त्या सीतेची) जणू चन्द्रकिरणमय असलेली, मऊ व कोमल कमलदेठासारखी (नाजूक) असलेली शरीररूपी वेल हिंस्त्रश्वापदांनी निश्चितच गडप केली असावी. ॥२८॥

सीता : आर्यपुत्र! जीवन्त आहे. ही मी जिवन्त आहे.

राम : हाय! प्रिय जानकी तू कोठे बरे आहेस?

सीता : हाय! धिक्कार असो! हाय! धिक्कार असो!

जणूकाही दुसरेच कोणीतरी असल्याप्रमाणे आर्यपुत्र मुक्तकण्ठाने रडत आहेत.

तमसा : खरोखरच दुःखी व्यक्तींना दुःखाचे शमन करावेच लागते.

पूर्णपणे भरलेल्या सरोवराचे पाणी वाहू देणे हीच प्रतिक्रिया असते. दुःखाने क्षुब्ध झालेल्या हृदयाला मोठ्या विलापानीच सावरून धरावे लागते.॥२९॥

विशेषतः रामचन्द्राला हा जीवलोक अनेकप्रकारे कष्टकारक झाला आहे.

सावधचित्ताने त्या रामचन्द्राला ह्या विश्वाचे नियमानुसार पालन करावयाचे आहे. प्रियेविषयीचा शोक त्याच्या जीवाला फुलाप्रमाणे सुकवित आहे. स्वतः त्याग करून विलाप करून दुःखशमन करणेदेखील त्याला सुलभ नाही. म्हणून आज तो उच्छ्वास सोडीत आहे; खरोखर त्याचे रडणे हा लाभच आहे. ॥३०॥

राम : कष्टदायक आहे. अहो! हे कष्टदायक आहे.

गाढ उद्वेगाने भरलेले हे हृदय फुटत आहे; परन्तु ते दोन भागात वेगळे होत नाही. हा दुबळा झालेला देह मूर्छित होत आहे; परन्तु चैतन्याला सोडीत नाही. अन्तर्गत दाह देहाला जाळीत आहे.

(परन्तु) त्या शरीराला भस्मसात करीत नाही. दैव मर्माना छेदून टाकीत आहे. परन्तु जीवनाला तोडून टाकीत नाही. ॥३१॥

सीता : हे असेच आहे खरे!

राम : अहो नगरवासी लोकहो!

देवीसीतेचे माझ्या घरातील राहाणे आपणाला मान्य नव्हते; असे म्हणतात. म्हणून मी कस्पटाप्रमाणे तिला ओसाड वनात टाकून दिले आणि शोकाचा विचारही केला नाही. चिरपरिचित असलेले ते भाग मला विरघळून टाकीत आहेत. आज असहाय्य अशा आम्हाकडून रडले जात आहे. प्रसन्न व्हा! ॥३२॥

वासंती : (स्वतःशी) क्रोधाचा भार खूप खोलवर भरला आहे. (उघडपणे) महाराज! घडून गेलेल्या गोष्टीविषयी धैर्याचा अवलंब करा.

राम : मैत्रिणी! काय म्हणतेस? धीर धरावा!

देवी, नाहीशी झालेल्या जगाचे हे बारावे वर्ष आहे. तिचे नावही जणूकाही नाहीसे झाले आहे. परंतु राम जिवन्त नाही असेही नाही. ॥३३॥

सीता : आर्यपुत्रांच्या ह्या वचनांनी मी भूलले आहे.

तमसा : हे बाळे! हे असेच आहे.

प्रेमामुळे ओलावलेले व शोकामुळे भयंकर झालेले हे अत्यंत प्रिय असे शब्द नव्हेत; तर ह्या विषयुक्त मधाच्या धारा तुझ्यावर कोसळत आहेत ॥३४॥

राम : वासन्ती! खरोखर मी –

ज्याप्रमाणे एखादे ज्वलन्त अंगाराचे शल्य अन्नःकरणात तिरकस घुसावे; त्याप्रमाणे तीव्र असलेला शोकरुपी टोकदार खिळा हृदयामध्ये मर्माना कापीत असताना मी सहन केला नाही काय? ॥३५॥

सीता : आर्यपुत्रांना पुन्हादेखील कष्ट देणारी मी ह्याप्रमाणे मन्दभाग्याची झाली आहे.

राम : ह्याप्रमाणे अतिशय निश्चल व कठोर असे अन्तःकरण असलेल्या

माझा देखील परिचित असलेल्या वस्तूंच्या दर्शनाने हा आवेग अनावर होत आहे. कारण

मर्यादा ओलांडणाऱ्या माझ्या क्षुब्ध करुणरसाच्या विस्ताराला थांबविण्यासाठी जो जो प्रयत्न कष्टाने केला जातो. त्या त्या प्रयत्नाला हाणून पाडून आकुंठित वेग असलेला पाण्याचा प्रवाह वाळूच्या पूलाला तोडून जावा; त्याप्रमाणे बळजबरीने कोणता तरी मनोविकार अन्तःकरणात पसरु लागतो. ।।३६॥

सीता : आर्यपुत्रांच्या निवारण करण्यास कठिण असलेल्या ह्या दुःखाच्या संयोगामुळे माझे दुःख चोरलेले हृदय काहीसे सुन्न बनले आहे.

वासन्ती : (स्वतःशी) महाराज! कष्टाने पीडित झाले आहेत. तेव्हा त्यांना दुसरीकडे वळविते. दीर्घकाळापासून परिचित असलेल्या अशा ह्या जनस्थानातील भूभागाकडे पाहात महाराजांनी त्यांचा सन्मान करावा.

राम : असेच होवो. (असे म्हणून उठून फिरतो.)

सीता : प्रिय मैत्रिणीचा मनोविनोदनाचा उपहास हा दुःख भडकविणाराच आहे; असा माझा तर्क आहे.

वासन्ती : महाराज! महाराज!

ह्याच लताकुंजामध्ये तिच्या वाटेकडे डोळे लाऊन तू बसला होतास. (त्यावेळी) गोदावरीच्या वाळवंटामध्ये हंसाचे कौतुक केलेल्या तिला (परत येण्यास) खूप वेळ लागला. (परत) येत असलेल्या तिने मन खिन्न झाल्यासारखे झालेल्या तुला पाहून, घाबरल्यामुळे कमळाच्या कळीप्रमाणे मोहक कान्ती असलेली ओंजळ प्रणाम करण्यासाठी जोडली. ॥३७।।

सीता : भयंकर आहेस! वासन्ती! तू भयंकर आहेस! की जी तू हृदयातील मर्म उघडणारे शल्य चाळविणाऱ्या ह्या बोलांनी पुन्हापुन्हा मन्दभाग्याच्या मला व आर्यपुत्रांना संतप्त करीत आहेस.

राम : हे रागावलेल्या जानकी! तू इकडे तिकडे दिसत आहेस. पण दया दाखवीत नाहीस.

हाय! हाय! देवी! हृदय फुटत आहे. सांधे गळत आहेत. जग ओसाड झाले आहे, असे मला वाटते. चोहोबाजूच्या ज्वाळांनी मी आतल्या आत जळत आहे. माझा विधूर झालेला अन्तरात्मा गळून जात दाट अंधारात बुडत आहे. सर्व बाजूंनी मोह मला स्थगित करुन टाकत आहे. मन्दभाग्याचा असलेल्या मी (आता) कसे बरे करावे? ॥३८॥

(असे म्हणून मूर्च्छित होतो.)

सीता : हाय! धिक्कार असो! हाय! धिक्कार असो! आर्यपुत्र पुन्हा मूर्च्छीत झाले आहेत.

वासन्ती : महाराज सावध व्हा! सावध व्हा!

सीता : आर्यपुत्र! सर्व जीवलोकाचा पवित्र आधार असलेल्या तुम्हाला मन्दभाग्याची असलेल्या मला उद्देशून वारंवार संशयपूर्ण जीवन झाले असल्याने हा ह्या भयंकर अवस्थेचा परिणाम आहे! (असे म्हणून मूर्च्छित होते.)

तमसा : बाळे! सावध हो! सावध हो! तुझ्या हाताचा स्पर्श हाच पुन्हा रामचंद्राला सावध करण्याचा उपाय आहे.

वासन्ती : अजूनही कशी बरे सावध होत नाही? हाय! प्रिय मैत्रिणी सीते! तू कोठे आहेस? आपल्या प्राणेश्वराला सावध कर. (सीता गोंधळून, जवळ जाऊन रामचंद्राच्या हृदयास व कपाळाला स्पर्श करते.)

वासन्ती : सुदैवाने रामचंद्र शुध्दीवर आला.

राम : जणूकाही अमृतमय असलेल्या लेपांनी शरीरातील धातूंना आतून व बाहेरुनही लेप करीत असलेला हा एकत्रित स्पर्श मला अचानक पुन्हा जिवंत करीत; आनन्दाने जणूकाही वेगळाच मोह उत्पन्न करीत आहे. ॥ ३९ ॥

(आनन्दाने डोळे मिटताच)

मैत्रिणी वासन्ती! सुदैवाने तुझा उत्कर्ष होत आहे.

वासन्ती : महाराज! कसा बरे?

राम : मैत्रिणी! दुसरे काय? जानकी पुन्हा मिळाली आहे.

वासन्ती : हे महाराज रामचन्द्र! ती कोठे बरे आहे?

राम : (स्पर्शसुखाचा अभिनय करुन) पहा! ही तर पुढेच आहे.

वासन्ती : हे महाराज! मर्मच्छेद करणाऱ्या, अत्यन्त भयंकर असलेल्या निरर्थक बोलांनी प्रिय मैत्रिणीच्या दुःखाने दग्ध झालेल्या मन्दभाग्याच्या मला पुन्हा का बरे जाळीत आहेस?

सीता : मी जाऊ इच्छिते. परन्तु दीर्घकालीन सद्भावामुळे सौम्य व शीतल असलेल्या आर्यपुत्रांच्या स्पर्शाने दीर्घकालीन भयंकर संतापालाही अचानकपणे नष्ट करणारा, जणूकाही वज्रलेपाप्रमाणे बद्ध झालेला, घामेजून जाणारा, निश्चल असणारा व थरथर कापणारा माझा हात जणूकाही असाहाय्य बनला आहे.

राम : मैत्रिणी! हे निरर्थक बोल कोठून बरे आलेत?

(श्लोकार्थ)

विवाहविधीच्या वेळी कंकण बांधलेला जो (तुझा) हात मी पूर्वी स्वीकारला होता; दीर्घकाळ इच्छेनुसार केलेल्या स्पर्शामुळे आणि अमृतासमान असलेल्या शीतलतेमुळे तो परिचित आहे.

सीता : आर्यपुत्र आता आपण तेच आहात.

राम : (श्लोकार्थ) तोच हा बर्फाच्या ढिगाऱ्याप्रमाणे रमणीय आणि रायआवळीच्या पालवीप्रमाणे कांती असलेला तिचा हात मला लाभला आहे. ॥४०॥

(असे म्हणून हात हाती घेतो.)

सीता : हाय! धिक्कार असो! हाय! धिक्कार असो. आर्यपुत्रांच्या स्पर्शामुळे मोहित झालेल्या माझ्याकडून खरोखर चूक झाली आहे.

राम : हे मैत्रिणी वासन्ती! आनन्दाने इन्द्रियग्रस्त झालेला मी धांदलीमुळे परस्वाधीन झालो आहे. तेव्हा तूच हिला धर.

वासन्ती : कष्टदायक आहे. हे वेडच आहे. (सीता गोंधळून जाऊन हात ओढून बाजूला जाते.)

| | | |
|---|---|---|
| राम | : | हाय! धिक्कार असो! चूक झाली. |
| | | तिचा तो जड, कंप पावणारा व घामेजलेला करपल्लव, माझ्या जड, कंप पावणाऱ्या व घामेजलेल्या हातातून एकदमच निसटला. ॥४१॥ |
| सीता | : | हाय! धिक्कार असो! अस्थिर, निश्चल, मोहित गरगरणारे नेत्र असलेले हे अजूनही स्वतःला पुन्हा स्थिर करीत नाहीत. |
| तमसा | : | (प्रेमपूर्वक, कौतुकाने, स्मित करीत व सीतेला निरखून पाहात) |
| | | प्रियकराच्या स्पर्शाच्या सुखाने रोमांचित झालेली, घामेजलेली व अंग कापणारी ही बाला; जणूकाही वाऱ्याने हलविलेल्या, नूतन मेघांनी जलसिंचन केलेल्या व कळ्या फुललेल्या कदम्बाच्या फांदीप्रमाणे झाली आहे ॥४२॥ |
| सीता | : | (स्वतःशी) अहाहा! ह्या माझ्या स्वतःच्या पराधीनतेमुळे मी भगवती साध्वी तमसेकडून लज्जेला पात्र ठरले आहे. खरोखर ही काय बरे समजेल की हिचा हा त्याग । अन् काय हिची ही आसक्ती! |
| राम | : | (सर्वत्र पाहून) हाय! कशी बरे ती नाहीच! अगं करुणाहीन सीते । |
| सीता | : | खरोखरच मी निर्दयी आहे की! अशाप्रकारच्या तुम्हाला पाहणारी जी मी जगतच आहे. |
| राम | : | हे देवी! तू कोठे आहेस! प्रसन्न हो. अशाप्रकारच्या मला टाकून देणे हे तुला योग्य नाही. |
| सीता | : | अहो नाथ! हे जणूकाही उलटेच होत आहे. |
| वासन्ती | : | महाराज! प्रसन्न व्हा! प्रसन्न व्ह! स्वतःच्या लोकोत्तर धैर्याने आपल्या मर्यादेचे अतिक्रमण करणाऱ्या तुम्ही स्वतःला थांबवावे. माझी प्रिय मैत्रीण कोठे बरे आहे |
| राम | : | सीता नाही; हे उघडच आहे. |
| | | अन्यथा ती वासन्तीला कशी बरी दिसली नसती? खरोखर, हे स्वप्न असेल काय? मी झोपलेलो नव्हतो. रामचन्द्राला झोप कोठून बरे |

येईल? अनेकवेळा केलेल्या चिन्तनातून निर्माण झालेला तो हा भयानक विरह पुन्हा मला बांधत आहे.

सीता : निष्ठुर अशा माझ्याकडून आर्यपुत्राला फसविले गेले आहे.

वासन्ती : महाराज पहा, पाहा.

जटायूने मोडून टाकलेला रावणाचा हा लोखंडी रथ आहे आणि केवळ हाडे शिल्लक राहिलेली पिशाच्याप्रमाणे मुखे असलेली ही गाढवे पुढेच आहेत. (रावणाच्या) शस्त्राने तुटलेले जटायूचे पंख इकडे आहेत. चळचळ कापणाऱ्या सीतेला वाहून नेणारा शत्रू अन्तर्गर्भात चकाकणाऱ्या विजेनेयुक्त असणाऱ्या मेघाप्रमाणे येथे आकाशात वर उडाला. ॥४३॥

सीता : (भितीपूर्वक) आर्यपुत्र! तात जटायू मारले जात आहेत. मीदेखील अपहृत होत आहे. तेव्हा वाचवा!

राम : आवेशाने उठून) अरे पापी रावणा । तात जटायूचे प्राण व सीतेचे अपहरण करणारा तू कोठे जात आहेस?

वासन्ती : हे महाराज! राक्षसकुळाचा नाश करणाऱ्या धूमकेतो! तुझा रागाचा विषय अजूनही आहे काय?

सीता : अहाहा! मीदेखील भ्रमिष्ट झाले आहे.

राम : आता दुसरीच उलटापालट झाली आहे.

उपाय असल्याने सततच्या मनोरंजनाच्या अदलाबदलींनी, अडथळ्यांनी आणि वीरांच्या खेचाखेचीने जगामध्ये अद्‌भुत रस निर्माण झाल्यामुळे मोहक असलेल्या सीतेचा वियोग शत्रूचा नाश होईपर्यंतच टिकला. परंतु कालावधी निश्चित नसलेला आणि प्रतिकार न करता येणारा हा विरह स्तब्धपणे कसा बरे सहन करण्यास योग्य आहे? ॥४४॥

सीता : कालावधी निश्चित नाही ह्या शब्दांनी हाय! मन्दभाग्याची मी ठार मारली गेले आहे.

राम : हाय! कष्टकारक आहे.

जेथे माझी वानरश्रेष्ठांशी सख्य व्यर्थ ठरते. वानरांचा पराक्रम व्यर्थ ठरतो. जम्बुवानाची बुध्दीदेखील जेथे काही चालत नाही. विश्वकर्म्याचा पुत्र नलदेखील जेथे जाण्याचा मार्ग करण्यास समर्थ नाही. लक्ष्मणाच्या बाणांच्या टप्प्यातही नसलेल्या अशा कोणत्या ठिकाणी हे प्रिये! तू आहेस? ॥४५॥

सीता : त्यापूर्वीच्या विरहाने मी खूप सन्मानित झाले आहे.

राम : मैत्रिणी वासन्ती! आता रामाचे दर्शन दुःखालाच कारण ठरणार आहे. दीर्घकाळ मी तुला किती बरे रडावयास लावू? तेंव्हा मला जाण्यास संमती दे.

सीता : (उद्वेगपूर्वक व मूर्च्छापूर्वक तमसेला आलिंगन देऊन)
हे भगवती तमसे, हे आर्यपुत्र! आता मी निघाले. (असे म्हणून मूच्छित होते.)

तमसा : हे बाळे! सावध हो! सावध हो! चिरंजीव लवकुशांच्या वाढदिवसाचे मंगल क्षण साजरे करण्यासाठी भागीरथीजवळच आपण दोघी जाऊया.

सीता : हे भगवती! प्रसन्न हो. दर्शन दुर्लभ झालेल्या आर्यपुत्रांना क्षणमात्र तरी मी पाहते.

राम : तसेच अश्वमेध यज्ञासाठी मी सहधर्मचारिणी नियुक्त केली आहे.

सीता : आर्यपुत्र , कोण ती ?

वासंती : लग्नदेखील केले की काय ?

राम : नाही, नाही. सीतेची सुवर्णमयी प्रतिमा आहे.

सीता : (उसासा सोडून, अश्रुपूर्ण नेत्रांनी) आता तुम्ही आर्यपुत्र शोभत आहात! आता माझ्या त्यागरुपी लज्जेचे शल्य आर्यपुत्रांनी उखडून काढले.

राम : तेथेदेखील अश्रूनी भरलेल्या नेत्रांचे मनोरंजन करेल.

सीता : जी बहुमानिली जाते; तसेच जी आर्यपुत्रांचे मनोरंजन करीत जीवलोकाचा अशाबन्ध झाली आहे. ती धन्य आहे;

तमसा : (हसून, प्रेमाने अश्रुंनीयुक्त होऊन आलिंगन देऊन) अगं बाळे ।

अशारीतीने तू स्वतःची स्तुती करतेस.

सीता : (लज्जापूर्वक, खाली मान घालून व स्वतःशी) भगवतींकडून मी उपहासिली गेली आहे.

वासन्ती : हा संयोग आमच्याबाबतीत कृपाच आहे. जाण्याच्याबाबतीत जेणेकरुन काही हानी होणार नाही, तसे करावे.

राम : तसेच होवो !

सीता : आता वासन्ती माझ्याबाबतीत प्रतिकूल झाली आहे.

तमसा : बाळे! चल. जाऊया!

सीता : (कष्टपूर्वक) आपण दोघी असेच करुया.

तमसा : किंवा कसे बरे जाता येईल? ज्या तुझ्यासाठी –

प्रियकराच्या जणूकाही रोवलेल्या व तहानेने वाढलेल्या नेत्रांचा संयोग; मर्मच्छेदाप्रमाणे असलेल्या प्रयत्नांनी रोखून धरला जात आहे. ॥४६॥

सीता : पूर्वी कधीही न घडलेल्या पुण्याईने निर्माण झालेल्या आर्यपुत्रांच्या चरणकमलांच्या दर्शनाला नमस्कार असो.

(असे म्हणून मूर्छित होते.)

तमसा : हे बाळे, सावध हो! सावध हो!

सीता : (सावध होऊन) किती दीर्घकाळापर्यन्त मेघांच्या आड असलेल्या पौर्णिमेच्या चन्द्राचे दर्शन होईल.

तमसा : केवढे हे रचनेचे वैचित्र्य!

एकच करुणरस निमित्तभेदानुसार भिन्न असूनही जणूकाही वेगवेगळ्या परिणामांचा आश्रय करतो. ज्याप्रमाणे भोवरा, बुडबुडा, लाट इ. रुपातील विकार असले तरी ते सर्व पाणीच असते. ॥४७॥

राम : हे विमानराज! इकडे, इकडे यावे.

(सर्व उठतात.)

तमसा व वासन्ती :(सीता व राम ह्यांना उद्देशून)

आमच्या सारख्यांच्या समवेत पृथ्वी, गंगा व जे छंदाचे पहिले निर्माते आहेत; तसेच अरुंधतीसह संपूर्ण जगाला प्रसिद्‌ध करणारे कुलपती वसिष्ठ ऋषी आपले मंगल होण्यासाठी तुम्हाला कल्याणकारक गोष्टी देवोत. ॥४८॥

(असे म्हणून सर्वजण निघून जातात.)

(तृतीय अंक समाप्त)

(ब) **४.४** स्वयं अध्ययन प्रश्न

(ब) **४.४.१ मोठा प्रश्न**

**१) तिसऱ्या अंकातील शुध्द विष्कंभक स्पष्ट करा.**

**प्रस्तावना**:- भवभूती विरचित उत्तररामचरितम्‌ नामक नाटकातील तिसऱ्या अंकाच्या प्रारंभी शुध्द विष्कंभक आला आहे. ह्या शुध्द विष्कंभकामध्ये तमसा व पुरला ह्या दोन नद्यांना मूर्त रूप देण्यात आले आहे. ही दोन्ही पात्रे संस्कृतमधून बोलतात. ह्या शुध्द विष्कंभकातून दुसऱ्या अंकानंतरच्या घडलेल्या दीर्घकालातील घटना तमसा व मुरलेच्या संवादातून प्रेक्षकांना समजतात. त्या अशा–

**विषयविवेचन:-**

१. अंकाच्या प्रारंभी तमसा व मुरला ह्या दोन्ही नद्या मूर्तरूपात रंगभूमीवर प्रवेश करतात. त्यापैकी मुरला नदी तमसेला म्हणते की, 'अगस्ती महर्षिच्या पत्नीने म्हणजेच लोपामुद्रेने सर्वश्रेष्ठ अशा गोदावरी नदीला निरोप देण्यासाठी मला पाठविले आहे. कारण सीतेचा त्याग केल्यापासून रामचंद्राचा शोक आतल्या आत अंत करणामध्ये वाढत आहे. त्यामुळे त्या शोकाने रामचंद्र अतिशय क्षीण झाला आहे. त्यामुळे मलाही खूप दुःख झाले आहे. तो पंचवटीमध्ये आलेला आहे. पंचवटी प्रदेशात संचार करीत असतांना त्याला सीतेच्या सहवासातील ती ती ठिकाणे निश्चितच दिसणार आहेत. तो खंबीर मनाचा असला तरी सीताविषयक शोकाने ती ती ठिकाणे पाहून त्याच्यावर काळजी करण्यासारखे प्रसंग ओढविण्याची शक्यता आहे. म्हणून गोदावरीने ह्याबाबत रामचंद्राची काळजी घ्यावी. कमलपरागांचा सुवास घेऊन जाणाऱ्या जलकणांच्या तुषारांनी वारंवार मूर्च्छित होणाऱ्या

रामचंद्राला गोदावरीने सावध करावे, हा निरोप देण्यासाठी मी गोदावरी नदीकडे चालले आहे.'

२. ह्यानंतर तमसा नदी मूर्च्छित होणाऱ्या रामचंद्राला सावध करण्यासाठी खात्रीचा उपाय आहे; असे मुरलेला सांगते. तो असा 'पूर्वी लक्ष्मण सीतेला वाल्मिकींच्या आश्रमाजवळ सोडून निघून गेला. त्यावेळी सीतेला प्रसूतीच्या वेदना होऊ लागल्या. त्यामुळे शोकाकूल सीतेने आवेगाच्या भरात गंगानदीमध्ये आपला देह झोकून दिला. त्याचवेळी तिने गंगेच्या प्रवाहात दोन बालकांना जन्म दिला. तेव्हा पृथ्वी व भागीरथीने त्या दोन बालकांना व सीतेला पाताळामध्ये नेले. ती दोन बालके अंगावर पिण्याचे थांबल्यानंतर त्या दोघांनाही गंगामातेने वाल्मिकींच्या हवाली केले. तेव्हापासून सीता गंगानदीजवळ राहते.'

'शम्बुक'वधाच्या निमित्ताने रामचंद्र जनस्थानामध्ये येण्याची शक्यता आहे', असे शरयु नदीकडून ऐकल्यानंतर गंगा नदीलादेखील लोपामुद्रेप्रमाणेच रामचंद्राच्या स्थितीबाबत शंका आली आणि तिने धार्मिक संस्कारांच्या निमित्ताने सीतेला घेऊन गोदावरी नदीला भेटण्यासाठी जाण्याचे ठरविले आहे. त्यानिमित्त 'भगवान सूर्यनारायणाला स्वहस्ते फुले गोळा करून अर्पण कर. त्यासाठी ह्या भूतलावर संचार करीत असताना तुला कोणीही पाहणार नाही. त्यामुळे रामचंद्राच्या बाबतीत शोकाकूल परिस्थिती निर्माण झाल्यास अदृश्यरूपात असलेली सीता रामचंद्राला धीर देईल. त्यानुसार मीही आता सीतेच्या सानिध्यात राहणार आहे' असे तमसा बोलत असतानाच सीता वनाकडे येत असलेली तमसा व मुरला ह्या दोनही नद्यांना दिसते. सीतेला घेऊन गंगानदी गोदावरीच्या भेटीसाठी जाते.

ह्या शुध्द विष्कंभकातून पुढील गोष्टी कळतात –

१. शम्बुकवधाच्या निमित्ताने आलेल्या रामचंद्राला पंचवटीतील ठिकाणे पाहून वनवास काळातील स्मृती आठवतील. त्यामुळे रामचंद्र कदाचित शोकाकूल होईल, अशा अवस्थेत त्याला सावध करण्यासाठी गोदावरी नदी व छाया रुपातील सीता उपयुक्त ठरतील.

२. सीतात्यागानंतर लवकुशांच्या जन्माची हकीकत येथे विष्कंभकातून तमसेच्या तोंडून कळेल. तसेच छायारूपातील सीतेला रामचंद्राला धीर देता येईल, अशी व्यवस्था गंगानदीने केली आहे. त्यामुळे सीतेला रामचंद्राचे दर्शन घडेल आणि एकप्रकारे दोघांची दृष्टभेट होईल.

**आशय:-** ह्याप्रमाणे रंगभूमीवर न दाखवता येणाऱ्या आणि दुसऱ्या अंकानंतर घडलेल्या कथानकाची माहिती ह्या शुध्द विष्कंभकाच्या माध्यमातून प्रेक्षकांना कळते.

**२) छायांक याचे महत्त्व कथन करा.**

**प्रस्तावना**:- दुसऱ्या अंकाच्या शेवटी रामचंद्र अगस्ती मुनींच्या निमंत्रणानुसार त्यांच्या आश्रमाकडे जाण्यास निघाल्याचे सांगितलेले आहे. त्यानुसार अगस्ती मुनींच्या भेटीनंतर रामचंद्र पंचवटीला येणार आहे. दोन अंकामधील ही घटना सांगण्यासाठी भवभूतीने तमसा व मुरला या दोन नद्यांच्या प्रवेशाची योजना केलेला शुध्दविष्कम्भक अंकापूर्वीच आला आहे. त्यातून पंचवटीतील पूर्वस्मृती आठवून तो मूर्च्छित झाल्यास त्याला सावध करण्यासाठी भागीरथीने सीतेला अदृश्यरूपात राहण्याची योजना केली आहे. त्यामुळे रामचंद्राला सीतेचे अन्तःकरण जाणता येईल आणि सीतेलाही रामचंद्राचे अंतःकरण जाणता येईल, अशी योजना ह्या अंकात केली आहे.

**विषयविवेचन:-** कृश झालेल्या रामचंद्राला पंचवटीत हिंडत असताना आपल्या थंड जलावरून वाहणाऱ्या वायुलहरींनी उत्तेजित करावे अशी इच्छा गोदावरीने केली, त्यानुसार लोपामुद्रेने रामचंद्राला उत्साहित केले. ह्याचवेळी भागीरथी नदीने सीतेला तिच्या मुलांचा म्हणजे लव–कुशांचा बारावा वाढदिवस साजरा करण्याच्या हेतूने धार्मिकविधी पार पाडण्यासाठी पाताळातून दंडकारण्यात आणले आहे. रामचंद्र ज्यावेळी जनस्थानामध्ये येईल; त्यावेळी सीतेला त्याचे दर्शन घडेल. बारा वर्षानंतर सीतेला पाहून कदाचित रामचंद्र अत्यानंदाने मूर्च्छित होईल. अशावेळी आपल्या मृदु हस्तस्पर्शाने त्याला संजिवनी देण्यासाठी गंगेने सीतेला अदृश्य अवस्थेत म्हणजेच छाया रूपात रामचंद्राजवळ उपस्थित ठेवण्याची योजना केली आहे. त्यावेळी तमसा नामक नदी देवतेच्या रूपात सीतेला दिलासा देण्यासाठी तिच्यासोबत राहाते. हा कथाभाग तिसऱ्या अंकातील विष्कंभकामध्ये आला आहे.

मुख्य अंकाच्या प्रारंभी वनदेवता वासंती ही सीतेने पुत्राप्रमाणे मानलेला एक हत्तीचा छावा एका मदोन्मत अशा हत्तीश्रेष्ठाशी (गोदावरीची इच्छा रामचंद्राला उत्साहित करावे, लोपामुद्राने व भागीरथीने सीतेला पाताळातून दण्डकारण्यात पाठवले. गंगेने सीतेला अदृष्य रूपात ठेवले. तमसा नामक नदी देवतेच्या रूपात सीतेला दिलासा देण्यासाठी) झुंज देत असतांना पाहाते आणि त्या छाव्याच्या संरक्षणासाठी इकडे–तिकडे हाका मारू लागते.

ह्याचवेळी रामचंद्र पुष्पक विमानातून तेथे येतो. तेंव्हा त्याला तो हत्तीचा छावा विजयी झाल्याची हकीकत कळते.

त्याचवेळी छायारूपात असलेल्या सीतेला त्या हत्तीच्या छाव्याला पाहून आपल्या तरूण पुत्राची (लवकुशाची) आठवण होऊ लागते.

वनदेवता वासंती रामचंद्राला सीतेसमवेत पंचवटीतील सर्व भूभाग दाखविते. त्यावेळी सीतेसह पूर्वी आपण उपभोगलेले विविध भूभाग पाहून रामचंद्राला अत्यंत वाईट वाटू लागते. तसेच आपल्या प्रणयाचे साक्षीदार असलेले विविध भूप्रदेश पाहून पूर्वस्मृती अधिकच जागृत होऊन रामचंद्राला वारंवार मूर्च्छा येऊ लागते. त्यावेळी छायारूपातील सीता आपल्या स्वहस्तस्पर्शाने मूर्च्छित झालेल्या रामचंद्राला सावध करते. त्यामुळे सीता जीवंत असावी आणि ती जवळपास कोठेतरी असावी, अशी रामचंद्राला वारंवार शंका येते. वासंतीला मात्र त्याला होणारा हा सीतेचा भास, म्हणजे केवळ त्याची उन्मादावस्था असावी असे वाटते.

रामचंद्राने सीतेचा त्याग केल्याबद्दल वासंती रामचंद्राला अत्यंत कठोर भाषेत दूषणे देऊ लागते. परंतु छायारूपातील तेथे उपस्थित असलेल्या सीतेला वासंतीचे हे बोलणे रूचत नाही. रामचंद्राने जरी आपला त्याग केला असला तरी राम व वासंती यांच्या (वनदेवता वासंती पंचवटीतील सर्व प्रदेश दाखविते.) संवादातून सीतेला रामचंद्राचे आपल्यावरील निःस्सीम प्रेम दिसून येते आणि तिचे मन स्वच्छ होते. तसेच रामचंद्राने केलेल्या त्यागाचे झालेले दुःख पूर्णपणे नष्ट होते.

**आशय:-** ह्या अंकामध्ये सीतेचे छायारूपाने रामचंद्र व वासंतीच्याजवळ वावरणे त्यातून सीतेला रामचंद्राच्या मनाची जाणीव होणे ह्या गोष्टीतून ह्या अंकामधील सर्व घटना वेगाने घडून कथानकाला गती येते. ही घटना ह्या अंकात प्रमुख असल्याने भवभूतीने ह्या अंकाला 'छायांक' असे नाव दिले आहे.

**(ब) ४.४.२ योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा.**

१) सीतेला पाताळामध्ये... .......नेले.

अ) तमसेने ब) मुरलेने क) गंगा व तमसेने ड)पृथ्वीव भागीरथीने

२) गंगा नदी ........भेटण्यास आली होती.

अ) तमसेला  ब) लोपामुद्रेला   क) वासंतीला   ड) गोदावरीला

३) पशुपक्षी ……….जाणीव ठेवतात.

अ) कोणाचीही  ब) पूर्व परिचयाची  क) प्रिय व्यक्तीची  ड) अप्रिय व्यक्तीची

४) रामचंद्राला वासंतीने 'महाराज' असे वापरलेले संबोधन………. वाटते.

अ) ओळखीचे   ब) अयोग्य   क) कसेतरीच   ड) आपुलकीरहित

५) वन्यमोर………. रममाण होत आहे.

अ) बांधवा प्रमाणे ब) स्वजानां प्रमाणे क) आप्तांप्रमाणे  ड) घरोब्यांप्रमाणे

६) दुःखी व्यक्तींना……. करावेच लागते.

अ) प्रायश्चित्तब) दुःखाचे शमन  क) तीर्थगमन   ड) दुःख

७) ……….तरवः पुष्पैरर्घ्यफलैश्च मधुश्चुतः ।

अ) करोतु  ब) विसृजतु   क) ददतु   ड) व्याप्नोतु

८) अयि कठोर……. किल ते प्रियः ।

अ) कीर्तिः  ब) सुखम्   क) यशः   ड) पुष्यम्

९) ……….वाक्यनिवृत्तीर्मोहश्च ।

अ) योग्यः  ब) अयोग्यः   क) स्थाने  ड) अस्थाने

१०) विरहव्यथेव वनमेति………. |

अ) जानकी   ब) वासंती   क) तमसा  ड) मुरला

(ब) **४.५.२  स्वयम् अध्ययनाची उत्तरे**:

**२) योग्य पर्याय**:

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) ड | २) ड | ३) ब | ४) ड | ५) ब | ६) ब |
| ७) क | ८) क | ९) क | १०) अ | | |

(ब) **४.६ सारांश**:

मुरला नावाच्या नदीने तमसा नावाच्या नदीला म्हटले की, मी अगस्ती मुनींच्या पत्नी लोपामुद्रेच्या सांगण्यानुसार गोदावरी नदीला हे सांगण्यासाठी चालले आहे की, "रामचंद्र सीतेच्या वियोगाने खूपच दुर्बल झाले आहेत आणि अगस्तींच्या आश्रमातून परत आल्यानंतर पंचवटीला पोहोचल्यावर जेंव्हा त्यांना पूर्वीच्या हकिकतीचे स्मरण होईल;

तेंव्हा पावलो–पावली त्यांना सांभाळण्याची आवश्यकता वाटेल, म्हणून सावध राहावे." तमसा म्हणाली की, "हे औदार्य उत्तमच आहे. कारण ज्यावेळी वाल्मीकिच्या आश्रमाजवळ सीतेला लक्ष्मण सोडून गेला आणि सीतेला प्रसूतीच्या वेदना झाल्या. तेंव्हा ती गंगेमध्ये प्रविष्ट झाली. तिला दोन पुत्र झाले. पृथ्वी व भागीरथीने त्यांना सांभाळले. सीता पाताळाला गेली आणि दूध सुटल्यानंतर दोन्ही मुलांना भागीरथीने वाल्मीकिंच्या आश्रमात पोहोचविले आहे."

पंचवटीमध्ये रामचंद्र येण्याची शक्यता असल्याचे शरयूच्या तोंडून ऐकून भगवती भागीरथीने देखील जी शंका घेतली होती. तीच शंका लोपामुद्रेने घेतली होती. म्हणून सीतेबरोबर ती गोदावरीला भेटण्यासाठी गेली आणि सीतेला सांगितले की; आज कुश व लव यांच्या बाराव्या वाढदिवसाची मंगलगाठ बांधावयाची आहे. म्हणून आपली कुलदेवता असलेल्या सूर्याची पूजा कर. तसेच माझ्या प्रभावामुळे वनदेवतादेखील तुला पाहू शकणार नाहीत. मग सामान्य माणसांच्याबाबतीत काय बोलावे! भागीरथीने सीतेला अदृश्य बनवून तमसेबरोबर बाराव्या वर्षांच्या मंगलगाठीच्या निमित्ताने रामाचे रक्षण करण्यासाठी पंचवटीला पाठविले.

इकडे रामचंद्र अगस्तींच्या आश्रमातून निघून पंचवटीमध्ये आला आणि सीतेच्या सहवासातील पूर्वकाळातील आठवणीतील ठिकाणे पाहून मूर्च्छित झाला. तमसेने सांगितल्यानंतर सीतेने रामचंद्राला आपल्या हाताचा स्पर्श करून रामचंद्राला सावध केले. वासंतीदेखील रामचंद्राला भेटली आणि तिने सीतेसंबंधी रामचंद्राशी बोलणे केले. रामचंद्र व सीता दोघेही शोकाकूल झाले आणि विलाप करू लागले.

त्यानंतर सावध झालेला रामचंद्र अश्वमेध यज्ञ पूर्ण करण्यासाठी अयोध्येला निघून गेला आणि सीता आपल्या मुलांना बाराव्या वाढदिवसासाठी मंगलगाठ बांधण्यासाठी गंगेजवळ परत गेली.

**(ब) ४.७ स्वाध्याय**

**सरावासाठी प्रश्न** :

प्रश्न १. तिसऱ्या अंकातील विषय स्पष्ट करा.

प्रश्न २. छायांक याचा सारांश लिहा.

प्रश्न ३. तिसरा अंक ‘छाया’ याच्यातील विचार कथन करा.

**(ब) ४.८ क्षेत्रीय कार्य**

नजीकच्या ग्रंथालयातून उत्तररामचरितम् नाटक मिळवून त्याचे अभिवचन करा.

**(ब) ४.९ अधिक वाचनासाठी :**

**प्राथमिक स्रोत**

१. उत्तरराचरितमम्, (मराठी) हातवळणे दि. मो., केळकर म. मो. / पहिली आवृत्ती, १९६५

२. उत्तरराचरितम्, (हिन्दी) त्रिपाठी रमाशंकर, चौखम्बा कृष्णदास अकादमी, वाराणसी, तृतीय संस्करण, २०१४

**दुय्यम स्रोत**

१. राय गंगासागर, महाकवी भवभूति, चौखम्बा विद्याभवन, वाराणसी द्वितीय संस्करण,१९९०

२. करंबळेकर् वि. वा., संस्कृत साहित्याचा सोपपत्तिक इतिहास, मॉडर्न बुक डेपो, पुणे, प्रथमावृत्ती, १९५४